इनामदार बंधू
प्रकाशन



माझ्या जीवनाची सरगम / सी. रामचंद्र



माझ्या
जीवनाची

सरगम

सी. रामचंद्र

प्रकाशक
प्रमोद बाबुराव इनामदार
इनामदार बन्धु प्रकाशन
६३७ (नवा) सदाशिव, पुणे ३०

आवृत्ती १ ली : १२ जानेवारी १९७७

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणे ३०

मुखपृष्ठ / मांडणी
सुभाष अवचट

मूल्य १८·५० रुपये

यशवंत व रेशमा
माझ्या या दोन बाळांना
तसेच
माझ्या असंख्य चाहत्यांना आणि थोड्याशा निंदकांनाही

माझ्या
जीवनाची
सरगम

माझे
हे
दोन
मित्र
कविवर्य ग. दि. माडगूळकर व जयंत साळगावकर
यांचे मनःपूर्वक आभार
—सी. रामचंद्र

दोन शब्द : **त्याने शांति नभी गभीर लिहिली आम्हा न ती लाभते**
दिव्य प्रीति तये जगी पसरिली — आम्ही तियेची भुते
विश्वाच्या हृदयातल्या निवडुनी स्वर्गीय भावाप्रती
चित्रे रंगविली तये न कळती हा हंत आम्हास ती !

मला वाटते, मानवी आयुष्ये ही ईश्वराच्या मुखातून पाझरणारी गीते आहेत. प्रत्येक गीताची सुरावट वेगळी. राग, ताल वेगळा, सारखेपणा आढळला तर तो अपवाद. प्रत्येक गीताचा स्वर-विस्तार स्वतंत्र. भावदर्शनही वेगळे.

अशा गीताची सरगम लिहून लाभ काय ? एकासारखे जगणे दुसऱ्याला जमणार आहे थोडेच. जमले तरी, एकाचे यश का दुसऱ्याच्या पदरी पडणार आहे ? मग आत्मकथनाचा हा अट्टा-हास कशाला ? आपली अनुभूती दुसऱ्याला सांगणे हा कला-वंताचा स्वभाव आहे. मी स्वतःला एक नम्र कलावंत समजतो. ईश्वराने अभावितपणे गायलेले माझे जीवनगीत, म्हणूनच मी अक्षरबद्ध करतो आहे. अनंताचे गीत सुबोध असेल कसे ? स्वरा-स्वरांच्या विसंवादानेही अनेकदा ते साकारते. त्याची सरगम करणे तसे मानवी शक्तीच्या बाहेरचे आहे. हा एक प्रयत्न आहे. सारेच स्वरलेखन निर्दोष आणि मुळाशी प्रामाणिक होईल असे मी कसे म्हणू ? मानवी गणनेप्रमाणे, गेली कित्येक वर्षे हे गीत मी ऐकतो आहे. सर्वेंद्रियांनी ते भोगतो आहे. तरीही विस्मरणाने त्या गीताचे कैक दुवे कमकुवत केले आहेत. ते जोड-ण्याचे साहसही मी करून पाहतो आहे. मला माहीत आहे, ही उटाठेव अकारण आहे. लिहावेसे वाटले, फार वाटले म्हणून मी हे आत्मकथन लिहितो आहे. अदृश्य स्वर अक्षरांत गुंतविण्याची ही खटपट करतो आहे.

लौकिकदृष्ट्या माझे आयुष्य यशस्वी आहे. मी पैसा कमाविला. नाव कमावले. घरे बांधली. गाड्या घेतल्या. परदेश पाहिला. प्रपंच केला. अजून करतो आहे. जीवनाचा रसास्वाद मनमुराद घेतो आहे. वाहत्या गीताला कल्पनेनेच एक बांध घालून मी मागचा प्रवाह पाहतो. होऊन गेलेल्या गीताची सरगम स्मरणाने टिपतो आहे.

यशाचे नेमके गमक काय ? कृतकृत्यता ही खरी जाणीव आहे की आभासच आहे ? या प्रश्नांची उत्तरे मी खरोखरच देऊ शकणार नाही. माझे जीवनगीत माझ्या कानी या घडीपावेतो पडले तसेच लिपिबद्ध करण्याचा माझा हेतू आहे.

अन्यांच्या आवडी-निवडीशी मला कर्तव्य जरूर आहे, पण त्यांचे नियंत्रण मात्र मला मानविण्यासारखे नाही.

♠ ♠

१

नगर जिल्ह्यातील पुणतांबे हे माझे जन्मगाव. सी. रामचंद्र या धेडगुजरी व्यवसायनामामुळे मराठीचे सुपुत्र मला ' तामिळनाडा 'त फेकतात. माझी तक्रार नाही. पण त्याविषयी मला दुःख मात्र वाटते. गाव पुणतांबे आणि आडनाव चितळकर हे गौडबंगालही फारसे अगम्य नाही. चितळी नावाचे एक लहानसे खेडेगाव पुणतांब्याशेजारीच आहे. चितळीचे ब्राह्मण पुणतांब्याला राहिले असतील. गाव बदलले तरी मूळ गावाचे नाव आडनावात राहिले असेल, इतकेच.

पुणतांब्याचे ब्राह्मण पेशवाईत प्रसिद्ध होते. शास्त्रजाणते पुरोहित म्हणून त्यांना श्रीमंतांची बोलावणी येत असत. माझ्या घराण्यात ही विद्यासंपन्नता मला कधी दिसली नाही. माझे वडील रेल्वेखात्यात नोकरी करीत होते. सोवळे-ओवळे, पूजा-अर्चा हे प्रकार त्यांच्या आचरणात होते, पण ' मम आत्मनः 'पलीकडे काही संस्कृत वचने बोलताना मी ऐकलेले नाही.

माझे वडील शरीरानें किरकोळ आणि उंचेपुरे होते. वाण उजळ देशस्थी

होता. वाणी स्वच्छ होती. मला वाटते ते इंग्रजी चांगले जाणत होते. मी जन्मलो तेव्हा त्यांची चाळिशी उलटलेली होती. त्यांच्याशी कानगोष्टी करणारे त्यांचे केस रुपेरी रंगाचे होते हें मला स्पष्टपणे आठवते. वडिलांचा स्वभाव आनंदी होता. दोन बायकांच्या दादल्याला होणारा ताप त्यांच्या मुद्रेवर कधीच दिसत नसे.

मी नावाने ' राम ' असलो तरी कृष्णासारखा दोन मातांचा मुलगा आहे. एकीने जन्म दिला. एकीने सांभाळले. माझ्या मोठ्या आईचे नाव भागीरथी-बाई. तिला तीन अपत्ये होती. पण तिला ळळा होता तो माझा. जन्मदात्री आई मला माझ्या जन्मापासून हिडिसफिडीस करी. का कोण जाणे !

एक गोष्ट नंतर तिनेच मला सांगितली. माझ्या आधी आईला ४-५ मुलगेच झाले होते. तिला मुलीची हौस होती. परकर चोळी घालून लुटूलुटू मिरवणारी, सोप्यात पोरी जमवून भातुकलीचा खेळ मांडणारी, आईला घरकामात हातभार लावू शकणारी लेक तिला हवी होती. हिंदु बायका ' पुत्रा 'साठी नवस करतात. माझ्या आईला डोहाळे होते लेकीचे. वाट पाहावी मनिऑर्डरीची आणि हाती यावा व्ही. पी. चा लिफाफा, तशी तिची गत झाली. पौषातली गोठविणारी आमावास्या गाठून आमचा अवतार झाला. चंद्रमुखी कन्येच्या आशेने आईने डोळे उघडले आणि दृष्टी पडली मी—पायाचा पारवा, पुरुषजातीचे पोर.

' मुलगाच का मेला शेवटी ? ' हे जन्मदेचे प्रथमोद्गार माझ्या कानी पडले असतील. जन्मतः जाणीव नसते म्हणून बरे, नाही तर जन्मल्याबद्दल दुःख करीतच मला पुढचा सारा जन्म कंठावा लागला असता.

मी जन्माला आलो आणि दोन दिवसांनी संक्रात आली. मला वाटते, तापसरीची भयंकर साथही तेव्हाच उद्भवली. एकंदरीत माझा जन्म काही शुभ वेळी झालेला नव्हता.

' आई ' या विषयावर गौरवगीत न लिहिलेला कवी जगाच्या पाठीवर सापडणे कठीण. आई या नात्याशी दुरावा दाखवणारा लेखक जगाच्या

कुणाही भाषेत उत्पन्न झालेला नसेल. मी एक भारतीय मात्र असा आहे की ' मातेची प्रीती ' मला कधीच कळली नाही. मिळाली नाही असे मी कसे म्हणू ? दैवाच्या करणीला फक्त देवच जबाबदार असतो.

एक खरे की, आईची माया मला माझ्या थोरल्या सावत्र आईने दिली. ओसंडून वाहणारे वात्सल्य मी तिच्या हातांनी प्यालो. मी जन्माला आलो तेव्हाच मोठ्या आईची दृष्टी कमी झाली होती. तिला दिसत नव्हते म्हणून वडिलांनी दुसरा विवाह केला होता की काय न कळे. सवतीला मिळणारी सुखे मोठ्या आईला मुळातच दिसत नव्हती, त्यामुळे ती सुखी होती. माझी जन्मदात्री वडिलांची फार आवडती होती, असेही नव्हते. त्यांचा विश्वास मोठ्या आईवरच अधिक होता. घरची कर्ती स्त्री मोठी आईच होती. माझ्या सख्ख्या आईचा तिने कधीही दुस्वास केला नाही.

वडिलांचा संसार ' बेसुरा ' होता असे नव्हे, पण त्यांच्या प्रपंचाचे गाणे ' कणसुरे ' होते यात शंका नाही. मी प्यायलो असेन मातृस्तन्यच, पण न्हायलो मोठ्या आईच्या मांड्यांवर, झोपलो तिच्या कुशीत. माझी टाळू भरली ती तिच्याच ममताळू बोटांनी. मी मान धरायला शिकलो तो तिच्या तळ-हातांवर. ' नेत्रींचा केला दिवा, तळहाताचा पाळणा, ' ही जन्मदेती जबाब-दारी माझ्या सापत्न मातेने मोठ्या हौसेने स्वीकारली. मोठ्या आईच्या सान्निध्यात अखंड राहणे माझ्या दैवात नव्हते. मी ९ वर्षांचा असेन त्या वेळी ती देवाघरी गेली. मी कळू नकळू होतो एवढ्यातच ती देवाघरी गेली ! आई असून, आई नसल्यासारख्या अवस्थेत मला पुढे वाढावे लागले. ' आई ' म्हटल्यावर मला आठवण झालीच तर ती सावत्र आईची होते. ईश्वराच्या कृपेने माझी सख्खी आई अजून हयात आहे. पण आईविषयीचा जिव्हाळा मला थोरल्या आईबद्दल वाटतो हे लोकविलक्षण सत्य आहे.

मी महिन्याभराचा होतो न होतो एवढ्यातच आम्हांला पुणतांबे सोडावे लागले. वडिलांच्या नोकरीच्या गावी जावे लागले. हे गाव डोंगरगड नावाचे होते. माझे बालपण या गावात गेले. स्टेशनमास्तराच्या घरात संगीत कसले

ऐकू येणार ? गाड्यांचा रूक्ष धडधडाट आणि त्यांच्या शिट्ट्यांचा कर्णकटू आवाज हेच तिथले संगीत. पडत्या चढत्या बाहुल्यांची खटखट वा वडिलांनी तारायंत्रावर केलेली ' कट्टकड कट्टकड 'स्वर संगीताशी संबंध असलेला कसलाही मधुर स्वर माझ्या शैशवाला तिथे सापडला असेल असे मला वाटत नाही.

नाही म्हणायला निसर्गाची मात्र त्या डोंगरगडावर पूर्ण कृपा होती. चहूबाजूला हिरव्या डोंगरांनी वेढलेले ते गाव जणू निसर्गाच्या ओंजळीतच वसलेले होते. रायांतून भरारणाऱ्या तिथल्या वाऱ्याच्या स्वरात खचितच संगीताचा गोडवा असेल. असंख्य निनावी पाखरांनी अगणित रागिणी त्या गावातील झाडांवर बसून छेडल्या असतील. कानांवर कुरळी झुलपे रागवणाऱ्या माझ्या शैशवाला कदाचित तेच नैसर्गिक बाळकडू मिळाले असेल. मला काहीच आठवत नाही. कदाचित असे काही नसेलही. अवसेपोटी प्रतिपदा अवतरली. तसे बेसुरातूनच माझे स्वरवेड उगवून आले असेल. काय असेल, काही सांगता येत नाही. आमची मोठी आई नेहमीच आमच्या बरोबर राहत असे, असे नाही. माझ्या सर्वांत थोरल्या भावाच्या नोकरीच्या गावी ती मधूनमधून जाई. काही काळ पुणतांब्यात राही. कधी आमच्याकडे येई.

ती आली म्हणजे चंगळ उडे. मोठी आई आली आली की स्वैंपाकघराची सुभेदारी ती आपल्या हाती घेई. तिला कमी दिसते या संधीचा फायदा मग मी नाना तऱ्हेने घेत राही.

मला तूप या वस्तूचे फार प्रेम. मी जेवायला बसलो की मोठी आई पानासमोर बसे, 'हे घे, ते घे,' असा सारखा आग्रह. तूप ही काही ओतून घेण्याची वस्तू नव्हे, मी ती ओतून घेई.

आई म्हणे, 'राम, भात घेतलास ?'

मी बोले, 'हो.'

आई म्हणे, 'चमचाभर तूप घे हं त्यावर.' त्या चमचाभर आज्ञेचे

ओगराळभर पालन मी आधीच केले असे. आता त्या गोष्टी आठवतात आणि कंठ दाटतो. मोठ्या आईने मला मोठा झालेला पाहिला नाही. माझी आजची स्थिती तिने पाहिली असती तर तिची गेलेली दृष्टी परत आली असती. तृप्तपणे ती म्हणाली असती—' राम, पांग फेडलेस !' संगीत काय स्वरातच असते. एखाद्या दृश्यातदेखील संगीत असते. प्रवाही रेखा एखादी चित्राकृती उभी करताना तेव्हाही संगीताचा साक्षात्कार होतो. आज मी म्हणू शकेन मोठ्या आईच्या वागण्यात संगीत होते. बोलण्यात संगीत होते. मी भावनाविवश होऊन लिहितो असे नाही. काही फार चांगले घडते किंवा फार वाईट कोसळते तेव्हा मात्र मोठ्या आईची आठवण येते. डोळे पाणावतात. माझ्या वडिलांना संगीताचा नाद होता. वेळी अवेळी ते भसाड्या आवाजात गात असत. त्यांच्या तोंडी गाणी असत ती बव्हंशी नाटकांतली. मला स्पष्ट आठवते ते ' चंद्रकान्त राजाची कन्या ' हे गीत नेहमी गात असत. ते गाताना ते कवीच्या गाण्यात एका अक्षराची अकारण वाढ करीत.

' चंद्रकान्त राजाची कन्यात, सगुण रूपखाणीत ' असें ते मोठ्या रंगात येऊन घोळवीत राहत. हा तकार त्यांना का भरीस घालावा लागत असे, हे तेव्हा तर मला कळले नव्हतेच पण अजूनही कळलेले नाही. नाटकी गाण्याप्रमाणेच लावण्या घोळविण्याचा छंदही वडिलांना होता. अंगावर सोवळ्याचे वस्त्र असतानाही ते बेभानपणे गात असत...

' तू कोण रे मेल्या ? '

' मी तो डोंगरीवाला— '

' इथं कशाला आला ? '

कुठल्या नायक-नायिकेचे हे द्वंद्वगीत होते देव जाणे ! स्तोत्र म्हणावे इतक्या सहजतेने माझे वडील ते म्हणत असत. वडिलांच्या नोकरीच्या निमित्ताने माझे बालपण डोंगरगड, नागपूर, विलासपूर, गोंदिया इत्यादी गावांतून भटकत राहिले. भटकता भटकता बाल्याशी भिडले.

बालपणाबरोबर थोडी समजही आली. डोक्यावर जंगली लाकडाचे भारे

घेऊन सांजवेळी डोंगरकपारीतून निघालेल्या गोंडिणींची गाणी कानांना आवडू लागली. ती ऐकण्यासाठी मी खेळ सोडून गप्प उभा राहू लागलो. वडिलांच्या गाण्याची नावड मला उमगत नव्हती. पण गोंडिणींच्या गाण्यांतला गोडवा आवडू लागला होता खाचित.

माझी सख्खी आई अजूनही सांगते की लहानपणी मी संगीतद्वेष्टा होतो. कुणाचे गाणे सुरू झाले की माझे रडे सुरू व्हायचे. जगाची मुले अंगाई गायल्याने झोपी जातात. मी अंगाई गीताने चाळवत उठे. उठून भोकांड पसरी.

खरेखोटे देवाला माहीत! वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षी ऐकलेली गोंडिणींची जंगली सुरावट अजून माझ्या कानात आहे. त्यांतील शब्द मला मुळीच आठवत नाहीत. सूर पुसट आठवतात, पण त्या गाण्याने झालेला आनंद अजूनही मला नुसत्या आठवणीने अनुभवता येतो. भव्या लोकांची गाणी आणि फोनोग्राफवरच्या बांगड्या ऐकताच मी रडत का होतो कोण जाणे. कदाचित माझे त्या वेळचे रडणे सकारणही असू शकेल.

मी सहा-सात वर्षांचा झालो तेव्हा आमचे कुटुंब परत डोंगरगडी नांदत होते. वडिलांनी मला तिथल्या प्राथमिक शाळेत घातले. माझे शिक्षण सुरू झाले. लाखो पोरांचे शिक्षण चालते तसेच ते चालू लागले.

याच वेळी कधी तरी वडील गंमतीत येऊन मला म्हणाले, 'चल राम!'

'कुठं?'

'बघायला.'

'काय?'

'चल तर खरा.'

मोटी आई नसली की तिची जागा वडील घेत असत. ते माझ्यावर फार माया करीत. बाकीच्या भावंडांना हेवा वाटावा इतके लाड ते माझे पुरवीत. मी वडिलांच्याबरोबर गेलो.

एका मोठ्या मैदानात शेकडो लोक जमले होते. मध्यभागी तमाशा

चालला होता. तालासुराची वाद्ये मोठ्या मेळाझोळाने झंकारत होती. गॅस-बत्त्यांच्या उजेडात एक नखरेल बाई नाचत होती. बाकीचे तिला साथ करीत होते. लोकांनी वडिलांना वाट दिली. आम्ही अगदी पुढे जाऊन बसलो. बराच वेळ मी नाच पाहिला. लोक अगदी खूष होते. नाच पाहता पाहता माझे डोळे पेंगुळले.

एकाएकी वडिलांनी पाठीवर इवलीशी चापटी मारून मला जागे केले.

'काय?' मी दचकून म्हणालो.

'हा रुपया घे.' वडील म्हणाले.

'कशाला?' मी पेंगतच विचारले.

'घे, आणि ठेव इथं!' त्यांनी तो रुपया, माझा हात आणि दंड यांच्या मधल्या सांध्याच्या जागी ठेवला.

'बहुत अच्छा, अब आओ उठाओ रुपया' कुणी मोठ्याने म्हणाले. ती नखरेल बाई नाचत नाचत माझ्याकडे येऊ लागली. मी बापडा पेंगत होतो. वाद्यांचा गजर अधिक वाढला. माझी झोप निवळली. डोळे टक्क उघडे झाले. गाणे आणखी जवळ आले. ती बाई अगदी माझ्या नजीक आली. वडील प्रसन्नपणे हसत होते. ती बाई वाकली. आपल्या ओठांनी तिने तो रुपया उचलला. गर्दीने टाळ्या पिटल्या. शिट्ट्या मारल्या. रुमाल वर उंच फेकले. काय झाले ते मला कळले नाही. तो गलका मात्र मला फारसा आवडला नाही.

गलका ओसरला. ती बाई परत गेली. पुनः वाद्ये सुरू झाली. माझे डोळे पेंगू लागले. पेंगता पेंगता मी वडिलांच्या मांडीवर कलंडलो. समोर चाललेल्या गीताच्या तालावर ते माझ्या कानशिलावर थोपटू लागले. मला झोप लागली.

वडिलांना वाटत होते आपला राम शंभर मुलांत उठून दिसावा. त्या अपेक्षेने त्यांनी माझ्या हातून त्या रात्री 'दौलतजादा' करविला. पुढे अशीच एकदा आमच्या गावी कार्लेकर ग्रँड सर्कस आली. बाकीच्या भावं-

डांच्या हट्टाला मुळीच भीक न घालता, मला एकट्याला तेवढे वडील ती सर्कस बघायला घेऊन गेले.

सर्कशीत अनेक क्रूर जनावरे होती. वाघ होते. सिंह होते. सर्कसवाले एक चमत्कारिक खेळ करीत. रिंग-मास्टर चाबूक उभारी. डरकाळ्या फोडीत फोडीत पिंजऱ्यात फिरणारा सिंह हातभर जबडा उघडी. रिंगमास्तर प्रेक्षकांतून एखाद्या मुलाला बोलावी आणि त्याला त्या सिंहाच्या तोंडात ठेवी. काही धिटुकली पोरे आपणहून पुढे येत.

वडील मला म्हणाले, 'राम!'

'काय?'

'तू जाशील सिंहाच्या तोंडात?'

'हो, हो.'

मी म्हणालो.तसे वडील म्हणाले, 'शाब्बास' उद्यांच्या प्रयोगाच्या वेळी रिंगमास्तरला सांगून सिंहाच्या जबड्यात जाण्याची संधी मला देण्याचे वचन त्यांनी मोठ्या दिलखुलासपणे मला देऊन टाकले. मी मनातून हबकलो होतो. पण वडिलांना बरे वाटावे म्हणून 'हो' म्हणालो होतो. सुदैवाने वडील ती गोष्ट विसरले आणि सिंहाच्या तोंडात आपणहून जाण्याचा प्रसंग लहानपणापुरता तरी टळला.

मांजरीच्या पिलासारखे आम्ही वडिलांबरोबर गावोगाव फिरत होतो. माझे शिक्षण चाललेच होते. चालले होते म्हणजे काय, थांबले नव्हते. प्रगती ही अवस्था शालेय अभ्यासात मी कधीही येऊ दिली नाही. बाल-वर्गापासून मी कधीही कुठल्याही वर्गात पास झालो नाही.

एक प्रसंग आठवतो. तसा मी सगळ्याच विषयांत कच्चा होतो. सगळेच विषय मला जड जायचे. अंकगणित, इंग्रजी, भूगोल, इतिहास, व्याकरण असे सर्व विषय. त्यातही शब्दांची स्पेलिंगं पाठ करणं मला फारच जड जायची. असा एक शब्द अंब्रेला (umbrella). 'अंब्रेला' शब्दाचं स्पेलिंग कधीच पाठ होत नव्हतं. स्पेलिंग पाठ करण्यावरनं मी

मारही फार खाल्ला. एकदा-दोनदा-अनेकदा मार. आणि तरीही स्पेलिंग काही पाठ होता होत नव्हतं.

मग मला डोंगरगडचा आमच्या शेजारचा म्हातारा आजोबा आठवला. तो रोज सकाळी आपल्या नातवाची उजळणी घ्यायचा. तो त्या वेळी शिकवायचा

—म्हशीची शिंगे चार

उभा माणूस पाच—

अशीच पुढं तो गाण्यातून उजळणी शिकवत होता. मग मलाही असं वाटलं की आपणही शब्दांचं स्पेलिंग गाण्यासारखं म्हटलं तर ते अधिक चांगलं लक्षात राहील. मग मी अंब्रेला शब्दाच्या स्पेलिंगला चाल दिली ती ही अशी—

U	M	B	R	E	L	L	A	— अंब्रेला	— छतरी
सा	रे	ग	सा	रे	ग	सा	सा	— धसारेसा	— रे ग़ रे

मग मात्र ते स्पेलिंग आजही माझ्या लक्षात आहे. तर काय, बालवर्गा-पासून कधीही कुठल्याही वर्गात मी पास झालो नाही. प्रत्येक वेळी मला पुढे ढकलावे लागले. हे ढकलवून पुढे नेण्याचे काम वडीलच परस्पर करीत असत. ते असिस्टंट स्टेशनमास्तर होते. सायडिंगला पडलेला डबा चालत्या गाडीला जोडून देणे हा त्यांचा नित्याचा उद्योग होता.

पुनः वडिलांची बदली नागपुरला झाली. नागपुरला जाण्यापूर्वी आम्ही आमच्या गावी पुणतांब्याला गेलो. आता तिथल्या घराचे सौंदर्य मला जाण-वले. गावाविषयीची आपुलकी मनोमन जागी झाली. मोठ्या आईच्या अर्धांध डोळ्यांकडे पाहण्यात काही आगळा आनंद गवसू लागला.

गोदावरीच्या पाण्याकडे पाहण्यात विलक्षण मौज असल्याचा साक्षात्कार झाला. वाहत्या पाण्याचा आवाज कानांना सुखावतो याचीही पुसट प्रचीती आली. पुष्कळ गावकरी मुलांची मैत्रीही मला त्या वेळी लाभली.

माझे ते सारे मित्र बहुतेक ब्राह्मणवर्गातले होते. साऱ्यांच्या डोक्यावर घेरे

आणि शेंड्या. अंगांत गुळकीचे सदरे आणि कमरेला लंगोट्या. माझी अजून मुंज झाली नव्हती. मी नागर वेषात होतो. अर्धी चड्डी, अर्धा शर्ट असा माझा वेष होता. त्या ब्राह्मणांच्या मुलांनी एक व्यवसाय सुरू केला होता. सकाळपासून ती टोळक्यांनी गोदेच्या घाटावर हजर होत. जानवी दिसावीत म्हणून कपडे काढून टाकीत. गंगास्नानासाठी येणाऱ्या भाबड्या खेडुतांना गाठून त्यांना संकल्प सांगत आणि दक्षिणा उपटीत असत.

तेवढेच असते तर मला त्या बटूंचा हेवा वाटला नसता. ते बेटे सारेजण संध्याकाळी रेल्वे स्टेशनवर जात. तिथल्या एका हॉटेलात कांद्याची भजी मोठी चवदार होत. ती सारेजण जाऊन त्यावर ताव मारीत असत आणि परत येऊन त्यांची खमंग चव वर्णन करून सांगत.

एके दिवशी मीही हिय्या केला. मित्राच्या खोट्या मंत्रांकडून स्फुरण घेऊन खोटे यज्ञोपवीत चढविले. एका महा भाबड्या खेडुताला पकडला. गोदेच्या पाण्यात उभा राहून त्याला 'सदा सर्वदा' हा श्लोक मंत्राच्या थाटात ऐकविला आणि एक ढब्बू पैसा कमाई केली.

त्या सायंकाळी भजी खाणाऱ्यांच्या मेळाव्यात मला स्थान मिळाले. मीही त्यांच्याबरोबर ती दुर्मिळ वस्तू खाल्ली आणि तृप्त झालो.

एका ढब्बूसाठी केलेले हे ब्राह्मण्याचे सोंग मला पुनः आणावे लागले नाही. नागपुरला हजर होण्यापूर्वी मला 'ब्रह्मचारी' करून टाकावा असे वडिलांनी ठरविले. मोठी आई आता फार थकली होती. तिचे डोळे जवळ जवळ अंधत्वाला भिडले होते. आमच्या कुलस्वामीचे शेवटचे दर्शन घ्यावे असे फार दिवस तिच्या मनात होते. माझी मुंज तिरूपती व्यंकटेशासमोर उरकावी असा निर्णय झाला आणि आम्ही दक्षिणदेशी गेलो. सी. रामचंद्र या मद्रास धाटणीच्या आजच्या माझ्या नावाला त्या वेळी जणू एक बादरायण संबंध मिळाला. माझी मुंज शेषाचलावर झाली. त्या वेळेचाही योग असा, ऐन वेळी माझी सख्खी आई अस्पर्श बसली आणि मातृभोजनासाठी मला मोठ्या आईच्याच ताटात जेवावे लागले.

तिचे आणि माझे ते शेवटचे एकत्र जेवण. तिने जणू त्या दिवशी मला शेवटचे भरवले—

पुणतांब्याला परत आल्यावर तिने अंथरूण धरले. आम्ही नागपुरला गेलो— मोठी आई फार दूर गेली. जेथून कुणीही कधीही गेलेले परत आले नाही, त्या गावाला गेली.

२

आम्ही नागपुरला राहायला आलो. वडिलांची बदली इतवारी स्टेशनवर झाली होती. वडिलांच्या माझ्यांविषयी काही आकांक्षा होत्या. मी शिकून शहाणा होईन, घराण्याचे नाव गाजवीन असे त्यांना वाटत होते. बरोबरीच्या मित्रांजवळ ते तसे बोलून दाखवीत. मला गाणे म्हणावेसे वाटे व म्हणून मी म्हणत राही. ते चांगले उतरत असले पाहिजे.

नागपुरला आम्ही संगमावर राहू लागलो. हा संगम कुठल्या नद्यांचा होता, हे मला आजही माहीत नाही. कदाचित एक-दोन ओहळच त्या ठिकाणी एकमेकांत मिळालेले असतील. त्या संगमावर शिवाचे एक देवालय होते. त्या देवालयाच्या अवती भवतीही चार-दोन छोटी-छोटी देवळे होती त्या देवमंडळीच्या परिसरातच कुठे तरी आम्ही निवारा घेतला होता.

नागपुरसारख्या मोठ्या शहरात माझ्या शिक्षणाची सोय चांगली होईल असे वडील म्हणाले होते. पण मला शिक्षणाविषयी फारशी आस्था नव्हती. ढकलगाडीच्या गतीने मी चौथी ओलांडली होती. पाचवीपासून आता

इंग्रजीचा म्हणजे 'वाघिणीच्या दुधा'चा रतीब सुरू होणार होता. मायमाउली मराठीचे दूधच मला पिववत नव्हते, आता वाघिणीच्या दुधाचा खुराक कसा मानवणार होता कोण जाणे.

नागपुरात आल्या आल्या मी विचार करीत बसायला एक जागा शोधून काढली. ती जागा म्हणजे या संगमाकाठचा एक धोंडा.

एका संध्याकाळी मी संगमावर बसलो होतो. मी अगदी गप्प होतो. बाहेर अंधारू लागले आणि मनातही कसली तरी काळजी जमू लागली. मी एकटाच असल्याची जाणीव झाली आणि उगाचच भडभडून आले. मागचा-पुढचा धागा न सांधताच एक घटना मला जशीच्या तशी आठवली.

तेव्हाही आम्ही नागपुरातच राहत असू. माझी सख्खी आई बाळंतपणा-साठी कुठल्या तरी इस्पितळात गेली होती. अर्धांध अवस्थेतील मोठी आई घरात होती. मी परीक्षेत साफ नापास झालो होतो. वडील अजून कामा-वरून परत येणार होते. मी त्यांच्या येण्याची वाट पाहात होतो. ते आले, रागावले, दोन–चार धपाटे दिले म्हणजे ते परीक्षापर्व संपून जाणार होते.

दिवस मावळतीला गेला आणि वडील आले. मी चोरासारखा उभा राहिलो. ते फार संतापलेले दिसले. माझ्या अपयशाची वार्ता बहुतेक त्यांना समजलेली होती. एखादा वादाडा मिळणार या तयारीने मी पापण्या झुकवून, माझ्या गालफडांकडे पाहून घेतले, वडील मुळीच बोलेनात. एकटक माझ्याकडे बघत ते काही वेळ स्तब्ध उभे राहिले. मग नंतर एकाएकी धमका-वणीच्या स्वरात ओरडले, 'अंगातला सद्रा काढ!'

मी सद्रा काढून टाकला....

'गंजीफ्रॉक काढ!' वडील ओरडले. मी गंजीफ्रॉकही काढला.

'विजार काढ.'

नाही, होय म्हणण्याची सोय नव्हती. मी विजार उतरू लागलो. तेव्हा मुंज झालेली नव्हती. वडील नुसते धुमसत होते. मी ठार घाबरलो होतो. मोठी आई आतल्या दरवाजापाशी येऊन उभी राहिली. तिन्ही

सांजेच्या उजेडात तिला काहीच दिसले नसावे. मी तिच्याकडे पाहिले. तिच्या सर्वांगाला कापरे भरलेले होते.

'काढ ती. फेक—'

मी पूर्ण अवधूत उभा राहिलो. फक्त कमरेचा करगोटा काय तो अंगावर राहिला होता. वडील धावून आल्यासारखे अंगावर आले. त्यांनी माझ्या खांद्याखालचा दंड धरून जोराने हिसकला. एखाद्याला फेकून देताना घेतात, तसाच पवित्र वेत ते मोठ्यांदा गर्जले, 'हो चालता. पुनः पाय टाकू नकोस या घरात.'

मी काही हालचाल करण्याच्या आत त्यांनी माजघराबाहेर लोटलेदेखील. मी नागडाउगडा रस्त्यावर आलो. नागडेपणाच्या जाणिवेने की, सहज प्रवृत्तीने कुणास ठाऊक, वडिलांना बिलगावे म्हणून मी त्वरेने त्यांच्याकडे झेपावलो. त्यांनी खाडकन् दार बंद करून टाकले.

कुठे जाणार मी? त्या कातरवेळी तसा थरथरत उभा राहिलो. चुकलेल्या कुत्र्याच्या पोरासारखा दिशाहीन गतीनं चालू लागलो. पण जाणार कुठे? एकाएकी मला आठवण झाली की, आपली आई घराबाहेर आहे. ती बाळंत झाली होती ते इस्पितळ खूप दूर होते. पण त्याचा ठावठिकाणा मला माहीत होता. मी तिकडे निघालो. आईकडे निघालो. नागडा उघडा, वडिलांनी हाकलून दिलेला, असा एक मुलगा नेमका आपल्या जन्मदेकडे निघाला. आईची माझ्यावर माया नाही, असे मला नेहमी वाटत होते, तरीही मी तिच्याकडे निघालो, रडत रडत निघालो.

किती चाललो कुणास ठाऊक. शहरातले दिवे लागले. रात्र झाली. मी चाललोच होतो. एकाएकी कुणी तरी मागल्या बाजूने माझ्या उघड्या खांद्याला स्पर्श केला. मी झटक्याने वळून पाहिले. आणि मला केव्हढा तरी हुंदका आला.

ज्यांनी संतापाच्या भरात, पण घरातून हाकलून दिले, ते माझे वडीलच, सायकलवरून माझा शोध घेत घेत माझ्या पाठीमागे आले होते.

'रडू नको!' ते परत रागानेच म्हणाले. मी गप्प झालो. त्यांनी मला आपल्या पुढ्यात सायकलवर बसवले आणि आम्ही घरी आलो. मोठ्या आईने त्या रात्री माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला. झोपताना आपल्या कुशीत घेतले. माझ्यावर आपल्या वत्सल-अश्रूंचा जणू तिने अभिषेक केला....

ती मोठी आई आता या जगात नव्हती. परीक्षा नापास होण्यासारखे अपराध माझ्या हातून पुनः पुनः घडणार होते. वडिलांना रागावणे भाग पडणार होते. मला मार मिळणे संभाव्य होते. मारणारे हात मला कुरवाळण्याइतके मायाळू खचित होते, पण मोठ्या आईची माया—? जी कधी मिळणार नव्हती, ती कधीही मिळणार नव्हती.

वडिलांनी मला एकाच वेळी दोन शाळांत घातले. न्यू इंग्लिश स्कूलच्या इंग्रजी पहिल्या इयत्तेत आणि श्रीराम संगीत विद्यालयाच्या प्रारंभवर्गात. शाळेतील प्रगती 'गती' म्हणावी अशा अवस्थेला आलीच नाही. पण माझ्या गाण्यातल्या गतीला मात्र जोरदार वेग आला. माझा आवाज उपजतच सुरेल. तालाचा समजही अजाणताच प्राप्त झालेला. सप्रे मास्तर माझ्यावर फार खूष झाले. ते वडिलांना म्हणाले, 'पोरगा नाव काढील!' शिक्षकांची शाबासकी ही वस्तू शालेय जीवनात माझ्या वाट्याला कधीच आली नाही. गायनशाळेत मात्र, प्रवेशासरशीच माझ्या पाठीवर शाबासकीची थाप बसली.

सप्रे मास्तर अतिशय प्रेमळ. सदा हसतमुख. शिकवता शिकवता ते 'वाः राम! वाः राम!' म्हणत. श्रीरामसंगीत विद्यालयात माझ्या गुणगुणण्याचे गाणे झाले. त्या गाण्यावर वेगवेगळ्या रागांचे रंग चढू लागले. पण इंग्रजी पहिलीतला तर्खडकर मला रखडवीतच राहिला.

त्या काळात देशभक्तीची गाणी फार विकत होती. त्यातली काही नकळत मीही शिकलो. पुढे आमच्या सप्रेमास्तरांनी मेळा काढला. त्या मेळ्याचे कार्यक्रम ठिकाठिकाणी होऊ लागले. या मेळ्याच्या आणि गाण्याच्या गोतावळ्यात मला एक मित्र मिळाला. त्याचे नाव वासू देशपांडे. तो बेटा माझ्याच वयाचा, त्याला हार्मोनियम वाजविण्याचा छंद. त्याची गट्टी फार

लौकर जमली. विशेष म्हणजे, तो एवढा बारा तेरा वर्षांचा ब्राह्मणाचा मुलगा शाळेत मुळीच जात नव्हता ! नुसता आपला पेटी शिकत होता. मी त्याला म्हणालो, 'वासू, तुझे हे करणे खरे नाही.' मग वासूने एकदा मला आपल्या घरी नेले. त्याचे घर आमच्या अगदी शेजारीच होते. त्याचे आईवडील म्हणजे देवमाणसं होती. वडील मोठे नामांकित वकील. घरची स्थिती संपन्न. माझे गाणे ऐकले आणि वासूची आई माझ्यावर वासूसारखीच माया करू लागली. मोठ्या आईच्या वत्सलतेचा सारा ठेवा मला तिच्याजवळ सापडला.

शेजारी शेजारी राहत असल्यामुळे मग वासूचे सारे कुटुंबच आम्हा चितळकरांचे स्नेही झाले. वासू शाळेत जात नव्हता, त्यामुळे मी त्याला माझ्यापेक्षा 'कमी' समजत होतो. एके दिवशी माझा तो अभिमान पार भुईसपाट झाला. वासूचे वडील त्याला घरी शिकवीत होते. त्याची तयारी तेव्हाच मॅट्रिकला बसण्याइतकी झाली होती. वासूची प्रगती माझ्या वडिलांना कळली तेव्हा ते मोठ्या कष्टी स्वरात वासूच्या वडिलांना म्हणाले,

"आमचा राम मात्र शाळेत अगदी 'ढ' आहे." वासूचे वडील गंभीर स्वरानं म्हणाले, 'राम त्या कामाचा नाही, गाण्याच्या शास्त्रात तो फार मोठा माणूस होईल"

वर्षा दोन वर्षांत 'उत्तम गाणारा मुलगा' म्हणून माझे नागपुरात नाव झाले. नागपूरकर मंडळी जात्याच रसिक. त्यांत आमच्या सप्रे मास्तरांना हौस दांडगी. मला लोकांपुढे उभे करण्याची एक संधी ते सोडीत नसत.

भाटेबुवांची 'नाट्यकला प्रवर्तक' नागपुरला आपले खेळ करीत होती, सप्रे आणि भाटेबुवा यांचे संबंध फार जिव्हाळ्याचे होते. एकदा सप्रे मास्तर आपल्या उत्साही आणि सदैव घाई असल्याच्या स्वरात मला म्हणाले,

'राम, काम करशील?'

'कसलं? कुठं?'

'नाटकात.'

'नाटकात काम!' ही संधी मला फार मोलाची वाटली. मी होकार दिला. मी मराठी रंगमंचावर चढलो तो देवाचा वेष घेऊन. संत सखू नाटकात मी विठ्ठलाची भूमिका केली. माझे सारे अंग निळ्या रंगाने रंगविण्यात आले, मोरमुकुट, पीतांबर सारी आभूषणे घालण्यात आली, मी भक्तश्रेष्ठ सखूला दळू लागलो. एक गाणे गायले आणि रसिक नागपूरकरांकडून पसंतीच्या टाळ्या घेतल्या. तो दिवस वा ते साल—मला नीटसे काहीच आठवत नाही. पण त्या टाळ्या मात्र अजून माझ्या कानांत आहेत. शालेय शिक्षणात अशा टाळ्यांचा प्रसंग तर सोडाच, साधा 'पास' हा शेराही मी कधी मिळवू शकलो नाही. शाळेत मी जात राहिलो, गायन शाळेत शिकत राहिलो, शिकलो. खरोखर माझी तयारी चांगली झाली. दरम्यान मला एक चमत्कारिक व्यसन लागले. अगदी लहान वयात लागले. नागपूर मोठे शहर असल्यामुळे त्या व्यसनाला वाव मिळाला, वडीलधाऱ्यांचा डोळा चुकवून त्या व्यसनाचा आस्वाद घेण्याची सवय मला कायमची पडली. ते व्यसन—सिनेमा बघण्याचे. देशी विदेशी मुके सिनेमा बघताना माझे देहभान अगदी हरपून जात असे. एकदा सिनेमा बघायला पैसे नव्हते म्हणून एका पानवाल्याची चोरी केली. या सिनेमाच्या व्यसनासाठी मी खुद्द सप्रे मास्तरांचाही मार खाल्ला. पण ते व्यसन सुटले नाही ते नाहीच. आपण सिनेमात काम करावे अशी आशा याच काळात माझ्या मनात रुजली. नागपुरात चित्रपट बनविणारी कुणी मंडळी नव्हती, नाही तर मी केव्हाच त्या व्यवसायात शिरलो असतो.

१९३० च्या सुमाराला मला परत एकदा 'रंगमंचा'वर येण्याची संधी मिळाली. त्या नाटकाचे नाव होते 'नवा खेळ'. या नव्या खेळात मी एक नवाच खेळ करून पाहिला. मी लहानपणी चांगला देखणा मुलगा होतो. नव्या खेळात मी मुलीची भूमिका वठवली. त्या स्वभावचित्राचे नाव 'छबी' असे होते. छबीच्या भूमिकेला योग्य अशी छबी मजजवळ होती, पण

चालणे बोलणे कुठले सुधारते, कपाळ. एक गाणे आळवून आळवून गाताना माझ्या डोक्यावरचा सारा केशसंभार माझ्या हाती आला. प्रेक्षक किंचित हसले, पण तेवढ्यात मी गाण्याचा रंग असा काही जमवू शकलो की प्रेक्षकांनी माझी भूमिका फक्त कानांनीच पाहिली. माझ्या गाण्यातील तयारीची सर्वत्र वाहव्वा झाली.

१९३१ साली वडिलांनी पेन्शन घेतले आणि आमचे सारे कुटुंब नांदगावला गेले. मोठ्या आईचा मोठा मुलगा तिकडे नोकरीला होता. सेवानिवृत्त वडिलांनी मुलाकडे जाणे सरळच होते. मी नांदगावला राहून काय करणार ? तिथे गायनशाळा मुळीच नव्हती. कधीही पास न होता मी आता इंग्रजी पाचव्या इयत्तेच्या दाराशी येऊन पोचलो होतो. शेवटी ठरले की, पुढील शिक्षणासाठी मी पुण्यास जावे. वडील व दोघे वडीलभाऊ यांनी मला शिक्षणासाठी पैसे पाठवावेत.

पाचवी इयत्ता शिकण्याच्या निमित्ताने मी पुण्यास आलो. एकटाच आलो. रमणबागेतील हायस्कुलात नाव घातले आणि शिक्षण घेऊ लागलो. पं. विनायकबुवा पटवर्धन यांच्या गांधर्व विद्यालयात खोली घेतली, ती अप्पा बळवंत चौकात गायन शाळेच्या जवळ. शाळेत शेवटचा बाक पण गायन शाळेत सर्व प्रथम रांग. असाच शिक्षणक्रम पुण्यातही चालू राहिला. सिनेमाचे वेड बळावत राहिले.

वार्षिक परीक्षा एक-दोन दिवसांवर आली होती. कुणी तरी सांगितले की पर्वतीच्या पायथ्याशी एका चित्रपटाचे शूटिंग चालले आहे. हा वेळपर्यंत चित्रपटाचे शूटिंग पाहण्याची संधी मला कधीच मिळाली नव्हती. मी अगदी अधीर झालो. मित्र अभ्यास सोडून यायला तयार नव्हते. मला राहवेना. मी एकटाच गेलो.

शाहू मोडक नावाचा मुलगा या चित्रपटात काम करीत होता. मला त्याचा हेवा वाटला. ते रिफ्लेक्टर्स, तो फटमार्क, तो मायक्रोफोन, तो कॅमेरा, ती रेकॉर्डिंगची ट्रक– ते सारे वैभव मला यक्षनगरीचे वाटले, मी वेड्यासारखा

पाहत राहिलो. के. पी. भावे नावाचे विख्यात मराठी दिग्दर्शक या चित्रपटाचे दिग्दर्शन करीत होते. माझ्यासारख्या बघ्यांना उद्देशून ते म्हणाले, ' अहो, तुमच्यातले कुणी, इकडून तिकडे नुसते जाल का ? '

मीच मला पुढे ढकलले. दिग्दर्शकांनी सांगितले त्याप्रमाणे मी एक दोनदा इकडून तिकडे गेलो. माझे चालणे, माझी छबी त्या चित्रपटात उमटली. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. माझ्यासारखे आणखी दोघे–चौघेही मग माझ्याबरोबर आले. संध्याकाळपर्यंत मी पर्वतीच्या पायथ्याशीच राहीलो. काम संपल्यावर दिग्दर्शक म्हणाले, ' आजची मंडळी उद्याही या. शूटिंग चार–सहा दिवस चालणार आहे. '

' हो, हो. ' मी उत्साहाने म्हणालो.

परीक्षा सुरू झाली. एक-दोन पेपर्स मी कसेबसे दिले. मन नव्हतेच खर्डेघाशीत. तिकडे पर्वतीच्या पायथ्याशी चित्रण चालले होते. दिग्दर्शकाने तिकडे रोज येण्याविषयी विचारले होते. मी थोर तोंडाने होकार दिला होता. मला जाणे भाग होते.

इतिहास-भूगोलाची प्रश्नपत्रिका समोर होती. सारे विद्यार्थी खाली माना घालून उत्तरे लिहिण्यात गर्क झाले. माझे लक्ष काही केल्या लागेना. पर्वतीचा पायथा दिसू लागला. रिफ्लेक्टर्स चकाकू लागले. दिग्दर्शक आज्ञा देऊ लागला. मायक्रोफोन बोलणाऱ्या नटाचा पाठलाग करू लागला. कॅमेरा, सारे दृश्य आतल्या आत चित्रित करू लागला. ' चला, चालणारी मंडळी इकडून तिकडे जा '–दिग्दर्शक ओरडला.

मी परीक्षेच्या हॉलमधून उठलो. साहित्य आवरले. उत्तर-पत्रिका सपशेल कोरी होती. हॉलबाहेर पडणार तोच देखरेख करणाऱ्या शिक्षकांनी हटकले.

' झाला पेपर ? '

' हो. '

मी कोरा पेपर पुढे केला. शिक्षकांनी तो चाळून पाहिला. संपूर्ण कोरा. मी निघालो.

'अरे!'

'अं?'

'याच्यावर नाव घालायला पाहिजे!

शिक्षकच म्हणाले म्हणून मी त्या उत्तरपत्रिकेच्या वरच्या पानावर माझे नाव लिहिले आणि सटकलो तो थेट पर्वतीच्या पायथ्याशी.

त्या चित्रपटसंस्थेच्या चित्रपटात मी कारण नसताना एका निनावी पादचाऱ्याची भूमिका केली. ती करताना अगदी रंगून गेलो. पुढे याच चित्रपट व्यवसायात मला चालत राहावयाचे आहे याची मुतराम् कल्पना त्या क्षणी नव्हती.

उन्हाळ्याच्या सुटीत मी भावाकडे नांदगावला गेलो. परीक्षेचा निकाल तिकडे आला. कोरा पेपर दिल्यावर निकाल तो काय येणार? शाळेच्या अधिकाऱ्याने वडिलांना उद्देशून लिहिले होते. 'एका इतिहास भूगोलासाठी हा विद्यार्थी जूनमध्ये पुनः परीक्षेस बसेल तर त्याला वरच्या वर्गात घेता येईल!'

मला जायचेच कुठे होते वरच्या वर्गात? मला सिनेमात जायचे होते. ते कसे जावे याचा रस्ता माझा मला काही केल्या सापडत नव्हता. वडीलही माझ्या शिक्षणाविषयी निराश झाले होते.

ते म्हणाले, 'राम–'

'काय भाऊ?'

'पुण्याला नाही का जाणार तू?'

'नाही.'

'मग?'

मी गप्प झालो.

वडील बोलले, 'मग माझ्याबरोबर चल.'

'कुठं?'

'पुणतांब्याला.'

'कशाला?–' असे मी विचारण्याआधीच वडिलांनी सांगितले, 'तिथे आपली शेती आहे. आणखी काही जमीन हाती येण्याचा चान्स आहे.' त्यावरही मी काही बोललो नाही.

ग्वाल्हेरला असणाऱ्या आमच्या एका दूरच्या नातलग वृद्ध स्त्रीची पुष्कळशी जमीन पुणतांब्याला होती. ती आमचेच काही नातेवाईक मंडळींनी बेकायदेशीर पद्धतीने लाटली होती. त्या जमिनीवर खरा हक्क आमच्या वडिलांचा पोचत होता. त्या वृद्धेच्या मनातही ती जमीन माझ्या वडिलांना मिळावी असे होते.

मला या साऱ्या प्रकरणात काहीच रस नव्हता. आणखी कुठे जावे ते न कळल्यामुळे मी त्यांना म्हणालो, 'भाऊ, मी येतो तुमच्याबरोबर–'

पुणतांब्याला आलो खरा, पण मन रमेना. वडील चोवीस तास त्या इस्टेटीचा पाठलाग करण्यात गुंतले. इथे गाण्याची साधनाही होईना. त्या गावात गाण्याला कसलीच साथ उपलब्ध नव्हती. एका सायंकाळी वडिलांबरोबर कुणी तरी पाहुणे आले. आले आणि ओसरीशी बसले. वडिलांनी मला बाहेर बोलावले, ओळख करून दिली. ते पाहुणे फार चौकस नजरेने माझ्याकडे पाहू लागले.

'छान आहे मुलगा!' पाहुणे म्हणाले.

'गातो उत्तम!' वडील उत्तेजित स्वरात बोलले.

'योग्य आहे.'

'बघा आवडला तर–'

मला काही बोधच होईना. मुलगी पाहतात तसे हे गृहस्थ मुलगा पाहयला आले होते की काय न जाणे. वडिलांनी तेवढ्यात मला सांगितले, 'राम, एखादं गाणं म्हणून दाखव.'

गाणे मी नाइलाजाने म्हटले, पण नाइलाजाने कुणी कुणाला दिलेला पेढा लागणार गोडच. पाहुणे मोठे खूष झाले. त्यांनी मला जवळ बोलावले. पाठीवरून हात फिरवला.

वडिलांना एकट्यांना बाजूला गाठून मी विचारले,

'भाऊ, माझं लग्न का करणार आहांत तुम्ही ?'

'नाही रे, एवढ्यात कसलं लग्न ?'

'मग हे पाहुणे ?'

'बैस, सांगतो.' मी बसलो. वडीलही बसले.

'तुला खूप गाणं शिकायला हवं. मी आता थकत आलो आणि नांदगावचा भाऊ कसाही झाला तरी सावत्र. तुझा भाऊ आहे सोलापुरला. त्याची मिळकत ती काय ? तुला-तुझ्यासारख्या मुलाला जन्मभर कसली ददात असता कामा नये. हे गृहस्थ जहागीरदार आहेत. लाखाभराची दौलत आहे त्यांची !'

'मुलगी आहे त्यांची ?'

'अंहं, त्यांना संतान नाही.'

'मग ?'

'ते दत्तकासाठी मुलगा शोधताहेत. तुला पसंत केलं त्यांनी. जाशील दत्तक त्यांना ?' भाऊंचा आवाज उगीचच कातर झाला.

'दत्तक जायचं म्हणजे ?'

'त्यांच्या ओट्यात जायचं. त्यांचंच व्हायचं.'

'माझं नाव ?'

'रामच राहील, वडिलांचं नाव, आडनाव बदलेल. पण केव्हढ्या मोठ्या इस्टेटीला धनी होशील. जन्मभर सुख, समाधान–'

'आडनाव काय त्यांचं ?

'गोसावी' ते आडनाव ऐकताक्षणीच माझ्या अंगावर शहारे आले. दाढी, मिशा, जटा, छाटी, चिमटा, राख, या किळसवाण्या वस्तूंनी आपल्या अंगचटी यावे असा भास मला झाला. काकुळतीच्या स्वरात मी जवळ जवळ ओरडलो, 'भाऊ, मला नाही जायचं दत्तक !'

भाऊंचे डोळेही पाणावले होते. मुलगा दत्तक घालण्याचा प्रकार त्यांच्या

मनालाही फारसा प्रशस्त वाटत नव्हता. मला जवळ घेत म्हणाले, 'नाही अं राम, मी नाही देणार तुला कुणाच्या मांडीवर....'

ते श्रीमंत गोसावी आले तसे परत गेले. वडिलांनी त्यांना बहुतेक स्पष्टपणे नकार देऊन टाकला असावा. मला मुळीच करमेनासे झाले तेव्हा वडील म्हणाले–'सोलापुरला जा हवं तर, नानाकडे.'

नाना माझा मोठा भाऊ. त्याच्या माझ्या वयात जवळ जवळ दहा वर्षांचा फरक. तो सोलापुरला एका लिथो प्रेसमध्ये काम करीत होता. मी त्याच्याकडे गेलो. त्याचा ब्रह्मचर्याश्रम व होता.

तो मला रोज विचारी, 'राम, कुठल्या गिरणीत काम शोधू या ?

मला गिरणीत काम करण्याची बिलकुल इच्छा नव्हती. मी घुम्यासारखा गप्प बसून राही. नाना शिजवील ते खाई. तो कामाला गेला की मोठमोठ्याने मी गाणे सुरू करी. ते गाणे ऐकायला शेजारी-पाजारी अक्षरशः गर्दी करीत. मी कुठला व्यवसाय करावा या विषयी नानाने काही आराखडा बांधला असेल-- एके दिवशी तो मोठ्या आशेने माझ्याजवळ आला. त्याने वर्तमानपत्रात आलेली एक जाहिरात मला दाखविली. कोल्हापुरात 'ललित पिक्चर्स' नावाची एक चित्रपट संस्था होती व तिला अभिनयासाठी तरुण हवे होते.

नानाला फोटो काढण्याची हौस होती. त्याने माझे पुष्कळ फोटो काढले होते. त्यांतले काही निवडून त्याने अर्जासह ते 'ललित पिक्चर्स' कोल्हापुरकडे पाठविले.

दोन-चार दिवसांतच अर्जाचे उत्तर आले. ललित पिक्चर्सने तिसऱ्या वर्गाचे भाडे देण्याचे मान्य करून भेटीला बोलावले होते. मला जायचे होते ती वाट सापडली.

सोलापूर सोडून मी कोल्हापुरला निघालो.

कोल्हापूर– कलापूर– चित्रपटांची नगरी–

♠ ♠

३

सोलापुरातील निष्क्रिय आयुष्य संपलं. पथारी बांधून मी कोल्हापुरास आलो. ' चित्रपटांची नगरी ' हा कोल्हापुरचा लौकिक माझ्या कानी होता. या शहरात आपले मन तर रमेलच रमेल, पण आयुष्याचा रस्ता देखील इथेच सापडेल, असे मला मनोमन वाटत होते. चित्रपटाचा स्टुडिओ असा मी यापूर्वी पाहिला नव्हता. ललित पिक्चर्सच्या स्टुडिओत प्रवेश करताना उगीचच अंग शहारल्यासारखे झाले.

ललित पिक्चर्स ही संस्था अण्णासाहेब राजोपाध्ये यांनी सोहनी व बागडे यांच्या सहकार्याने सुरू केली होती. माझी भेट आण्णासाहेबांशी झाली. पगार दरमहा चाळीस रुपये ठरला. हा पगार त्या काळच्या मानाने ' झक्क ' होता. कोल्हापूर स्वस्ताईविषयी देखील विख्यात होते. कोल्हापुरचे दूध आणि कोल्हापुरची भाजी यांविषयी पुण्यात देखील स्तुती ऐकली होती. चाळीस रुपयांची नौकरी मिळाल्याच्या आनंदापेक्षा आपणांला चित्रपटात प्रवेश करताच ' भूमिका ' मिळाली याचा आनंद मला अधिक झाला.

ललित पिक्चर्सने ' प्रतिमा ' या नामाभिधानाचा बोलपट हाती घेतला होता. मला वाटते, भासाच्या ' प्रतिमा ' नाटकावरून त्या कथेची सिद्धता केली गेली होती. कथानक रामायणाविषयक होते. मी नावाने राम होतो. पण माझी निवड झाली होती ती मात्र लक्ष्मणाच्या भूमिकेसाठी. रामाच्या स्वभावाचित्रासाठी सुरेश परदेशी नावाचा देखणा तरुण माझ्या आधीच मुक्रर करण्यात आला होता. सीतेच्या भूमिकेसाठी अमीना या नटीची निवड झालेली होती. सावकारी पाशातील, शेतकऱ्याची घरधनीण म्हणून गाजलेली तीच ही अमीना.

भेंडेगल्ली नावाच्या एका चिकट वस्तीत मला राहायला खोली मिळाली. मी चाळीस रुपयांचा चाकरमान्या मान्य झालो, तसा नाना सोलापूर सोडून कोल्हापुरला आला. माझी देखभाल करण्यासाठी येणे, वडीलभाऊ म्हणून त्याला अगत्याचे वाटले. घर सांभाळणे, खरेदी बिरेदी करणे, हे सारे त्याने हाती घेतले. पोळ्या भाजण्याचे काम देखील नानाच करू लागला. मी त्या विषयात ठोंब्याच होतो. आमचा भावाभावांचा पुरुषी संसार सुरू झाला.

त्या वेळी चित्रपटांच्या देखील नाटकांसारख्या तालमी चालत. आण्णासाहेब तालमी घेऊ लागले. मी लक्ष्मणाची भाषिते तोंडपाठ करू लागलो. उभे कसे राहावे, हातवारे कसे करावे, डोळ्यांत भाव कसा आणावा ते शिकू लागलो.

एका संध्याकाळी थकून-भागून मी परत आलो. संवादाची इतकी आवर्तने कानांवरून गेली होती की, त्यांतले काही शब्द कानांतच राहिले आहेत, असे वाटत होते. रामलक्ष्मण इत्यादी थोर नावे देखील पुन्हा कानांवर नकोत, असे वाटत होते. घरी जाऊन मस्त लोळावे, जमल्यास गरम गरम काही खावे, असे मनात होते. माझी खोली माडीवर होती. मी जिना चढून आलो, खोलीचे दार बंद होते. आणि आत ' संवाद 'च चालले होते. नाना तर एकटाच होता खोलीत. मग हा दुसरा स्वर कुणाचा ? मी बंद दाराशी थबकलो. दारावर थाप मारली नाही. चिडलेल्या

स्वरातील एक प्रश्न कानावर आला.

'अरे पण मिळवतो तो. खर्च करायला तुझ्या बापाचं जातं काय?'

'करतो ना मग खर्च' उत्तराचा स्वर मवाळ होतो!

'करतोस? काय करतोस कपाळ? हीच ना तुझी जमाखर्चाची वही. दूध पाच रुपये. पाच रुपयांच्या दुधानं, बोटं तरी भिजतील का? महिन्याला पाच रुपड्यांचं दूध. त्यातलं प्यावं काय? खावं काय? दही कसलं न् ताक कसलं. तुपाचं तर नावच नको!'

'काढतो ना तूप, भाऊ!'

'अरे निघेल कसं?'

'निघतं!'

मी आवाज ओळखला. भाऊ पुणतांब्याहून आले होते आणि आपल्या मिळवत्या मुलाला थोरला मुलगा कसा सांभाळतो आहे त्याची चाचणी घेत होते. दार ढकलून मी आत गेलो. भाऊंना पाहून मला फार आनंद झाला. वडील माणसं घरी असतात तेव्हा त्यांचं दडपण नको वाटतं. पण तीच अशी कालांतरानं भेटली की, आपल्या लहानपणावर फुलं लहडताहेत असं वाटतं.

मी हसतच भाऊंना समजावून सांगितले की, कोल्हापुरात दूध सहा पैशाला शेर मिळते. ते देखील अगदी निरसे. तुमच्या समोर म्हैस पिळून, दुधाचे भांडे फेसासकट भरतात इथले गवळी. मग भाऊंची खात्री पटली. नानाची हिशेबाची वही सहीसलामत सुटली.

दोन चार दिवस राहून भाऊ परत गेले. आणि का कुणाला ठाऊक त्यांनी माझ्या आईला कोल्हापुरी पाठविले. मुलाच्या पोटाचे हाल होत आहेत, असेच त्यांना वाटले असावे. पुरुषाने कितीही केले तरी अन्नपूर्णा हे त्यांचे दैवत नव्हे. आई आली आणि माझ्या खोलीला 'घरपणा' आला. देवाघरी जाऊन राहिलेल्या आईचे पुनः स्मरण झाले. नानाचा चार्ज आईनं घेतला. तसे नानाला मोकळेपण जाणवू लागले. तो निघून गेला. मला

वाटते नाशिकला की कुठे जाऊन त्यानेही नोकरी पकडली.

माझ्या अजून तालमीच चालल्या होत्या. चित्रणाला आरंभ काही केल्या होत नव्हता. तोंडावर रंग लावून, माथी मुकुट चढवायला मी अधीर झालो होतो. पाठीचा भाता आणि हातांतील धनुष्य मी चांगले सांभाळायला शिकलो. पण... ते छायाचित्रित होण्याचा सुयोग काही येईना.

दरम्यान एकाएकी मी आजारी झालो. साधा ताप टायफॉइडवर गेला. आईने अटोकाट शुश्रूषा केली. एकवीस दिवसांच्या त्या आजाराने अंदाजपत्रकाचे पार दिवाळे निघाले. डॉक्टरांची बिले, फळांचे खर्च, यांनी प्रकरण निष्कांचन अवस्थेला येऊन भिडले. आईने वडिलांना लिहिले नाही की, नानाला कळविले नाही. टक्क डोळ्यांनी आपल्या हातातल्या दोन सोन्याच्या बांगड्या मोडल्या आणि वेळ भागविली. हिंदु बायकांना त्याग कुणी शिकवावा लागत नाही. प्रसंग आला की, परंपरा जणू त्यांना रस्ता दाखविते.

मी चांगला बरा झालो. हरपलेली शक्ती हळूहळू परत हातापायांत येऊ लागली. मग एके दिवशी आई पुणतांब्याला गेली. भाऊ तिकडे एकटेच होते. सौभाग्य आणि संतान दोहोंचीही चाकरी बजावली पाहिजे. स्त्री जातीच्या जबाबदाऱ्या मोठ्या अवघड. आई गेली, मी मग एकटाच ठरलो. अगदी एकटा.

डॉक्टर म्हणत, 'फळे खात जा. एग्ज घेत जा' कोल्हापुरच्या स्वस्ताईला दरमहा चाळीस मोप होते, पण असल्या श्रीमंती चोचल्यांपुढे त्या पैक्याचा काय पाड?

याच काळात माझी बेरळेकर नावाच्या कुटुंबाशी ओळख झाली. लक्ष्मण बेरळेकर नावाचा छोटा दहाबारा वर्षांचा मुलगा मालजींच्या कंपनीत होता. 'कालियामर्दन'मध्ये त्याने श्रीकृष्णाची भूमिका केली होती. त्याची माझी ओळख झाली. त्याच्यामुळे त्याचा भाऊ रघुनाथ ओळखीचा झाला. माझे एकटेपण त्या भावंडांना पाहवले नाही. त्यांनी सुचविले, 'राम, तू आमच्याकडे ये राहायला!

मला तेच पाहिजे होते. मी माझा बोऱ्याबिस्तरा उचलला आणि रंकाळा वेशीतील बेरळेकरांच्या वाड्यात नेऊन ठेवला.

या बेरळेकरांच्या घरात गोदूताई मला भेटल्या, वडील माणसांच्या नावामागे आपण पद्धती म्हणून तीर्थस्वरूप लिहितो. ही बाई खरोखरच तीर्थस्वरूप होती. अत्यंत थोर मनाची. फार प्रेमळ. तिला देवाने हात दिले होते ते सेवेसाठी, आशीर्वादासाठी, माझ्यासारख्या अनिकेतांना भरविण्यासाठी. गोदूताई रघुनाथ बेरळेकराच्या काकी. रघुनाथ, लक्ष्मण तसाच राम ही त्यांची वागण्याची तऱ्हा. मोठ्या आई नंतर त्या योग्यतेची माया मला या गोदूताईजवळ मिळाली. अगदी घरच्यासारखाच मी त्याच्या कुटुंबात राहू लागलो.

आजारानंतर गेलेली शक्ती परत येण्यासाठी मी बनपावाचा रतीब लावला. हा कोल्हापुरी बनपाव माझ्या आवडीला फार उतरला. सकाळ संध्याकाळ मी त्या पाववाल्याची वाट पाहत थांबू लागलो.

असाच मी त्या पाववाल्याची प्रतीक्षा करीत एका सायंकाळी, दरवाजाशी थांबलो होतो. काही तरी गुणगुणत होतो. हवा मोठी छान पडली होती. सूर्याचा सरता प्रकाश छानदार वाटत होता. मी पाववाल्याची वाट बघत होतो आणि आणखी कशाची तरी वाट बघत होतो. कोल्हापुरात येऊन बारा महिने झाले होते. चित्रसृष्टीच्या दारीच जणू मी थबकलो होतो. नियती अजूनही मला आत घेत नव्हती. एकदा आत गेलो म्हणजे मानाचे आसन मिळवीनच मिळवीन अशी मला खात्री होती. राजोपाध्यांची 'प्रतिमा' आकार घेत नव्हती. मातीच मळत राहण्याचे त्यांचे धोरण माझ्या लेखी कंटाळवाणे झाले होते. आणखी कुठे संधी मिळाली तर तिची मी वाट पाहत होतो. ती संधी आपणहून येत नव्हती. तो बेटा पाववाला पण येत नव्हता. बराच वेळ मी दरवाजात उभा होतो. अंधार झाला. वेशीत जमणाऱ्या दूधबाजाराच्या घंटा कानी येऊ लागल्या...

शेजारी कुणी कुणाला तरी विचारले, 'आमचा राम आहे का?'

पहिल्यांदा मला वाटले हा भास असेल. 'आमचा राम' या नावाने कोण विचारणार? रघुनाथ विचारील. लक्ष्मण विचारील, नाहीतर गोदूताई विचारतील, पण त्यांच्यापैकी कुणाचा आवाज नव्हता तो. मी तर त्यांच्याच दरवाजात उभा होतो.

'माझा राम राहतो का इथं?' पुनः तोच आवाज घोगरा, कोण कुणाला विचारत होते?

'कोण राम?' कुणीतरी विचारले.

'रामचंद्र नरहर चितळकर.'

माझे समग्र नाव कोल्हापुरात कुणाला ठाऊक होते? मी भानावर आलो. तंद्री मोडली. शेजारच्या घराच्या दाराशीच कुणीतरी माझी चौकशी करीत होते.

'कोण आहे, मी आहे इथं!' मी जरासा पुढे सरकलो. अंधारातून एक आकृती समोर आली. चाचपडत आल्यासारखी पुढे आली. तिला बघताच माझे सर्वांग शहारले. ते भाऊ होते. माझे वडील. मला नागडा करून घरातून घालवून देणारे, पण माझ्या पाठोपाठ सायकलवरून येणारे...

'भाऊ--' मी जवळ जवळ ओरडलो.

'होय राम मीच. आता मला दिसतं कमी रे राजा.'

बापरे! बारा महिन्यांत किती थकले होते भाऊ. मी त्यांचा हात धरला. त्यांनी मला कुरवाळले. कापऱ्या हातांनी माझी मुद्रा चाचपली. मी त्यांना घेऊन घरात गेलो.

दोन-तीन दिवस वडील माझ्याकडे राहिले. ते आजारीच होते. गोदूताईंनी त्यांच्या पथ्यपाण्याची अणुमात्र आबाळ होऊ दिली नाही. माझा घोडा अजून थराला बसला नाही, हे भाऊंनी ओळखले. म्हणून जायला निघताना ते काकुळतीने म्हणाले--'बरं राम, चल आता.'

'कुठं?'

'आपल्या जन्मगावी. पुणतांब्याला.'

'मी नाही येणार!' मी निश्चयाने म्हणालो. वडील बोलले नाहीत. पुनः मला कुरवाळून ते परत पुणतांब्याला गेले.

आण्णासाहेबांची 'प्रतिमा' नुसत्या कल्पनेतच राहिली. माझे भविष्य मळल्या मातीच्या स्वरूपातच पडून राहिले. कोल्हापूर सोडून चालण्यासारखे नव्हते. मी तिथेच राहिलो. नव्या संधीची वाट बघत राहिलो. मला फार काळ थांबावे लागले नाही. शालिनी सिनेटोन या राजकृपाप्राप्त संस्थेत मला प्रवेश मिळाला.

लक्ष्मणाच्या भूमिकेसाठी मी कोल्हापुरात आलो होतो. शालिनीने मला नट म्हणून स्वीकारले नाही. फालतूंच्या (एक्स्ट्रा) फडात माझी भरती करून घेतली. कामाला जावे असे ठिकाण प्राप्त झाले आणि मी कोल्हापुरातच रोवला गेलो.

'शालिनी सिनेटोन,'चे कर्तेधर्तेपण बाबूराव पेंटरांसारख्या थोर कलाकाराकडे होते. तिथला संगीताचा विभाग गोविंदराव टेंब्यांसारख्या विद्वान गायनतज्ञाच्या हाती होता. कमीत कमी गोविंदरावांचे गाणे, वाजविणे ऐकायला मिळेल हा लाभही मला महत्त्वाचा वाटला.

आम्हां फालतू बुणग्यांची खोली गोविंदरावांच्या विश्राम खोलीच्या ठीक पाठीमागे होती. फालतू मंडळी फालतू गप्पा करण्यातच दिवस घालवायची. गोविंदराव घडोघडी आमच्यावर रागावत. संतापून म्हणत, "किती बडबडतां? लाखदा सांगितलं कळत कसं नाही तुम्हाला!"

गोविंदराव आणि मी यांच्यातील अंतर हे इतके होते. मी कसला मग त्यांच्याजवळ जाऊन बसतो आणि कसले त्यांच्या संगीताचे मर्म शिकून घेतो. पार्श्वगायकांच्या घोळक्यात कधी मधी मी त्यांच्या समोर तोंड उघडले असेल इतकेच. निकट परिचयाचा प्रसंग उद्भवलाच नाही.

गोविंदरावांचे व्यक्तिमत्वही मोठे जरब घालणारे होते. त्यांच्याशी जाऊन बोलण्याची हिंमत माझ्यासारख्याला कशी होणार? तशात एकदा काय झाले—

'उषास्वप्न' नावाचा बोलपट तेव्हा चालू होता. त्यातील कुठल्या तरी गीताचे ध्वनिमुद्रण चालले होते. बाबूराव पेंटर चित्राचे दिग्दर्शक. त्यांनी गोविंदरावांना काही सूचना केल्या. गोविंदराव संतापले. आम्हां सगळ्यांच्या देखत म्हणाले, 'उं! बोलता येत नाही सरळ आणि गाण्यात सुधारणा सांगताहेत!'

बाबूरावांच्या वाणीत दोष होता खराच, पण ते संस्थेचे सर्वेस्व होते. गोविंदराव टेंब्यांनी त्यांची देखील जिथे संभावना केली, तिथं माझ्यासारख्याला काय दाद मिळणार!

शालिनीच्या दरबारी माझी डाळ मुळीच शिजली नाही. नाही म्हणायला, मला एक मित्र मात्र मिळाला. खूप बडबडणारा, मोकळ्या स्वभावाचा, प्रेमळ. तो पुण्याहून इथे या फालतूंच्या मेळाव्यात आला होता. बिचारा चांगला उंचापुरा, देखणा होता. त्यालाही माझ्यासारखीच नामवंत अभिनेता होण्याची आकांक्षा होती. त्याचे नाव विनायक काळे. आम्ही त्याला अप्पा म्हणत असू.

अप्पा काळे आणि मी खूप दोस्त झालो. इतके की, शेवटी तोही माझ्याबरोबर गोदूताईंच्या वाड्यात राहायला आला. रघुनाथ, लक्ष्मण, राम तसाच विनायकही. गोदूताई सर्वांचेच करू लागल्या.

दिवाळी दसऱ्यासारख्या सणासुदीला गोदूताई आपल्या मुलांबरोबर आम्हा दोघांनाही आपल्या हातांनी अंघोळ घालीत. गोडधोड आग्रहाने खाऊ घालीत. इतक्या थोर मनाची स्त्री क्वचितच कुणी पाहिली असेल. मी तर त्यांना माझी तिसरी आई समजतो.

शालिनीतले कंटाळवाणे जिणे कुजू लागले. कोल्हापुरात येताना मी द. म. चाळीस रुपये पगारावर आलो. आता मला फिरंगी बढती मिळाली होती. महिन्याला फक्त पंधरा टिकल्या मिळत होत्या म्हणून दोनदा जेवत होतो. अप्पा होता म्हणून त्याच्याशी गप्पा करीत दिवस घालवीत होतो. पुढच्या आयुष्याविषयी डोळ्यांसमोर गाढ अंधार होता.

एकाएकी या अंधाराला एके दिवशी एक खिंडार पडले. एक माणूस माझी चौकशी करीत ‘ शालिनी ’त आला. माझी त्याची गाठ पडली. ओळखदेख झाल्यावर त्याने विचारले, ‘ तुम्ही गाता ना ? ’

‘ हो तर ’

‘ शिकला आहात ? ’

‘ अर्थात ’

‘ मग जमेल ’

‘ काय ? ’

‘ सम्राट सिनेटोनला हीरो पाहिजे ’

सम्राट असो की, दरिद्री असो, मला नायक बनविणारी संस्था अस्तित्वात आली आहे याचा मला मनस्वी आनंद झाला. कसलाही विचार न करता मी ‘ शालिनी ’ सोडली आणि सम्राट सिनेटोनमध्ये दाखल झालो. वणकुद्रे नावाच्या भांड्याच्या व्यापाऱ्यांनी ही संस्था सुरू केली होती.

वाय्. व्ही. राव नावाचा एक दाक्षिणात्य दिग्दर्शक त्यांनी मुद्दाम आणविला होता. चित्रपट घोषित केला होता ‘ नागानंद ’. शेवटी मी एकदाचा नायक झालो. आझमबाई नावाची गायिका नायिका म्हणून निवडली होती. तिच्या आणि माझ्या प्रेमदृश्याचे चित्रण एका उद्यानात सुरू झाले. मी फार घाबरलो होतो. आपण नायक झालो खरे, पण ही जबाबदारी पेलणार का आपल्याला, या शंकेने मला घेरले होते. सतरा-अठरा वर्षांचा तरुण मुलगा मी. प्रेम संवाद बोलताना देखील बिचकायला होत होते.

माझ्या गाण्याविषयी मात्र मी निःशंक होतो. नागानंदाचे संगीत दिग्दर्शक होते वामनराव सडोलीकर. त्यांनी दिलेले गाणे बैठकीत म्हणावे तसे मी सणसणून म्हटले. तेव्हा प्ले बॅक पद्धती नव्हती. गाणे संवादासारखे दृश्याच्या वेळी म्हणावे लागे. दृश्याचा कोन बदलताना एक तान ठोकायची म्हणजे नव्या दृश्याची जुन्या गाण्याचा लय, ताल जोडणे साधायचे. मी गाणे दिले ठोकून—

सुखद सुरसभा—

त्यागुनिया कुणी विरही रंभा

मधुगान गाई, स्थलिं या—

पण पुढे त्या रंभेशी प्रेमालाप करताना माझी जीभ कोरडी पडू लागली. तशात आणखी एक प्रकार घडला.

आमचे चित्रण चालले त्याच उद्यानात मास्टर विनायकांचेही चित्रण सुरू झाले. ते स्वतः दिग्दर्शक. विख्यात नट. त्यांचा अभिनय सफाईदार. आमच्या संस्थेतले लोक त्यांचे चित्रण बघत आणि माझ्या कानी जावे इतक्या मोठ्याने बोलत—

‘ हा कसला फालतू हीरो ! हीरो तो मास्टर विनायक. ’

त्या बोलण्यांनी मी आणखी ढेपाळलो. काय करावे ते सुचेना. मीही विनायकांचे शूटिंग पाहिले. किती उमदा दिसत होता तो तरुण. नाही तर मी. किडकिडीत, दुबळा. अंगावरची पत्र्याची आभूषणे हाडांना रुततात माझ्या.

दिग्दर्शक वाय्. व्ही. राव यांनीही एक दिवशी मला डिवचले. तो दाक्षिणात्य दिग्दर्शक मोडक्या हिंदीत मला म्हणाला, ‘ यह क्या हेल्थ है तुम्हारा. जरा तगडा हो जाओ. मास्टर विनायकको देखा की नहीं ? ’

‘ देखा. मगर क्या करूं मोटा हो जानेके लिए ! ’

दिग्दर्शक हसला. म्हणाला, ‘ बिअर पीओ. बैदा खाओ....’

बिअर आणि बैदा. मला पगार मिळत होता पंचवीस रुपये. माझा बनपावाचा रतीब ठीक होता, पण मनाने घेतले आपण रसरशीत झाले पाहिजे. मास्टर विनायकासारखे दिसले पाहिजे. मनाचा हिय्या केला. रघुनाथला सांगितले नाही. लक्ष्मणाला बोललो नाही की अप्पाचाही सल्ला विचारला नाही. एके दिवशी उठलो आणि गेलो काळ्या पापाच्या दुकानात. ऑर्डर देताना माझा मीच जरा अडखळलो. विख्यात नायक होण्यासाठी माझे शरीर पुष्ट दिसणे इष्ट होते. चित्रपटातच नाव कमविण्याचा माझा निश्चय

कायम होता. पुढच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आज मद्यपान करणे आवश्यक होते.

दुकानच्या नोकराने भुवईने विचारले, ' काय हवे ? '

मी जोरात म्हणालो, ' बिअर आण एक. ' बिअर. पेल्यावर फेसाळणारे एक मादक पेय. मी तो पेला तोंडाला लावला. पुणतांब्याच्या कुळवंत ब्राह्मणाचा मुलगा मद्यपी झाला. उगीचच पुणतांब्याचे स्मरण झाले. घरासमोरचा गणपती आठवला— चांगदेवबाबांची पालखी आठवली. मोठी आई— गोदूताई...

छे: त्यांना कुणालाही भ्यायचे काही कारण नव्हते. मला यशस्वी नायक व्हायचे होते. आणि त्यासाठी ते पेये घेणे मला भाग होते.

मी काढा प्यावा तसा तो कडवट पेला मोकळा केला.

धाडसाने म्हणालो, ' आणखी एक आण...'

♠ ♠

४

तारुण्यात आलो तरी माझं जीवनगीत कुठल्याच तालाशी मिळते घेईना. बेतालपणा आजवर नव्हता. आता मद्याशी ओळख झाली. मांसाशनाचा प्रयोग कधी केला नव्हता. तो करण्याची पाळी आली. पुणतांब्याच्या ब्राह्मणाचा मुलगा मी. चित्रपटासारख्या बहुरंगी दुनियेत आलो. मोहांची रांगच्या रांग समोर होती. वचक ठेवील असे कुणीच आता कोल्हापुरात राहिले नव्हते. भाऊ, आई, नाना सारीजणे निघून गेली होती. बेरळेकरांचे घर आसरा देत होते. उपदेश देणे हा त्या घराण्याचा स्वभाव नव्हता. नायक होण्याचे माझे स्वप्न सत्यात उतरले होते. पण ते सत्य स्वप्नाहूनही असत्य आहे. याची माझी मलाच खात्री होऊन चुकली होती. मास्टर विनायकसारखा तत्कालीन नायकांच्या सावलीशी उभे राहावे इतकीही योग्यता माझ्या अंगी नव्हती.

गाण्याची गोडी उपजतच होती, म्हटले पाहिजे. मी जेवत होतो. खात होतो, पीत होतो. तसाच गात होतो. गायनाच्या छंदास काही स्वतंत्र

अस्तित्व होते असे नाही. कधी मधी आमच्या चित्रसंस्थेचे संगीत दिग्दर्शक श्री. वामनराव सडोलीकर यांच्याकडे जाऊन मी बसत होतो. शास्त्राशी ओळख करून घेण्याचा प्रयत्न करीत होतो.

एकदा एक थोर कलाकार स्टूडीयोत आले. उस्ताद अहमदजान तिरखवाँ. मी वामनरावांच्या पुढ्यात बसलो होतो. 'नागानंद' चित्रपटांतीलच कोणा गीताची तर्ज शिकून घेत होतो. तिरखवाँ साहेब आले. वत्सल स्वभावाच्या माणसाने घरी येताच लहान धाकट्यांना पुढ्यात घ्यावे तसे त्यांनी तबल्याचे जुळे पुढ्यात घेतले. तो तपस्वी कलाकार, त्या निर्जीव वाद्यांना बोलते करू लागला. मेलेली कातडी मंजुळपणे बोलू लागली. मोरमोरणी नाचाव्या तसे उस्तादांचे हात नाचू लागले. तबल्याची गर्जना घुमू लागली. मी तर भारून गेलो. स्वतः निर्मिलेल्या तालविश्वात उस्ताद स्वतःच रंगून गेले. रंगात येऊन मला म्हणाले.

'गाओ, बेटा गाओ'

मी काय गाणार? उस्तादांच्या तबल्याच्या तालावर बालगंधर्वासारख्यांची वाणी वेडावून नाचावी. मी उभयदृष्ट्या आशिक्षित. पण उस्तादांची आज्ञा मला मोडवली नाही. मी तोंड उघडले. गाऊ लागलो. उस्ताद वाद्यावर आघात करू लागले. तबल्याच्या बोलांनी मला जणू पुढच्या ताना सांगितल्या. काय गायलो कुणाला माहीत, पण गायलो. मी गात राहिलो. ते वाजवीत राहिले.

'हाय दैवा काय दावा साधिला
बाण वर्मी पाखराच्या लागला—'

हे गीत त्याकाळी फार लोकप्रिय झाले होते. ते मी म्हणू लागलो. उस्तादांना चालीवरची मूळ चीज आवडली. ते स्वतः ती गाऊ लागले. मोठी अद्‌भुत बैठक जमली. बिअर या पेयाचा नशा मला उमगला होता. या बैठकीचा नशा त्या नशेहून वेगळा होता. अधिक बेहोष करणारा होता.

गाणेच शिकत राहिलो असतो, पण तसे घडायचे नव्हते. कलेच्या

बेहोषीपेक्षा वागण्यातल्या उच्छृंखलपणाची आवड माझ्या मनी बलवान झाली.

कुठल्यातरी माळावर नागानंदाचे आउटडोअर शूटिंग चालले होते. अनेक तरण्याताठ्या पोरी एक्स्ट्राज म्हणून अवती भवती वावरत होत्या. त्यांतली एक माझ्याजवळ आली. चित्रपटाचा नायक झालो तरी बायकांशी बोलताना बिचकणे मला टाळता येत नव्हते.

'रामचंद्रराव–' सात ठिकाणी मुरडत ती गोरटी नटमोगरी म्हणाली, 'आज रात्री माझ्याकडे जेवायला याल?'

जेवण्यापेक्षा पिण्याचा मोह माझ्या मनी अधिक होता. आपण सिनेमा-नट आहोत याची आठवण आतल्या आत जागी करीत मी लटपटत्या निर्लज्जपणाने तिला विचारलं, 'नुसतं जेवायला?'

ती हसली. फार लोभसवाणे हसली. तिची मुद्रा रंगवलेली आहे, भुवया मुद्दाम लांबविलेल्या आहेत, हे सारे मला माहीत होते, तरीही तिचे ते हावभाव मला आवडले. तीही जणू प्रसन्न झाली. डोळे तिरपे करीत तिने विचारले. 'आणखी काय पाहिजे?' मी उजव्या हाताचा आंगठा पाठीकडून वाकवीत ओठाशी भिडवला आणि हसलो.

'ती पण व्यवस्था करते' ती म्हणाली.

'मग येतो.'

द्वादशीचा ब्राह्मण म्हणून निमंत्रण स्वीकारावे तसे मी त्या अधिकेचे निमंत्रण स्वीकारले. खरे म्हणजे, मला मद्याची चटक लागली होती. रोज संध्याकाळी बिअर पिण्याचे व्यसनच मला जडले होते. मला मिळणारा पगार त्या व्यसनाला फार अपुरा होता.

सूर्यदेवाने आपल्या तोंडावरचा तळपता रंग पुसून टाकला, नेहमीच्या शीतळ मुद्रेने त्याने दिवसाचा निरोप घेतला. मी माझ्या तोंडावरचा ग्रीस-पेंट पुसला. बेरळेकरांकडे कळविले नाही. गोदूताईंना सांगितले नाही, की अप्पा काळ्याला थांग पत्ता लागू दिला नाही. तिन्हीसांजेच्या काज-

ळल्या वेळी मी त्या अधिकेच्या आळीत जाऊन पोचलो. घर नेमके माहीत नव्हते. तिने खाणाखुणा सांगितल्या होत्या. त्या दिसता दिसेनात. अंधार झाला–ओठांना त्या कडवट कैफाची तहान छळू लागली. त्या आंधळ्या आळीत विजेचे दिवे नव्हते. मी अगदी कंटाळलो. खिशात दिडक्या असत्या तर त्याच पावली मी परत फिरलो असतो. काळ्या पापाचा 'बार' गाठला असता. खिसे उपाशी होते. मला फार तहान लागली होती.

एक वळण वळलो आणि काय आश्चर्य ! माझी निमंत्रिका माझीच वाट पाहत उभी होती. तिच्या हातात मिणमिणता कंदील होता. मी आलो म्हणताच ती चटकन आली. आनंदाने बोलली, 'तुमची वाट बघत होते, चला.'

मी तिच्या पाठोपाठ गेलो. एक जुनाट वाडा होता. चहू बाजूंनी कांद्या-लसणाचे वास येत होते. तिचे बिऱ्हाड आले. दोन खोल्यांचा संसार. एक खोली सैंपाकाची, एक खोली बैठकीची. बैठकीच्या खोलीत एक अंथरी अंथरलेली होती. एक छोटे शामदान जळत होते. तिच्या हातचा कंदील आत सैंपाकघराकडे गेला. मला वाटते, तिची म्हातारी आई आत पाकसिद्धी करीत होती.

मी अंथरीवर बसलो. ती नाचत आल्यासारखी आली. एक अर्ध्या पाइं-टची 'रम'ची बाटली घेऊन आली. तीही कोल्हापुरची निर्मिती होती. मी तहानेला होतो, पण 'रम' या पेयाशी माझा परिचय नव्हता. असो. मला कसले तरी मादक पेय हवे होते. मी ती बाटली अधाशीपणाने घेतली.

'थांबा हं, सोडा आहे.'

'सोडा कशाला ?'

ती हसली. मग तिनेच सारी सिद्धता केली. सोडा आणि मद्य मिसळले. एक पेला माझ्या हाती दिला. एक तिने स्वतःसाठी घेतला. हाती पडताच मी तो पेला तोंडाला लावला. घटाघटा पिऊन घेतला. ही चव वेगळी होती. तामस होती. ती डोळे विस्फारून पाहत होती. तिचे डोळे फार सुंदर

होते. मी तिचा ऋणी होतो. तिने माझी तहान ओळखली होती. ती भागविण्यासाठी कसले का होईना, मद्य तयार ठेवले होते. मी पुष्कळ प्यालो. सर्वांग बधिरल्यासारखे झाले. भूक जाणवू लागली, तसे अडखळत बोलून गेलो, 'जेवण ?'

'तयार. कोंबडी आवडेल ना ?'

मी पिण्याचा अभ्यास वाढवला होता पण 'खाण्या'च्या वाटेला अजून गेलो नव्हतो. मी तिला 'हो'कार दिला की नकार दिला,– काय केले कोण जाणे.

ती थोडी माझ्याजवळ सरकली. माझ्या मांडीवर हात देऊन, डोळ्यांत पाहिल्यासारखे पाहू लागली, तिचे ओठ थरथरत नव्हते. डोळे अधीरल्या-सारखे दिसत होते. तो अनुभव मला सर्वस्वी नवा होता. तिला काय पाहिजे होते ते मी तर्काने जाणले आणि मनस्वी घाबरलो. उगाच भलत्या गोष्टी आठवू लागलो. सोवळे नेसून वाढणारी मोठी आई आठवली. पुणतांब्याच्या घरासमोरची ती गणेशमूर्ती आठवली. वडिलांचा आठव आला. आईची आठवण आली. मला जणू ब्रह्मांड आठवले. अंगातली चेतना जाणवल्या-सारखी झाली होती. तरीही मी दूर सरलो. तशी ती परत जवळ आली, आणखी जवळ आली. तिच्या श्वासांना आर्जवाचा वास आला. वाटले, मी सापडलो. सापडू नये त्या जाळ्यात सापडलो. मी आणखी दूर सरलो. ती आणखी जवळ आली. मग सरकण्यासाठी जागाच उरली नाही. मी एका कोपऱ्याशी आलो. कोळ्याच्या जाळ्यात गुंतलेले एकादे पंखाचे पाखरू जागच्या जागी थरथरावे तसा थरथरू लागलो. तशा बेहोश अवस्थेतही मला काही सुचले.

'जेवण आणता ना ?' मी विचारले.

'आता आणत्ये.' म्हणत ती उठली. आत गेली. त्या संधीचा मी अचूक लाभ घेतला. मी उठलो, उंबरठ्यात ठेवलेली माझी पायताणे मी उचलून बगलेत मारली आणि मागे न बघताच धूम ठोकली. त्या अंधारातून निसटलो.

वाऱ्यासारखा निघालो. कसा निघालो, काय निघालो, राम जाणे. कुठेही थांबलो नाही. थांबलो तो रंकाळा वेशीत, गोदूताईच्या वाड्याशी.

ती गोष्ट मी कुणाला सांगितली नाही. तिनेही सांगितली नाही. ती पुनः भेटली, तिचे आणि माझे कार्यस्थळ एक. भेट पडल्याशिवाय राहील कशी? मी तिच्याकडे पाहिले. तिने माझ्याकडे पाहिले. अनोळखीपणाचा आव दोघांनी आणला. पुनः आपसांत भाषण असे झालेच नाही. आज तर त्या बापडीचे नावही माझ्या स्मरणात नाही.

पापाची पाऊलवाट मला सापडली होती. एक अनोळखी अधिकेने विषयवासनेची चुणूक मला दाखविली होती. पूर्व-संस्कारांनी मला अपघातातून वाचवले. ते संस्कारही पुढे झिजणी लागले. क्षीण होत गेले. दारू पिण्यात काही पाप आहे हे मला बिलकुल भावेनासे झाले. अवती भवती माणसे होती ती सारी तसलीच. पापाला पराक्रम मानणारी. नीतीला दुबळ्याचे दैवत संबोधणारी. त्यांच्या सवंग गप्पांनी माझ्या मनावर होता तो संस्कारांचा वर्ख पुसून टाकला. त्यांच्या—माझ्या आवडीनिवडी त्यांनी एकरूप करून टाकल्या. मी हे सारे श्रेय त्यांच्या कर्तृत्वाला देणे माझ्यावर अन्याय करणारे आहे. मी स्वतःच दुबळा होतो. कच्चा होतो.

कला साधनेपेक्षा अन्य उचापतींतच मला रस वाटू लागला. मी गाणारा तरुण. गाण्याच्या नादाने एखाद्या गायिकेच्या प्रेमात पडतो तर गोष्ट वेगळी. केवळ कुणी टारगटांनी हुलीवर घातले म्हणून मी बिघडलो आणि चढू नये त्या वस्तीचा जिनाही चढलो. वातावरणाचा परिणाम वागण्यावर व्हावा असेच ते वय होते.

चित्रपट व्यवसायातील गुण मी किती आत्मसात केले कुणास ठाऊक! दुर्गुण मात्र बव्हंशी मी पचवले. अभिनयाविषयीची उपजत ओढही माझ्या मनी करपून गेली. गरुडाने अर्धे शरीर खाऊन टाकले आहे, अशा राजपुत्राच्या अवस्थेचे सोंग वठविण्यासाठी मला तासन् तास उन्हात पडावे लागले. अंगावर फासलेल्या वॉर्निशच्या वासाने अनेकदा ओकारी आली.

तो व्यवसाय करणे प्रारंभीच नकोसे होऊन गेले. नागानंदाचे चित्रण आकाराला आले, नाना आता मुंबईत नोकरी करीत होता. त्याचे पत्र आले. "आई आणि शकू (छोटी बहीण) इथे आहेत. काम आटोपले असल्यास इकडे ये." मी कोल्हापूर सोडावयाचे ठरवले. गोदूताई वा बेरळेकर बंधू यांना मात्र मी तसे सांगितले नाही. 'मुंबईस जाऊन येतो' एवढेच सांगून त्या प्रेमळ घराचा मी निरोप घेतला. मी नायकाचे काम केलेला तो चित्रपट अद्याप प्रकाशित व्हायचा होता.

अनेक मोहांच्या मिठ्या अनुभवून मी मोहमयी मुंबईत आलो. इथे आलो तो घरकुलाच्या आसऱ्याला. नानाला चाकरी लागली होती. श्री साउंड स्टुडिओ आता आहे त्याच्या पाठीमागच्या बाजूस एका चाळीत तेव्हा त्याचे बिऱ्हाड होते. आई त्याच्यापाशी होती. अन्नपाण्याचा प्रश्न माझ्यापर्यंत भिडलेला नव्हता. पण माझा म्हणून काही उद्योग शोधणे मला अगत्याचे वाटत होते. नानाचा एक गायकवाड नावाचा स्नेही होता. त्याच्या ओळखीने मी एक दिवस वाडिया बंधूंच्या स्टुडिओत पोचलो. माझी मुलाखत कुणाशी झाली ते मला आता नेमके आठवत नाही. पुष्कळ चित्रपट-संस्थांकडे खेटे घालून कंटाळल्यावर गायकवाडांच्या मध्यस्थीने माझी आणि वाडियावाल्यांची भेट होत होती. माझे ध्यान दिसायला वाईट नव्हते. नाकी-डोळी नीटस माणूस होतो मी. पण पाप्याचे पितर. पोषाख गबाळा. अंगात धड कोट नाही. नुसता सदरा आणि पायजमा. गायकवाडांनी माझी भलावण 'कोल्हापुरचा एक हीरो' म्हणून केली असावी. मास्टर विठ्ठल, मास्टर विनायक यांच्यासारखे एखादे उमदे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर येईल, असे त्या चालकांना वाटले असावे. मी आत जाताच त्याचे डोळे आश्चर्यचकित झाले. 'बसा' म्हणणे तर भाग होते. ते 'बसा' म्हणाले आणि मी बसलो. दाखविण्यासारखे एखादे छायाचित्रदेखील माझ्याकडे नव्हते. होते ते 'नागानन्द' चित्रपटाचे एक छापील चोपडे. त्यात माझा एक फोटो होता. ते चोपडे मी पुढे केले. त्यांनी ते न उघडताच बाजूला ठेवले.

मी स्वतःच जर त्यांच्यासमोर बसलो होतो तर फोटो बेटा हवा कशाला? बातचीत सुरू झाली.

त्यांनी विचारले, ‘ तुमने हीरोका रोल किया ?’

‘ जी.’

‘ घोडेपे चढना आता है ?’

‘ नही.’

‘ ऊँचीपरसे कूदना ?’

‘ कूदना ?’

‘ हाँ कूदना. रिचर्ड टॉलमेज जैसा ?’

‘ नहीं.’

‘ मोटर-सायकल चलाना जानते हो ?’

‘ साइकल चला सकता हूँ. ?’

तो मुलाखत घेणारा साहेब कातावल्यासारखा झाला आणि फटकन म्हणाला—‘ फिर काहेके हीरो तुम ?’

नायकाची वरील वैशिष्ट्ये मी कधीच आत्मसात केली नव्हती. वाडिया बंधूंनी मला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. थोबाडीत खाल्ल्यासारखा चेहरा करून मी बिऱ्हाडी परत आलो.

नाना निराश झाला नाही. तो म्हणाला, ‘ आपण बाबांना विचारू. ते सांगतील पुढचा रस्ता... !’

नानाच्या जीवनात ‘ बाबा ’ हे एक बडे प्रस्थ होते. तो एक हरिजन म्हातारा होता. दोन्ही पायांनी खुरडत खुरडत काठीच्या आधारावर चालायचा. मी मुंबईत आलो, तेव्हा तो आमच्या कुटुंबातच राहत होता. नाना आणि आई त्यांची खूप सेवा करीत असत. मला असली थोतांडे पटत नसत, पण त्यांना विरोध करण्याची धमकही माझ्यात आलेली नव्हती.

‘ कोण बाबा, त्याला काय कळणार !’ इतके मी म्हणालो मात्र, नानाने

मला एक पोथीच ऐकवली. त्याच्या गुरुगौरव-गाथेने मलाही मग मागचे आठवले.

पूर्वी कधी तरी मी लहान असताना नाना ओगलेवाडीला नोकरीला होता. तिथे त्याची प्रकृती एकाएकी बिघडली. त्याला उगीचच घाबरे झाल्यासारखे वाटू लागले. मोठ्या सावत्र भावाने त्याला नांदगावला आणविला. मी आणि भाऊदेखील तेव्हा नांदगावीच होतो. नाना एकाएकी घामाघूम व्हायचा. अर्धाअधिक बेशुद्धीत बुडायचा. डॉक्टरांना काही म्हटल्या काहीच बोध होईना. भाऊ अगदी हवालदिल झाले. नानाच्या रोगाला काही केल्या उतार पडेना. एका संध्याकाळी आमचा एक खंडकरी नांदगावी आला. नानाचे दुखणे त्याच्या दृष्टी पडले. तो माझ्या वडिलांच्या वयाचा पोक्त माणूस होता. नानाची घबराट पाहून तो भाऊंना म्हणाला, ‘ मास्तर, काय झालं हो या गंग्याला ?’

‘ तेच तर कळत नाही. ओगलेवाडीहून आल्यादिवसापासून रोज संध्याकाळी याचे हे असे चालले आहे.

त्या शेतकऱ्याने थोडासा विचार केला. कळ सापडल्यासारखा आविर्भाव करून तो म्हणाला—‘ मी नेतो याला.’

‘ कुठे ?’ भाऊंनी विचारले.

‘ नाशकाला.’

‘ ने हवा तर !’ भाऊंचा विश्वास होता त्या वाटेकऱ्यावर. तो शेतकरी बैलगाडीतून माझ्या भावाला नाशिकला घेऊन आला. चार-आठ दिवसांनी नाना परत आला तो खडखडीत बरा होऊन.

त्याला म्हणे, कुणा भुताने झपाटले होते ! त्याचे ते भूत नाशिकच्या देवर्षीने हाकलून लावले. नानाचे झाड मोकळे केले. तो देवर्षी म्हणजेच हा बाबा.

बाबा आता आपल्या उपकृताच्या आसऱ्याला आला होता. नाना त्याचे पाय चोळून द्यायचा. त्याच्या अंगाला तेल लावायचा. मला ते मुळीच

आवडत नव्हते. नानाची मात्र त्या गुरुमाउलीवर गाढ श्रद्धा होती.

मी वाडियाकडून नकार घेऊन आलो, त्या रात्री नानाने मोठ्या आर्जवी आवाजात बाबाला विचारले,

'बाबा, या माझ्या भावाला चाकरी का लागत नाही?'

'गेला होता का कुठं चाकरी मागायला?'

'हो, आजच गेला होता.'

'मग?'

'नाही म्हणाले मालक.'

'का?'

'तेच कळत नाही.'

'मी सांगू–' डोळ्यांची काही तरी विलक्षण हालचाल करीत बाबा म्हणाला. नानाने अदबीने हात जोडले. आईदेखील हातचे काम टाकून ऐकायला आली.

'त्या पोराला एका भुताने झपाटले आहे. आज तो कुणाकडे तरी नोकरी मागायला गेला होता. तेव्हा ते भूतही संगती होते. ते दोघांच्या-मध्ये उभे राहिले. याचे गुण मालकाला दिसले नाहीत!' बाबाच्या या अजब शोधाने मी तर थक्क झालो. तिरसटल्या स्वरात मी त्याला विचारले,

'मला कुठे लागणार भूत!'

'लागले आहे.'

'कसे? कशावरून?'

'तू होतास कुठे?'

'कोल्हापुरी.'

'काम कुठे करीत होतास?'

'एका फिल्म कंपनीत.'

'कामाच्या जागेजवळ एक म्हातारा पिंपळ होता?'

'मला आठवत नाही.'

'पण मला दिसते आहे, एका काळ्या तिन्हीसांजेला तू त्या झाडाखाली इरागतीला बसलास आणि तिथेच तुला भुताने झपाटले. ते तुझ्या अंगावर आहे!' बाबाने आव खूप आणला, पण मला त्याचे एक अक्षर पटले नाही.

नाना म्हणाला, "राम, पाया पड बाबांच्या."

मी पाया पडलो खरा, पण मला मात्र त्याचे काहीएक पटले नाही ते नाहीच. नानाने त्याला विनंती केली, "बाबा, माझ्यावरचे संकट निवारलेय तसे आता याच्यावरचे निवारा."

बाबाने डोळे मिटले. होकारार्थी मुंडी हलविली.

त्या बाबाने मग तऱ्हातऱ्हा केल्या. माझ्या अंथरुणाभोवती राखेची रांगोळी घातली. नानांकडून ताडीचा भोगा मागवला. मला खूप ताडी पाजली. बाबाचे तंत्रमंत्र मला आवडले नाही, पण त्या पेयाने माझा तळिराम सुखी झाला. कोल्हापूर सोडल्यापासून जिभेला मादक ओलावा लाभला नव्हता. मी खूप प्यायलो आणि अंथरुणावर आडवा झालो. बाबाने कणकीच्या बाहुल्या केल्या आणि माझ्या अंथरुणाभोवती ठेवल्या.

'आता गाढ झोप' हुकमी आवाजात त्याने मला फर्मावले.

'का?'

'मी सांगतो म्हणून. या बाहुल्या आता नाचू लागतील. ते पाहून तुला भय वाटेल. घाबरशील. त्यापेक्षा गाढ झोप.'

मी गप्प झालो. पोटात पेय गेलेलं असल्यामुळे मला झोप मोठी छान लागली. सकाळी जागा झालो तेव्हा मी गाणे गुणगुणू लागलो. बाबाने ग्वाही दिली की, पोराच्या अंगावरचे पिशाच्च पसार झाले. मला ते सारेच नाटक वाटले. मी तसे म्हणताच बाबा भडकला. त्याने एक सणसणून थोबाडीत ठेवून दिली. मी चकितच झालो. नानाला मी तक्रार सांगितली. नानाला अत्यानंद झाला. त्याने खूष होऊन विचारले, 'बाबांनी थोबाडीत मारली तुझ्या?'

'हो ना.'

‘ भाग्यवान आहेस ! ’

‘ अं ? ’

‘ अरे, ती थोबाडीत नव्हे, तो आशीर्वाद ! ’ बाबांच्या आशीर्वादाने माझे काही देखील भले झाले नाही. मी बेकारच राहिलो. बाबा मात्र आमच्या संसारात चरत राहिला. नाना त्याची सेवाचाकरी करण्यातच धन्यता मानू लागला. आईला मात्र पुढे पुढे बाबाचे अस्तित्व आवडेनासे झाले. नानाच्या धाकाने ती करीत राहिली, पण त्या म्हाताऱ्याच्या हट्टाचा आणि ओंगळ-पणाचा तिला अगदी वीट आला. आईची अवस्था मीही हेरली. तिला विश्वासात घेतली. आम्ही दोघांनी ठरविले की, नानांच्या मानगुटीवरचे हे जिते भूत पळवून लावायचे. आमच्या या कटाचा सुगावा कसा कोण जाणे, पण नानाला लागला. त्याला फार वाईट वाटले. तो काकुळती येऊन म्हणाला.

‘ अरे, बाबा नसता तर आज मीही दिसलो नसतो. त्याच्या अंगीपिंडी अनेक दैवतांचा आणि आत्म्याचा वास आहे. तो स्वतः मुक्त आहे. हट्ट करतो तो बाबा नव्हे. त्या वेळी त्याच्या अंगी संचारणारी देवता तो हट्ट करीत असते. ’

‘ देवता का अंडी आणि मांस मागतात ? ’

‘ त्याच्या अंगावर एक अवलिया आहे. ’

‘ अवलिया ? ’

‘ हो. अवलिया– पीर ! ’

माझी खात्री होती अवलिया, पीर, जादूटोणा हे सारेच थोतांड होते. मी मुंबईत आलो त्या दिवशीच बाबांचा आमच्या घरातला शेर सरला होता. त्यालाही माझ्याबद्दल खात्री नव्हती. मी सिनेमा व्यवसायातील पाणी प्यायलेला पाणूस. मी काय त्याच्या देवर्षीपणावर विश्वास ठेवणार ? त्याला तशी शंका आली होती, म्हणूनच त्याने नसते एक भूत माझ्या मानेवर बसविले होते व ते हाकलल्याचा तमाशाही घडवून आणला होता.

आई माझ्या पक्षाला मिळाली. एके दिवशी मी नानाला निक्षून सांगितले ‘ नाना, तुझ्या या बाबाला हाकल. ’

त्याने निश्चयपूर्वक नकार दिला. ‘ मला ते पाहवणार नाही. ’

‘ मी ते करणार ! तू नको करू. आमचे आम्ही पाहून घेऊ. तू घरीच येऊ नको चार दिवस. मित्राकडे रहा. ’

नाना काही बोलला नाही. त्याचे डोळे मात्र भरून आले. अतिशय कष्टाने तो बोलला, ‘ माझे काय, मी राहीन चार दिवस बाहेर. पण तुम्ही त्याला दुखवून दुःखी व्हाल ! ’

‘ आता कुठे सुखाचे डोंगर हिरवळले आहेत ? ऐंशी तिथे पंच्याऐंशी. ’ मी म्हणालो.

नाना तीनचार दिवस गायब झाला. बाबांची रसद तोडून टाकली. तो सारखा विचारी– ‘ नाना कुठाय ? ’

त्याच्या त्या प्रश्नाची चांगली शंभर आवर्तने मी होऊ दिली आणि मग त्याला कठोरपणे सांगितलं, ‘ नाना येणार नाही, तुम्हीही या घरात येऊ नका ! ’

‘ होय हो ? ’ बाबाने संतप्त स्वरात आईला विचारले, आईने मान वळविली. बाबा समजावयाचे ते समजला, मग तो मोठ्याने ओरडला, “ मला थोडी राख तर द्याल ? ”

मी आईला म्हटले, ‘ आई सारी शेगडी त्याच्या स्वाधीन कर. हवी तेवढी राख घेऊ दे त्याला ! ’

बाबाने राख घेतली आणि आमच्या उंबऱ्यात विसकटली. एका छोट्या राखेच्या ढिगाऱ्यावर आपल्या हाताचे बोट वर्तुळाकृती फिरवीत तो काही मंत्र पुटपुटला. दातओठ खात खूप तणतणला. अंती कडू जहर शब्दांत गरजला, ‘ निःसंतान होईल. या घरात दिवा लागणार नाही, कुळ चालवील असे कुणी राहणार नाही. ’

बाबाने उंबरा ओलांडला, पण जाणार कुठे ? तीन चार दिवस तो

आमच्या बिऱ्हाडाच्या आगेमागेच घोटाळत राहिला. नाना आला नाही. बाबाची आणि त्याची गाठच झाली नाही. आमचे सारे शेजारीपाजारी किरिस्ताव होते. त्यांतल्या कुणी एकानेही त्या हिंदू बैराग्याची दखल घेतली नाही.

मग तो गेला. कुठे गेला, कसा गेला, काही कळले नाही.

मी मुंबईत राहिलो. बेकार अवस्थेतच राहिलो. आमच्या बिऱ्हाडाशेजारी एक उडप्याचे हॉटेल होते. तेथे ग्रामोफोन होता. त्यावर न्यू थिएटर्सच्या रेकॉर्ड्स अहोरात्र वाजत. मी त्या हॉटेलात जाऊन बसे. ऐकून ऐकूनच ती गाणी पाठ करी. त्यांचे नोटेशन एका वहीत पेन्सिलीने लिहून ठेवी. असे आळशी आणि गतिहीन जीवन चालले असतानाच एके दिवशी पुणतांब्याहून पत्र आले. वडील आजारी झाले होते. त्या नुसत्या वार्तेनेच माझे डोळे पाणावले. भाऊंना भेटल्याखेरीज जिवाला चैन पडेना. आई, बहीण आणि मी तिघेही वडिलांकडे गेलो.

पुणतांब्याला वडिलांची एक म्हातारी काकी होती. तिच्याही अंगात जगदंबेचा संचार व्हायचा. एकदा अशाच भरलेल्या अवस्थेत तिने सांगितले, ‘ मास्तर म्हणजे माझा उजवा हात. तो मी तुटू देणार नाही. ’

माझा त्यावरही विश्वास बसला नाही. बाबांच्या करनखरेपणाचाच मला तो एक सात्त्विक प्रकार वाटला.

वडिलांना मूत्राशयाचे दुखणे झाले होते. लघवीच तुंबून राहत होती. घरगुती आणि गावठी उपाय खूप केले गेले. गुण आला नाही. मुंबईतल्या बाबाची शापवाणी मला उगीचच भेडसावू लागली. माणसाचा एकवार धीर सुटला की त्याला थोतांडेही अर्थपूर्ण वाटू लागतात. वडिलांना उतार पडेना. पुणतांब्यात ना जाणता वैद्य, ना शहाणा डॉक्टर. मग त्यांना येवल्याला हलवले. तिथे एक मिशन हॉस्पिटल होते. तिथली ट्रीटमेंट सुरू झाली.

हॉस्पिटलशेजारी कुणाचा तरी एक मळा होता. त्या मळ्यातील वस्तीवर वडिलांसाठी एक खोली भाड्याने घेतली होती. वडिलांचे एक मित्र होते.

आण्णासाहेब सराळकर त्यांचे नाव. तेही बरोबर होते. वडिलांचे हाल दिवसेंदिवस वाढत चालले. पोट तुडुंबले की त्यांची शुद्ध हरपू लागली. माझ्या डोळ्यांना सारख्याच धारा लागू लागल्या. कितीकिती गोष्टी आठवू लागल्या. याच भाऊंनी माझे लाड केले. याच भाऊंनी मला हौसेने गायनशाळेत घातले. याच भाऊंनी मला लहानपणी आपल्याबरोबर तमाशाला नेले. माझ्या हातून दौलतजादा करविला. याच भाऊंनी मला अवधूत वेषात हाकून दिले. हेच भाऊ वेड्यासारखे माझ्या पाठीमागे आले. याच भाऊंनी माझ्या दुधासाठी मोठ्या भावाची कानउघाडणी केली. हेच भाऊ अर्धांध डोळे घेऊन, मला शोधीत गोदूताईच्या दरवाजाशी आले. एक का अनेक, भाऊंच्या आठवणी माझ्याशी बोलू लागल्या आणि भाऊंना मात्र बोलणे सुधारेना.

एके दिवशी रडतरडतच मी आण्णासाहेबांना विचारले, ‘ आता काय करू ! ’

‘ राम, कठीण प्रसंगी देवाशिवाय आधार नाही, त्याचं नाव घ्यावं. ’ ते म्हणाले,

‘ कसं घ्यावं ? ’ मला तेही माहीत नव्हते.

‘ व्यंकटेश स्तोत्र वाचीत जा, ’ ते म्हणाले.

मी बाजारातून एक लहानसे व्यंकटेश स्तोत्राचे चोपडे आणले. त्या दुखणाईत वातावरणापासून दूर एका झाडाखाली बसून मी त्याचे वाचन, कसले पारायण करू लागलो.

‘ ॐ नमो जी हेरंबा । सकळादि तू प्रारंभा । आठवूनि तुझी स्वरूपशोभा । वंदन भावें करीतसे । ’

माझ्या अंतरीचा भाव खरोखरच उफाळून आला. शेषशायी व्यंकटेशाचे ते स्तोत्र बघता बघता मला मुखोद्गत झाले.

‘ क्षय अपस्मार कुष्ठादि रोग. ग्रंथ पठणे सरावा भोग ’ हे माझे मागणे गिरीच्या राजाने ऐकले नाही. कानांआडते टाकले.

मी व्यंकटेश स्तोत्रच वाचीत बसलो होतो. ओठ बडबडत होते. काळीज धडधडत होते. डोळे गळत होते. वेळ मंत्र थबकला होता. हलता हलत नव्हता—

'राम–' कुणीतरी हाक मारली. 'भाऊ बोलावताहेत.' मी धावत गेलो. भाऊ खाटेवर पडले होते. त्यांनी खुणेने मला जवळ बोलावले. मी गेलो. त्यांच्या खाटेवर बसलो. हुंदका आवरता आवरेना.

'राम' वडील क्षीण आवाजात म्हणाले.

'भाऊ,' मी मुसमुसून बोललो.

'मी सांगतो ते ऐक. बाई या जातीवर विश्वास ठेऊ नको. शरीराची सारी दारे स्वच्छ ठेव, वरची तीन आणि तळीची तीन.' भाऊ काही तरी बोलले. त्यांच्या त्या बोलण्याला काही संदर्भ होता का? त्यांना काही अनुभव आले होते का! मला तसे भविष्यात काही अनुभवावे लागेल असे त्यांना वाटत होते?

काय होते कुणास ठाऊक. मरताना ते इतकेच बोलले आणि त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेवला. तो हात माझ्या पाठीवरून फिरला. फिरता फिरता थांबला. त्यातली ऊब निवू लागली, निवली. आणि–भाऊ गेले. मी पोरका झालो.

मी किती रडलो त्याला गणित नाही. नंतरच्या आयुष्यात मला कधीही तसे रडू आले नाही. बाळपणीही मी कधी इतका रडलो नसेन. माझे भाऊ गेले.

म्हातान्या काकीच्या मुखाने जगदंबा असत्य बोलली. तिचा उजवा हात तुटला. जळून नाहीसा झाला.

त्या तामसी देवर्षीच्या शापाने मी अनाथ झालो का? कशाने काय घडते ते कळते तर?

भाऊंनी माझे काहीच पाहिले नाही. त्यांची आकांक्षा माझ्या हातून पुरी झालेली त्यांना ऐकायला देखील मिळाली नाही. माझे भाऊ गेले. त्यांची आणि माझी भेट आता असंभाव्य झाली.

♠ ♠

५

भाऊ गेल्यानंतर येवल्यात राहण्याचे काहीच कारण उरले नाही. काही दिवस आम्ही सारीजण पुणतांब्यास राहिलो. आई आणि मोठी भावंडे यांनी पुणतांब्याच्या स्थावर–जंगमाची काही निरवानिरव केली असेल. मी दुर्मुखलेल्या अवस्थेतच वावरत होतो. वारंवार वडिलांची आठवण करीत होतो. काळ नुसत्या फुलांचेच निर्माल्य करतो असे नाही. तो पहाडांना भुईसपाट करतो, समुद्राचेही वाळवंट करून फेकून देतो. माझ्या मनातल्या दुःखाचे ताजेपण कालांतराने ओसरून गेले. मी पुनः जीवनाचा रस्ता चालू लागलो.

पुनः मुंबईस आलो. पुनः नानांच्या बिऱ्हाडी राहू लागलो. पुनः नोकरीसाठी पायपीट करू लागलो. ताकास तूर लागेना. कुणीतरी सांगितले की, शिवडीला एक नवी चित्रपट संस्था चालू झाली आहे. तिचे चालक माणसांची भरती करून घेत आहेत. ती नवी संस्था म्हणजे 'मिनर्व्हा मुव्हिटोन' आणि तिचे चालक म्हणजे प्रसिद्ध नट-दिग्दर्शक सोहराबजी मोदी.

सोहराबजींना रंगभूमीवरचा अनुभव अमाप होता. त्यांची 'आर्यसुबोध नाटक मंडळी' साऱ्या भारतभर विख्यात होती. चित्रपट हा रंगभूमीचाच एक यंत्रसिद्ध प्रकार. त्यांनी चित्रपट सुरू करायचा असे ठरविले होते. मी त्यांना भेटायचे ठरविले.

नाही म्हटले तरी माझ्यापाशी थोडा अनुभव होता. एकाच का होईना, चित्रपटात मी नायकाची भूमिका केलेली होती. मध्यस्थाची गरज माझी मलाच वाटली नाही. गरज वाटली एकाच गोष्टीची. एक बऱ्यापैकी कोट जवळ असणे आवश्यक होते. एवढ्या मोठ्या माणसाला भेटायला जायचे म्हणजे वेष बरा असायला हवा होता. माझ्याकडे कोट नव्हता. नानाची सांपत्तिक परिस्थिती मला कोट सहज शिवून देण्याइतकी संपन्न नव्हती. मी आईकडे हट्ट घेतला. तिच्या पडशीतही कोट करविण्याइतकी नाणी शिल्लक नव्हती. कोट शिवणे तर भाग होते.

मला एक आठवण झाली. मी थोडे सोने आईकडे ठेव ठेवलेले होते. पुणतांब्याला असताना, पाथर्डीच्या रसिकांनी मला सोन्याचे पदक दिलेले होते. ते पदक मला माझ्या गान-नैपुण्याबद्दल देण्यात आलेले होते. नागपुरला अशी शेकडो पदके मला मिळालेली होती. पण ती सारी चांदीची. पाथर्डीकरांचे पदक सोन्याचे होते. ते मी आईकडे दिलेले होते. आईने ते जतन करून ठेवलेले होते.

'आई, तो बिल्ला कुठाय ग?' मी विचारले.

'कसला?'

'सोन्याचा. पाथर्डीला मला मिळाला होता तो.'

'आहे माझ्याकडे. का?'

'मला हवाय तो!'

'कशाला?'

'मोडायला.'

'काय करणार मोडून?'

'कोट शिवणार?'

'बिल्ला मोडून कोट?'

'त्याला काय झालं?'

'घर मोडून मांडव बांधणारा शहाणा दिसतोस!'

'असू दे. तो बिल्ला दे!'

'मी नाही देणार.'

'मग कोट कशाने शिवू?'

'अरे, काही धंदा-रोजगार कर. पैसा कमव. मग शीव कोट!'

'कोटावाचून धंदा-रोजगार मिळत नाही.'

'कोटाचा न् चाकरीचा काय संबंध?'

आईला सारे समजावून सांगणे मला भाग पडले. तिने ते पदक माझ्या पुढ्यात रागाने भिरकावले. मी ते शांतपणे उचलले. त्याला बाजार दाखविला. त्या सोन्याचे रोख अठरा रुपये आले. मी एक अर्धे सुती आणि अर्धे लोकरी कापड खरेदी केले. एक फॅशनेबल कोट शिवला. तो कोट पेहरला आणि निघालो शिवडीला. दिवस ऐन उन्हाळ्याचे होते. त्या कोटाने माझे सर्वांग शिजवून काढले. घामाघूम अवस्थेत मी एकदाचा मिनर्व्हाच्या महाद्वारात पोचलो.

तिथे रांगा लागल्या होत्या. मीही एका रांगेच्या शेवटी जाऊन उभा राहिलो. माझ्या मागेही काही उमेदवार येऊन उभे झाले. भरपूर ऊन खाऊन झाल्यावर माझ्यावर पाळी आली. नोकरांना पसंत करण्याचे काम स्वतः सोहराबजीच करीत होते. मी त्यांना प्रथमच पाहिले. लालबुंद कांतीचा, पांढरे शुभ्र कपडे ल्यायलेला तो रुबाबदार माणूस पाहून मी थोडा गांगरलोच.

सोहराबजी बोलले 'या.'

मी आत गेलो. शेजारीच एक बैठक होती. त्या बैठकीवर हार्मोनियम होता.

'म्हणा गाणं !'

मग कुठे माझ्या लक्षात आले की, या परीक्षेचा विषय 'गायन' हा आहे. मी पेटीशी बसलो. स्वतः पेटी वाजवू लागलो. गाऊ लागलो. एखादे कडवे गाऊन झाले न झाले तो सोहराबजी म्हणाले, 'ठीक है.'

चाचणीत यशस्वी झालेले उमेदवार शेजारच्या एका खोलीत बसवून ठेवले जात होते. माझी रवानगी तिकडे झाली. मी त्या खोलीत जाऊन बसलो. तासाभराने एकेकाला बोलावणे येऊ लागले. येता येता पाळी माझ्यावर आली. मी आत गेलो. मोदी स्वतःच्या कार्यालयातील आसनावर विराजमान झालेले होते. मी आत जाताच ते म्हणाले, 'छान आहे आवाज. राहाल आमच्याकडे ?'

'जी,' मी बोलली.

'पगाराचे काय ?' त्यांनी विचारले.

'आपण सांगा.'

'दरमहा पंधरा रुपये पगार देऊ ?'

'पंधरा ?'

'तर किती ? हवं तर दादर ते शिवडी पास देऊ तिसऱ्या वर्गाचा. मग झालं ?' मग झालं काम न काय. मी खिशातून आणलेले नागानंदाचे चोपडे त्यांच्या पुढ्यात फेकीत म्हणालो, 'मी हीरोचे काम केले आहे. मला पंधरा रुपयांवर काम कर म्हणता आपण ?'

'आम्ही एवढेच देऊ शकतो. परवडले तर पाहा.'

'नाही परवडणार'

'नाही परवडणार तर जा.'

मी खरेच मागे वळलो. तसाच चालत चालत घरी आलो. स्वतःच्या बाणेदारपणाची कथा मी मोठ्या कौतुकाने मातुश्रींना सांगितली. मातृदेवतेने उलटी माझीच पूजा बांधली. लागट स्वरात ती म्हणाली, 'तू कशाला करशील नोकरी ? गिळायला मिळतं आहे दोन वेळा. नाना कमावतोय. आपण

कशाला कराल कष्ट ?'

आईच्या या कुजक्या बोलण्याचा मला भारी संताप आला. अंगातला कोट देखील न काढता मी त्याच पावली परत फिरलो. पुनः शिवडीला गेलो. सोहराबजींना भेटलो. ते जेवत होते. मी नम्रपणाने त्यांना सांगितले, 'मघा माझी चूक झाली साहेब. पंधरा रुपयांवर नोकरी करायला तयारी आहे माझी !'

'हो, पण आता रेल्वे पास नाही मिळणार.' सोहराबजी म्हणाले. 'केवळ द. म. पंधरा रुपये !'

'कबूल आहे.' मी म्हटले. माझा मिनर्व्हात प्रवेश झाला.

'सयदे हावस' नावाचा चित्रपट आपली प्रथम निर्मिती म्हणून मिनर्व्हाने हाती घेतला होता. चित्रपटाचा विशेष असा होता की त्याचे चित्रण रंगभूमीच्याच पद्धतीने होणार होते. पदोपदी स्थळ विशेष बदलण्याची तऱ्हा त्या चित्रपटासाठी वापरण्यात येणार नव्हती. रंगभूमीवर चालणारे नाटकच जसेच्या तसे चित्रित करण्यात येणार होते. पडदे, प्रवेश, गमन हे सारे काही रंगमंचाच्या धाटणीने दाखविले जाणार होते. स्वतः सोहराबजी या चित्रपटात नायकाची भूमिका करणार होते. नायिकेसाठी श्यामा नावाच्या कुणा अभिनेत्रीची खास निवड करण्यात आली होती.

माझी नेमणूक झाली होती संगीत विभागात. पण मला पहिले काम सांगितले गेले ते हाती भाला धरून, ताठ उभा राहणाऱ्या सिद्दी रक्षकाचे. कोल्हापुरचा नायक मी. मुंबईला येऊन फालतूंच्या मेळाव्यात दाखल झालो, हाच या घटनेचा अर्थ होता. एक्स्ट्रा नटाचे ते काम अत्यंत अपमानाचे वाटले. पण करतो काय ? पुनः प्रारंभ करणे भागच होते. नानाने मिळवावे आणि मी ऐतोबासारखे खावे, हे चालत राहणे मलाही नको होते.

एकदा असाच एक दरबारचा सीन चालला होता. मी भाला धरून उभा होतो. मुख्य पात्रे लांबलचक संवाद बडबडत होती. रंगमंचावर अमाप गर्दी होती. दहा-पाच तालमी झाल्या आणि चित्रणास आरंभ झाला. वेळ

अपरात्रीची. चित्रण सकाळपासून अव्याहतपणे चालले होते. मी आपला एखाद्या पंचरसी पुतळ्यासारखा उभा होतो. डोळ्यांत झोप दाटली होती. चित्रण चालू असतानाच मला केव्हातरी डुलकी आली आणि मी तोल जाऊन खाली कोसळलो. मुख्य पात्रांचे संवाद 'ठाणठाण' घंटा वाजावी तसे चालले होते. ते संपले.

'कट' मोदीसाहेबांनी दृश्य तोडले.

'ओ. के.' रेकॉर्डिस्ट ओरडला.

कॅमेऱ्यावर पांघरूण घातलेल्या काळ्या बुंधीतून तोंड बाहेर काढून कॅमेरामन मात्र ओरडले 'अरे साहब, रीटेक करना पडेगा?

'क्यों?' मोदीने विचारले.

'वह सिंहासनके पीछे एक पहारेदार था शुरूमें– वह कहाँ है?'

सर्वांच्या नजरा मी उभा होतो त्या जागेकडे वळल्या. ती जागा मोकळी होती. मी खाली पडलो होतो. पडल्या पडल्याच मला गाढ झोप लागून गेली होती. साहेब स्वतः माझ्यापाशी आले. त्यांनी मला जागे केले. मी दचकून उठलो. घाबरलो, फार गांगरलो. पण मोदी एक अक्षरानेही मला बोलले नाहीत. त्यांनी मला तोंडावर पाण्याचा शिडकावा करण्यास सांगितले. मी तसे केले. पूर्ण जागा झालो. पुनः भाला धरून उभा राहिलो. पुनः चित्रणास प्रारंभ झाला. चार सहा महिन्यांत तो चित्रपट पुरा झाला आणि मला वाटते साफ पडला. ते पडद्यावरचे नाटक प्रेक्षकांना मुळीच पसंत पडले नाही.

दुसरा चित्रपट निघायचा ठरला 'आत्मतरंग'. या कथेत संन्याशाचे जथे फार वावरत होते. मी संन्यासी म्हणून रंगत होतो आणि संगीत विभागातही हमाली करीत होतो. दैवदुर्विलास असा की हा दुसरा चित्रपटही साफ पडला. कंपनीने आपल्या नोकरवर्गात कपात सुरू केली. कपातीच्या बाणाला बळी पडलेला पहिला कपोत मी. मासिक पंधरा टिकल्या विणारी ती नोकरीही जाणार असे कळताच माझ्या तोंडचे पाणी पळाले.

मी धावतच मोदीसाहेबांच्याकडे गेलो. गयावया करून म्हणालो, 'साहेब, मला काढू नका!'

साहेबांनी थोडा वेळ विचार केला आणि मग मला विचारले.

'तुझे और क्या आता है?'

मला गाणे येत होते, ते तर मी त्यांना सुरुवातीलाच गाऊन दाखविलेले होते. माझ्या अभिनयाचे मोल तर त्यांना पुरतेच उमगले होते. एकवार नायकाचे काम केलेला मी त्यांच्या संस्थेत उपऱ्या नटाच्या भाऊगर्दीतही ठीकपणे उभा राहू शकत नव्हतो. मला आणखी काय येत होते, म्हणून मी त्यांना प्रश्नाचे काय उत्तर देणार? काही तरी बोलायचे म्हणून बोललो, 'साहब, मैं हार्मोनियम बजा सकता हूँ!'

'अच्छा, तो आजसे तुम म्युझिकमेंही काम करो। हार्मोनियम बजाना तुम्हारा काम।' सोहराबजी म्हणाले, सुराला सूर मिळाला. माझी जागा मला सापडली. तोंडाला रंग लावून घेण्याच्या व्यापातून मुक्त होऊन मी स्वरसृष्टीच्या आसपास आलो.

मिनर्व्हा संस्थेचा जुना हार्मोनियम मास्तर आजारीपणामुळे निवून गेला होता. त्याची पेटी माझ्या हाती आली. सप्रे मास्तरांच्या शाळेत गाण्याबरोबर मी पेटी वाजवायलाही शिकलो होतो. चालणाऱ्याला उभे राहणे येतच असले पाहिजे. गाणाऱ्याला पेटी वाजवता येतच असली पाहिजे. माझा हिशेब हा असा होता. आपल्याला पेटी वाजविता येते हे मी वेगळेपणाने कधी सांगितले नव्हते.

मी मिनर्व्हा संस्थेच्या संगीत विभागाचा पेटीवाला झालो. त्यावेळी संगीत दिग्दर्शक होते बुंदुखाँ. हे बुंदुखाँसाहेब साऱ्या मोदी कुटुंबाचे संगीत शिक्षक होते. भली उंचीपुरी दांडगी आसामी होती. त्यांना संगीताचे ज्ञान असेलही अमाप, पण बाकीच्या विषयांत बुंदुखाँसाहेब अगदी बुद्दुखाँ होते म्हटले तरी चालेल. ते मोठ्या डौलाने स्वतःच्या मनगटावर सोन्याचे घड्याळ बांधीत, पण घड्याळात किती वाजले आहेत ते त्यांना मुळीच समजत नसे.

ते आपले मनगटी घड्याळ माझ्यासारख्या पुढे धरीत आणि अगदी छाती-ठोकपणे विचारीत ' कितने बजे है जरा कहो भई !! '

या बुंदुखाँसाहेबांनी मला पहिल्यापासूनच धारेवर धरले. पेटी वाजविण्याचे राहोच, त्यांनी मला त्या पेटीला हातदेखील लावू दिला नाही. ते मला कामे सांगत ती अशी—

' जाओ चार प्यालिया चाय कहके आओ '

' जरा सिग्रेट ले आओ '

' बनासी पान ले आओ '

ते मला शिपाई म्हणून वागवीत होते. त्यांनी असे का वागावे ते माझ्या मुळीच लक्षात येईना. शेवटी शोध लागला की, मी ज्या जागेवर रुजू झालो होतो ती जागा त्यांना आपल्या एका शागिर्दासाठी हवी होती. मोदींनी त्यांच्या नकळत मला नेमून टाकले होते.

खुद्द संगीत दिग्दर्शक माझ्यावर नाराज होते. पण बाकीच्या वाद्यकारांत मी बघता बघता लोकप्रिय झालो. तेव्हा पार्श्वगायनाची पद्धत (प्ले बॅक) रूढ झालेली नव्हती. प्रत्यक्ष चित्रवाणीच्या वेळीच गाणीही ध्वनिमुद्रित करावी लागत. स्टुडिओबाहेर शूटिंग असले म्हणजे गाणाऱ्या नटनटींबरोबर आम्हां वादकांनाही जावे लागे. कॅमेऱ्याच्या कक्षेबाहेर राहून गाणाऱ्या नट-नटींना साथ करावी लागे. अशा वेळी कधी झाडावर बसून पेटी वाजविणे भाग पडे. कधी नायक झाडाच्या फांदीवर बसला की आम्हांला झाडाखाली राहून त्याचा स्वर सांभाळावा लागे. या खेळात बुंदुखाँ कधी नसत. मीच अशा वेळी वाद्यमेळाचे म्होरकेपण करी. पेटीशी लगट करी. स्टुडिओच्या आवारात खाँसाहेब स्वतःच पेटी घेऊन बसत. मी नुसतीच गरुडमुद्रा धारण करून उभा राही.

' आत्मतरंग ' हा चित्रपट आटोपला आणि बुंदुखाँही कंपनी सोडून गेले. नवे संगीतदिग्दर्शक आले हबीबखाँ. त्या माणसाने आल्याबरोबर मला आपला खास सहकारी बनवून टाकले. माझी तबीयत खूष झाली. तो

माणूस मोठा गुलहौशी होता. तिकडचा, पतियाळाकडचा होता. मस्त माणूस. त्याने माझा पगारही थोडका वाढविला. मला नवे कामही त्याच्या-कडून मिळाले. हबीबखानने शास्त्रीय संगीत शिक्षणाचा एक वर्ग काढला होता. ब्रॉडवे सिनेमासमोर एक शरीफा मॅन्शन होते. तेथे हा वर्ग भरे. त्या वर्गावर त्याने माझी शिक्षक म्हणून नेमणूक केली. मी खाँसाहेबांजवळ शिके व त्यांच्या नव्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण देई.

माझा सारा दिवसच मग संगीताच्या संगतीत जाऊ लागला. पहाटे चारला मी खांसाहेबांकडे जाई. ते मला एखादी चीज सांगत. उजाडेपर्यंत मी ती घोटत राही. खाँसाहेब पुनः चौपाईवर पडून घोरू लागत. सकाळी त्यांचे विद्यार्थी येत. नऊपर्यंत मी त्यांचा वर्ग घेई. मग मिनर्व्हाकडे जाई. मिनर्व्हाची नोकरी सहापर्यंत चाले. मी परत येई तो थेट पुन्हा गायन-वर्गात. पुन्हा साडेनऊपर्यंत माझे अध्यापनकार्य चाले. कामाच्या या लोक-विलक्षण रगाड्यात मी अगदी दुमता होऊन जाई. मला मद्यपानाचे स्मरण होई.

नाना आता मुंबईत नव्हता. तो कुठेतरी नाशिकला की कायसा नोकरी करीत होता. आई आणि शकू माझ्याकडे होत्या. माझी मिळकत अजूनही सांगण्यासारखी नव्हती. हातातोंडाला गाठ पडणेच महा कठीण होते, मग मद्य कशातून पिणार ? या काळात मी नवे व्यसन लावून घेतले. भांग घ्यायला शिकलो. आता दादर विभागात विजयनगर इमारत आहे, त्या जागेसमोर एक भांगवाला भैय्या होता. त्याच्याशी मी संधान बांधले. रात्री साडेनऊ वाजता मी गायनशाळेतून सुटलो की त्याच्या दुकानी जाऊ लागलो. त्या वेळेपर्यंत त्याची गिऱ्हाइकी संपलेली असे. भांगेचे भांडे तळाला लागलेले असे. मी त्याच्या हातावर एक आणेली ठेवी आणि तो भांगेचा गाळ गळ्यात ओती. घरी पोचेपर्यंत अगदी ब्रह्मानंदी टाळी लागे. घरी जाऊन मी बकाबका जेवी आणि हातपाय ताणून, भारावलेल्या अजगरा-सारखा गाढ झोपी जाई.

हबीबसाहेबांच्या विद्यार्थ्यांना मी काय शिकवले कुणास ठाऊक, पण माझी स्वतःची मेहनत मात्र सपाटून झाली. माझा पहाटेचा रियाज तिथे इतका विकोपाला गेला की उषःकाली ती शरीफा आणि तिचे सारे भाडेकरू हबीबसाहेबांच्या खोलीत जमले. शरीफा मग संतापून हबीबसाहेबांस म्हणाली, 'इस लडकेका यह सुबह–सुबह चिल्लाना बंद करो, नही तो आपको भी जगह खाली करनी पडेगी !'

हबीबसाहेब शांतपणे मला म्हणाले, 'बेटा राम, वख्त मिलनेपर रियाज करो. औरोंकी नींद खराब करना अच्छा नही !'

'मिनर्व्हा'तच काम करणारा एक गौतम नावाचा तरुण या अवधीत माझा जानी दोस्त बनला. त्याला माझे व्यसन मुळीच आवडत नसे. भांग पिणे, हा भ्याडांचा शौक असे त्याचे वैयक्तिक मत. त्याने आणि त्याच्या काही मित्रांनी एके दिवशी एक कट केला. मी घरी पोचायच्या आधीच ते माझ्या घरी गेले आणि त्यांनी माझ्या आईला सांगून टाकले, 'राम आज घरी जेवायला येणार नाही, आम्ही मित्रमित्र बाहेर जेवायला जाणार आहोत.'

रात्री ९॥ ला मी गायनशाळेतून निघून भांगवाल्या भैयाकडे जाणार तो हा जथा मला वाटेत भेटला. त्यांनी मोठ्या आग्रहाने मला आकंठ भांग पाजली. मग मला घेऊन ते प्लाझा सिनेमासमोरच्या एका खाणावळीत जेवायला आले. मी काय जेवलो, किती जेवलो याचा माझा मलाच पत्ता लागला नाही. शुद्ध पार हरपली. दिव्यांची टिंबे शतगुणित दिसू लागली. अंतराचे आकलन मेंदूला राहिले नाही. चालता येईना. बोलणे सुधारेना. वस्तूंची ओळख पटेना. गपागप डोळे मिटू लागले. मित्रांनी माझी टर उडविण्याचा चंग बांधला. कुठल्याही इमारतीकडे बोट दाखवून ते मला सांगू लागले.

'—राम, यह तेरा घर !' मी वेड्यासारखा लडखडत त्या दिशेने पाहू लागलो. बंद दाराशी थडकन वा कुणाच्या तरी शिव्या खाऊन परतू लागलो.

ते हसत राहिले. असा घोळ पहाटेपर्यंत चालला. माझी नशा पार उतरली. शुद्धीवर आलो तेव्हा मी शपथ घेतली 'उभ्या आयुष्यात पुनः भांगेला स्पर्श करायचा नाही.' माझी भांग सुटली. खरोखरच सुटली.

हबीबसाहेब मिनर्व्हा सोडून गेले आणि हूगन नावाचे एक काश्मिरी दिग्दर्शक कामावर रुजू झाले. तोही माणूस मोठा जिंदादिल होता. त्याचे संगीताचे ज्ञान थोर होते. त्याने सारे खातेच नवे करून टाकले. इंग्लिश तऱ्हेच्या वाद्यावर देशी राग वाजविता येतात हे जणू त्यानेच दाखविले. कित्येक गोवेकर वादक त्याने मिनर्व्हात आणले. देशी पद्धतीने नोटेशन लिहिण्याची सवय मला लहानपणापासून होती. लिहिणारा संगीतकार ही एक नवी पदवी मला लाभली. आळशी वादक त्यामुळे माझ्याशी अधिक स्नेह करू लागले. संगीत विभागातील माझी लोकप्रियता अगदी वज्रलेप झाली.

हूगनही माझ्यावर फार प्रेम करू लागला. तो मला घेऊन मद्यपानाच्या मैफली घडवू लागला. त्यावेळी मुंबईच्या मोठमोठ्या हॉटेलसमध्ये इंग्लिश वादकांचे ताफे असत. मी खूप ऐकले. पाश्चात्यांची उडती लय देशी गाण्यांना लाभली तर ती लोकप्रिय होतील असा एक आडाखा माझा मीच मनाशी बांधला.

हूगन गाण्याच्या चाली करी व मला त्याची स्वरलिपी करून ठेवायला सांगे. मी त्यावेळी टिपून घेई. मग ती चाल स्वतःशी गुणगुणून पाही. माझे मलाच काही तरी नवीन सुचे. हलकेच मुळात थोडा बदल करून मी माझ्या सुधारणाची स्वरलिपी त्या लिखाणात घुसडून देई. हूगनच्या लक्षात राहत नसे. मी केलेले बदल तो नकळत मान्य करी. माझ्या आनंदाला उधाण येई. यशोदेने देवकीचे बाळ वात्सल्याने खेळवावे तसे तो माझ्या चाली आपल्या म्हणून घोळवीत राही. सृजनाचा आनंद उरी कोंडून धरणे मला अशक्य होऊन जाई.

हूगननंतर मीरसाहेब नावाचा एक ज्ञानी गायक संगीतदिग्दर्शक म्हणून आला. बनारसी पद्धतीची गायकी हा त्याचा हातचा केवळ मळ होता.

त्याच्या सहवासात मी किती तरी शिकलो. त्या ज्ञानाचे पृथक्करण करता येणार नाही, पण मीरसाहेबांकडून मला फार मिळाले. पूर्वीच्या दिग्दर्शकांच्या कारकिर्दींत चाल निर्माण करण्यातील आनंद माझ्या ओळखीचा झाला होता. आता मला तो छंदच जडला. रेघांरेघांचे एक चित्र बनते तसे स्वरांस्वरांचेही एक चित्र बनते याची मला पुरेपूर जाण आली. वेगवेगळ्या दिग्दर्शकांच्या हाताखाली काम केल्यामुळे त्या प्रत्येकाचे वैशिष्ट्य माझ्या मनावर एक नवा संस्कार करून गेले. मीरसाहेबाची मर्जी मी चांगली संपादन केली. तो मोठा कुर्रेबाज माणूस होता.

मिनर्व्हाबरोबरच तो आणखीही काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन करीत होता. त्यांत एक चित्र स्टंट पद्धतीचे होते. त्या चित्राचे काम करतानाही तो मला बरोबर घेऊन जाई. त्या चित्राचा नायक एक मराठी तरुण होता. भगवान पालव. तो त्या चित्राचे दिग्दर्शन करीत होता. चित्राचे नाव होते ' बहादूर किसान.' भगवान स्वतः गात असे. मीरसाहेबांचीही स्मरणशक्ती यथातथाच होती. त्यांच्या चालींत काही स्वतःचे रंग मिसळणे त्यामुळेच मला शक्य झाले. माझा कोणता बदल ते आनंदाने स्वीकारतात व कोणता फेकून देतात हेही मला अजमावता आले. मीही चाली निर्माण करू शकेन, स्वतः संगीत दिग्दर्शक बनू शकेन, असा विश्वास मनातल्या मनात दरवळू लागला. तो विश्वास मला दिसत नव्हता, पण जाणवत होता खचित.

बहादूर किसानचे चित्रण आउट डोअर लोकेशन चालले होते. भगवान गात होता. मी पेटी वाजवत होतो. वाद्यवृंद सांभाळत होतो. गरम तबियतीचे मीरसाहेब भगवानला जागा सांगत होते. भगवान काही मुळी गायक नव्हे. मीरसाहेबांनी चारदोन दटावण्या देताच त्याचा आत्मविश्वास डळमळला. त्याला गाणेच साधेना. मीरसाहेब संतापले. भगवान माझ्याजवळ आला आणि म्हणाला, ' गाना तुम लो. इसको जाने दो. तब जमेगा. ' भगवानची अडचण माझ्या लक्षात आली. मी मीरसाहेबांच्या कानी लागलो. त्यांना सांगितले. ' भगवान आपको डरता है. आप यहाँ रहेंगे तो वह गा नहीं सकेगा. '

मीरसाहेबांना ते पटले. ' अच्छा, तो मैं जाता हूँ, तूं ले ले इसका गाना ' मीरसाहेब गेले. मी भगवानकडून ते गाणे म्हणवून घेतले. वाद्यमेळ जमला. गाणे-चित्रण सारेच ठीक झाले. भगवान आणि मी त्या एकाच प्रसंगाने दोस्त झालो.

अलीकडे मला शे-पाउणशेची प्राप्ती महिना होऊ लागली होती. मद्य पिण्याचे कामही मी पुनः सुरू केले होते. चाली बनविणे मला साधेल असे मनोमन वाटत होते. पण संधी येणे खरोखरीच दैवाधीन असते. ती यशासाठी राबविणे हे उत्तरदायित्व मात्र प्रयत्नांचे असते.

एका संध्याकाळी भगवान माझ्याकडे आला आणि म्हणाला, ' एक काम करोगे अन्ना ? '— (घरात मला ' अण्णा ' म्हणत.)

' बोलो '

' अपने को एक तामिळ पिक्चर मिला है डैरेक्शनको ! '

' अच्छा है '

' तुम म्युझिक करोगे ? '

' जरूर '

भगवान एक नवी संधी घेऊन माझ्याकडे आला. मला तेच हवे होते. मला उगीचच गळा मोकळा झाल्यासारखे वाटले. स्वर सापडल्याचा आनंद झाला.

' क्या नाम है पिक्चरका ? ' मी भगवानला विचारले.

' जय-कोडी ' भगवान वेडीवाकडी तोंडे करीत म्हणाला.

' म्हणजे ? '

' कोडी म्हणजे झेंडा म्हणे '

' विजयाचा झेंडा ? '

' असेल ! '

' विजय-पताका म्हण की ! '

भगवानने टाळीसाठी हात उंचावला. मी त्याची सणसणीत टाळी तळहातावर आनंदाने झेलली.

♠ ♠

६

'मिनर्व्हा' मुव्हीटोनच्या चाकरीत, अडीच-तीन वर्षे निघून गेली. वेगवेगळ्या संगीत दिग्दर्शकांशी काम करावयास मिळाल्यामुळे चाली कशा बांधल्या जातात, त्याचे प्रत्यक्ष शिक्षण माझ्या पदरात पडले. चाली लावण्याचे काम आपल्यालाही करता येईल असा आत्मविश्वास, मनातल्या मनात रांगू लागला. 'आपण संगीतनियोजक होऊ शकू.' या धीट विचारापर्यंत जीवनाचे गाडे येऊन ठेपले. कर्तृत्वविषयक जाणिवेचा घाट या थराला येईतो आणखीही काही घटना घडून गेल्या. माझ्या व्यावसायिक जीवनाशी त्या घटनांचा तसा संबंध नाही, पण त्याचे निवेदन करणे भाग आहे. स्वरांबरोबरच बेसुरांचीही मोजदाद झाली पाहिजे. वर्षाबरोबर ग्रीष्माची परिणाम शक्तीही विचारात घेतली पाहिजे.

कोल्हापुरातील वास्तव्याने फिल्मी जगाची नीतिमत्ता माझ्या परिचयाची झाली होती. अनीती हीच त्या जगातली नीती होती. सख्यासोबत्यांची सूचना मानून मी मद्यपी तर बनलो होतोच, मदिराक्षी मात्र अजून म्हणावे

इतक्या सलगीची झाली नव्हती. एका फालतू नटीने लगट करून पाहिली होती. माझ्या पूर्वसंस्कारांनी मला तिच्या करपाशातून वाचविले होते. मनातल्या सोवळ्याने शरीराच्या उघडेपणावर पांघरूण घातले होते. पुढे पुढे मनही चळले आणि शरीर तर मळलेच मळले.

मुंबईच्या निवासात एक वेगळाच अनुभव आला. गायकवाड नावाचे एक गृहस्थ नानाचे स्नेही होते. त्यांना भेटण्यासाठी मी अनेकदा त्यांच्या वस्तीकडे जात असे. ते जातीने अस्पृश्य होते. ते राहत होते ती नायगावातील वस्तीच जवळजवळ अस्पृश्यांची होती. एकदा, कुठल्या तरी निमित्ताने त्यांनी माझी एका तरुण मुलीशी ओळख करून दिली. ती अस्पृश्य–कन्याच होती, पण सुशिक्षित होती. मॅट्रिक पास झालेली होती. ठेंगणी ठुसकी, ठाकठीक अंगलटीची, बोलक्या डोळ्यांची आणि लवचीक हालचालींची ती षोडशी मला फार आवडली. पहिल्या भेटीनच मी तिच्या प्रेमात पडलो. गायकवाडांना भेटण्याचे निमित्त काढून मी पुनः पुनः त्या वस्तीत जाऊ लागलो. वाढवेळ झाला तरी त्या वस्तीतच राहू लागलो. त्यांच्या पंक्तीला बिनधोकपणे जेऊ लागलो, फार काय त्यांच्यातील काही जणांसारखा, फूटपाथवर पथारी टाकून झोपू लागलो. तपस्येची वेल कळ्या धरू लागली. त्या मुलीचे आणि माझे बोलणे होऊ लागले. हसत हसत बोलण्याची तिची लकब आणि शुद्ध शब्दोच्चार मला एखाद्या गीतासारखे लोभनीय वाटू लागले. स्पर्शसुख अनुभवण्याचे साहस मात्र साधले नाही, पण सहवासाचा आनंद मात्र मी मनसोक्त लुटत राहिलो.

मिनर्व्हात काम करताना, गायनशाळेत शिकता-शिकविताना आणि मद्यार्काची अपूर्वाई लुटताना माझे मन तिचेच चिंतन करू लागले. खऱ्या भेटी स्वप्नासारख्या वाटू लागल्या आणि स्वप्नांत झालेल्या भेटी प्रत्यक्ष सत्या-इतक्या जिवंत वाटू लागल्या.

मी निश्चय केला की तिच्याशी लग्न करावयाचे. नाही तरी मी आता लग्नाच्या वयात आलोच होतो. सून-मुख बघण्यासाठी वडील उरले नव्हते. मोठी आई देवाघरी जाऊन विसावली होती. खऱ्या आईचे मन माझ्यासाठी पाऱ्हावूच शकत नाही असा माझा समज होता. नाना स्वतःच अजून ब्रह्मचारी होता. माझे लग्न जमविणे, हे काम माझे मीच करावयाला हवे होते. कसे करावे ? कुणाच्या मध्यस्थीने बोलणी करावी, या विचारात बराच काळ गेला. ती अलीकडे आपण होऊन आमच्या घरी देखील येऊ लागली होती. जे मला वाटत होते, तेच तिला वाटत असावे हे मी हेरले होते. नानाला सांगून गायकवाडामार्फत विषय काढावा, असे माझ्या मनाने घेतले. माझे नाही. एक तर नानाच्या आधी मी लग्न करणे चुकीचे होते आणि दुसरे, अस्पृश्याच्या मुलीला एका ब्राह्मणाने मागणी घालणे हे लोकव्यवहार-दृष्ट्या गैर होते. कसा कोण जाणे, एवढा विवेक मला तेव्हाही सुचला. मी तसा स्वतः जातीची जाण विसरून गेलो होतो. यज्ञोपवीत केव्हाच टाकून दिले होते. संध्या कधी शिकलोच नव्हतो. मिश्रविवाह, सामाजिक सुधारणा वगैरे शब्दांशी माझ्या विचारांची गाठभेटही झालेली नव्हती. मला ती मुलगी आवडली होती. तिची संगत जन्मभर लाभावी अशी आकांक्षा माझ्या सर्वांगी आणि अंतरंगी देखील उताला आली होती. मी अनेकदा तिला नुसती हाक मारी, तिचे नुसते नाव घेतल्याने माझ्या जिभेला सुख वाटे.

'राम !' अशा नुसत्या हाकेनच ती मला उत्तर देई. पुढचा प्रश्न विचारणे मला जमेना व मनातले सांगणे तिला साधेना. दोघेही एका अनामिक सुखाचा आस्वाद घेत राहिलो. एका रात्री ती आमच्या बिऱ्हाडी आली. नाना किंवा आई कुणीच घरी नव्हते. मी एकटा होतो. ती आली. अभिसारिकेसारखी आली. मी गोंधळलो. 'ये बैस' इतकेच बोललो. ती बसली. नेहमीसारखेच हसली आणि अगदी सहजपणाने म्हणाली.

'एक आनंदाची बातमी सांगायला आल्येय तुला.'

माझ्या काळजाला जणू दोन हात फुटले. कानांचे द्रोण दोन्ही हाती धरून ते तिचे शब्द झेलायला अधीर झाले, पण—

मी मागितली भाकर आणि तिने पदरी टाकला धोंडा. ती म्हणाली— हसत हसत म्हणाली, ' माझे लग्न ठरले. '

' कुणाशी ? ' मी विचारले.

' आमच्या जातीतच मिळाला एक तरुण माझ्या जोगता. '

मी काय बोलणार ? हळुवारपणे रचलेली माझ्या मनातली आशांची उतरंड कोसळली. तिची केवळ खापरे झाली. हुंदका दाटल्यासारखा झाला. मी मोठ्या कष्टाने तो गहिवर आवरला. गप्प राहिलो. तिचे तिलाच काय वाटले कुणास ठाऊक, मी न विचारताच, तिनं खुलासा केला. ' ब्राह्मणाशी लग्न करायला विरोध केला घरच्यांनी. त्यात तू अगदीच अशिक्षित ! '

नुसता अशिक्षितच का ? अडाणी देखील. दरिद्री....रस्ता चुकलेला. माझ्याशी लग्न करायला ती अस्पृश्य मुलगी तयार झाली नाही. ती गेली. आपल्या पतीच्या पाठोपाठ संसाराच्या सुखनगरीकडे गेली. मी तसाच राहिलो. बाण वर्मी लागलेल्या पाखरासारखा जळत. तळमळत, माझ्याच जखमांची निगराणी करीत.

ते प्रेम प्रकरण, माझ्याच्याने विसरवेना. दिवस गेले, महिने गेले, पण उष्णाला उष्णानेच मारणे भाग होते. त्या चांडालिका आख्यानाचा शेवटचा सर्ग मिटला आणि एका नव्या प्रेमग्रंथाने ' सूतोवाच ' केले. ' एका ' चित्राच्या निमित्ताने एक नवी नायिका मिनर्व्हात आली होती. ती गायिका होती. सुंदर नव्हती, पण तरुण होती. तारुण्याला सौंदर्याची सारी लक्षणे आपसुख बहाल करून टाकण्याच्या मनोवृत्तीने मी पछाडलेला होतो.

त्या नायिकेला गाणे शिकविण्याच्या बहाण्याने माझी प्रेम-यात्रा नव्याने सुरू झाली. ती प्रेम-देवता निर्दय नव्हती. आर्ताची अवस्था तिने ओळखली. हात पसरण्याआधीच तिच्या दातृत्वाने दान पुढे केले. मी भारून गेलो. भारावून गेलो. ज्याचा ध्यास घेतला होता तो भास सजीव झाला. ' माझे ' असे काहीतरी मला लाभले. त्या कैफात, दिवस-रात्री पाखरासारख्या उडून गेल्या, तिच्या आणि माझ्या भेटींतील मधला वेळ जणू नुसत्या संगीतानेच

भरून जात राहिला. सारे सुराचेच साम्राज्य पसरले होते. शरीर गात होते. साथ आणि गीत यांत वेगळेपणाचा भास देखील भासत नव्हता. कसला अपशकून झाला देव जाणे. चढलेली तार ' तड्कन् ' तुटली. साथीदाराने हात आखडले. माझे गीत गळ्यातल्या गळ्यातच आवंढ्यासारखे अडकून बसले.

ती नायिका स्वतः शेटच्याच मर्जीतली होती. ते तिला फिरायला घेऊन जात होते. चित्रपटांना जात होते. माझ्या ते लक्षात आले. बेभान माणसासारखी मी शेटची नालस्ती करू लागलो. अगदी उघडपणे करू लागलो. परिणाम व्हायचा तो झाला.

मी आणि मीरसाहेब मिनर्व्हाच्या संगीत विभागात एक तर्ज बांधण्यात मशगूल होतो. विजेचा लोळ यावा तसे शेठ आत आले. मोठ्याने ओरडले, ' राम ! '

मी उभा राहिलो. शेठचा अवतार विलक्षण संतापाचा होता. डोळे लालभडक झाले होते. दात ओठ खात त्यांनी विचारले,

' तू माझ्याविषयी वाटेल ते बडबडतोस हे खरे का ? '

' खरे आहे. ' मी थरथरतच पण खरे ते बोललो.

' कशावरून ? '

' सांगू ? '

' सांग '

' हे सारे तिने स्वतःच मला सांगितले. '

मीरसाहेब शेजारी नसते तर त्या क्षणी त्याने मला जन्माचा जायबंदी केला असता. ते हात उगारून, दात ओठ खात माझ्या अंगावर धावले. मीरसाहेब झटकन आडवे झाले. तरीही एक ओझरता तडाखा मला लागला. त्या तडाख्यासरशी मी दूर कडमडत गेलो. कोसळलो. खाली पडलो.

' बाहेर हो. पुनः पाय ठेवू नको या आवारात.... '

मी धडपडत उठलो आणि बाहेर पडलो. झुंज हरलेल्या बैलासारखा

खांदे पाडून, मुख्य प्रवेशद्वाराकडे जाऊ लागलो. माझा कोट आत एका खुर्चीच्या पाठीवर राहिला होता. तो त्यांनी माझ्या पाठमोऱ्या आकृतीवर भिरकावला. मी तो उचलून घेतला. डोळ्यांपुढे काजवे चमकले. भर दिवसा अंधारले. पुनः बेकार होऊन मी ' मिनर्व्हा 'च्या बाहेर पडलो. परत वळून बघण्याचीही हिंमत मला झाली नाही. पार्वतीचीच मागणी करणाऱ्या भस्मासुराला शिवाने भस्मसात करून टाकला तसा माझ्यातला माजलेला प्रेमिक नाहीसा करून टाकला. धड अंगाने मी पुनः मुंबई नगरीच्या पायरस्त्यावर आलो. एकच आसरा आठवला. भगवान पालव. त्याचे ' जयकोडी ' पिक्चर मी करावे अशी इच्छा होती. मी त्याची टाळी झेलली होती. मी भगवानकडे गेलो. बारा घाटांचे पाणी प्यायलेला भगवान माझी लोकविलक्षण प्रेमकथा ऐकून नुसता हसला. बेछूटपणे म्हणाला,

' कोई बात नही अन्ना, सर सलामत तो पगडीयाँ पचास '

प्रेम संपले होते पण जीवन पुष्कळ चालून जायचे होते. पुढे चालणे भाग होते.

भगवानच्या भरोशावर मी ' जयकोडी ' चित्राच्या संगीत रचनेस प्रारंभ केला. ते चित्र निर्माण करणारी संस्था मुंबईतच काम करीत होती. तयार झालेली गीते नायिकेला शिकविण्यासाठी मला पुनः तारुण्य आणि सौंदर्य यांच्या गुंफेत जाणे भाग आले.

जयकोडीची नायिका होती, रुक्मिणी. अगदी लहानसर चणीची गोरीपान. थोड्याशा पृथुल अंगकाठीची. लालचुटूक ओठांची. तिच्या स्वरात तर रातराणीच्या वासासारखा मादकपणा होता. मी तिला शिकवू लागलो. तिला माझी भाषा येत नव्हती. मला तिची भाषा येत नव्हती. आजवर खेळलेला प्रीतीचा प्रत्येक खेळ माझ्या अंगाशी आला होता. पण आकर्षले जाणे, आणि आकर्षून घेणे ही आता जित्याची खोड झाली होती. रुक्मिणीचे काजळभरले टपोरे डोळे माझ्याशी बोलू लागले. ती डोळ्यांची भाषा मला आता बरीच कळू लागली होती. मी स्वतःला सावरले.

फार कटाक्षाने सावरले. डोळ्याला डोळा भिडवणे शक्यतो टाळले. रुक्मिणी हिंदु कॉलनीत राहत होती. तिच्याबरोबर तिची आई होती. रुक्मिणीही नायिका होती. चित्रपटसंस्थेच्या नायिका या निर्मात्याच्या नायिका असतात्च याचा अनुभव मला नुकताच आला होता. ' जयकोडी 'चा निर्माता विश्वनाथ, रुक्मिणीच्या समोरच्या घरात राहत होता, हे मला माहीत होते. मिनर्व्हातील अवमानाध्यायाची पुनरावृत्ती नको म्हणून मी रुक्मिणीच्या हसण्यात रस घेतला नाही. मुळीच घेतला नाही. स्त्रियांना आकर्षित करावे असें कुठले वैशिष्ट्य माझ्यात होते कोण जाणे. ती रुक्मिणीही माझ्यावर भाळली. प्रलोभनाला बळी पडणारे वय आणि चित्रसृष्टीने दिलेला चांडेपणा यामुळे मीही चाळवला गेलो. जाऊच नये त्या रस्त्याला पुनः लागलो. ठेचा खाऊन आंधळे झालेले आयुष्य पुनः आडवाटेकडे वळले.

बोरीवलीच्या एका बागेत, जयकोडी चित्रपटांचे बाह्यचित्रण चालू होते. गाण्याचे चित्रीकरण असल्यामुळे, भगवानबरोबर मीही चित्रणस्थळावर उपस्थित होतो. थोड्या वेळाने रुक्मिणी आली. तिने आपल्या केसांत इतकी फुले घातली होती की तिचा गोंडस चेहरा चैत्रगौरीच्या मुखवट्यासारखा दिसू लागला होता. मद्रासी बायका, नाहीतरी फारच फुले घालतात. रुक्मिणीसारख्या सुंदरीच्या केशकलापात एखादेच संपूर्ण फूल शोभून दिसते. ती जवळ पोचताच मी समोर झालो आणि इंग्रजीत म्हणालो,

' बब्बब किती ही फुलं ? चेहऱ्याचा अगदी फ्लॉवर पॉट होऊन गेला आहे ! '

' तुम्हांला नाही आवडलं ? ' रुक्मिणी भुवया उंचवीत म्हणाली. मी नकारार्थी मान डोलावली, तशी तिने ती सारीच्या सारी फुले काढून फेकून दिली.

' छान, आता कशी सुंदर दिसतेस. फुलापेक्षाही सुंदर ! ' मी म्हणालो. ती दिलखुलास हसली. जणू माझ्या पसंतीसाठीच तिने सारा शृंगार केला होता.

रुक्मिणी चित्रणाच्या कामासाठी थोडी दूर निघून गेली. मी तिच्या आईशी गप्पा मारीत बसलो. 'नट्यांच्या आया' ही एक मोठी अजब जमात चित्रपट व्यवसायात असते. प्रत्यक्ष नटीपेक्षा या त्यांच्या म्हाताऱ्यांना अधिक सांभाळावे लागते. रुक्मिणीचे आणि तिच्या आईचे माझ्याविषयी काही बोलणे झाले असले पाहिजे. अवतीभवतीची सारी माणसे चित्रणाच्या पाठोपाठ दूर गेल्यावर रुक्मिणीची आई मला हलकेच डोळे मिचकावीत म्हणाली, 'सर, यू शुड्ड कम टु अस्स धिस्स नैट्ट ?'

'रात्री ?'

'हं.'

'किती वाजतां ?'

'बारा वाजतां ?'

'बारा ! इतक्या अवेळी ?'

'विश्वनाथ समोर राहतो. सुब्रम्हण्यम् समोर राहतो. त्यांचा डोळा असतो आमच्या घरावर. रात्री या म्हणजे त्यांच्यापैकी कुणीही जागे असणार नाही' म्हातारी म्हणाली. नायिकेच्या मातेच्या त्या आमंत्रणाचा अर्थ स्पष्ट होता. दोनदा पराभूत झालेल्या माझ्यातल्या हीन वासना त्या निमंत्रणाने जणू नव्याने उजळून आल्या. ते प्रेम होते की नाही कोण जाणे ! त्या त्या अस्पृश्यकन्येवर मी प्रेम केले होते. मिनर्व्हाच्या त्या नायिकेविषयी माझ्या मनी प्रेमासारखेच काही होते पण आताचे हे आवाहन मात्र केवळ विलासासाठी होते, वासनापूर्तीसाठी होते, पण त्यातही एक 'पराक्रम' होता. निदान, तेव्हा तरी मला तसे वाटले.

अपरात्री बारा वाजता मी रुक्मिणीच्या बिऱ्हाडी गेलो. धोतर मुद्दाम लुंगीसारखे नेसलो होतो. पाऊस पडणार नव्हता, पण मी छत्री नेली होती. छत्रीआड स्वतःला लपवीत उगीचच लंगड्यासारखे चालत मी तिच्या दाराशी गेलो. समोरच्या बिऱ्हाडात सामसूम होती. रुक्मिणीच्या घरात एक मंद दिवा तेवत होता. मी बेल वाजविताच, मीच का ? हे तिच्या

आईने खिडकीतून डोकावून पाहिले आणि मग दरवाजा उघडला. मी आत गेलो.

रुक्मिणी माझ्यासाठी वेडी झाली होती. डोळ्यांचे दिवे करून ती प्रियागमनाची वाट पाहत होती. मी तिला भेटलो. ती रात्र सुखाने काठोकाठ भरली—नीतिहीन प्रीतीची ती सुखरात्र मी कधीच विसरणार नाही. रुक्मिणी सर्वस्वी माझी झाली. जयकोडी संपेतोपर्यंत पुढे तिचे वागणे विवाहित पत्नीच्या वागण्यइतके एकनिष्ठ झाले. चित्रपट संपल्यावर मात्र ती आपल्या गावी मद्रासला निघून गेली. मी परत विरही झालो.

ती अस्पृश्य षोडशी मला परत भेटली नाही. मिनर्व्हाच्या त्या नायिकेने माझ्यासाठी एक अश्रुबिंदू देखील ढाळला नाही. ही दाक्षिणात्य नायिका वेगळी निघाली. तिची पत्रे मला मद्रासहून येऊ लागली. प्रेमाने भरलेली. आठवणींनी ओथंबलेली पत्रे येऊ लागली. तिची पत्रे तामिळ भाषेत येत ती मी एका मित्राकरवी वाचवून घेई. मी तिला उत्तरे धाडी ती इंग्रजीत. तिचा आग्रह होता की, मी मद्रासला यावे. माझ्या सहवासाचा लाभ तिला अखंडपणे द्यावा. मला ते शक्य नव्हते. मी अद्याप कुणीच झालो नव्हतो. माझ्या आयुष्याला कसलेच स्थैर्य आलेले नव्हते. 'जयकोडी' चित्र संपले आणि मी परत बेकार झालो. मिनर्व्हाकडे जाण्याची सोयच नव्हती. काय करावे या चिंतेत मी पडलो. अभिनयाच्या फंदात पुनः पडण्यात अर्थ नव्हता. मी नायकाचे काम केलेला तो चित्रपट पडद्यावर कधीच पाहिला नाही. मी मिनर्व्हात आलो, तेव्हाच ते 'नागानंद' चित्र मुंबईत प्रकाशित झाले होते. मी त्या चित्रगृहाला टेलिफोन केला होता तेव्हा मला सांगण्यात आले होते की तो चित्रपट मध्यंतराच्या वेळीच पडला. पुढचे चित्र पहाण्यास प्रेक्षक थांबलेच नाहीत.

असले अपयश जगाच्या इतिहासात कुणा चित्रपटाने मिळवले नसेल. मी त्या चित्रपटाचा नायक होतो. कोण मला पुन्हा काम देणार ? जयकोडी चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन मी केले खरे, पण त्याच्या यशापयशाचे

परिणाम मुंबईच्या बाजारावर कसे होणार, कुठे जावे, काय करावे, अशा मनस्थितीत मी वावरत असतानाच माझी आणि नेवरेकरांची गाठ पडली. मध्यंतरी नेवरेकर मिनर्व्हात आले होते आणि त्यांनी मिनर्व्हाच्या 'नामदेव' नामक एका मराठी चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन केले होते तेव्हा त्यांची माझी चांगली ओळख झाली होती.

ते म्हणाले, पुण्याला येतोस ? त्रिकडे नारद-नारदी नावाचा एक मराठी बोलपट निघतो आहे. मी संगीत देणार आहे. तू चल साहाय्यक म्हणून.'

मी 'होकार' दिला आणि त्यांच्या पाठोपाठ पुण्याला पोचलो. नाना आणि आई आता मुंबईत राहत नव्हती. नाना कुठेतरी डेहराडूनला की काय नोकरीसाठी गेला होता. आई त्याच्याबरोबर गेली होती. आता 'घर' मुंबईत नव्हते.

मी पुण्यात आलो तो नेवरेकरांचा साहाय्यक म्हणून. संगीत, नायक, दिग्दर्शक हे दोन्ही टिळे माझ्या कपाळावर उमटले आणि पुसून गेले, मी पुन्हा आपला 'होतकरू' च राहिलो.

पुण्यात आल्यावर नानांचे पत्र आले की, पुण्यात एक मुलगी आहे ती पहा. ती मला सांगून आली आहे. मोठ्या भावासाठी मुलगी पाहण्याचे ते प्रौढ काम मी केले. चार मित्रांबरोबर जाऊन ती मुलगी पाहिली. पसंत केली. नानाजवळ काही पैसे होते. बाकीचे पैसे त्याने माझ्याकडे मागितले. मी नारद-नारदीचे दिग्दर्शक श्री. बेडेकर यांच्याकडून शंभर रुपये उसनवार घेतले. नानाचे लग्न झाले. आई, शकू, नवी बायको या सर्वांना घेऊन तो परत आपल्या नौकरीच्या गावी गेला.

नानाचे लग्न झाल्यामुळे की काय न जाणो मला रुक्मिणीची फार आठवण येऊ लागली. तिची न समजणारी पत्रे मी वेड्यासारखा बसून पुनः पुनः चाळू लागलो. एके दिवशी मनाने काय उचल घेतली कुणाला ठाऊक, मी उठलो आणि मद्रासला जाणाऱ्या गाडीत बसलो. खिशात फक्त पंधरा रुपये होते.

तिसऱ्या वर्गाने प्रवास करूनही ते पैसे मद्रासला पोहचताच संपुष्टात आले.

रुक्मिणीचा पत्ता माझ्याकडे होता. पायपीट करीतच त्या अफाट शहरात मी तिच्या कवाडाशी जाऊन पोचलो. रुक्मिणी तिथे दिसली नाही. एका काळ्याकुट्ट नौकराने सांगितले.... 'शी हॅज़् गॉन टु मुफीसील्स'

म्हणजे काय ते पण नीट कळले नाही. मी वेड्यासारखे पुनः पुनः विचारले तेव्हा तपास लागला की, नाटकात काम करण्यासाठी ती उपनगरात कुठे तरी गेली आहे.

'केव्हा परत येईल ?' मी विचारले.

'चार पाच दिवसांनी' उत्तर मिळाले.

निष्कांचन अवस्था. अंगावर नुसती एक अर्धी विजार आणि सदरा. त्या मजनूच्या अवस्थेत चार दिवस मद्रासमध्ये राहयचे कसे ? येताना मी कुणाला सांगूनही आलो नव्हतो. फक्त भगवान पालवला कळविले होते. आता काय करावे ते कळेना. एका घाणेरड्या हॉटेलात जाऊन उतरलो. भगवानला पत्र लिहिले त्याच्या उत्तराची वाट बघण्यात चार दिवस गेले. परत रुक्मिणीच्या दाराशी गेलो. ती आली होती. मला वाटले आता ती हसत हसत येईल. मेघदर्शनाने मोर नाचावा तसे तिचे मन नाचू लागेल. माझ्या अंगावर परत ती सर्वस्वाचा वर्षाव करील. पण तसे काहीही झाले नाही. तिचा नौकर चिडक्या चालीने परत आला. मला उद्देशून म्हणाला, 'जा, बाई तुम्हांला भेटू इच्छीत नाहीत.'

'का ?' मी विचारले. खरे तर त्या नोकराला हा प्रश्न विचारून काहीच लाभ नव्हता.

'त्या म्हणाल्या'— नोकर मोडक्या इंग्रजीत बोलू लागला.

'हं ?' माझ्या आशा पुनः पालवल्या.

'असं पुन्हा यायचं नाही.' नोकराने माझ्या प्रेमिकेचे वक्तव्य भाषांतरित करून सांगितले. मी ठार झालो. मद्रासचे ऊन माझ्या सर्वांगाला जाळून उठले. त्याच पावली मी परत फिरलो. हॉटेलकडे जाताना, मला वडिलांचे मरते

समयीचे शब्द आठवले, ' बायकांच्या जातीवर विश्वास ठेवू नकोस '

भाऊंना माझे भवितव्य आधी दिसले होते का? आता मात्र मी मनोमन शपथ घेतली की स्त्रीवर विश्वास ठेवायचा नाही. एक भोग्य वस्तू यापलीकडे तिची लायकी मानायची नाही.

भर उन्हातून परत येत असताना मला कुणीतरी हटकले. मी वळून पाहिले, तो लुंगीवाला गृहस्थ मद्रासी होता. मिनर्व्हाच्या नायिकेच्या बिऱ्हाडातच मी त्याला मुंबईत पाहिले होते. मी थांबलो. तो जवळ आला. कपाळाच्या आठ्या अधिकच ताणावीत त्याने मला विचारले ' इकडे कुठे? '

' आलो होतो, रुक्मिणीकडेच '

' भेटली? '

' नाही '

' म्हणजे? तिची-तुमची फार दोस्ती होती. मग असे कसे झाले? '

' तिची इच्छाच नाही मला भेटण्याची. तिने मला जवळ जवळ दारातूनच हाकून दिले. '

मी दिलेल्या या माहितीने त्याला बरे वाटले. एखाद्या तत्त्वज्ञासारखा स्वर काढीत तो म्हणाला, ' अशाच असतात या बायका, तुम्ही फसलात म्हणायचे.'

' हो. '

' मग ती ही? '

' कोण? '

त्याने मिनर्व्हातील त्या नायिकेसंबंधी विचारले. मी म्हणालो, ' तिची सावली देखील मी कित्येक दिवसांत पाहिली नाही. '

या माहितीने तर तो गृहस्थ अधिक आनंदित झाला. तो त्या नायिकेच्या प्रेमिकांपैकी एक होता.

' उतरला कोठे? ' त्याने माझी चौकशी केली.

मी माझी अवदशा अगदी निर्लज्जपणाने त्याला सांगितली. तो द्रवला.

त्याने मला काही पैसे दिले. त्या पैशांतून मी त्या हॉटेलचे देणे चुकवले आणि परत मुंबईचे तिकिट काढले.

परतीच्या प्रवासात मी सारखा विचार करीत होतो. ' स्त्री ' ही काय चीज आहे? सख्ख्या आईपेक्षा जिव्हाळ्याने मला सांभाळणारी मोठी आई ही स्त्रीच, नात्यागोत्याचा संबंध नसताना माझ्यावर बाल्याचा वर्षाव करणारी गोदूताई हीही एक स्त्रीच. पोटचा मुलगा असून माझ्याशी दुराव्याने वागणारी माझी आई ही देखील स्त्रीच.

कोल्हापुरला मला आपल्या घरी बोलावून मद्यानंद देऊ करणारी ती फालतू नटी? ती सुद्धा स्त्रीच. एकदा कोल्हापुरलाच मी भीत भीत त्या माडीवर चढलो. ती प्रौढशी होती. मी नवा होतो. खूप बावरलो होतो. तिने माझ्या पाठीवर हात फिरविला आणि कातरस्वरात विचारले, ' शाळेत असता का तुम्ही? ' मी तिथे थांबलो नाही. तिनेही त्या व्यापाराचा हट्ट धरला नाही. ती गणिका कोण? तीही स्त्रीच.

तासन तास माझ्याशी बोलत बसणारी ती अस्पृश्य मुलगी, तिला का नुसती माझ्या गाण्याने मोहिनी घातली होती? तिच्या मनात भावना नव्हती मग ती माझ्या घरी कशाला येत होती? तिला माझ्याविषयी काही तरी वेगळे आकर्षण होते. मग तिने नकार का दिला? किती सहज सांगितले तिने आपलं लग्न ठरलंय म्हणून. ती सासरी गेली. सुखात असेल. माझा आठवही तिला कधी आला नसेल. ती पण स्त्रीच.

ती नायिका. प्रत्यक्ष मालकांची तिच्यावर मर्जी. त्या मद्रासी कुमारासारखे कैक वेडे तिच्या तारुण्यावर लुब्ध झालेले. तिने आणखी माझ्यावर कशासाठी जादू केली? मालकांनी मला हाकून दिले. तिने विरोधाचा शब्दही उच्चारला नसेल. ती सुखात असेल. मला भेटण्याची इच्छाही तिने पुनः दाखविली नाही. ही देखील एका स्त्रीचीच कथा.

ही दाक्षिणात्य रुक्मिणी. मुलीसाठी द्युती कर्म करणारी तिची आई. रुक्मिणीची मुंबईतली वागणूक, तिच्या पत्रांतील ओसंडणारी आर्तता

आणि मद्रासमधले तिचे वर्तन-ही देखील स्त्रीचीच गोष्ट!

माझ्या वडिलांना अशाच स्त्रिया भेटल्या होत्या का? एरव्ही मरताना त्यांनी आवर्जून मला तसे कशाला सांगितले असते? असल्या स्त्रिया केवळ चित्रपट व्यवसायातच असतील. पण मग ती अस्पृश्य मुलगी....छे मला कशाचे आणि काहीच निश्चित उत्तर सापडले नाही.

मी मद्रासला गेलोच कशाला आणि परत आलो तो काय करण्यासाठी कुणाला ठाऊक? माझ्या साऱ्या चित्तवृत्तीच करपून गेल्या होत्या. मला पुनः पुनः वाटत होते की, मीच अडाणी असेन, वेडा असेन. जग जगासारखेच चालत असते. मला माझी गती आणि माझा गाव ठरविला पाहिजे.

♠ ♠

७

साथीला वाव नाही, संगतीला ताल नाही. माझ्या जीवनगीताची एक ओळही सरळपणाने उमटेना. कुठल्या सुरात गावे आणि कुठल्या रागाच्या अंगाने पुढे सरकावे हे काहीच ठरले नव्हते, तर गाण्याला आकार येणार कसा?

वासनेच्या वावटळीत वावरताना मला संगीताचा विसर पडला नव्हता हे मात्र खरे. प्रीतीचे निशाण हाती धरून, दक्षिण दिग्विजयाला जाण्यापूर्वी मी मुंबईत थोडा काळ संगीत दिग्दर्शकाची चाकरी बजावली होती. ही नोकरी चित्रपटसृष्टीबाहेरची होती म्हणून तिचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

'रेन बो' नावाची एक ध्वनिमुद्रिका तयार करणारी संस्था होती. त्या संस्थेत मी चाकरी केली. दशकांनी चाली तयार केल्या. त्यांच्या उठावासाठी योग्य ते पार्श्वसंगीत योजिले. गायक गायिकांकडून त्या चाली नीटपणे म्हणवून घेतल्या. नाही म्हटले तरी या संगीतकामाठीच्या रूपाने अत्यावश्यक तो अनुभव माझ्या हातांशी आला. सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक

श्री. नौशाद हेही त्या वेळी त्याच संस्थेत, माझ्यासारखाच उद्योग करीत होते. त्या माणसाची बुद्धी भलतीच तल्लख. तो दिवसाला अकरा अकरा गाणी ध्वनिमुद्रित करून टाकायचा. सराईत सुगरणीने भराभर पुऱ्या तळून टाकाव्या तशा तो ग्रामोफोनच्या तबकड्या तयार करून फेकायचा. माझी गती त्यामानाने मंद होती. दिवसाकाठी तीन एक गाणी मेणावर कोरून झाली की, माझी दमछाक व्हायची. त्या वेळी आम्हांला तनखा मिळत होता रोजी सात रुपये.

का कुणाला ठाऊक, पण त्या चाकरीचा काळ मला बेकारीसारखाच वाटला. त्या बेकारीतून वाट काढण्यासाठी मी पुण्याला आलो. नारद-नारदी या मराठी चित्राचा साहाय्यक संगीत दिग्दर्शक झालो. मध्येच मद्रासची यात्रा केली आणि जखमी मनाने पण धड अंगाने परत आलो.

सरस्वती सिनेटोन ही दादासाहेब तोरण्यांची संस्था. चित्रपट नारद-नारदी. दिग्दर्शक : विश्राम बेडेकर. संगीत दिग्दर्शक श्री. सदाशिवराव नेवरेकर आणि साहाय्यक मी. या ठिकाणीही मला कांम करण्याची संधी भरपूर मिळाली. सदाशिवरावांच्या सौजन्याने मी बांधलेल्या काही चालीही या चित्रपटात जशाच्या तशा येऊ शकल्या. सदाशिवराव प्रत्येक चाल करताना मोठ्या आस्थेवाईकपणाने माझे साहाय्य घेत असत. मला महत्त्व देत असत.

'सांज झाली, चांदणी रात्र आली' असे सुबोध तोंड असलेली, त्याच चित्रपटातील माझी एक चाल मला अजून आठवते.

'अशि काशि भीशी साजणी, की काटा तुला लागेल ग' हीच त्या चित्रपटातील एक नखरेल तर्ज मी अजूनही मोठ्या हौसेने गात असतो. ही चाल देखील मीच बांधली होती.

या एक-दोन चाली तर मी गुंफल्याच पण त्या चित्रपटातील प्रत्येक गीताचे पार्श्वसंगीत व वाद्यमेळ-योजना करण्याची संधिही मला लाभली. सपाटून काम करायला अवसर सापडला. कामाचा कैफदेखील मोठा



आई, बहीण, वडील व पाठीमागे भाऊ यांचे समवेत पांढरा कोट घातलेला राम.

कोल्हापूरच्या गोदूताई






लता मंगेशकर व सी. रामचंद्र.



मेह्मूद, जयकिशन, सी. रामचंद्र, राजकपूर, यशवंतराव चव्हाण, आशा भोसले.

सी. रामचंद्र, श्रीमती लालबहादूर शास्त्री, लालबहादूर शास्त्री, कवी प्रदीप





' सुरेल ' ह्या संस्थेच्या मुहूर्तप्रसंगी सी. रामचंद्र, लता मंगेशकर, जयकिशन, मा. भगवान, अनिल विश्वास, व तात्याराव सावरकर.





सी. रामचंद्र, आशा भोसले, लता मंगेशकर, महमंद रफी.



व्ही. शांताराम, सी. रामचंद्र

शेख अब्दुल्लासमवेत लता मंगेशकर व सी. रामचंद्र



ओमप्रकाश, सी. रामचंद्र, लता मंगेशकर, मीना,
महंमद रफी, नौशाद, कोरगावकर, व गुलाम अहमद





महंमद रफी, नौशाद, सी. रामचंद्र, तलत महमूद




राजकपूर, सी. रामचंद्र



नेहरूंच्या उपस्थितीत ' ए मेरे वतन के लोगों '



ा. भगवान, सी. रामचंद्र, ओमप्रकाश व दिलीपकुमार



सामर्थ्यवान असतो. रात्री प्यायलेले मद्य, दुसऱ्या दिवशी साफ उतरून जाते. डोक्यात चढलेली चाल, आठवडेच्या आठवडे माणसाला धुंदीत ठेवते. वाद्ये मुकी होतात. बैठक संपते. पण स्वर मात्र मुंग्या चढाव्यात तसे मस्तकात चढतच राहतात. प्रेमवेडा माणूस आणि संगीतकार यांची अवस्था जवळ-जवळ सारखी असते. मी काही कुणी शायर नाही पण अनुभवाच्या सच्चे-पणाची ग्वाही देऊन मी छातीठोकपणे म्हणे : प्रीतसे कोई कम नहीं, बेहोषी संगीतकी '

पुण्यातील या अत्यंत उद्योगमग्नतेच्या काळात तरी ' वासने ' ने माझा पाठपुरावा सोडला म्हणता काय? नाही. नारद-नारदीमध्ये काम करणाऱ्या एकीने मला आपल्या यौवनाकडे खेचलेच. प्रेमाच्या प्रकरणात मी इतका अंगभर मार खाल्ला होता की, त्या आकर्षणाला अपेक्षित फळ आले नाही. माझ्या मनातला ओलावाच गारठून बर्फ झाला होता. उबेच्या जाणिवेने तो रतिमात्र पाझरू शकला नाही.

पुण्यातले काम संपले. पुढे काय? या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी भगवान पुण्याला आला. तो म्हणाला, ' अन्ना, चलो. '

' कहाँ? '

' मद्रास. '

मी मद्रासविषयी धसका घेतला होता. त्या शहरात ' बहोत बेअब्रू होकर, तेरे कूचरेसे निकले हम ' या शेराचा चांगला सव्वाशेर होऊन माझ्या पदरी पडला होता. भगवान म्हणाला, ' मुझे एक पिक्चर मिली है वहाँ– '

' प्रोडयूसर कौन ? ' मी विचारले.

' वह ही '

' वह ही, याने ? '

' जयकोडीवाला. विश्वनाथ '

' बाप रे ! '

'क्यों ?'

भगवानने प्रश्न विचारला. माझ्या डोळ्यांपुढे के. टी. रुक्मिणी, तिची आई, ती रात्र–साराच तमाशा उभा राहिला. मी थोडा काळ गप्प बसलो. व्यवसायात असले मानापमान आणि हेवेदावे सांभाळून चालणार नाही हा विवेक मला तत्काळ सुचला.

'जाएंगे' मी म्हणालो.

'एक शर्त है' भगवान बोलला.

'कुणाची ?'

'प्रोड्यूसरची.'

'काय अट आहे त्यांची ?'

'बुरा नही मानना.'

'बोल तो सही.'

भगवान मुलखाचा गमत्या, पण त्याचे बटबटीत आणि मिष्किल डोळेही थोडे गंभीर झाले. हलक्या आवाजात तो बोलला, 'तो निर्माता म्हणाला, अण्णाला संगीत दिग्दर्शन देतो पण–'

'पण काय– ?'

'त्याने एक काम करायचं नाही.'

'करायचं नाही ?'

'हो.'

'कोणतं ?'

'हिरॉइनशी प्रेम.'

अरे ! प्रेम का करतं कुणी ? ते होत असतं. असो, मला काही प्रेमवीर होण्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. मला व्हायचं होतं यशस्वी संगीत दिग्दर्शक. त्या निर्मात्यालाच सांगावे, अशा आविर्भावात मी भगवानला सांगितले, 'मी माझ्या संगीत पुरते पाहीन. बाकीच्या गोष्टींकडे ढुंकून पाहणार नाही. मग झालं ?'

'तो तय हो गयी बात' भगवान उत्तेजित स्वरात म्हणाला, आणि आम्ही दोघांनी मद्रासासाठी प्रस्थान ठेवले.

भगवान दक्षिण देशी जाऊन दिग्दर्शित करणार होता त्या चित्राचे नाव होते. 'वनमोहिनी.' त्या कथानकात प्रमुख भूमिका होती एका जनावराची–हत्तीची. तो हत्ती मद्रासच्या स्टुडिओत येणे शक्य नव्हते. त्याच्या कामासाठी सारी चित्रणसंस्थाच एका जंगलात मुक्कामाला जाणार होती नगर काय आणि जंगल काय ? काम मिळते आहे तर त्याच्यासाठी जाणे भाग होते.

आम्ही मद्रासला गेलो. त्या विश्वनाथाशी माझा करार झाला. करारात त्याने नायिकेला न फितविण्याची अट घातली नाही हे त्याचे सौजन्य. माझ्या सर्व कामाचा एकत्रित मेहनताना पाचशे रुपये ठरला आणि आम्ही त्या जंगलाकडे वळलो.

अर्नाकुलमपासून पस्तीस मैलांवर ते जंगल होते. त्या मलबारी वनप्रदेशात आमची राहण्याची व्यवस्था एका ख्रिस्ती शिकाऱ्याच्या 'दौलती'वर करण्यात आली. त्या वस्तीचे नाव होते तोडुपडा. त्या ख्रिस्ती शिकाऱ्याचे अभिधान होते, डब्ल्यू. जे. जॉन. तो जॉनसाहेब होता काळा-सावळा, ठेंगणाठुसका, पण भलता काटक. उडत्या पाखरांना अचूक टिपण्याचे कसब त्याने कमावलेले होते. शिकार हा त्याचा प्यारा छंद होता. संपत्ती त्याच्या घरी कावडी वाहत होती. साऱ्या मलाबारभर ठिकठिकाणी त्याचे चहा, कॉफी, वेलदोडे यांचे मळे होते. आम्ही त्याच्या 'दौलती' वर राहायला गेलो तेव्हा त्याला फार आनंद झाला. व्याह्याने वरपक्षीय वऱ्हाडाचे स्वागत करावे तसे त्याने आमचे स्वागत केले. आपल्या भल्या मोठ्या बंगल्यात आम्हांला पृथक् पृथक् खोल्या त्याने देवविल्या.

दिवस ऐन उन्हाळ्याचे होते. बहुधा एप्रिल महिना असावा. आम्ही दिवसभर बाह्य चित्रणासाठी जात असू. वास्तविक संगीत दिग्दर्शक चित्रणाच्या जागी जाण्याची आवश्यकता अशी काही नव्हतीच. पण चित्राचा दिग्दर्शक

होता भगवान, माझा जिवाचा मित्र. त्याला साहाय्य करण्यात मला नेहमीच आनंद वाटे. मी अक्षरशः त्याचा साहाय्यक म्हणूनही काम करी. फट-मार्क मारणे, रिफ्लेक्टर्स धरणे हे उद्योग मनःपूर्वक मी करी. चाली लावण्याचे काम संगे संगे चाल्लेच होते.

नुसत्या हवेत चाली तयार करणे मला साधत नव्हते. गीत समोर असले की चाल मला आपोआप सुचे. हिंदी मराठीची कथा वेगळी. त्या भाषांची अक्षरे माझ्या ओळखीची होती. तामीळ–तेलगूचे लफडे आणखी कठीण. त्या कवीने येऊन गीताचा छंद आणि अर्थ मला समजावून द्यावा तेव्हा त्या गीताची चाल माझ्या मेंदूतून लवलव करीत जागू लागे.

कवीकडून गीत हाती आले म्हणजे मी मुक्कामावर थांबे. चाली लावीत बसे. एरव्ही भगवानच्या ताफ्याबरोबर चित्रणस्थानी जाणे मला आवडे. निर्मात्यांशी केलेल्या अलिखित कराराप्रमाणे मी अगदी तंतोतंत वागत होतो. कोणाही स्त्रीकडे 'त्या' नजरेने पाहण्याचे कटाक्षाने टाळत होतो. नायिकेला फितवण्याचा प्रश्न उद्भवला नाही. तिने स्वतःच आपल्या प्रीतीचा हुक्का करून टाकलेला होता. ती आल्या आल्याच मी आणि भगवान यांच्यामध्ये बसे. आमचे दोघांचे हात आपल्या हाताने ओढून स्वतःच्या दोन्ही खांद्यांवरून घेई. तिला मी काय फितवणार होतो कपाळ! झाडावरच पिवळे झालेले फळ, अर्धीच्या उबेची बाट बघणार थोडेच? त्या तवमणीदेवीला मी चाली बसवल्या. मद्रासला जाऊन त्या ध्वनिमुद्रित केल्या. भगवान ती गाणी चित्रण करू लागला.

जॉनसाहेब श्रीमंत होता. शिकारी होता तसाच जातिवंत मद्यपी पण होता. तो आपल्या घरीच देशी मद्य तयार करी. बाजारचे पेय त्याला 'सपक' वाटे. व्हिस्की, ब्रँडी, जिन, असली पेये मग तो मोठ्या अगत्याने मला आणि भगवानला देई. जंगलातल्या रात्री बेहोषीने भारून जात. तोडुपुड्याच्या मुक्कामात मी मनसोक्त पिऊन घेतले. माझा मेंदू एखाद्या पाणबुडीसारखा मद्यसागराच्या पोटातूनच जणू फिरत राहिला.

जॉनसाहेबांची आणि आमची दोस्ती मला तर खूपच मानवली. माझ्या मरतुकड्या अंगकाठीला चांगला रसरशीत गोलवा येऊ लागला. त्या मलबारी जंगलातील वनवास मला खरोखरीच लाभदायक झाला.

मे महिन्याच्या सुट्टीत, कॉलेजमध्ये शिकणाऱ्या जॉनसाहेबाच्या चार तरुण मुली घरी आल्या. चित्रपटकलावंताच्याविषयी त्या मुलींच्या मनात आगाऊच आकर्षण होते. त्या आल्या आल्याच आमच्यात मिसळल्या. चित्रण पाहण्यासाठी येऊ लागल्या. गप्पांत भाग घेऊ लागल्या. औत्सुक्याने नटलेले वेडेभोळे प्रश्न विचारू लागल्या. कॉलेजमधल्या गंमती सांगू लागल्या.

आमची एक चौकडी होती. भगवान, मी, भगवानचा सहकारी राजाराम गोल्तकर आणि एक छायाचित्रकार अहमद-उल्ल-ला. त्या चार तरुण मुली बघता बघता आम्हा चौघांवर फिदा झाल्या. प्रत्येकीने जणू एकाची निवड केली. त्या चौघीजणी आमचे जेवणाचे डबे घेऊन, चित्रणस्थानी येऊ लागल्या. बटमोगऱ्याचे आपादमस्तक पोचणारे सर, आम्हांला भेट म्हणून देऊ लागल्या. माझी मित्रत्रयी आनंदाने वेडावली, पण माझे साहस काही केल्या वाढेना. तो जॉनसाहेब मोठा प्रेमळ माणूस होता. मद्याच्या ऐन अंमलात तो माझ्या खांद्यावर हात ठेवी आणि डोळे पाणावून म्हणे, "मला एक मोठा मुलगा होता. तो जिवंत असता तर तुझ्याएवढा असता!"

जॉनचे ते शब्द आणि प्रेमप्रकरणांतला माझा पूर्वानुभव मला पुढचं पाऊल टाकू देईना. जॉनची एक मुलगी मात्र, माझ्या एकसारखे मागे मागे करी. तिला काही द्यायचे होते, पण मला ओंजळ उघडण्याची हिंमत उरली नव्हती. माझ्या मनाला सारखे वाटत होते, 'या मुलीनेही असे वागू नये.' माझे वाटणे ठीक होते. निसर्गाचे सामर्थ्य आपल्या गुलामांना आपल्या गतीच्या गाड्याला जुंपून हाकलीत होते, त्याला कोण काय करणार?

मध्येच एकदा कोचीनच्या तत्कालीन राजपुत्राने आम्हांला मेजवानीसाठी बोलावले. जॉनसाहेबांच्या गाडीतूनच आम्ही गेलो. राजाचा पाहुणचार घेतला. परत निघायला रात्र झाली. चांगले ११ वाजले असतील.

अलबाईपर्यंत आलो आणि ध्यानीमनी नसताना असे विलक्षण वादळ सुटले की विचारू नका. मुसळधार पाऊस लागला. वीज उन्मत्त झाल्यासारखी तांडव थैमान घालू लागली. रस्त्यावरचे वृक्ष कडाकड मोडून उन्मळून पडू लागले. गाडी चालविणे अशक्य झाले. तशात जॉनचा एक डोळा अधू. त्याला पुढचे ठीकपणे दिसणार कसे? आम्ही सारेजण घाबरलो. मद्यानंदात मशगूल असलेला जॉन मात्र खुषीने म्हणत होता, 'धिस् इज द वाइल्ड ब्यूटी ऑफ मलबार.'

त्या आक्राळविक्राळ निसर्ग-सौंदर्याने आमच्या सर्वांगाला कापरे सुटले. एका नदीच्या ऐल तीरावर गाडीने पाय गाळले. समोरची नदी महापुराने मातली होती. वरून पाऊस कोसळत होता. जंगल किर्रर्र दाटले होते. आता काय करायचे?

जॉनसाहेब म्हणाला, 'तावदानं बंद करा. आणि झोपा पोरांनो. जगलो वाचलो तर जाऊ!'

ती काळरात्र आम्ही कशी काढली ते आमचे आम्हांला ठाऊक. केवळ सहा मैल जाण्यासाठी आम्हांला तेरा तास लागले. धड शरीरांनी आणि मरगळलेल्या मनांनी तोडुपुड्यास जाऊन पोचलो. आडवे पडलेले झाड कुऱ्हाडीने खापलून बाजूला करण्याचा उद्योग जॉनला ठायी ठायी करावा लागला. त्या म्हाताऱ्याच्या ताकदीने आम्ही तरणीताठी माणसे अगदी दिपून गेलो. मला उगीचच वाटले, जॉनच्या मुलींच्या मोकळेपणाचा फायदा घेणे वेडेपणाचे लक्षण ठरेल.

तोडुपुड्याला येताच परत प्रेमाध्याय सुरू झाला. त्या चार कन्यका आम्हा चौघाजणांची प्रेमाराधना करू लागल्या. त्यांच्या निरागस वागणुकीचा फायदा घेण्यात कुठलाही चित्रपट व्यावसायिक कचरला नसता. पण आम्ही कचरलो. त्यांच्या सादात पूर्ण प्रतिसाद असा कुणीच दिला नाही.

आमचे शूटिंग संपले. त्यांची सुट्टी संपली. त्या चौघीही आमच्याबरोबर

रेल्वेने निघाल्या. जॉनसाहेब नव्हता बरोबर. त्यानं आम्हांला निरोप दिला, तेव्हा त्याचे अनुभले डोळे पाणावलेले होते. शब्द कातर झाला होता.

मी आणि जॉनची नंबर दोनची मुलगी एका डब्यात होतो. बाकीच्या मुली पांगल्या होत्या. जागा मिळेल तिकडे बसल्या होत्या. माझे तीन मित्र त्यांच्या आसपास होते. जॉनची ती मुलगी आज फार सुंदर दिसत होती. किंचित सावळी अंगलट. टपोरे डोळे. लालभडक रंगाचे रंगविलेले ओठ. पांढरे शुभ्र दात. मनमोकळे हास्य. पाश्चात्य पद्धतीचा तोकडा वेष. ती तारुण्याने मुसमुसलेली होती. प्रेमासाठी आसुसली होती. तसे आम्ही गर्दीत होतो. अवतीभवती बाकीचे प्रवासी होते. तिला वाटत होते, त्या डब्यात आम्ही दोघेच आहोत. लांबसडक केस असलेल्या आपल्या पापण्यांची मजेदार हालचाल करीत ती मला म्हणाली, 'राम'—त्या हाकेतली आर्तता मला पूर्णपणे जाणवली. मी नुसता हुंकार दिला. ती पुष्कळसे बोलली, संयमाने बोलली. तिला माझ्याशी लग्न करायला हवे होते. मी होकार दिला नाही. ती तरुण होती. सधन होती. तिच्या बापाने प्रत्येक मुलीसाठी सात सात लाख रुपये ठेवले होते. ती श्रीमंत होती. सुदृढ, सुंदर होती. मी दरिद्री होतो. अनेकवार पोळलेला होतो. पूर्वी मी एका अस्पृश्य मुलीला आपणहून मागणी घातली होती. आता ही ख्रिश्चन मुलगी आपण होऊन मला विनवीत होती. तिची मागणी मी नाकारली. या वेळी फसलो नाही. एक मात्र खरे की, नकळत का होईना, पण मी एका जीवाला फसविले, निराश केले. स्वतः अधू झालेल्या माणसाने उगीचच एका पाखराचे पंख दुखवून ठेवले. त्याला जायबंदी करून सोडले.

'वनमोहिनी'चे चित्रण आटोपून आम्ही परत मुंबईत आलो. जॉनच्या 'दौलती' वरच आम्ही पर्ल हार्बरवर हमला झाल्याचे वृत्त वाचले होते आणि मुंबईस आलो तेव्हा वर्तमानपत्रांचे रकाने युद्धवार्तांनी भरून ओसंडत होते.

निसर्गाच्या वरदानाने संपन्न दिसणारा तो मलबार प्रांत, ते घनदाट जंगल

एका टेकडीच्या उतरणीवर असलेला तो जॉनसाहेबाचा बंगला—त्याचे सदासिद्ध आतिथ्य ती फेसाळणारी पेये—हरिणीसारख्या भोळ्या डोळ्यांनी आमच्याभोवती बागडणाऱ्या त्या फुलवेड्या पोरी !

मुंबईत पोचल्यावर हे सारे विसरावे लागले. विसरता विसरत नव्हते. ते निश्चयाने पुसून टाकावे लागले.

दादर विभागात मसालेवाल्या बेडेकरांच्या माडीवर माझी खोली होती. तिथेही मी एकटा नव्हतो. माझ्यासारखे आणखी तीन-चार ब्रह्मचारी होते. कोण कुठे, कोण कुठे अशी चाकरी करीत होता. पोटाची खळगी भरत होता. कुणी कारकून होता कोण हिशेबनीस होता, तर कुणी शिकाऊ होता. एका रात्री, माझ्याशिवाय ती सारी मंडळी चित्रपट पाहायला गेली. मी एकटाच खोलीवर होतो. उद्या काय करायचे ? हे सनातन गीत सादा-वाचून, चालीवाचून, तालावाचून मनोमन आळवीत होतो. बरीच रात्र झाली तरी झोप येईना. अर्ध्या रात्री ती सारी जनता परत आली. आली ती ठीक जाऊन अंथरुणावर पालथी पडली नाही. त्यांना चित्रपट चढला होता. त्यांतल्या एका गाण्याने त्यांना भारून टाकले होते. ते सर्वजण माझ्या-भोवती गोळा झाले. मी नको नको म्हणत असता, पाहिलेल्या चित्रपटाची कथा त्यांनी मला ऐकवली. व्ही. शांताराम या थोर दिग्दर्शकाच्या नावाने त्यांनी ' उदो ' गाजविला आणि मग सांघिकपणे त्या चित्रपटाचे ध्येयगीत गाण्यास त्यांनी प्रारंभ केला.

आता कशाला उद्याची बात ?
बघ उडून चालली रात
भर भरून पिऊ
रसरंग नऊ
चल बूडुन जाऊ प्रेमात.

त्या बहाद्दरांनी गाणे पाठ केले होते. त्याची चाल मात्र ते आपल्या इच्छेने हवी तशी वळवीत होते. ' कशाला, कशाला ' हा शब्द, वेगवेगळ्या

शैलीने गद्यात उच्चारीत होते. सकाळ होईतो त्यांचा हा धुमाकूळ चालू राहिला. ' कशाला उद्याची बात ' ऐकता ऐकता प्रत्यक्ष ' उद्या 'च समोर येऊन उभा ठाकला.

मी त्या उद्याच्या चिंतेत होतो. त्याच्या पदरी काय टाकावे याच फिकिरीत होतो. ते होऊन गेलं होतं. काही तरी व्हायला हवे होते आणि त्याचा धागा नेमकेपणाने हाती गवसत नव्हता. नुसते ' कशाला उद्याची बात ' म्हणून भागण्यासारखे नव्हते. कुठले तरी भरीव कार्यक्षेत्र लाभायला हवे होते.

एका दुपारी मी एकटाच खोलीत होतो. मुंबईचा उकाडा जिवाची काहिली कासावीस करीत होता. अंथरुणावर उताणा पडल्या पडल्या मी स्वतःशीच हसत होतो. मला काहीतरी आठवत होते. त्या आठवणीतल्या माकडाशी स्वतःची तुलना करताना माझे मलाच हसू फुटत होते. ते हसू प्रसन्न नव्हते. कडवट होते. स्वतःची निंदानालस्ती करणारे होते.

तोडुपुड्याला जाण्यापूर्वी थोडे दिवस आम्ही मद्रासलाच थांबलो होतो. त्या विश्वनाथ नावाच्या निर्मात्याकडेच आमचा मुक्काम होता. त्याच्या निवासस्थानाच्या पाठीमागच्या बाजूला एक लहानसे उद्यान होते. त्या उद्यानात एक होते लाल तोंडाचे माकड. विश्वनाथने मोठ्या हौसेने ते पाळले होते. ते नेहमी एका झाडाच्या फांदीवर बसलेले असायचे. त्या झाडाला एक लांबलचक कातडी पट्टा कायमचा बांधलेला होता. त्या पट्ट्याचे शेवटचे टोक बकलाने त्या माकडाच्या कमरेशी बांधलेले होते. विश्वनाथने त्या माकडाला मद्य पिण्याचे व्यसन लावले होते. दुपारच्या वेळी विश्वनाथचा एक नौकर मागल्या अंगणात येई, एक बिअरची बाटली फोडून ती एका प्याल्यात भरी. तो प्याला तो झाडाखालच्या हिरवळीवर ठेवून देई. तो उसळता चषक दृष्टी पडताच झाडावरचा तो बद्ध कपिराज आपल्या हातांनी आपल्या कमरेचा पट्टा सोडून टाकी आणि खाली हिरवळीवर उडी घेई. तो बिअरचा ग्लास मोठ्या समाधानाने प्राशन करी. परत झाडावर चढे. पट्ट्याचे

बक्कल परत आपल्या कमरेशी अडकवून तो स्वतःच स्वतःला स्थानबद्ध करी. मग त्याच्या अगणित लीला चालू होत. त्या नुसत्या बघत राहण्यातही मोठी मौज असे. तासच्या तास निघून जात.

माझे तसेच काहीतरी चालले होते. त्या मानवजातीच्या पूर्वजात आणि माझ्यात काहीच फरक नव्हता. मीही असाच एखाद्या व्यसनापासून स्वतः-ला सोडवून घेत होतो. पुनः पुनः कसल्यातरी प्रश्नानं स्वतःला गुंतवीत होतो. माझे आयुष्य असे मी काहीच घडवू शकलो नव्हतो विश्वनाथाच्या माकडासारखा मी एका झाडाच्या फांदीवर बसत होतो. सुचतील ते चाळे करीत होतो.

त्या माकडाशी मी स्वतःची तुलना करून हसतो आहे एवढ्यातच कुठंतरी दार ठोठावले. मी उठलो. कडी काढली. दार उघडले. बघतो तो भगवान दादा.– तो माझ्यासाठी आणखी काही नवे काम घेऊन आला होता. त्याला ते जमले होते. मी त्याच्या मानाने अगदीच ' आडगोळा होतो. '

' काम मिल गया अन्ना, अपनेकू ' भगवान खरा मराठी माणूस. तो आपली अशी एक स्वतंत्र हिंदी भाषा बोलायचा. हिंदी निर्मात्यांच्या माथ्या-वरही तीच थापायचा.

' कसलं ? कसलं काम मिळालं भगवान ? ' मी विचारलं.

' एक पिक्चर मिळालंय् ? '

' कुठं ? '

' इथं '

' मुंबईत ? '

' कुणाचं ? '

' हरिश्चंद्रराव कदम '

' ते फक्त तुला मिळालं ? मला काय काम ? ' मी निराशेने बोललो.

' का ? '

' कदमांचा संगीत दिग्दर्शक आहे नेहमीचा ! '

' कोण ? '

' रोबीन चतर्जी. '

' नही यार. हमने कहा हरिश्चंद्र रावसे. म्युझिक अन्नाकों मिलेगा तो हम पिक्चर करेगा. नहीं तो नहीं. उसको मानना पडा ! ' आणि मीही भगवानला मानला.

भगवाला किती धन्यवाद द्यावेत ते मला कळेना. तो काम मिळवी ते केवळ एकट्यासाठी नव्हे. माझा वाटा तो गृहीतच धरून चाले.

भगवानच्या कृपेने मला हिंदी भाषेतील पहिले चित्र संगीत-दिग्दर्शनासाठी मिळाले. त्या चित्राचे नाव होते सुखी जीवन. नाव अन्वर्थक होते. माझे जीवन वाहत होते, पण त्यात सुखाचा किरण अद्याप तरी प्रतिबिंबित झाला नव्हता. सुखी जीवनासाठी मी पहिली चाल लाविली ती एका भारतविख्यात गीताला. डॉ. महमंद इक्बाल यांचे होते ते गीत—

' सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा ! '

८

हरिश्चंद्रराव कदमांचे हिंदी चित्र, संगीत योजनेसाठी माझ्याकडे आले, तेव्हा कुठे मला वाटले की, आता 'सा' लागला. लहानपणापासून केलेल्या खटपटीला कुठे ना कुठे यशोमार्ग सापडला. आता माझ्या आयुष्याची बैठक जमावी. गाणे रंगाला यावे.

हरिश्चंद्रराव स्वतः मोठा मुरब्बी माणूस होता. माझ्या अंगात काही वेगळे कसब आहे हे त्याने जाणले होते. स्टुडिओत येईल त्या नव्या पाहुण्याला तो मोठ्या अभिमानाने माझी ओळख करून देई. एखाद्या आत्मतुष्ट सासूबाईंनी आपल्या नवथर पण गुणी सुनेचे ठायी ठायी कौतुक करावे, तसे हरिश्चंद्रराव माझे करीत. मी रचलेल्या चाली पुनः पुन्हा म्हणून दाखविण्याचा आग्रह करीत. मलाही स्फुरण चढे. प्रत्यक्ष मीच उत्साहभराने गाऊ लागलो की मीच बांधलेल्या माझ्या चालीच्या वीणेत एखादी नवी चमक आपसुखपणे नव्याने उजळून निघे. ऐकणारा 'वाहव्वा' देई. हरिश्चंद्रराव प्रसन्न होत आणि मलाही उत्साहाचे भरते येई.

होता होता, माझ्या चालींचा लौकिक साऱ्या व्यवसायभर झाला. 'सारे जहाँसे अच्छा, हिंदोस्ताँ हमारा' या गाण्याच्या ध्वनिमुद्रणासाठी मी उभा राहिलो. वादकांचा जथा सिद्ध झाला. गायकांनी स्वर जमविले. आता ध्वनिमुद्रणाच्या कामास प्रारंभ होणार, एवढ्यांत काय नवल चतर्जी, अनिल विश्वास, डी. पी. कोरगावकर ही त्या वेळची सारी श्रेष्ठ संगीतकार मंडळी सभागृहात उपस्थित झाली. मी काय करतो आहे हे पाहण्याच्या जिज्ञासेनेच ते सर्वजण आले होते. माझा ऊर किंचित दडपल्यासारखा झाला.

अनिल विश्वास या संगीत दिग्दर्शकाविषयी माझ्या मनात फार आदर होता. हिंदी संगीतात पाश्चात्य वाद्यांचे स्वर बेमालूमपणे मिसळून देण्याचे काम त्यांनी मोठ्या रसज्ञपणे केले होते. संगीतशास्त्राला देश-कालाच्या सीमा नाहीत हे त्यांनी जणू आपल्या श्रुतिमनोहर चालींनी पुनः प्रस्थापित केले होते. 'हार्मनायझेशन्'चे तंत्रही त्यांनी आत्मसातही केले होते. एका अर्थाने मी अनिलदाचा चेला होतो. प्रत्यक्ष त्यांनी नसले तरी त्यांनी तयार केलेल्या चालींनी मला बरेच काही शिकवले होते.

माझे गीत ध्वनिमुद्रित होत असताना अनिलदांसारखा ख्यातकीर्त संगीत दिग्दर्शक अनाहूतपणे उपस्थित व्हावा, हा एक सुयोग होता.

मी थोडका बावरल्यासारखा झालो, पण त्या थोर थोर संगीत दिग्दर्शकांनी आपल्या मनमोकळ्या वागण्याने, थोड्याच वेळात मला थक्क करून टाकले. 'सारे जहाँसे अच्छा' हे गीत, संघगीत होते. दहावीस तरुण-तरुणी त्या गीताचे ध्रुपद उचलीत होत्या. गीताची अंतिम चाचणी सुरू झाली. स्वर कसा येतो आहे हे पाहण्यासाठी मी ध्वनिमुद्रिकाच्या काचबंद खोलीत गेलो. सहकाऱ्याने तीन अंक मोजले. वाद्यमेळ सुरू झाला. गीत ऐकू येऊ लागले. गीताचा प्रवाह ध्रुपदावर आला आणि मला खटकल्यासारखे झाले. संघगान करणाऱ्यांतील कुणी गायक एक वेगळा स्वर लावीत होता. माझ्या कानाला ते वेगळेपण नेमके जाणवले. ते वेगळेपण लोभस होते. शास्त्रबाह्य होते. पण कानाला गोड लागत होते. मी गाणे थांबवले. धावतच

बाहेर आलो.

अनिलदा, चतर्जी, कोरगावकर हे सारेजण त्या संघगायनात सामील झाले होते. तो स्वर स्वतः अनिलदांचा होता.

'अच्छा लगता है ना तीव्र निषाद ?' अनिलदा म्हणाले. मी योजलेल्या रागात तो तीव्र निषाद योजण्याचा परिपाठ नव्हता. अनिलदांच्या तोंडून मात्र तो गोड लागत होता. गाण्याच्या प्रातात एक जरीची झगझगीत रेखा आणखी मिसळली जात होती.

'चलेगा ना ?' अनिलदांनी आपल्याकडे कौतुकपूर्ण लहानपणा घेत विचारले. 'ना, दादा ना' मी म्हणालो. अनिलदांनी हट्ट घेतला नाही. त्यांची सूचना सुंदर होती, पण ग्राह्य होतीच असे नव्हते. त्या स्वरूपाच्या भरीने ते गीत आणखी मनोहर होत होते, पण त्या एकाच स्वराने त्या रचनेला अवघडपणा येत होता. चित्रपट ही बोलून चालून जन-कला. सुबोधता आणि सौंदर्य या दोन्ही तत्त्वांचा मेळ घातल्यावाचून तिचा रथ चालू शकायचा नाही. माझे हे मत मी अगदी नम्रपणाने अनिलदांच्या कानी घातले. त्यांनीही ते मनःपूर्वक मान्य केले.

'सारे जहाँसे अच्छा, हिंदोस्ताँ हमारा' हे गीत ध्वनिमुद्रित झाले. मी हिंदी चित्रपटसृष्टीत एक संगीत दिग्दर्शक म्हणून नोंदवला गेलो. सारे बालपण नागपुराकडे गेल्यामुळे आईपेक्षा मावशीचा लळा मला अधिक होता. मराठीपेक्षा हिंदीशी माझे हितगुज अधिक जमत होते. मी मराठी भाषिक असून अधिकतया हिंदीत वावरलो, त्याचे इंगित हेच.

हे वर्ष १९४१-४२ असावे. मी त्या वेळी राहत होतो दादरला. शिवाजी पार्कच्या आसमंतात. मी ज्या वास्तूत राहत होतो तिचे नाव होते नारायणसदन. ही इमारत श्रीमती ठाकूर नामक कोणा एका विधवेच्या मालकीची होती. मी भाडेकरू होतो.

नव्याने हाती आलेल्या संधीचे सोने करून दाखविण्याच्या ईर्षेने मी सारी प्रतिभा पणाला लावून चाली बांधीत होतो. चालीची कुसर पारखण्यासाठी निरनिराळी वाद्ये साथीसाठी हाताळीत होतो. मेंडोलिन हे माझे अत्यंत आवडते वाद्य. ते हाती घेऊन त्याच्या स्वरात स्वर मिसळून मी वेळी अवेळी गात बसे...

एक सावळी, उभार अंगलटीची मुलगी ते गाणे ऐकण्यासाठी माझ्या खोली-भोवती घुटमळू लागली. तिला 'का ग बाई ?' असे विचारण्याची सोय नव्हती. ती घरमालकिणीची सर्वांत मोठी मुलगी आहे, हे मला माहीत होते. त्या मुलीला मी अनेक दिवस पाहत होतो, तिच्याविषयी ऐकत होतो. ती फार हुषार आहे, कर्तबगार आहे, बुद्धिमान आहे, असे माझे मत झाले होते. तिच्या सादात हुकमत होती. चालण्यात आत्मविश्वास होता. डोळ्यांत एक प्रकारची जरब होती. आईचे घर तीच चालवीत होती. इमारतीची डागडुजी, प्रपंचातील पाहिजे-नको, भाडेकरूंची वसुली, ही सारी कामे तीच करीत होती. तिचे लग्नाचे वय उलटून गेलेले होते. धाकट्या बहिणी विवाहित होऊन आपापल्या घरी नांदत होत्या. त्यांतल्या एकीचा नवरा माझा चांगला दोस्त झाला होता. त्याने आपली प्रेमकथा मला साद्यंत निवेदन केलेली होती.

'प्रेम' या प्रकरणाचा मी धसका घेतला होता आणि तरीही त्या घुटमळणाऱ्या मुलीविषयी माझ्या मनात काही तरी घुटमळू लागले. आणखी काही बोलण्याचा धीर नव्हता. मी बावळट आहे, याविषयी माझी पुरेपूर खात्री झालेली होती. तिच्या शहाणपणाच्या कैक कथा मी तिच्या आप्तस्वकीयांकडून ऐकल्या होत्या.

एका संध्याकाळी मला राहवले नाही. मी मेंडोलिन छेडीत बसलो होतो. काही तरी गुणगुणत होतो. ती आली. आपण आपल्या मालकीच्या इमारतीत वावरतो आहे, हा भाव तिच्या डोळ्यांतून एकाएकी हरवल्याचं मला जाणवले. धाडसाने मी म्हणालो... 'कोण आहे ?'

'मी रतन'

'बाहेर का मग ? आत या ना !'

ती आत आली. थोडी लाजल्यासारखी झाली. त्या सांजेसारखीच सुंदरता मला तिच्या मुखमंडलावर जाणवली.

' माझं एक काम होतं ! ' ती म्हणाली.

' सांग ना ! ' मी बोललो.

' मला मेंडोलिन शिकायचं आहे. शिकवाल ? '

' नाही ' म्हणण्याचा धिटावा तर मला साधला नाहीच, उलट मोठ्या आर्जवी स्वरात बोलून गेलो, ' जरूर, जरूर येत जा ना रोज ! '

रतन ठाकूर माझ्याकडून मेंडोलिन शिकण्यासाठी येऊ लागली. प्रत्यक्ष पद्धतीने वाद्य लौकर आत्मसात होईल या अपेक्षेने मी तिला पद वाजवावयास शिकवू लागलो. मला वाटते ते पद श्री. मो. ग. रांगणेकरांनी रचलेले होते. त्या काळी ते फार लोकप्रिय होते—

' हा कोण मुशाफिर आला, माझ्या दारी ? '

गीतातील नायिकेचा मुशाफिर तिच्या दारी आला होता. मी तर बापडा नायिकेच्या घरीच राहत होतो. तिला माझ्यातले काय आवडले ते मला आजही सांगता येत नाही. मला ती हवीशी वाटली ती तिच्यातील चतुरपणामुळे. तिच्यासारखी कर्तृत्ववान सहचरी आपल्याला लाभली तर आपलाही कधी काळी सुखी संसार होईल, आपले घरदार होईल. अशा अर्धबोबड्या विचारांनी मला घेरले. संगीतयोजना चालूच होती. आणखीही काही योजनांचे मनोरे माझे मन रचीत राहिले. आणि एका शुभक्षणी तिने मोठ्या चतुराईने मला विचारले.

' एकटे किती राहणार ? '

प्रापंचिक भवितव्याविषयी अखंड अंधारातच वावरणाऱ्या माझ्या मनाला त्या प्रश्नाने काजव्याचे पंख फुटले. आत आत कुठेतरी एक प्रकाश-शलाका भिरभिरू लागली. तो प्रकाश माझ्या कामातही उजेड भरू लागला.

दरम्यान माझी सख्खी आई आणि छोटी बहीण माझ्याकडे राहयला येणार असे ठरले आणि मला नारायणसदनातील बिऱ्हाड हलवावे लागले. जवळच

एका दुसऱ्या इमारतीत स्थलांतर केले. आई आणि शकू मुंबईला आल्या.

फूल लपले तरी वास लपत नाही. आमच्या प्रेमाचं गुपित षट्कर्णी झाले. तिच्या आईला कळले. माझ्या आईला पत्ता लागला. आमच्या दोघांच्या भेटी होत राहिल्या. प्रेम वाढत राहिले. आमच्या दोघांच्याही मातृदेवतांनी मात्र वेगळाच उद्योग आरंभला. दोघीही आपापल्या अपत्यांची मनसोक्त निंदा उघडपणे करू लागल्या. माझ्या आईला परजातीची सून नको होती. तिच्या आईला दरिद्री जावई नको होता. विहिणींचे नाते जमण्या आधीच दोघींनीही थयथयाट केला. माझ्या आईने माझ्यावर यथेच्छ तोंडसुख घेतले आणि मुलीला बरोबर घेऊन ती नानाकडे निघून गेली. माझ्या यातना मी लिहीत नाही. त्या सोसण्याचे सामर्थ्य दिले त्या देवाचे पुनः पुन्हा आभार मानतो.

संतापून निघून गेलेली माझी आई दोन एक महिन्यांनी पुनः परत आली. कदाचित नानांशीही तिचे भांडण झाले असेल. माझ्या लग्नाविषयी मग ती बोलली नाही. मीही तिला सांगितले नाही. आम्ही विचारपूर्वक निर्णय घेतला होता. विचार अर्थात तिने केला होता. माझ्या विचारांचा तोंडावळा नेहमीच अविचारासारखा ठरत होता. बेन (रतन ठाकूरला तिच्या घरात बेन म्हणत) आणि मी लग्न करणार आहोत ही गोष्ट बेनचा धाकटा मेव्हणा कालन याला माहीत होती. तो आमच्या पक्षाला होता. भगवान तर माझ्या पाठीशीच उभा होता. पाप असो की पुण्य असो, भगवान सदैव माझाच कैवारी होता. राजा जोशी नावाचा आणखी एक मित्र आमच्या कोंडाळ्यात आता सामील झाला होता. त्याचीही सहानुभूती मला लाभली होती.

या लग्नाचा समारंभ होण्याची शक्यता सुतराम नव्हती. सारा मामला गुपचूप पार पाडणे भाग होते. माझ्या संग्रही कांचनाचे वांधेच होते. बेनची मुखत्यारी आता तिच्या आईने बरखास्त करून टाकली होती लग्न माटुंग्याच्या ' आर्यसमाजात ' उरकून घ्यावे असे आमच्या मित्रमंडळाने ठरविले. दिवसही निश्चित झाला — १९ नोव्हेंबर १९४२.

मधल्या काळात, बेन आणि कालन यांनी माझी कुंडली एका थोर माणसाला दाखवून घेतली होती. जगन्मातेची आराधना करून आपले प्रापंचिक आयुष्य अत्यंत सुखानें व्यतीत करणाऱ्या त्या गृहस्थांचे नाव आरोलकर. ते ' टाइम्स ऑफ इंडिया ' मध्ये मोठ्या हुद्दयावर नोकरीला होते. ज्योतिष हा त्यांचा छंद होता. पण अडलेल्यांना धीर देणे हा त्यांचा स्वभाव होता. मी पुढे फार मोठा संगीत–दिग्दर्शक होणार असल्याचे आरोळकरांनी सांगितले होते. बेनचा त्यांच्या भाकितावर गाढ विश्वास होता. आणखी काय काय भविष्य त्यांनी वर्तविले होते, कोण जाणे. बेनचा निश्चय अढळ होता.

तो दिवस उजाडला. मी आणि माझ्या मित्रांनी सारा कार्यक्रम आधी ठरवला होता. भगवान, राजा जोशी आणि कालन एवढेच वऱ्हाडी. लग्नाला बत्तीस तेहतीस रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार नव्हता. काही घ्यायचे नव्हते, काही द्यायचे नव्हते. नाही म्हणायला माझ्या संग्रही कसलीच टोपी नव्हती. एखादी टोपी आणणे भाग होते. ते काम राजा जोशीने स्वीकारले.

त्या दिवशी मी नेहमीसारखाच कामाला गेलो. आई आणि शकू यांना शंका देखील आली नाही. माझ्या मुद्रेवर काही भाव उमटलेले असतील खचितच, पण त्यांना कुणाला तसे काही भावले नाही.

ठरल्यावेळी टॅक्सी करून मी वधूला घेण्यासाठी तिच्या घरी गेलो. माझी कल्पना होती ती अत्यंत अधीर झाली असेल, प्रत्येक क्षण तिला युगासारखा वाटत असेल, नेटका पोषाख करून ती चोरट्या हालचालीने आतबाहेर करीत असेल, पण प्रत्यक्ष दृश्य होते ते अगदी वेगळे. अगदी अनपेक्षित. माझी वधू गुडघ्यांत मान घालून डोळे गाळीत बसली होती. काय झाले होते कुणास ठाऊक ?

' बेन ' मी हाक मारली. तिने वर पाहिले. ' चल वेळ झाली ' ती गप्प सली, मग एकाएकी हुंदके देऊ लागली.

' म्हणजे झालं काय ?

' माझी आई–'

' काय झालं तिचं ? '

' माझ्यावर रागावून घरातून निघून गेली '

' मग ? '

' मला भीती वाटते ? '

' कसली ? '

' ती जिवाचं काही बरं वाईट करून घेईल. '

मला विलक्षण संताप आला. मी तिच्यावर रागावलो नाही. तिच्या जन्मदेवर संतापलो नाही. संतापलो माझ्या दैवावर. देवाला उद्देशून बोलावे ते सर्व कठोर शब्द मी त्या बिचाऱ्या वधूला उद्देशून बोललो. अंती तिरसटून पण दबल्या आवाजात ओरडलो, 'तुला चलायचं असलं तर चल. नाहीतर—'

बेनने अश्रू आवरले. आवंढा गिळला. तशा अवस्थेतही तिच्या मुद्रेवर हसू झळकले. पावसात लख्ख ऊन पडावे तसे काहीतरी पडले. आई, तिचे घर, तिची सांपत्तिक सुस्थिती या कशा-कशाची पर्वा न करता ती उठली. तिने आपला वेष बदलला. मुद्रेवरचा भावही बदलला आणि ती निमूटपणे येऊन गाडीत बसली.

आम्ही माटुंग्याच्या त्या आर्यसमाजमंदिरात पोचलो. भगवान, कालन, राजा जोशी, वगैरे मंडळी आली होती आणि काय ? आणि इतकेच की माझे लग्न झाले. मंडप नाही. बोहले नाही. गौरीहर पूजा नाही. विहीण नाही. वऱ्हाड नाही. वाजंत्री नाही. काही नाही. माझे लग्न झाले. मी विवाहबद्ध झालो. त्या चतुर मुलीने माझ्या अंगी नसलेल्या चातुर्याची पोकळी भरून काढण्यासाठी आपला हात पुढे केला. पुरोहितांनी वैदिक मंत्र मात्र मजकडून उच्चारवून घेतला–धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि नातिचरामि, नातिचरामि....

लग्न आटोपले, आम्ही सर्वजण जाऊन एका देशी खाणावळीत जेवलो. मी वरून हसत होतो. मित्र थट्टा चेष्टा करीत होते, पण आत आठवणींचे मोहळ उठले होते. त्यांतल्या असंख्य मधुमक्षिका माझ्या काळजाचा चावा घेत होत्या. आज थोरली आई नव्हती, भाऊ नव्हते, गोदूताईंना लिहून बोलावणे कठीण नव्हते, पण ते मी करू शकलो नव्हतो. सख्खी आई घरात होती, ती लग्नाला येणे शक्य नव्हते. हवी होती ती पत्नी मिळाली होती, बाकी साऱ्या यातना होत्या. क्लेशच होते.

संध्याकाळ झाली. सौ. चितळकर यांना बरोबर घेऊन मी बिऱ्हाडांत प्रवेश केला. आईच्या भुवया चढल्या. मी आणि पत्नीने जोडीने तिला नमस्कार केला. माझा गळा दाटला होता. सांगणे तर भागच होते. तिच्या पायांना स्पर्श करता करता मी म्हणालो–' आई, पाया पडतो लग्न करून आलोय मी. '

पायाला काही डसावे अशा अविर्भावाने आई मागे सरकली. संतापून म्हणाली ' माझ्या कशाला पाया पडतोस? जिच्याशी लग्न केलंस तिच्याच पाया पड ' आईचा आशीर्वाद हा असा मिळाला. घरभरणी झाली ती अशी झाली. माझी सुवासिनी संसारात आली ती अशा वातावरणात.

त्या दिवसालाही गती होतीच. दिवसाचा देव समुद्राच्या अथांगतेत मिसळला. रात्र पडली. मला वा माझ्या पत्नीला त्या बिऱ्हाडात जागा नव्हती. दोन तर खोल्या. एकीत माझा मित्र राजा जोशी राहत होता, दुसऱ्या खोलींत आई आणि शकू.

आम्ही आमची पथारी बाहेर गॅलरीत टाकली. नवविवाहित दांपत्याची ती पहिली रात्र अशी उघड्यावर आली. दोघांच्या मनावर मणामणांची ओझी होती. झोप रात्रभर लागली नाही. एक गोष्ट मात्र खरी– रात्री चंद्रदर्शन झाले. चंद्राच्या साक्षीने तितक्या अवघड प्रसंगीही आम्ही एकमेकांचे झालो. प्रथम मीलनाच्या क्षणी आभाळात चंद्र होता. आलिंगनातला आनंद खरोखरच मधाने थबथबलेला होता.

दुसऱ्याच दिवशी आई संतापून निघून गेली. काका प्रधान नावाच्या एका मित्राने आम्हांला जागा दिली. मी आणि पत्नी त्या नव्या घरात राहायला गेलो.

हरिश्चंद्ररावांचे ' सुखी संसार ' चित्र स्टंट असूनही यशस्वी झाले. पंधरा आठवडे चालले. मी यशस्वी संगीत-दिग्दर्शक ठरलो. इकडे आमचाही सुखी-संसार सुरू झाला. बेनने, आपल्या उपजत चातुर्याने, कोंड्याचा मांडा केला. जोड खोल्यांच्या टाचक्या बिऱ्हाडाला बंगलीची ऐट मिळवून दिली. दिवस सुखाने जाऊ लागले. तिच्या लाघवी आणि चतुर सहवासात माझ्या अंतरीच्या साऱ्या यातना मिळून आल्या.

एके दिवशी जयंत देसाई या यशस्वी दिग्दर्शकाकडून मला बोलावणे आले. पत्नीचा पायगुण भाग्यसूचक ठरला. द. म. तीनशे रुपये पगारावर जयंत देसाईंनी माझी नेमणूक संगीत-दिग्दर्शक म्हणून केली. करार मदार होताना त्यांना फक्त एक अडचण जाणवली. ते म्हणाले, ' तुम्हारा नाम बिल्कूल मराठी लगता है। '

तो करें क्या? '

' बदल दें '

' कैसें? '

लग्नात वधूचे नाव बदलते. आमच्या लग्नात तसले सोपस्कार काहीच झाले नव्हते. लग्नानंतर माझे नाव बदण्याचा प्रसंग आला, याचे मला नवल वाटले. जयंत देसाईंनी सुचविले ' स्क्रीन–नेम लीजिये कुछ.'

मी विचार केला. खूप विचार केला. त्या वेळी ' व्ही. शांताराम ' हे नाव भारतीय चित्रपटांच्या रुपेरी पडद्यावर विजेसारखे तळपत होते. त्यांचे यश अमाप होते. मराठीत जन्म घेऊन त्यांच्या नावाने उभा भारतवर्ष पादाक्रांत केला होता. वणकुद्रे या उच्चारदुर्लभ मराठी नावाला त्यांनी दिलेले अतिसंक्षिप्त रूप मला लोभनीय वाटले. मी जयंत देसाईंना सांगून टाकले. पडद्यावर माझे नाव द्या : सी. रामचंद्र.

संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र आणि त्यांची गृहिणी यांचा संसार मग गालातल्या गालात हसू लागला. योगायोगाने संगीतासाठी चित्रपट मिळाला. नावही होते 'मुस्कुराहट'. या चित्राचा हीरो होता मोठा कलाकार 'मोतीलाल'. मुस्कुराहट म्हणजे मंदहास्य. ते मंदहास्य वाऱ्याच्या सुगंधी झुळकांसारखे माझ्या अवतीभवती तरंगू लागले. त्या काळात माझ्या चालीही अशाच मंद हास्याने भरल्यासारख्या मधुर उतरल्या. सुप्रसिद्ध कलाकार मोतीलाल मला एकदा प्रसन्नपणे म्हणाले देखील– 'अभी शादी हो गयी न, हर तर्जमें वह नयेपन मुस्कुराहट सुनाई देती है !'

माझ्या चिमुकल्या घरात मी फार सुखी होतो. पैसा मिळत नव्हता, पण मिळतो आहे तो कमी आहे, हेही कळत नव्हते. विवाहित झाल्यामुळे पूर्वीचा स्त्रीजातीपासून होणारा त्रास आता माझ्यापुरता तरी मावळला होता. पण—

पुनः एक प्रकरण उद्भवलेच !

वत्सलाबाई कुमटेकर नावाची एक विख्यात गायिका त्या वेळी स्टुडिओत येत असे तिच्याबरोबर तिची एक छोटी बहीण कधी कधी तिच्या बरोबर येई. अगदी अठरा-एकोणीस वर्षांची, सुंदर, तारुण्याने मुसमुसलेली. ती माझ्या संगीतालयात येई. गाणी ऐके, बोले. ती माझ्या प्रेमात पडली आहे हे मला मुळीच कळले नाही. कुणी बाई माझ्या प्रेमात का पडते हे मला तेव्हा कळले नाही, आजही कळत नाही. वत्सलाबाईंची बहीण प्रेमात पडली आहे हे मला कळले ती आजारी पडल्यावर. एके दिवशी वत्सलाबाईच घाबऱ्या घाबऱ्या माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या 'अण्णा, तुमच्याशी काही बोलायचं आहे' मी म्हणालो, 'बोला की, त्याला परवानगी कशाला ?'

'माझी बहीण फार आजारी आहे.'

'हो ऐकलय् मी. आता कशीय् प्रकृती ?'

'नवज्वर झाला आहे तिला. बेशुद्ध होते, बडबडते, सारखं तुमचं नाव घेते !' मी थक्क झाले. बाईंच्या म्हणण्याचा आशय माझ्या लक्षात आला.

अगदी आडमुठ्या कठोरपणे मी त्यांना म्हणालो, 'बाई, तुमची बहीण चूक करते आहे.'

'म्हणजे ?'

'माझं नुकतंच लग्न झालं आहे. माझ्या पत्नीवर माझं प्रेम आहे.'

'अस्सं !' बाई संतापून म्हणाल्या आणि मी त्यांचा काही घोर अपराध केला अशा निश्चित समजानिशी पाय आपटीत निघून गेल्या.

दिवसामागे दिवस गेले. संगीतासारखा धुंदी आणणारा व्यवसाय आणि बेनसारखी प्रेमवेडी व चतुर पत्नी. मी माझ्यातच धुंद होतो. आई आपल्यावर रागावली आहे, समाजात आपल्याला स्थान नाही, असल्या गोष्टींचा आठव देखील मला येत नव्हता. बेनचा सहवास हेच माझे सुखसर्वस्व होते. मधेच बेनच्या मनी काय आले कुणास ठाऊक तिने बडोद्याच्या राणीसाहेबांकडे एक नोकरी धरली. शिवण, कशिदा वगैरे हस्तकलांत बेनने असाधारण नैपुण्य पूर्वीच कमावलेले होते. त्या कलेच्या जोरावरच तिने बडोद्याच्या राजकुटुंबात नोकरी मिळविली. ती आणि तिची बहीण दोघीही बडोद्याला गेल्या. संगीताच्या धुंदीत काही काळ मला तिचा सहवास विसरता आला, पण एखादा आठवडा उलटताच अस्वस्थ झालो.

तो अस्वस्थपणा इतका शिगेला गेला की, एका रात्री मी आणि कालन बाईलवेड्या तुळशीदासासारखे बडोद्यापर्यंन्त गेलो. त्यांचा पत्तादेखील ठाऊक नाही अशा अवस्थेत रात्रभर साऱ्या बडोद्यात भटकलो. शेवटी शंकर-टेकडीवरचे त्यांचे निवासस्थान आम्हांला दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता सापडले. तुळशीदासाच्या रत्नासारखा बेनने मला काही रामसेवेचा उपदेश केला नाही, पण नौकरी न करण्याचा निर्णय मात्र तिने मनोमन ठेऊन टाकला.

आमच्या संसाराचा चिमुकला वेल विस्ताराला आला. बेनच्या तोंडावर पिवळेपणाची झाक आली. मला काही तरी शंका आली. लग्नापूर्वी तिने माझी कुंडली दाखविली होती त्या आरोलकरांना मी गाठले. रोखठोकच

विचारले– ' माझ्या आयुष्यातील संततियोग सांगा ' आरोलकर हसले आणि म्हणाले, ' जगात असंख्य मुलं असतात. ती सारी आपलीच. कुणाच्याही धावण्या धावावं'

' म्हणजे ? '

आरोलकर बोलले नाहीत. त्यांनी लक्ष्मीचे योग सांगितले, कीर्तीचे योग सांगितले, प्रवास योग सांगितले, परदेशपर्यटनाच्या योगाविषयी खात्री दिली, पण संततियोगाबद्दल मात्र ' ब्र ' देखील काढले नाही. ती गोष्ट माझ्या मनात सलत राहिली. दैव तसे असले तर दैवत काय सांगणार कपाळ !

दैवालाही घडविणाऱ्या देवाचीच करुणा भाकावी असे मला उगीच वाटू लागले. तेवढ्यात जाधव नावाच्या माझ्या एका मित्राने मला, शिरडीला साईबाबाच्या दर्शनाला येता का ? ' असे विचारले. मी तात्काळ होकार दिला आणि बेनला घेऊन शिरडीला गेलो...

मी ब्राह्मण घराण्यातला माणूस. पुणतांब्याला राहिलेला. गोदेच्या तीर्थात डुंबलेला. माझ्या घरासमोर श्री गजाननाचे जागृत स्थान होते. वडील गेले तेव्हा मला देव आठवला होता. त्यानंतर या वेळी आठवला. मी शिरडीत प्रवेश केला मात्र मला एका अनामिक सुगंधाने भारून टाकले. तसला सुगंध कधी कधी आणि कुठेच अनुभवला नव्हता. या जागेशी आपले काही तरी नाते आहे, असे मला उगीच वाटू लागले. साईबाबांची समाधी आणि तिच्या शेजारची त्यांची तसबीर पाहून मला आनंदाचे भरते आले, त्या वृद्ध फकिराच्या डोळ्यात मला थोरली आई, भाऊ, गोदूताई, या सर्वांच्या नजरा दिसल्या. आपल्याला कुणी तरी कुरवाळते आहे, असा भास झाला. डोळे भरून आले. मस्तक लवले. आपल्याला कुणीच नाही असे आजवर वाटत आले होते. आता आधार सापडला.

' बेन, नारळ वाढवतो बाबासमोर ! ' मी पत्नीस उद्देशून म्हटले, बेनने बाबांच्या समाधीवर हार वाहिला. उदबत्ती पेटवली. नारळ वाढवला. तो

नारळ इथून तिथून नासका. आतल्या खोबऱ्याचा काळा कापूस झालेला.

माझ्या काळजात चर्रर्र झाले. गर्भिणी सुवासिनीने वाढविलेला नारळ कुजका—

मला उगीचच नानाच्या बिऱ्हाडातला तो महार बैरागी आठवला. त्याचा तळतळाट आठवला. मी बोललो काहीच नाही, पण आत कुठे तरी असह्य कळ उमटली.

♠ ♠

९

आम्ही श्री साईबाबांच्या दर्शनासाठी म्हणून शिरडीला गेलो तो एकोणीसशे त्रेचाळिसचा मे महिना असावा. सत्पुरुषाच्या समाधीसमोर वाढविलेला नारळ नासका निघावा. या घटनेने बेन फार कष्टी झाली. मीही मनोमन चरकलो होतो. पण तासा-दोन-तासांत माझे मन ठिकाणावर आले. म्हणालो, ' अग, आपणांला पुढचे दिसत नाही म्हणून ना आपण इथे आलो ? '

' ती म्हणाली, होय, पण बाबांनी हे काय दाखविले ? '

' काय ? '

' ओटीतला नारळ नासका.... '

' तू लावलास तोच अर्थ, बाबांच्या मनी असेल कशावरून ? '

' मला तसे वाटले. '

' वाटते तसे घडत नाही. '

' मग मी काय करू ? '

' बाबांच्यावर श्रद्धा ठेव. मृताला संजीवन देण्याचे सामर्थ्य आहे त्यांच्या अंगी. '

मी आणखी बरेच काही बोललो. होष्यमाण, अदृष्ट असल्या जडजंबाल शब्दांनी तिचा धिरावा सावरण्याचा प्रयत्न केला. थोडके का होईना, पण यश आल्यासारखे झाले. बेनने डोळे कोरडे केले. तिच्या फिकट मुद्रेवर परत चांदणे तरळू लागले.

चांगले दोन-तीन दिवस आम्ही शिरडीला राहिलो. उदाधुपांच्या सुगंधांनी भारलेल्या त्या श्रद्धानगरीत मुंबईकडचे व्याप जणू विसरून गेलो. माझा संगीत निर्मितीचा अहंकार, तिथल्या वेड्यावाकड्या भजनापुढे भाविकपणे हात जोडीत राहिला.

शिरडी सोडताना मन प्रसन्न होते. आपल्यावर कुणातरी सामर्थ्याची सावली आहे. या जाणिवेने ते निश्चिंत झाल्यासारखे झाले होते. नासक्या नारळाची कहाणी बेनच्याही डोक्यात राहिलेली नव्हती. बाबांच्या तसबिरीपुढे नम्र भावाने मस्तके वाकवून, आम्ही शिरडीचा निरोप घेतला.

आम्ही मुंबईला आलो. माझे संगीत रचनेचे काम नेहमीसारखे सुरू झाले. बेनच्या पोटातील प्रेमांकुर दिवसा दिवसाने वाढू लागला. ती अधिक गोड दिसू लागली. तिच्या त्या आनंदगर्भ आकृतीकडे पाहताना मला उगीचच माझ्या जुन्या प्रेमकथा आठवू लागल्या. स्वतःच्या धांदरटपणाचे पुनः पुनः हसू येऊ लागले.

सहा महिने पुरे होऊन सातवा लागताच बेन फार जडावली. कसलातरी दुसरा आळसटपणा तिच्या अंगाअंगांत भरून ओसंडू लागला. बहाराने लहडलेले झाड वाकते, अवघडते. पाहणाराला मात्र ते भारीच शोभिवंत दिसू लागते. बेन तशी दिसू लागली. मी तिची खूप काळजी घेत होतो. तिचे माहेरचे गोत तिच्यासाठी योग्य ती काळजी घेत होते.

मी काही श्रीमंत झालो नव्हतो, पण आता दरिद्रीही उरलो नव्हतो. ती एकाद्या नामांकित सूतिकागृहात गेली असती तर माझ्या खिशांनी आरडा-

ओरडा केला नसता. एका आळसावलेल्या संध्याकाळी मी म्हणालो, ' बाई-साहेब ! पुरंदरे, शिरोडकर अशा एखाद्या नामांकित डॉक्टराकडे जा आपण ! '

' कशाला ? ' ती म्हणाली.

' पहिली वेळ आहे. खबरदारी घेतलेली बरी, '

' काही नकोत महागडे डॉक्टर. '

' तर मग कुठल्या इस्पितळात जाणार तू ? '

' जाईन प्रभादेवीवरच्या दवाखान्यात '

' छि ! '

' का ? '

' ते सार्वजनिक इस्पितळ '

' म्हणून काय झालं. माझ्या बहिणी तिथंच बाळंत झाल्या. दृष्ट लागेल अशी मुलं आहेत त्यांना. '

माझे शहाणपण अडमडले. बायको आपल्यापेक्षा अधिक शहाणी आहे या जाणिवेचा पगडा लग्नाआधीपासून माझ्या मनावर होता. तशात तिने तिच्या माहेरच्या माणसांचा अनुभव माझ्यापुढे फेकला. मी निरुत्तर झालो. नाही म्हटले तरी आरोलकरांनी केलेले भविष्य आणि बाबांच्या पुढ्यात फुटलेला नासका नारळ, मला भय दाखवीत होताच. मी उगीचच म्हणालो, ' बेन, पोर्तुगीज चर्चजवळ एक डॉक्टर दांपत्य आहे. '

' कोण ? '

' डॉ. सेन आणि डॉ. मिसेस सेन. '

' मग ? '

' फार प्रसिद्ध आहेत ते. त्यांना दाखव तुझी प्रकृती नुसती. बाळंत-पणासाठी जा हवी तर प्रभादेवी इस्पितळात. '

कशी कोण जाणे, ती कबूल झाली. तिने आपली प्रकृती, डॉ. सौ. लीला सेन यांना दाखविली. त्या बाईंनी तिला मनःपूर्वक तपासली आणि काळजीने

भारावलेल्या सादात मला सांगितले, ' मि. चितळकर, तुमचे मूल फार हेवी आहे. त्याचे डोके मोठे आहे. कदाचित सीझेरिअन ऑपरेशन करून त्याला या जगात आणावे लागेल. घाबरू नका. त्यांना आतापासून आमच्या कडे ठेवा. मी घाबरलो. नुसत्याच होकारार्थी माना डोलवीत आम्ही त्या डॉक्टरांचा निरोप घेतला.

बेनला मी परोपरीने सांगितले की, ' बेन, तू सेन यांच्या इस्पितळात जा. ' बेन हुषार, बुद्धिमान, कर्तृत्वशालिनी. ती हसली आणि म्हणाली, ' अहो, इतके घाबरता काय ? हे डॉक्टर लोक पैसे-काढू असतात. एवढ्याचे एवढे करून सांगतात ! '

' असं कसं ? ' मी चाचरत बोललो, ' डॉक्टरांचे शास्त्र डॉक्टरांना अधिक कळत असले पाहिजे. '

' डॉक्टरांना कळते पैसे कसे काढावेत ते ' बेन म्हणाली. मी गप्प झालो.

पोटात कळा घातल्या तशी बेन तिच्या माहेरच्यांना परिचित असलेल्या प्रभादेवी इस्पितळात निघून गेली. मी आपल्या कामाला गेलो. बेन इस्पितळात गेली ती वेळ संध्याकाळची होती. रात्रभर तिला असह्य त्रास झाला. वेदनांची परमावधी झाली. अपरात्री त्या इस्पितळात कोणीही डॉक्टर नव्हता. तिचे काय हाल झाले आणि तिथल्या अनुभवी सेविकांनी काय उपाय केले मला काहीच माहीत झाले नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडे दहाच्या सुमारास मी भगवानच्या ऑफिस-मध्ये बसलो होतो. भगवानचा भाऊ शंकरही होता. अवेळी चहाचे घुटके घेत आम्ही गप्पा टप्पा करीत होतो. भगवान पुनः पुनः म्हणत होता ' अन्ना, अब तुम बाप बनोगे ' मला आतून गुदगुल्या होत होत्या. एक चाल रचली तर रचयित्याला केवढा आनंद होतो ! एका चालीचे जनकत्व केवढा संतोष देते. मग मी तर एका चालत्या बोलत्या मुलाचा पिता होणार होतो. एक नव्या जन्माचाच जनक होणार होतो ! एक अनामिक खुषी मला सुखवीत होती ! एक अनामिक चिंता मला हुरहुर लावीत होती.

एवढ्यात प्रभादेवीकडचा निरोप घेऊन कुणी तरी आले. आलेल्या माणसाने सांगितले, बाई बाळंत झाल्या. '

मी, भगवान आणि शंकर तिघेही घाईने उठलो आणि इस्पितळाकडे गेलो. दादर ते प्रभादेवी या तोकड्या प्रवासात सों गोकुळ माझ्या डोळ्यापुढे येऊन गेले. आपण बाप झालो, या जाणिवेने माझ्या काळजाचा कंद जणू पल्लवित झाला. आम्ही हॉस्पिटलमध्ये आलो. डॉक्टरपुढे आलो. मला बेनला पाहयचे होते. माझ्या अपत्याला पाहयचे होते. कृतकृत्य होऊन पडलेली रात्र, आणि झळाळत वर येऊ पाहणारा सूर्य या दोघांचे दर्शन घ्यायचे होते.

डॉक्टरनी आम्हाला थांबवले. बसायला सांगितले. माझी अधिरता डोळ्यांतून वाट शोधू लागली. मी उगाचच इकडे तिकडे पाहू लागलो.

डॉक्टर म्हणाले, ' मिस्टर चितळकर, मूल फार कष्टाने सोडवावे लागले...

' कुठाय तें ? ' मी अधीरतेने म्हणालो, डॉक्टर उगीचच गप्प झाले. थोड्या वेळाने अगदी थंडपणाने म्हणाले, ' मूल गेले. '

' आणि बेन ? ' मी जवळ जवळ ओरडलोंच.

' त्या ठीक आहेत. '

तशाही अवस्थेत मी एक सुटकेचा निःश्वास सोडला. उठून उभा राहिलो आणि म्हणालो, ' ते माझे मूल दाखवा तरी मला...? '

' जरूर ' डॉक्टर म्हणाले. ते उठले. चालू लागले. मी भगवान आणि शंकर त्यांच्या पाठोपाठ गेलो.

एका टेबलावर, मुलाचा मृत देह शुभ्र कपड्यात गुंडाळून ठेवलेला होता. माझे अपत्य. माझ्या रक्तामासांचा तो पिंड. उपजताच चेतनाहीन झालेला होता. पियानोच्या साऱ्या स्वरांवर एकदम आघात झाल्याने काही अबोध भयानक नाद उत्पन्न व्हावा तसे माझ्या मेंदूत झाले. उमाळ्याच्या जोराने संयमाचे बांध फुटले. मी ओक्साबोक्शी रडू लागलो. हे इस्पितळ आहे, एक सार्वजनिक जागा आहे, याचेही भान मला राहिले नाही. ते बाळ

जिवंत असते तर त्याने जग पाहून जसा टाहो फोडला असता, तसाच टाहो मी फोडला. भगवानने माझ्या पाठीवरून हात फिरवला आणि स्वतःचे डोळे कोरडे केले.

आरोलकरांनी केलेले भविष्य मला आठवले. त्यांची प्रसन्न सावळी मूर्ती भगवानच्या रुपाने माझ्या पाठीवरून हात फिरवू लागली. आणि नानाच्या बिऱ्हाडातला तो गोसावी. त्याने रचलेले ते राखेचे वर्तुळ....त्याचा तळतळाट....साईबाबांच्या पुढ्यात फुटलेला तो नासका नारळ....ते काळवंडलेले खोबरे....मला सारेच असह्य झाले. कुणी तरी माझी तापलेली कानशिले दाबून धरली. आणि माझी मान कोणा एका दिशेकडे वळली. टक्क डोळ्यांनी मी समोर पाहिले. साईबाबांची वृद्ध चित्राकृती माझ्या डोळ्यांना अगदी सुस्पष्ट दिसली. कपाळी चिंधी बांधून साऱ्या जीवमात्राच्या दुःखाचे सुतक पाळणारा तो सत्पुरुष अगदी मंद आवाजात मला म्हणाला ' मेरी तरफ देख, मै तेरी देखूँगा ! ' बस, माझा हुदका थांबला. डोळे कोरडे झाले.

होणारा अनर्थ साईबाबाही टाळू शकले नाहीत. देवावतारांनाही सुखदुः-खाच्या चक्रातून सुटता, सोडविता येत नाही. जे घडणार असते ते घडतेच. श्रद्धेने फक्त एकच गोष्ट प्राप्त होऊ शकते, सहन करण्याची शक्ती.

मग मी रडलो नाही. बेनला भेटलो. तरीही माझे डोळे पाणावले नाहीत. माझ्या स्वतःच्या नवजात अर्भकाचे प्रेत घेऊन मी निर्विकारपणे स्मशानात गेलो. निर्विकारपणेच त्याचे दफन केले. साडेतेरा पौंड वजनाचा तो पूर्ण विकासित देह आईच्या कुशीतून आला आणि भूमातेच्या कुशीत परत निद्राधीन झाला. हे सारे कशासाठी घडले ! कुणाला ठाऊक ? माझ्यासारख्यांना ते कधीच कळणार नाही. साईबाबांना कदाचित कळले असेल, पण कळून तरी उपयोग काय ? कसल्या भावनेने आणि कुठल्या विचाराने मी बोललो कोण जाणे. मी भगवानला म्हणालो, ' भगवान ! अपना पहला पिक्चर फ्लॉप हो गया ! ' तत्वज्ञानाचे तोंडावळे माझ्या डोळ्यापुढून फिरू लागले,

मनाने मान वळवली. ते उगीचच माझे कान पिळू लागले. कातावून ओरडू लागले. ' शहाण्या बायकोचे ऐकलेस आणि पोटचा गोळा मातीत घातलास. ती त्या सेन डॉक्टरांकडे जाती तर, हातांनी मातीत गाडलेस ते मूल तुझा हात धरून चालू लागलेले पाहिले असतेस ! '

तत्वज्ञानाचा चिरंतन स्वर आणि मनाचे बेसूर ओरडणे मला असह्य झाले. मी तसाच निघालो— आणि पोचलो तो स्टुडिओत.

आत पोंचताच कुणी एक परिचित स्वर मला अत्यानंदाने म्हणाला, ' कमाल झाली. '

' कसली ! ' मी विचारलं.

' कसली काय राव ? '

बोलणारा माणूस माझ्या ओळखीचा होता, पण त्यावेळी तरी मला त्याचे नाव आठवेना. त्याने माझा हात पकडला. ऊबदार हस्तांदोलन करीत तो उत्साहाने म्हणाला, ' भक्तराज ' हे तुमचे पहिले चित्र. पहिल्याच चित्राने रौप्यमहोत्सव साजरा केला. आणखी काय पाहिजे.... ' गो अहेड्, गो अहेड् ! '

मला नमस्कार करून तो माणूस घाईने निघून गेला तरीही मला तो कोण होता ते कळले नाही.

तो गेला आणि मग मलाही भावले की, केवढ्या विरोधी घटना एक-समयावच्छेदेकरून घडल्या. मी संगीत दिलेल्या पहिल्या चित्राने रौप्यमहोत्सव साजरा केला होता आणि मी जन्माला घातलेले पहिले मूल उपजताच मातीत गाडले होते. ईश्वराला लीलानाटक्या म्हणतात, ते किती खरे, किती सत्य ! योगायोगाने माझ्या त्या प्रथम चित्राचे नावही ' भक्तराज ' होते. त्यांतल्या साऱ्या गीतांची सुरावट हेच सांगत होती, ' ईश्वरी सत्ता अगाध आहे, त्याचा खेळ कुणालाच कळलेला नाही. '

घडले ते घडून गेले. मी परत कामाला लागलो. डॉक्टरनी सांगितले होते, ' पत्नीपासून दूर रहा. वर्ष दोन वर्षं तरी संयम पाळा ! ' मी तर उपभोगाला

चटावलेला माणूस. विवाहित ब्रह्मचर्य ही माझ्या लेखी अशक्य गोष्ट. नाइलाजच झाला म्हणून मी माझे मन संगीत-रचनेवर एकाग्र केले. त्या काळात बेन आणि मी यांच्यांत एक सक्तीचा दुरावा आपोआपच उत्पन्न होत राहिला. माझे पिणे वाढले. सूर आणि सुरा यांच्यांतच मी बुडून गेलो.

जयंत देसाई प्रॉडक्शनची चित्रे तयार होत राहिली. त्या प्रत्येक चित्राचे संगीत लोकप्रिय झाले. ज़बान, मनोरमा, ललकार, चंद्रगुप्त या साऱ्याच चित्रांनी जयंत देसायांना ' लाभ ' मिळवून दिला. माझा अहंकार जागा झाला. आपल्याला आता मेहनताना अधिक मिळाला पाहिजे असे मला प्रकर्षाने वाटू लागले. एवढ्यात कुठून तरी एक कुणकूण माझ्या कानी आली. नव्या चित्राचा नायक म्हणून एकमेव अद्वितीय गायक नट कुंदनलाल सैगल हे देसाईंच्या नव्या चित्रासाठी नायक म्हणून येणार आहेत.

सैगल रसिकांच्या गळ्यातला ताईत होता. कर्णाच्या कवचकुंडलासारखे सोन्याचे स्वर घेऊन तो उपजला होता. त्या स्वर सम्राटासाठी चाली घडविण्याची संधी आपल्याला मिळणार या वार्तेने मी वेडा झालो. त्या वेडाला ताबडतोब एक थप्पड बसली. स्टुडिओतल्या एका जबाबदार व्यक्तीने मला सांगितले. या चित्राच्या संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी लाल महंमदच्या नावच्या कोणा नव्या दिग्दर्शकावर सोपविण्यात येणार आहे.

' कोण हा लाल महंमद ? ' माझा अहंकार ओरडला.

' लाल महंमद ? गुलाम हैदर या महान यशस्वी संगीत दिग्दर्शकाचा शिष्य ! ' चौकशीने उत्तर दिले. कुणीही असेल. मी पाच चित्रे यशस्वी केली, मीही कुणी तरी आहेच की !

माझ्या अहंकाराला उधाण आले आणि त्याच तिरिमिरीत मी जयंत देसायांच्या ऑफिसामध्ये शिरलो. मला डाचत होते फटकन बोलून गेलो—

' माझा पगार वाढला पाहिजे. '

' किती ? ' मालकांनी विचारले.

' एक हजार ' मी माझ्या दृष्टीने मोठा आकडा सांगितला.

'कठीण आहे.'

'का?'

'मी कामगारांचे पगार त्यांच्या इच्छेने वाढवीत नाही. माझ्या मनात येईल तेव्हा वाढवितो.'

'माझा वाढवावा असे नाही वाटत?'

'वाटते तर!'

'मग?'

'तीनशेचे पाचशे करीन.... फार तर सहाशे-'

'मला हजार पाहिजे.'

'शक्य नाही.'

'का?'

'मी तुम्हांला एक महान संधी देणार होतो.'

'कसली?'

'सैगलच्या चित्राला संगीत देण्याची. ध्यानात ठेवा, सैगल हा सैगल आहे.'

देसायांचे म्हणणे खरे होते. सैगलच्या सुवर्णसादाने माझ्या चाली फार मूल्यवान ठरणार होत्या. पण मला कलावंताच्या अहंकाराने पुरते पछाडले होते.

मी वेड्यासारखा बडबडलो, 'सैगल, सैगल आहे, तर मीही सी. रामचंद्र आहे!' देसाई हसले, हसत हसतच म्हणाले 'तुमचे म्हणणे काय?'

'हजार रुपये महिना द्या, नाही तर—'

'नाही तर काय?'

'नाही तर मला मोकळे करा.'

जयंत देसायांनी एक पळाचाही वेळ मध्ये जाऊ दिला नाही. त्यांनी चटकन सांगितले, 'जाणार म्हणता तर जा.'

मी गप्प बसलो. मग त्यांनीच विचारलं, 'कधी जाता? आजच की

उद्या?'

आता संभाषण वाढविण्यात काहीच शहाणपणा नव्हता. माघार घेण्यातही नाचक्की होती. लालमहंमदाच्या आगमनाच्या नौबती माझ्या कानीही आल्या होत्या.

'जयंत देसाई प्रॉडक्शन' या संस्थेचा मी राजीनामा दिला. पुनः बेकार झालो. बेनला माझे हे करणे मुळीच आवडले नाही. तिचे चातुर्य मला पुनः पुनः बजावू लागले, 'संसार मांडल्यावर, असला आत्मघातकी अहंकार सोडून द्यावा लागतो.' तिचे बोलणे मी ऐकून घेत होतो, पण मनातून मला तिचा राग येत होता. लग्नापूर्वी माझे प्रेम हे तिचे सर्वस्व होते. माझ्या पलीकडले जग तिला दिसत नव्हते. लग्नानंतर, केवळ पायाखाली असलेली जागाच तिला स्वर्गासारखी वाटत होती. आता तिच्या स्वभावातले काव्य सरले होते. व्यवहार या गद्य वस्तूच्या आहारी जाण्याइतकी ती सामान्य झाली होती. तिच्या शहाणपणामुळे माझे प्रथमापत्य गेले होते. तिचे बोलणे प्रमाण मानण्याच्या मनःस्थितीतून मीही बाहेर आलो होतो.

तशी बेनची काही चूक नव्हती. तिचे म्हणणे बरोबर होते. संसार काही प्रेमाच्या भांडवलावर चालत नाहीत. संसार चालण्यासाठी पैसाच लागतो. तिच्या शहाणपणाने मूल हरवले, हा माझा विचारही वेडेपणाचा होता. मी त्या मुलाचा बाप होतो तर ती त्याची प्रत्यक्ष जन्मदात्री होती. ते मूल जावे असे स्वप्नातल्या स्वप्नात तरी वाटणे कधी शक्य होते का तिला?...मी तिरसटलो होतो. त्रासलो होतो, हेच खरे.

आता पुढे काय, याचा विचार माझ्याही मस्तकात होता. मार्ग दिसत नव्हता. घरी बसवत नव्हते, म्हणून मी भगवानचे ऑफिस धरले होते.

एका दुपारी सुप्रसिद्ध हिंदी कवी प्रदीपजी आपणहून भगवानच्या ऑफिसात आले. माझी आणि त्यांची ओळख जयंत देसाई कंपनीत असतानाच झाली होती. आता त्यांनी अलोट कीर्ती कमावली होती. बॉम्बे टॉकीज साठी त्यांनी लिहिलेली गीते साऱ्या हिंदुस्थानभर लोकप्रिय झालेली होती.

ते आले ते माझी चौकशी करीत. मी पुढे झालो. नमस्कार, कुशल प्रश्न होतात तोच ते एकदम म्हणाले,

'अण्णाजी, चलो.'

'कहाँ ?'

'फिल्मिस्तानमें'

फिल्मिस्तान ही संस्था नव्यानेच सुरू झाली होती. हिमांशू रॉय यांच्या तालमीत तयार झालेले शशीधर मुखर्जी हे सुविद्य गृहस्थ त्या संस्थेचे कर्णधार होते. यशस्वी चित्रे काढण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्याविषयी मी खूप ऐकलेले होते. ते फार चिकित्साखोर आहेत. कलाकारांना आंगठ्याखाली ठेवतात, आपणाला हवे तेच ते करवून घेतात, असे अनेक प्रवाद त्यांच्याविषयी प्रचलित होते. त्यांच्याशी काम करण्यासाठी सर्वच कलाकार अधीर असतात हेही तितकेच सत्य होते. मला त्यांच्याकडे काम मिळाले तर हवे होते. पण माझ्या अहंकाराची कडा मात्र अजून नमलेली नव्हती. फिल्मिस्तानकडून आलेल्या प्रदीपजींना म्हणूनच मी विचारले,

'तनखाह क्या मिलेगी फिल्मिस्तानमें'

'तुम चाहो सो' प्रदीपजी म्हणाले.

'एक हजार महावार' माझ्या अहंकाराच्या कडेवर तोच एक आकडा उमटलेला होता.'

'ठीक है. माना !' प्रदीपजी हसत म्हणाले. मग मात्र माझे बोलणेच खुंटले. संधी आपणहून आलेली होती. ती नाकारण्यात कसलाच शहाणपणा नव्हता. प्रदीपजीबरोबर मी फिल्मिस्तानमध्ये गेलो. श्री. शशीधर मुखर्जी यांना भेटलो. मी पगाराचा अपेक्षित आकडा सांगितला आणि त्यांनी 'हो' म्हटले. करार झाला, आणि फिल्मिस्तान या संस्थेचा संगीत-दिग्दर्शक झालो.

♠ ♠

१०

दरमहा हजार रुपये पगार मिळविण्याची माझी महत्त्वाकांक्षा एकदाची पुरी झाली खरी, पण 'फिल्मिस्तान'शी आपले कसे काय जमते, ही धागधुग मात्र मनात होती. 'फिल्मिस्तान'चे प्रमुख श्री. शशीधर मुखर्जी यांच्याविषयी मी पुष्कळच ऐकलेले होते. आता त्यांच्याशी काम करण्याचा प्रसंग आला. मुखर्जी माणूस दिसायला मोठा रुबाबदार. गोरासा. आपल्या समोरचा माणूस आपला सेवकच आहे. याची जाण ठेवूनच शब्द फेकणारा. हा पदवीधर चित्रपट व्यवसायांतले एक बडे प्रस्थ. त्याच्या अवतीभोवती थुंकीझेल्या लोकांची गर्दी. 'मुखर्जी साहब' हे नाव उच्चारताना देखील ते अशा थाटाने उच्चारीत की, ऐकणाराला वाटावे. हा मुखर्जी म्हणजे कुणी 'अभूतपूर्व' असामी आहे.

मुखर्जींच्या मागे यशाचे वलय होते. बॉम्बे टॉकीजसारख्या प्रथितयश संस्थेची परंपरा होती. हिमांशू रॉयसारख्या कर्त्या माणसाच्या मार्गदर्शनाचा प्रदीर्घ लाभ त्यांच्या गाठीशी होता. कंगन, बंधन. संसार, किस्मत

ही मुखर्जी महाशयांची त्र्यक्षरी नामाभिधानाची चित्रे, 'यशस्वी' हा त्र्यक्षरी किताब अजूनही मिरवीत होती.

मला स्वतःला मुखर्जी हे गृहस्थ काही असामान्य प्रतिभेचे वाटले नाहीत. ते फार चतुर, यात मात्र शंका नाही. चित्रपटसृष्टीचा सारा डोलारा कथांच्या पायावर उभा असतो. त्वरित द्रव्यलाभाला लालचावलेल्या चित्रपटसृष्टीतील महाभागांना या सत्याचे भान राहत नाही. कथेच्या भुसभुशीत पायावर ते तंत्राचा नसता बडिवार उभा करतात आणि हमखास अपेशी ठरतात. मुखर्जी या बाबतीत फार जागरूक होते. कवी प्रदीप, प्यारेलाल संतोषी, नेपाली शाहीद लतीफ, सादत हसन मंटो यांच्यांसारखे विख्यात साहित्यकार त्यांनी आपल्या संस्थेत मुद्दाम ठेवून घेतलेले होते. रवींद्र, शरच्चंद्र तळपून गेले त्या वंगीय अवकाशाखालीच मुखर्जींचे बाल्य वर्धमान झालेले होते. साहित्यिकांचा सल्ला घेण्याची सुबुद्धी त्यांच्या ठायी होती. पण केवळ कलेचीच कास धरून व्यवहाराकडे डोळेझाक करण्याचा त्यांचा शिरस्ता नव्हता. 'लोकांना काय पाहिजे' ते जाणण्याचा त्यांना छंद होता आणि म्हणूनच ते यशस्वी होते. त्यांची संस्था यशस्वी होती. त्या संस्थेशी संबंध येणे मानाचे होते.

फिल्मिस्तानचा संगीत दिग्दर्शक झाल्याने माझी सांपत्तिक स्थिती चांगली झाली. नियमित काम करावे, नियमित खावे, प्यावे असा नित्यक्रम सुरू झाला. पहिलेच मूल गेल्याने थोडी विमनस्कता आली होती. मनासारखे काम मिळाल्याच्या आनंदात ती हळूहळू मावळू लागली. जीवनाच्या गळ्यातून उफाळणारा वारा स्वर म्हणून ओळखला जावा इतपत मधुरता घेऊ लागला.

फिल्मिस्तानचे 'सफर' नावाचे चित्र मी करीत होतो. चाली खरोखरच फर्डा उपजत होत्या. माझा मीच खूष होतो. सहसा कशाला बरे न म्हणणारे मुखर्जीही मान डोलावीत होते. माझ्या जीवनगीताने रिखभ बरोबर लावण्याइतकी प्रगती निश्चितपणेच केली होती. हिरवळ भराला येते तेव्हाच फुलेही

उमलू लागतात. विसंगतीला वेडावलेला निसर्ग, मुळात सुसंवादप्रियच असतो. सफर निमित्ताने माझे प्रायोगिक स्वरसंधान चालू होते, तेव्हाच नेमकी मला एक आनंदवार्ता समजली. सुकलेली वेल पुन्हा पालवली होती. तिने परत कळी धरली होती. बेनला परत दिवस गेले होते.

खोटे बोलणे मला जमत नाही. मला मूल हवे होते. घर असून घराला पारखे झालेले माझे तारुण्य अपत्यसुखासाठी आसावलेले होते. आई आणि भावंडे माझ्यापासून मनानेच दूर झाली होती. मूळ भूमीपासून दूर फेकलेल्या एखाद्या बेटासारखे माझे आयुष्य एकलकोंडे होते. ते पण पुन्या बहाराला यावे अशी माझी मनीषा होती. पहिल्या अपत्याच्या उपजत मृत्यूने मी दुखावलो होतो. त्या अंत्यज बैराग्याचा शाप आपल्या जन्माला चिकटून बसला आहे असे मला वाटत होते. आरोलकरांचे भाकित आणि श्रीसाईनाथापुढचे नासके श्रीफळ माझ्या मेंदूत ओरखाडे उठवून गेले होते !

जो दिवसाला जन्म देतो तोच रात्रही उत्पन्न करतो. त्या रात्रीच्या सर्वांगावर तिचे आस्तित्वच नामशेष करून टाकणारा प्रकाशझोतही तोच फेकतो. कुणालाही न दिसलेला अनंतहस्त कारागीर काय करीत नाही ?

त्यावेळेला मात्र नवऱ्यासारखा गुरकावणीचा सूर काढून मी बेनला बजावले, 'आता तुझे ते माहेरचे इस्पितळ नको. डॉ. शिरोडकरांकडेच जा.'

बेन बिचारी 'हो' म्हणाली.

सातव्या महिन्यात तिला एकाएकी रक्तस्राव होऊ लागला. आरोलकरांच्या भाकिताने पुनः फडा काढला. त्या संतप्त बैराग्याचे शब्द परत विषारी फूत्कार करू लागले. माणसाच्या अज्ञानाची जाणीव क्षणोक्षणी देणारे विज्ञानच अज्ञानी माणूस आधार म्हणून उपयोगात आणतो. अथांग समुद्रात आसरा सापडल्यावर कासवाची पाठच पृथ्वीसारखी वाटते.

आम्ही डॉ. शिरोडकरांकडे गेलो. त्यांनी खूप दिलासा दिला. अकारण हळवे झालेले मन, आशेची खिडकी सदैव उघडी ठेवून दूरवर पाहू लागले. डॉक्टरांचे उपचार चालू राहिले. माझा व्यवसाय चालू राहिला.

बेन इस्पितळात गेली आणि नर्व्हसनेसमुळे मेट्रो सिनेमात एक इंग्रजी चित्र पाहण्यासाठी गेलो. प्रसूतिगृहातली प्रतीक्षा मला झेपली नसती. सोसली नसती.

मी चित्रपट पाहत होतो. पाहत होतो कसला? पाहण्याचे नाटक करीत होतो. ते साधत नव्हते. मुळीच साधत नव्हते. मध्यंतराच्या सुमाराला काका प्रधान आले.

मी विचारले, ' खबर बोलो– '

काका म्हणाले, ' घाबरण्यासारखे काही नाही ! '

' म्हणजे ? ' मी विचारले.

' त्रास होतो आहे. '

' मग ? '

' डॉक्टर म्हणत होते– '

' काय ? '

' दोन्हींतलं एक लाभेल. पत्नी तरी किंवा मूल तरी– '

माझ्या मेंदूत कुठे ' खट्ट ' आवाज झाला. सारे दिवे विझून गेले. प्रकाशाची रखरख राहिलीच नाही. डोळ्यांना शीतलता आली. गात्रे आळसावल्या-सारखी झाली. मनाचा ताणच ओसरला.

' बेन वाचली पाहिजे ' एवढेच मी म्हणालो. इस्पितळाकडे मुळीच गेलो नाही. घरी गेलो, नेहमीसारखा भरपूर प्यायलो, जेवलो. अंथरुणावर अंग टाकले. गाढ झोप लागली. सकाळी जागा झालो, तेव्हा वातावरण कसे शांत वाटले. मुंबई शहरातली नित्याची गडबडदेखील मनाला भासली नाही. ही कसली वृत्ती होती कोण जाणे ? मनात सुख नव्हते, दुःख नव्हते–विचार नव्हता– वैफल्य नव्हते– निराशा नव्हती– आशाही नव्हती.

सकाळ झाल्यावर शांतपणे इस्पितळात गेलो. तिथे कळले. शस्त्रक्रिया करावी लागली. बेन वाचली. अपत्य तीन तासांनंतर गेले.

' मुलगी होती. ' एका नर्सने न विचारताच सांगितले.

' असं ? कुठं आहे ? ' हे मी का विचारले कोण जाणे. ती नर्स म्हणाली, ' या– ' मी तिच्या पाठोपाठ गेलो. बेनच्या नात्यातली काही माणसे पण सांगाती होती. नर्सने त्या नवजाताचे कलेवर दाखविले. आवरण दूर करून त्याचे समग्र दर्शन व्हावे अशा बेताने दाखविले.

माझ्या गळ्यात हुंदका आला नाही की डोळ्यांत पाणी दाटले नाही. अगदी नेहमीसारखा मी बेनच्या अंथरुणाशी गेलो. बोललो काहीच नाही. तिच्या मस्तकावर अगदी कोरडेपणानेच थोपटले आणि बाहेर पडलो. थेट स्टुडिओत गेलो. संध्याकाळी गाण्याचा टेक होता. सहकारी वादकांची कल्पना होती की, मी आज येणार नाही. मी आलो आणि कामाला लागलो. गायिका मला वाटते– शमशाद बेगम होती. गाणे आर्त भावनेचंच होतं. नेहमीसारखा त्यांना निरोप दिला. जणू काहीच घडले नव्हते.

परत भेटलो तेव्हा डॉक्टर म्हणाले, " मि. चितळकर, आता तीन-चार वर्षे तरी तुम्हाला सावधगिरीने वागले पाहिजे. "

' म्हणजे डॉक्टर ? '

' पत्नीपासून दूर राहिले पाहिजे. '

' तीन-चार वर्षे ? ' ती आणि चा यांच्यामधील ईकार आकार लांबवीत मी विचारले. डॉक्टरांनी निश्चितार्थी मान डोलावली.

मी पत्नीपासून दूर राहिलो. राहणे भाग होते म्हणून राहिलो. मी आस्तिक असलो तरी विरक्त नाही. जीवनातले सारे आनंद मला हवेहवेसे वाटतात. पुण्याचे मला आकर्षण आहे, पण पाप टाळण्याइतके सामर्थ्य माझ्याजवळ नाही. पत्नीच्या दुखण्याने मी आणखी काही जवळ केले. माझे मद्याचे व्यसन काठोकाठ भरून फेसाळू लागले. मी मीलनानंदाचे सुख काचेच्या ओठातून मिळविण्याचा प्रयत्न करू लागलो. या अनैसर्गिक आटा-पिट्यातच कुठेतरी सांधलेला ताल परत हुकला. जीवनगीत सुटू लागले. वाहत राहिले. त्याला प्रवाह होता, पण वाट नव्हती. त्याला अनेक वळणे पडली. मी आणि माझी प्रेमविवाहिता पत्नी यांच्यामध्ये एक अनामिक दरी

आकारू लागली. मला ते जाणवले नाही. तिला निश्चित जाणवले असेल; कारण ती चतुर आहे, शहाणी आहे. माझ्यापेक्षा तिला समज अधिक आहे !

मैं मयकदे की राहसे होकर गुज़र पड़ा
वरना सफ़र हयातका कितना दराज़ था ।

मद्याच्या बेहोशीमुळे आयुष्याची कंटाळवाणी सफर जाणवेनाशी झाली. याच वेळी फिल्मिस्तानच्या सफर नावाच्या चित्राचे संगीत फार लोकप्रिय झाले. चित्राने तर रौप्यमहोत्सव साजरा केला.

कभी याद कर के
गली पार कर के
चली आना, हमारे आंगना.

हे गाणे तर बघता बघता सर्वतोमुखी झाले. ती चाल माझी होती आणि विशेष म्हणजे, ते गायलेही होते मी स्वतः !

छोटी सेठानजी,
तेरे फ़िराक़ में, हम तो हो गये बदनाम

या दुसऱ्या एका गाण्यानेही लोकप्रियतेची सीमा गाठली. या गाण्याची चाल करताना, मी मराठी पवाड्याला जोडतात, तसली सवाई गाण्याच्या ध्रुपदाला जोडली होती ' जी जी जी जी ' हे पारंपरिक शब्द त्या ठिकाणी योजले नव्हते. त्या शब्दाच्या वजनाचे स्वर वाद्य-मेळातून दिले होते इतकेच. हिंदी चाली करणारे मराठी दिग्दर्शक शेवटी मराठीच्याच वळणावर जातात अशी हिंदी निर्मात्यांची आवडती तक्रार आहे. मी जाणीवपूर्वक, मराठी बाज हिंदीवर कलम केला आणि भारतभरची जनता ते गीत आपल्या तोंडी घोळवू लागली. मराठीची लकब मी हिंदी हाटात विकली, आणि ती पंजाबी ढंगापेक्षा कैक पटीने अधिक टिकली. हे मी अभिमानाने लिहीत नाही. सुरावटीच्या साम्राज्याला खरोखरच सीमा नसतात. संगीत ही साऱ्या विश्वाची भाषा आहे. भाषावार प्रांतरचनेप्रमाणे संगीत वैशिष्ट्यांवर प्रांतरचना करायचे भारताने ठरवले असते तर सारा भारत एक प्रांत झाला असता.

जगातले अन्य देश भारतापासून वेगळे आहेत असा एक विलक्षण प्रश्न उत्पन्न झाला असता. भारताच्या प्रांताप्रांतांतले लोकसंगीत कुणी ऐकले तर संगीताच्या एकजिनसीपणाचा साक्षात्कार त्याला अचूक होईल. महाराष्ट्रातील धनगरी ओव्याची टोके पंजाबी लोकगीतात सहज मिसळतात. पहाडातल्या लोकगीतांत सहज मिसळतात. पहाडातल्या गाण्यांच्या लकेरी महाराष्ट्रीय शेतकऱ्याच्या भलरीशी येऊन भिडतात.

मी म्हटलेच आहे की, माझ्या जीवनगीताला रिखभ मात्र सापडला. पुढचे गाणे पुढेच होते.

फिल्मिस्तानचे ' शहनाई ' नावाचे चित्र काढायचे ठरविले आणि माझ्या कानी एक विचित्र वार्ता आली. ती शहनाई माझ्या ओठी येणार नव्हती. तिच्या चंदेरी कळांवर माझी बोटे फिरणार नव्हती. गुलाम हैदर नावाचा विख्यात संगीत-दिग्दर्शक त्या संगीत सोहळ्यासाठी निमंत्रित केला गेला होता. गुलाम हैदर भारतविख्यात होता. माझ्या ग्रंथाचे प्रथम पान उघडले गेले होते, तरीही ती वार्ता मला अपमानकारक वाटली. अडवणूक करणारी वाटली. रंगलेली मैफल टाकून उठणे माझ्या साधनेला परवडण्यासारखे नव्हते. मी बोललो नाहीच. अस्वस्थ मनाने गुलाम हैदरची वाट पाहू लागलो. संतोषीची शहनाई माझ्याच हाती यावी, असा मनाने हट्ट घेतला.

गुलाम हैदर लाहोरला होते. त्यांच्या आगमनाच्या पताका फडकत राहिल्या. उन्हा-पावसाने त्यांचे रंग फिके झाले. ते काही येईनात. संस्थेच्या मुख्यांनी मला बोलावले. मी रावबहादूर चुनीलाल यांच्या चेंबरमध्ये दाखल झालो. बातचीत झाली.

' पिक्चर जल्दी शुरू करनी है. गुलाम हैदर आये नहीं. '

' तो ? '

' आप ऐसा कीजिये– '

' फर्माइये. '

' एक गाने की तर्ज फिल्हाल बनाइये... बाद में वे करेंगे....

'ऐसा नहीं हो सकता' मी निश्चयाने म्हणालो, 'अगर करनी है तो पूरी पिक्चर मैं करूंगा–'

मी फिल्मिस्तानचा नोकर आहे. सांगतील ते काम केले पाहिजे, हे सारे मला माहीत होते. तरीही मी दणकावून सांगितले, 'वक्त आया तो नौकरी छोड दूंगा. लेकिन ऐसा एखाद गाना नही करूँगा.'

चुनीलाल गप्प झाले. मुखर्जींनी सल्ला दिला की संतोषीने भर घातली, काय झाले कुणाला ठाऊक. शहनाई नेमकी माझ्या हाती आली. हरवलेले गवसले. मी जिद्दीने कामाला लागलो. काही तरी नवे करण्याची मनोमन प्रतिज्ञा केली. इंग्रजी गीते आम-जनता घोळवते. लोकप्रिय गीताची लय सुरू झाली की, पाश्चिमात्यांच्या झुंडीच्या झुंडी ते गाऊ लागतात. सामान्यालादेखील संगीतात सहभागी होता येते. हिंदुस्थानात तसे का होऊ नये ? संगीत ही केवळ महालवाल्यांची मिरास का ? मोहल्यासाठी संगीत का निर्माण होऊ नये ? मीरा-सूरदासांच्या रचना आणि खानदानी गवय्यांची तानबाजी यांचा संगीताला अडसर का ? गाणे हा आतल्या आनंदाचा अनलंकृत आविष्कार आहे. जनसामान्यांना उचलावेसे वाटेल असे संगीत देण्याचे सामर्थ्य चित्रपट या माध्यमात आहे.

'सामान्यासाठी संगीत' या माझ्याच कल्पनेमागे मी वाट चालू लागलो. संतोषी माझा हमराही झाला. लवचीक लोकगीते लिहिण्यात त्याचा हातखंडा, हिंदीतल्या ग्रामबोलींचा त्याला उत्कृष्ट परिचय. आम्ही हातमिळवणी केली आणि एक विचित्र गाणे जन्माला आले.

मुखर्जींनी हिरवा दिवा दाखविल्याशिवाय फिल्मिस्तानातल्या कुठल्याच गाडीला गती घेता यायची नाही. आमचे गाणे मुखर्जींना आवडेल असे वाटेना. आम्ही दोघांनी मग ते ध्वनिमुद्रित करवून घेतले. उगाचच ते आल्या-गेल्यांना ऐकवण्याचा सपाटा सुरू ठेवला. या गाण्यातल्या स्वरांची गुंफण थोडी पश्चिमी जातीची होती. काही इंग्रजी शब्दही संतोषीने ठोकून दिले होते. गाण्याचा तोंडवळा हिंदुस्थानातल्या किरिस्तॉव पोरीसारखा झाला होता.

पण चालीचा ठसका कुणीही ताल धरावा असाच होता. हे गाणे अनेकांनी ऐकले. त्यांच्या तोंडी बसले. स्टुडिओतले लोकच ते गुणगुणू लागले. तसे मुखर्जी महाशय जागे झाले. त्यांनी आळसटल्या आवाजात विचारले, 'यह कहाँका गाना है ?'

'अपने पिक्चरोंका' कुणी तरी सांगितले.

'कौनसे ?'

'शहनाई.'

मग एकदा मुखर्जीसाहेब म्हणाले, "अरे भाई, बहुत सुना तुम्हारे गानेके बारेमें. हमें भी तो सुनाओ...."

मुखर्जींने गाणे ऐकले.

'आना मेरी जान, संडे के संडे.'

लोकप्रियतेच्या नाडीवर हात ठेवून बसलेला तो व्यावसायिक माणूस एकदम प्रसन्न झाला नाही. गाणे मात्र पसार झाले.

संतोषी हा माणूस लोकाविलक्षण. त्याच्या कथा-कविता साहित्य परिषदेला आवडोत न आवडोत, जनसामान्यांच्या मनांवर त्या एकदम मोहिनी घालीत; व त्याचे ताल-रागाचे ज्ञानही बरे. त्याच्या– माझ्या सहकारातून शहनाई-सारखाच रंगेल स्वर उमटला. शहनाईतले प्रत्येक गीत तुफान लोकप्रिय झाले.

माझ्या ब्राह्मणी पगडीवर नवा तुरा झळकला.

'संडे के संडे' या गीताने लोकप्रियतेची सरहद्द ओलांडली. सोवळ्या संगीतकारांनी नाके मुरडली. वर्तमानपत्रांनी फाजीलपणाने लिहिले. मला वाटते, मुंबईच्या 'ब्लिट्झ'ने काही तरी चमत्कारिक लिहिले होते. काहीही असो, मला अभूतपूर्व असे व्यावसायिक यश मिळाले. सी. रामचंद्र हे नाव भारतभर गाजले. महिनोन महिने दुमदुमत राहिले. म्हशीच्या पाठीवर पडून उन्हात नदीकडे निघालेला गुराखी पोरदेखील गाऊ लागला, 'आना मेरी जान, संडे के संडे !'

'शहनाईच्या संगीत महोत्सवात'च लता मंगेशकर ही गायिका पहिल्यांदा

माझ्या परिचयाची झाली. मला वाटते, 'जवानीकी रेल चली जाये रे !' या गाण्याच्या समूहात ती आली होती. वसंताच्या वातावरणात सारेच गाणारे पक्षी गातात. जाणत्याच्या कानाला कोकिळेचाच स्वर आकर्षित करतो. त्या स्वराच्या अनुरोधाने तो तिला शोधू लागतो. दिसाव्या अशा जागी ती सहसा बसत नाही. पानांच्या दाट संभाराआड, एखाद्या उपशाखेवर बसून ती आपला स्वर फेकीत असते. नुसत्या स्वरावरून त्या पाखराच्या प्रतिभेचा अंदाज येत नाही. डोळे तिला पाहण्यासाठी फिरतात. पापण्या थकता थकता, एक कृष्ण रंगाचे पाखरू ओझरते गवसते. मन थक्क होऊन जाते. इवलासा पक्षी, पण सारे वन भारून टाकतो. त्याच्या सादाचे चित्र कुणा प्रतिभावंत चित्रकाराने काढले तर सूर्य-चंद्राजवळ त्याला रंगाची उसनवारी करावी लागेल. रेखांचा हळुवारपणा प्रवाह– लहरींजवळ मागावा लागेल.

'या लता मंगेशकर !' मला कुणी तरी सांगितले. नमस्कारांची देवघेव झाली. गाणे ध्वनिमुद्रित होताच, ती कोल्हापुरला निघून गेली. माझ्या लक्षात राहिला तो असीम सुरेल साद. स्वराची चंडोलासारखी भरारी अवकाशातून ऊर्ध्वगतीने जाणारी एक झगझगती रेषा...

स्वर्गवासी दीनानाथांची ही कन्या त्या वेळी कोल्हापुरच्या हंसपरिवारात होती. मा. विनायकांच्या मार्गदर्शनाखाली आपली कलाप्रांतातली वाटचाल तिने नुकतीच सुरू केली होती. तिचा–माझा फारसा परिचय तेव्हा झाला नाही.

'जवानीकी रेल चली जाये रे' गाण्याच्या निमित्ताने झालेली ती ओळख. त्या वेळी तरी रेल्वेतल्या ओळखीसारखीच झाली. औपचारिक कोल्हापुरला राहणारी ती मुलगी गाण्यासाठी परत परत मुंबईला येऊ शकेल का ? ती काम करते त्या संस्थेकडून तशी मुभा तिला मिळेल का ? हे प्रश्न मात्र माझ्या मनात येऊन गेले, पण तेही ओझरतेच.

'शहनाई'च्या यशाने मी एकदम मोठा माणूस झालो. रसज्ञांच्या पत्रांचा अक्षरशः पाऊस पडला. चित्रपटसृष्टीत तरी यश आणि लक्ष्मी ही

जुळी भावंडं आहेत. माझा भाव वाढणार याविषयी माझ्या सर्व स्वकीयांना खात्री वाटू लागली. 'सी. रामचंद्र' या नावामुळे मद्रासकडच्या लोकांना माझा फार अभिमान वाटू लागला. मराठी लोकांना मात्र पत्ता नव्हता की, हिंदी चित्रपटसृष्टीत, असले यश मिळवणारा हा संगीतकार पुणतांब्याच्या एका ब्राह्मणाचा पोरगा आहे. नाथांचे पैठण पूजणाऱ्या गोदावरीनेच त्याला बाळपणी न्हाऊ घातला आहे. चवदाशे वर्षे जगलेल्या चांगदेवाच्या परिसरातच याची कला अंकुरली आहे. महाराष्ट्रीय जनतेचे सोडा चित्रपटात वावरणाऱ्या मराठी माणसांनाही माझे कुळगोत्र मराठी वाटत नव्हते. मराठीच्या आडात फार तर चंद्रभागेचे पाणी येईल. रात्री सतलजचे झोत आणि थेम्सचे थेंब कसे येतील ? आणि येऊ देईल कोण ? दिले तरी मराठी सोवळेपणाला ते रुचतील कसे ?

शहनाईच्या यशानंतरची गोष्ट. सुप्रसिद्ध नट– दिग्दर्शक गजानन जागीरदार मला एकदा रस्त्यात भेटले. मी मिनर्व्हात होतो, तेव्हा तेही मिनर्व्हात होते. स्नेह करण्याइतका मी तेव्हा मोठा नव्हतो, ते तेव्हाही कीर्तिमान होते.

माझा चेहरा त्यांना ओळखीचा वाटला. आठवणीला ताण दिल्यावर माझे आडनावही त्यांच्या स्मरणात आले. ते म्हणाले,

'काय चितळकर, कसं काय ?'

'ठीक आहे.' मी म्हणालो.

'काय करता हल्ली ?'

'म्युझिक ! आणखी काय करणार ?'

'करा. करा. काही नवे करा. आपण मराठी माणसं त्याच त्या वर्तुळात फिरत राहतो. तो बघा कुणी मद्रासी संगीत दिग्दर्शक आलाय. सारा व्यवसाय थक्क करून टाकलाय् त्यानं.'

'कोण हो ?'

'सी. रामचंद्र.' जागीरदार गंभीरपणाने म्हणाले.

मी हसलो नाही. मन मात्र कुरबुरले. घाईत असलेले जागीरदार निघून गेले. मी पाहतच राहिलो. छद्मी मन सादावाचून बोलले, ' सख्या आईला कधी कळलं नाही तू काय आहेस ते. मातृभाषेला तरी कसा पत्ता असणार तुझ्या कर्तृत्वाचा....? '

♠ ♠

११

१९४७ सालाचा मध्य असावा. माझ्या जीवनगानातला गांधार असा बेमालूम लागला की, कानांनी पाहू शकणारे रसिक निहायत खूष होऊन गेले. माझ्या नावाचा बोलबाला साऱ्या देशभर झाला. सांपत्तिक स्थितीही कधीच नव्हती इतकी ऊबदार झाली. मग मी एक मोटर विकत घेतली. तशी काही ती कोरी नव्हती, होती सेकंडहँडच. वाच्छा म्हणून फिलिमिस्तानमध्ये एक रेकॉर्डिस्ट होते. त्यांनी ती मोठ्या आनंदाने मला विकली. त्या गाडीसाठी मी एक सारथी पण नेमून टाकला. त्या सारथ्याचा पूर्वज चाणक्याची चाकरी करीत होता की काय न जाणे. त्याच्या अतुल कार्यशक्तीपुढे शरण जाणे मला भागच पडे. त्या मोटारीला त्याने बुद्धिदान केले होते की काय कुणाला ठाऊक? त्या निर्जीव यंत्राने एक पद्धत प्रारंभापासून स्वीकारली. मी बसलो रे बसलो की ती गाडी बंद पडे. ती अशी अचानकपणे थांबली की, माझा हुषार ड्रायव्हर निर्विकार मुद्रेने म्हणे, ' साहब, उतरिये.'

मी खाली उतरे. तो चक्राशीच बसून राही. गाडीच्या नितंबभागाकडे दृष्टिनिर्देश करीत मग तो मला आज्ञा करी, ' जरा धक्का मार दीजिये पीछेसे ! '

' चलेगी ? ' मी पथविस्मृतासारखी विचारणा करी.

' जरूर चलेगी. ' तो निश्चयपूर्वक म्हणे.

मी सर्व बळ एकवटून त्या गाडीला पाठीमागून रेटा मारी. मग तिच्या शरीरातून कसले तरी तडतडल्यासारखे साद उमटत. चक्रधर चाक फिरवल्यासारखे करी आणि गाडी चालू होई. ती गाडी चालू होई, ती फर्लांगभर धावून पुनः अचानकपणे गचकन थांबण्यासाठी.

या काळात मला आणखी एक श्रीमंती वळणाचे व्यसन जडले होते. घोड्यांच्या शर्यतीवर जुगार खेळण्याचे. म्हणून रेसला जाण्यासाठी मी सारा जामानिमा करी. उत्तम उंची कापडाचा सूट, प्रतिबिंब दिसावे असे चकचकीत बूट, काखेत दुर्बीण, पण माझ्या या साऱ्या थाटाला ती खोडील गाडी, चालता चालता गंगा घाटावर पोचवून देई. तिला ढकलता ढकलता मी बेजार होई. शेवटी तिला त्या निर्विकार चक्रधराच्या स्वाधीन करून, मला भाड्याच्या गाडीनेच शर्यत मैदानावर जावे लागे.

सहा–एक महिने ती गाडी माझ्याकडे होती. तेवढ्या अवधीत मी तिच्यातून सहा मैल तरी प्रवास केला की नाही कुणाला ठाऊक ! शेवटी ती गाडी अशाच कोणा नव्याने श्रीमंत झालेल्या माणसाला विकून टाकली. त्या थोर सारथ्याच्या हातीही विडानारळ दिला.

नवी गाडी घेतली. शेव्हरोलेट. ही गाडी घरी आली, तो दिवसही महत्त्वाचा होता. माझ्या ' शहनाई ' या चित्राचा रजत-महोत्सव साजरा होत होता, त्या दिवशी ती आली.

सकाळी, सकाळी मी त्या गाडीत बसलो. (आता ड्रायव्हर चांगला मिळाला होता.) साऱ्या आप्तस्वकीयांच्या घरी गेलो. त्यांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. सायंकाळी स्टुडिओत एक कार्यक्रम योजला गेला होता. मोठी

मेजवानी होणार होती. अभिनंदनपर भाषणे होणार होती. मुळीच न अडणाऱ्या त्या माझ्या स्वतःच्या गाडीतून थोडा लौकरच मी स्टुडिओत गेलो. गेल्याबरोबर वार्ता समजली ती भयंकर; राष्ट्रपित्याचा वध झाला होता. प्रार्थनास्थानीच त्या निष्पाप महापुरुषाला कुणी गोळ्या घालून ठार केले होते ! तो वध करणारा माणूस मराठी असल्याची बोलवा उठली होती. स्वागतासाठी जमलेल्या त्या सर्व हिंदी भाषिकांच्या मेळाव्यात मला उगीचच अवघडल्यासारखे झाले. भाषणाचा कार्यक्रम तर रद्द झालाच. सज्ज असलेले हार माझ्या गळ्यापर्यंत पोचू शकले नाहीत. विरस झाल्यासारखा झाला. मी परत आलो.

मी राहत होतो अस्सल मराठी विभागात. बिचारे परप्रांतीय मित्र मला काही बोलले नाहीत, पण माझ्या भावंडांनी मात्र साऱ्या गल्लीभर एक गटारगंगा सोडून दिली, ' महात्म्याचा वध झालेला असताना हा सिनेमावाला आनंद करीत होता. मेजवान्या झोडत होता. नवीन गाडी पण घेतली ! ! '

स्वकीयांच्या या अकृत्रिम प्रेमाचा हा वर्षाव माझ्यावर घरी, दारी, सर्वत्र होत आलेला आहे.

' शहनाई 'चे यश बाजारात निनादले. नावे सांगताना आठवणच करीत बसावे लागेल इतक्या चित्रपटांची कामे माझ्याकडे आली. पैशाची तर संततधारच सुरू झाली. मद्य, मदालसा, द्यूत या सर्वांनाही ओलांडून पैशाचा ओघ तर माझ्या घरापर्यंत पोचला. थोडी साठवण झाली. घरात पैसे जमले आहेत म्हणून की काय न जाणे मला राहती जागा अपुरी वाटू लागली. मी नवी मोठी जागा मिळविण्यासाठी शोध करू लागलो. एक जागा विकतच मिळत होती. अगदी शिवाजी पार्कच्या किनाऱ्याला खूप मोठी कणखर बांधणीची. एक मजला स्वतःला राहण्यासाठी मोकळी असलेली. मी ती वास्तू विकत घ्यायची असे ठरविले. माझ्या या बेताला पहिला विरोध केला माझ्या पत्नीने, बेनने. ती म्हणाली, ' इमारत विकत घेण्याची काही गरज नाही. '

मी ओरडलो, ‘ का ? ’

‘ त्यापेक्षा पैसेच राहू द्यावेत. ’

‘ कशाला ? ’

‘ उपयोगी पडतील. ’

‘ कुणाच्या ? ’ माझ्या या प्रश्नाने बेन निरुत्तर झाली. रागावलीदेखील असेल. तिच्या रागाला माझ्या कटू उद्‌गारांनी कारण तरी दिले होते. मी निष्कारण संतापलो. चिडीला पेटलो. बेन नको म्हणत आहे, म्हणून हे घर घेतलेच पाहिजे असे माझा हट्टीपणा मला सांगू लागला. त्या इमारतीच्या मालकाशी देण्याघेण्याची बोलणी सुरू झाली आणि बेनचे आणि माझे रोज खटके उडू लागले. कुरबुरीचा स्वर भांडणासारखा वाजू लागला. तिच्या-विषयी एक अडाणी अढी माझ्या मनात आधीच होती. तिची दोन अपत्ये देवाघरी गेली, यात तिचा अपराध काहीच नव्हता, पण माझ्या मनाने मात्र आरोपपत्र तिच्या नावे भरले होते. वैद्यकीय सल्ल्यामुळे तिच्या-माझ्यात एक दुरावा आला होताच. मी एकनिष्ठ राहिलेलो नव्हतो. आयुष्याच्या उर्जित काळात विवाह झाला. शरीरसौख्याला पारखी झालेली माझी वासना वाममार्गाकडे वाहवली होती. मी एक नवी मैत्रीण केली होती. कदाचित बेनच्या मनी स्त्रीसुलभ असूयेनेही मंथरेचा मंत्र पेरला असेल. तिने एक चमत्कारिक सूचना केली. ती म्हणाली, ‘ घर घेताच आहात तर घ्या, पण– ! ’

‘ पण काय ? ’ तिच्याशी बोलणे म्हणजे तिरसटपणे हाच माझा रिवाज झाला होता.

‘ ते तुमच्या नावावर घेऊ नका. ’

‘ मग ? ’ मी संतापून विचारले, ‘ तुझ्या नावावर घेऊ ? ’

बेनने उत्तर दिले नाही, पण तिच्या सूचनेचा आशय मी अचूक जाणला होता. त्या सूचनेत तिचा कसलाच अपस्वार्थ संभवत नव्हता. ती आणि मी इतकाच संसाराचा विस्तार होता. बरे दिवस आल्यापासून मला वाईट चाळे

अधिक सुचत आहेत. यातील अनर्थ त्या चतुर गृहिणीने आगाऊ ओळखला होता. मी आज घर घेईन आणि कसल्या तरी व्यसनापायी उद्या ते विकून टाकीन, असे भय तिला वाटत होते. मी यशाचे उन्मादी मद्य प्यायलो होतो. मी थोडाच नमते घेईन. मी ते घर घेतले, माझ्याच नावावर घेतले. तिला जखमी केली. अकारण दुःखी केली. समाजात मला नवा मान मिळत होता माझ्याविषयी श्रद्धा व्यक्त करणारी शेकडो पत्रे माझ्याकडे नित्यशः येत होती. बाहेरून प्रेमाचा नुसता वर्षाव होत होता. नेमका याच वेळी मी माझ्या अर्धांगीशी भांडत होतो. नवे घर घेतले आणि घरवाली मात्र मी असुखी करून ठेवली. झाले ते झाले. घडणाऱ्या गोष्टी कुणी घडवीत नाही. त्या होत असतात असेच म्हटले पाहिजे.

घराचा प्रत्यक्ष ताबा मिळाला तेव्हा मात्र एक अननुभूत आनंद मी अनुभवला. कुठे पुणतांबे ? कुठे कुबेरनगरी मुंबापुरी. कुठे गोदाकाठचे ते ओबड-धोबड बांधणीचे वडिलोपार्जित घर, आणि कुठे ही ऐसपैस अद्ययावत इमारत ? काय होते आणि काय झाले ? कुठे होतो आणि कुठे पोचलो ? बाळपणा-पासूनचा सारा गतेतिहास आठवला. बेनशी केलेल्या कलहाचाही पश्चात्ताप वाटू लागला. मीपणाचे मद्य उतरल्यासारखे झाले. ‘ ही वास्तू मी माझ्या कमाईने मिळवली ’ ही जाणीव उगीचच नमल्यासारखी झाली. द्वारकामाई मशिदीत, कपाळी चिंधी बांधून बसलेला तो वेडा बैरागी आठवला. त्याच्या तसबिरी-पुढच्या धूपदानातील भावमंगल सुगंध नाकपुड्यांना जाणवला. त्या स्निग्ध धुराने डोळे ओलावले. नव्या वास्तूचे पुनर्नामकरण करण्याची वेळ आली तेव्हा माझे मलाच वाटले, देह त्याची निर्मिती. सांभाळायचा सजवायचा आपण– गुण हे त्याचे देणे, बाजारात विकायचे आपण. ऐश्वर्य त्याचाच प्रसाद. भोगायचा आपण. त्या इमारतीला नाव दिले, ‘ साईप्रसाद ’.

शिरडीला प्रथम गेलो तेव्हाच माझे मन गहिवरून गेले होते. माझ्या-सारख्या अंधळ्या माणसालाही तिथे काही दिसले होते. तेव्हापासून आतापर्यंत मी शिरडीला अनेकदा जाऊन आलो होतो. प्रत्येक वेळी नवा

दिलासा मिळाला होता. आईची माया आटल्यासारखी झाली. पत्नीचे प्रेम ओसरल्यासारखे झाले. साईबाबांचा आधार कधी डगमगला नाही. हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. मी हिंदू ब्राह्मण आहे. हिंदुत्वाचा आणि ब्राह्मण्यत्वाचा वाजवी अभिमान माझ्या ठायी आहे. साईबाबा मुसलमान होते म्हणतात. मला माहीत नाही. देवाला अनेक धर्मीयांनी अनेक नावे दिली आहेत. धर्म माणसांचे असतात. देवाच्या अनंतत्वावर कुठे त्याचे लेप लावणार ? साधूंना कसली जात आणि कसला धर्म ?

'जात न पूछो साधुकी, पूछ लीजिये ग्यान'

असे कबिराने म्हटले आहे. साईबाबांची वचने मी वाचली आहेत. ज्ञान सांगण्याचा अट्टाहास त्यात नाही. मी तर म्हणेन ज्ञान पुसायची तरी काय गरज ?

हरिपण हरिनामे धातुमूर्तीस आले.

मी साईबाबांना सदेह पाहिलेले नाही. त्यांची मूर्ती पाहिली आहे. त्यांचे निवासस्थान पाहिले आहे. मी काही अनुभवले. अंधळ्या दृष्टीने पाहिले. बहिऱ्याच कानांनी काही ऐकले. पांगुळलेल्या चित्ताला एक अदृश्य आधार गवसला. माझी श्रद्धा त्यांच्या ठायी जडली. मी पुण्यवान नाही. कदाचित पापीच असेन. पुण्यवानांना आधार कशाला ? तेच विश्वाचे आधारस्तंभ असतात. साईबाबांना माझ्या श्रद्धेने 'साधू' नाव दिले. श्रद्धेने दिलेल्या नावाने मूर्तीला हरिपण आले.

माझ्यापुरती माझी ही निष्ठा मी जमेल त्या मार्गांनी व्यक्त केली. स्वतःच्या कमाईने खरेदी केलेल्या घरट्यावर 'साईप्रसाद' ही नामाक्षरे जडवून टाकली.

घराला देवाचे नाव दिल्याने घरात शांतता नांदते थोडीच ! मालकीची वास्तू लाभल्याच्या आनंदक्षणी साधूचे स्मरण झाले. स्मरणावर विस्मरणाचे ढीग ओतायला अनेक सहस्रबाहू कारणे उपस्थित होती. लौकिकाचा उन्माद, व्यसनांचे मोह होते. अकारण स्तुती करणारे खुषमस्कऱ्ये होते. उपभोगालाच

सर्वस्व समजणारे मित्र होते. माझा स्वतःचा कमकुवत स्वभाव होता. राग होता, लोभ होता...साईबाबांच्या नावाखाली नांदूनही माझे आणि बेनचे खटके उडायचे, ते थांबले नाहीत. बेन तिच्या परीने ती नवे घर सजवीत होती. आल्या गेल्याचे आतिथ्य हसऱ्या चेहऱ्याने चोखपणे करीत होती. मी चिडचिडा झालो होतो. संत्रस्त झालो होतो. स्वतःची चूक स्वतःला टाळता येत नव्हती. दुसऱ्याने ती दाखविलेली मला आवडत नव्हती.

या सर्वांचा परिणाम असा झाला की, माझे बोलणेच कमी झाले. मी घुम्या बनत चाललो. कवि राजेंद्र, लता मंगेशकर ही स्नेही मंडळी मला पुनः पुन्हा विचारीत 'अन्ना, बात क्या है ?'

मी काय सांगणार कपाळ !

'है कुछ ऐसीही बात, इसलिए चुप हूँ, वरना क्या बात करनी नही आती ?'

हेंही बोलण्या-सांगण्याची सोय नव्हती. मी आतल्या आत धुमसत होतो. मीच माझ्या आतड्यांना पीळ भरीत होतो. माझ्या घुम्या स्वभावाला व्यवसायातले मित्रही कंटाळू लागले. मला टाळू लागले.

या साऱ्या अशुद्ध आणि अवघड कथाविषयात एक भगवान मात्र माझा त्राता होता. तो सारखा माझ्या पाठीशी असे. मी घरी असलो की, तो घरातलाच एक असल्यासारखा वागे. मी परघरी की, तिथले परकेपणाही तो घरच्यासारखे करून टाकी.

काळ ऐन उत्कर्षाचा होता. प्रेमात पडणे या गोष्टीचा छंद माझ्या मनाला पूर्वीपासून होता. प्रेमात मी अनेकदा पडलो. आपणहून उडी घेतली नाही. ओढला गेलो आणि पडलो. आताही तसेच झाले होते. एका मुलीने मला वेड लावले होते. तिचा सतत सहवास ही एक, माझ्या लेखी अत्यावश्यक गोष्ट झाली होती. बेनशी प्रतारणा करावी असे वाटत नव्हते, पण प्रत्यक्षात मात्र प्रतारणाच घडत होती. बेनला ते कळत होते. ती ते सारे दुःख गिळायचा आटोकाट प्रयत्न करीत होती. आपले गृहिणीपद

कटाक्षाने अबाधित राखीत होती. परिस्थिती आणीबाणीची होती. माझ्यात सैलसरपणा येत नव्हता. बेन जाणीवपूर्वक तणाव्याला ढील देत होती तरीही काही लोकाविलक्षण विनोद घडत होते.

एका रात्री मी बेनला म्हणालो, ' बेन, मी जाऊन येतो. '

' कुठं ? ' तिने विचारले.

' ते तुला कशाला हवं ? '

' जेवण तयार आहे. '

' जेवायला जातोय मी. '

' कुठं ? '

' चौपाटीवर. '

' बरोबर कोण आहे ? '

' भगवान, आणखी कोण ? '

' मग तसं सांगायचं आधी. विचारलं म्हणून एवढा संताप कशाला ? '

मी गाडी घेतली. आणि बाहेर पडलो. भगवान वाटच पाहत होता. माझी आणि माझ्या त्या प्रियेची भेट आज ठरलेली होती. भगवान आणि मी तिच्याकडे गेलो. सारी रात्र द्राक्षार्कात बुडाली. भगवान चांदणे अंगावर घेत राहिला. मी चांदणे प्यायलो. तृप्त झालो. त्या रात्रीला शेवटच नसावा असे वाटण्याइतके सुख मी लुटले. सृष्टिक्रमाने पहाटेचा शंख वाजविला आणि त्या साजणीचा निरोप घेणे मला भाग पडले. भगवान घोरत होता. त्याला जागा केला. बरोबर घेतला. त्याच्या बिऱ्हाडी सोडला.

पहाटेचे वारे अंगावर घेत घरी आलो. बेन जागीच होती. रात्रभर झोपच आली नव्हती. तशाही अवस्थेत मला वाईट वाटले. तिच्या माझ्यातील पवित्र नात्याने माझ्या बेहोषीचा कान पिळला. मद्याची धुंदी उतरली नव्हती. उपभोगाचा आनंद मनाला थोडे उंच घेऊन गेलेला होता. बेनने अगदी साध्या स्वरात विचारले,

' कुठं होतात रात्रभर ? '

' खरं सांगूं ? '

' माझी शपथ ! ' बेनने गृहिणी करतात तसला लोभसवाणा अभिनय केला आणि मला खोटे बोलणे साधले नाही. कुणाच्या घरी गेलो होतो ते मी तिला खरे खरे सांगून टाकले. काय केले ते तिने विचारले नाही ! विचारले असते तरी ते न सांगण्याइतकी सावधानता माझ्यात तेव्हाही होती.

सकाळी मी स्नानगृहात गेलो आणि भगवान स्वामी आले.

' नमस्ते बेनजी ' त्याने वहिनीला नमस्कार ठोकला.

' नमस्कार ' बेन बोलली, ' चहा घेणार ? '

' लेंगे. अन्ना कहाँ हैं ? '

' आंघोळ करताहेत. आल्ये हं. '

बेननं ट्रे आणला. चहा ओतला. दूध-साखर मिसळली. तयार पेला माझ्या मित्राच्या हाती दिला. तिच्या मनी डाचत होते ते तिने साहजिकच विचारले—

' काल रात्री कुठं होता जेवणाचा बेत ? '

मी आत टबात पहुडलो होतो. टबातले पाणी कोंबट होते, पण माझे सर्वांग एकाएकी भाजल्यासारखे झाले. बेनने विचारले तर काय सांगावे हे मी भगवानला आधी पढवून ठेवलेले होते. भगवान ते नाटक बरोबर वठविणार होता आणि मी मात्र खरा प्रकार आधीच सांगून टाकलेला होता. भगवानचे उत्तर माझ्या कानी आले.

' कल बहुत मजा आया बेन. सचमुच ! '

' कुठं पण ? '

' चौपाटीवर. चांदणं पडलं होतं छान. मऊ वाळू....'

' आणि जेवण कुठनं मागवलं ? '

' समोरच्या हॉटेलातनं ? '

' कोणत्या ? '

' व्हेनिलीज ' भगवानने ठोकून दिले. बेन काही बोलली नाही. तो

त्या गंमतीदार अंगती-पंगतीचे आणखी वर्णन करीत राहिला. आता माझ्या टबातील पाणी झपाट्याने गोठू लागले. पाणी थंडगार झाले. आणि माझा मेंदूही गोठल्यासारखा झाला.

बेन सैपाकघरात कामाला गेली आणि बऱ्याच वेळाने मी बाहेर आलो. भगवानला बघून मला हसू आले. मी मोठमोठ्याने हसू लागलो.

'अरी, हसता क्यूं है खामखाह ?'

मी बेनला खरा प्रकार आधीच सांगितल्याचे, मी भगवानला सांगितले तेव्हा तो झटक्याने उठला. त्याने कोपरापासून हात जोडले. आणि पाठ फिरवून तो जो पळाला, तो महिनाभर आमच्या घराकडे पुनः फिरकलाच नाही.

व्यवसायाचा व्याप जोरदारपणे विस्तारला होता. तरी फिल्मिस्तानची चाकरी मी सोडीत नव्हतो. विभूती मित्रा परत फिल्मिस्तानमध्ये आला. त्याच्या चित्रासाठी तीन गाण्यांच्या चाली मी बांधल्या. त्या त्याला पसंत पडल्या. चौथीचे आणि त्याचे गोत्र काही जमेना. दिग्दर्शकाने दिग्दर्शन करावे हे ठीक पण याचा अर्थ त्याने माझ्यासारख्यालाही आपल्या चालीने चालवावे, असा निश्चितच नव्हे. माझे आणि मित्राचे वाजले. मुखर्जी महाशयांनी त्याचाच पक्ष घेतला. मला बाहेरची आमंत्रणे पंचवीस होती. फिल्मिस्तानला मी 'रामराम' ठोकला. मोकळा झालो. भगवानला म्हणालो, 'भगवान, यार तू क्या देमार-टाईपकी पिक्चरेंही निकालता रहेगा ?'

'तो तुम्हारी राय क्या है ?' भगवानने विचारले.

'कभी तो एक सोशल पिक्चर बनाओ.'

'माना' भगवानने एका दणक्यात मान्यता दिली, पण उपप्रश्न विचारला, 'वजह ?'

'वजह यह की मेरे नामका फायदा तूं उठा सकेगा.'

'अपने पिक्चरपर कब आता है सी. रामचंद्र का नाम ? हमारे लिए तो तूं अन्नासाहेब चितलकर रहा है ना आजतक ?'

'अबसे दूँगा सी. रामचंद्र नाम !'

'तो यह रहा खडा' भगवान एकदम उत्साहित झाला.

आमचा भगवान म्हणजे अवलिया आहे. त्याला कथा लिहिता येतात. संगीत समजते. पाश्चात्य पद्धतीची नृत्ये करता येतात. अभिनय येतो. दिग्दर्शन येते. अष्टावधानी असामी आहे. त्याने 'अलबेला' नावाची एक कथा घडविली. मीही माघार घेतली नाही. कवी राजेंद्रकृष्ण माझा खूप मित्र झाला होता. हिंदी चित्रव्यवसायात त्याच्या नावाला कालिदासाची किंमत आलेली होती. 'शहनाई'च्या निमित्ताने कानी पडलेला लता मंगेशकर या गायिकेचा स्वर आता सर्वत्र दरवळत होता. कानांची दृष्ट लागावी आणि ओठांची फसगत व्हावी असला विलक्षण गोडवा जिच्या आवाजात उपजत होता तिच्याच ओठी कोंडलेला तो दर्दभर स्वर आता चित्रव्यवसायात निनादत होता. वाऱ्यांनी तिच्या सादाच्या जरतारीचा पेहराव पांघरण्याचे जणू व्रत घेतले होते. माझ्या पुष्कळ रचना लताने गायल्या होत्या. तिचा माझा स्नेह झाला होता. भगवानच्या चित्रासाठी आमचे त्रिकूट एकत्र आले.

यथाकाली भगवानचे ते चित्र प्रकाशित झाले आणि विलक्षण लोकप्रियता संपादून गेले. स्वतः भगवानच त्या चित्राचा नायक होता. स्टंट चित्राचाच दिग्दर्शक असलेले हे चित्र संगीताच्या लोकप्रियतेचा उच्चांक गाठून गेले.

धी रे से आ जा रे अँखियनमें
निंदिया, आ जा रे आ जा

या अंगाई गीताचे पारायण लक्षावधी ओठांनी केले. चित्रपटात एखादे अंगाई-गीत घालण्याची एक फॅशनच चित्रव्यवसायात रूढ झाल्यासारखी झाली. सायगलच्या 'सो जा राजकुमारी'नंतर इतके अमर्याद लोकप्रिय झालेले अंगाई-गीत हेच.

घरातल्या आनंदाची आवश्यकता भासू नये, इतका आनंद माझ्या तन-

मनावर बाहेरून बरसत होता. राजेन्द्रकृष्ण आणि लता मंगेशकर यांचा मला लाभलेला स्नेह ही एक हेवा करण्यासारखी गोष्ट होती. आम्ही जणू एकत्रच वावरत होतो. घर ही फक्त घडीभराची वस्ती झाली होती. त्या घडीभराच्या काळातच कधी तर एक अनोळखी व्यक्ती माझ्या आयुष्यात आली.

गोरटेलेसा रंग. मध्यम उंची. शुद्ध खादीचा पेहराव. बोलणे अत्यंत आर्जवी, गोड. वागण्याची पद्धती सुसंस्कृत वळणाची. बोलताना दोन्ही ओठ पुढे काढण्याची प्रेमळ लकब. माणूस मोठा हुषार वाटला. त्याने आपण होऊनच आपले नाव सांगितले, ' मी पु. रा. भिडे. '

मी बाहेर पडण्याच्या बेतात होतो. त्या काळात माझे पाय घरात सहसा ठरतच नसत. भिड्यांनी कसली तरी योजना आणली होती. ती योजना त्यांनी इतक्या चांगल्या तऱ्हेने निवेदन केली की, मी प्रभावित झालो. भारतातल्या सुविद्यात शास्त्रीय गायकांची गायकी ध्वनिमुद्रित आणि चित्रित करण्याची त्यांची कल्पना होती. सोळा मिलिमीटर्सच्या अशा फिल्म्स् दाखविण्याची मनीषा होती. त्यासाठी ते एक संस्था स्थापन करीत होते. त्या संस्थेच्या कार्यात मीदेखील सहभागी व्हावे अशी त्यांची विनंती होती. नाकारण्यासारखे काहीच नव्हते. शास्त्रीय संगीताविषयी मला आस्था होती. संगीताच्या व्यवसायावरच मी एवढ्याचा एवढा झालो होतो. त्या संगीतकलेसाठी काही भरीव काम करणे हे माझ्यासारख्याचे उत्तरदायित्व होते. एका क्षीण क्षणाचा मुहूर्त साधून भिडे माझ्याकडे आले होते. भिडे भले दिसत होते. त्यांनी एका भल्या कामाला हात घातला होता. मी होकार दिला. त्यांना फार आनंद झाला. त्यांनी हलकेच सूचना केली, ' लताबाईदेखील या योजनेत साह्यभूत होतील तर बरे.' कसलाही विचार न करता मी त्यांना सांगितले, ' त्याही येतील.'

भिड्यांच्या त्या कामात मी फार लक्ष घातले. स्वतःचे एक हजार रुपये त्यांना देऊन टाकले. लताला विनंती केली, ' आपकी मदद होनी

चाहिये. आपके पिताजी शास्त्रीय संगीतकार थे.'

लता म्हणाली, ' अगर आप कहते हैं तो मुझे इतराज नहीं.'

लतानेही एक हजार रुपये संस्थेला दिले. ओमप्रकाश या विनोदी नटालाही मी एक हजार रुपये द्यायला लावले. संस्थेची उभारणी झाली. पदावलीच्या नामावलीचा शुभारंभ झाला.

अध्यक्ष : लता मंगेशकर.

सेक्रेटरी : सी. रामचंद्र आणि पु. रा. भिडे

लताचा आवाज तर साऱ्या वातावरणात दुमदुमत होता. त्यांचे प्रत्यक्ष दर्शन पडद्यावर घडवावे ही भिड्यांची इच्छा होती. कार्याला आरंभ झाला. आम्ही आमच्या उद्योगात होतो. भिडे आपल्या उद्योगात मध्येच केव्हा तरी घाईघाईने येत आणि माझी सही घेत. लताची स्वाक्षरी घेत. तो म्हणे, आपल्या मीटिंगची मिनिट्स आहेत. मी कशाला वाचून बघतो? सह्या करीत गेलो. यातली एक सही माझ्या फार अंगावर आली. लतालाही फार मनस्ताप सोसावा लागला. ते प्रकरण योग्य वेळी येईल.

भिड्यांच्या संस्थेच्या आगेमागे आम्ही आमचीही एक संस्था काढली. चित्रपट निर्माण करणारी संस्था. ओमप्रकाश, त्याचा भाऊ आणि मी असे तिघेजण तिचे भागीदार झालो. संस्थेचे नाव ठेवले ' साई प्रॉडक्शन्स.' थोड्याच दिवसांत आम्हांला समजून आले की, हे नाव कुठल्या तरी संस्थेने घेतले आहे. मग आम्ही वेड्यासारखे ' न्यू साई ' असे ठेवले. पहिला चित्रपट करायचा ठरला ' झाँझर !'

१२

'झाँझर' चित्रपटात मी माझा स्वतःचा पैसा असा फारसा गुंतवला नव्हता, पण त्या बोलपटाचे संगीत अश्रुतपूर्व व्हावे, यासाठी मी खूप श्रम केले. त्या चित्रपटात योजलेली प्रत्येक चाल अप्रतिम ठरावी म्हणून मी फार राबलो. अन्य अनेक चित्रपटांचे संगीत नियोजन त्या वेळी मी करीत होतो. त्या सर्व चित्रपटांच्या निर्मात्यांना 'झाँझर' विषयी असूया वाटावी, इतके लक्ष मी 'झाँझर'च्या कामाकडे दिले. फिल्मिस्तानचे 'अनारकली' नावाचे चित्र मी त्याच वेळी करीत होतो. भालजी पेंढारकरांच्या 'शिवाजी'चे संगीतही माझ्याचकडे होते. शिवाजी निमित्ताने मला वरचेवर कोल्हापुरास जावे लागत होते.

एकदा असाच मी कोल्हापुरात होतो. फिल्मिस्तानची एक नोटीस तिथे येऊन मला धडकली. त्या नोटिशीने माझ्यावर स्पष्ट आरोप केला होता की, त्यांच्या कामाकडे मी जाणीवपूर्व दुर्लक्ष करीत आहे. मी माझे लक्ष झाँझरवर केंद्रीभूत केले होते असे नाही, पण माझे सर्वाधिक लक्ष त्या चित्राच्या

संगीतावर होते, हे मात्र असत्य नव्हते. मधल्या कचकची सांगत बसत नाही. 'झाँझर' हा चित्रपट प्रकाशित झाला आणि साफ पडला. मी नायकाची भूमिका केलेल्या 'नागानंद' चित्रपटाची जी अवस्था झाली होती, तीच अवस्था मी निर्माण केलेल्या चित्रपटाची झाली. नवलाची गोष्ट अशी की, फिल्मिस्तानच्या 'अनारकली'ने मात्र यशाचा उच्चांक गाठला. टीकाकार आणि प्रेक्षक उच्चरवाने म्हणू लागले, 'या चित्रपटाचे यश त्याच्या संगीत-योजनेचे आहे.' ज्या चित्रपटाच्या संगीतयोजनेकडे लक्ष नसल्याबद्दल निर्मात्यांनी माझ्यावर तशी नोटीस बजावली तो चित्रपट माझ्या संगीता-मुळेच चालला. नुसता चालला नाही, विलक्षण चालला. आहे की नाही विनोद !

या 'अनारकली'त एक गाणे होते. 'जमाना यह समझो की हम पीके आएं.' हे गाणे निर्माते, दिग्दर्शक, त्यांचे सहकारी, चाहते, खुषमस्कऱ्ये यांपैकी कुण्णाकुणाला आवडले नव्हते. ते गाणे त्या चित्रपटातून काढूनच टाकावे असा सर्वांचा शेवटपर्यंत हट्ट होता. दैव बलवत्तर म्हणून ते गाणे त्या चित्रपटात राहिले, आणि नेमके तेच कमालीचे लोकप्रिय झाले. प्रेक्षक आणि परमेश्वर कुणालाही पुरता समजला नाही म्हणतात, ते खोटे नव्हे.

याच चित्रपटातील, आणखी एका गाण्याविषयी अशीच मौज सांगता येईल. 'यह जिंदगी उसी की है' या गाण्याची चाल सर्वांना फार नवीन वाटली. अप्रतिम वाटली. ते गाणे खूप लोकप्रियही झाले. पण त्या गाण्याची चाल नवीन नव्हती 'शारदा' नाटकातील 'मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली' हे पद मी चाल म्हणून खपविलेले होते. मूळच्या गाण्यातील शब्द हिंदीत नव्हते म्हणून तें गाणे मराठी श्रोत्यांना देखील नवे वाटले. अप्रतिम वाटले.

अनारकलीच्या यशाने माझा भाव आणखी वाढला. 'झाँझर'चा काटा माझे पायी मोडला होता याची आठवण मलाही फारशी राहिली नाही. माझे यश घोडदौडीने पुढे निघाले.

या 'झाँझर' चित्राच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मी अमृतसरला गेलो होतो. लता माझ्याबरोबर होती. तिची आणि सुप्रसिद्ध गायिका नूरजहाँ यांची फार मैत्री. लताने अमृतसरहून त्यांना फोन जोडला. त्या फोनवर आल्या. पाकिस्तानात राहणारी एक थोर गायिका, आणि भारतात राहणारी तितकीच थोर दुसरी गायिका यांचा सुख-संवाद सुरू झाला. त्या संवादातले सारे शब्द मला आता आठवत असते तर मी ते हौसेने पुनरुद्घृत केले असते. शब्द मला आठवत नाहीत, पण लताच्या उत्तरांवरून मी नूरजहाँचे प्रश्न ओळखत होतो. माझ्यासारख्या निबर माणसाचे डोळेही त्या मैत्रिणींचा सुख-संवाद ऐकल्याने पाणावत होते. शेवटी त्या दोघींची भाषणे थांबली. गद्य लोपले, संवाद सरले, शब्दही सरले. या इकडून एखाद्या रागाची सुरावट ऐकवीत, त्या तिकडून तसेच स्वर परत करीत. कितीतरी वेळ ही देवाण-घेवाण चालू होती. फोनवर भाषण ते किती? तीन मिनिटे, सहा मिनिटे, फार फार तर बारा मिनिटे. बराच वेळ झाला तरी त्या गंधर्वकन्यांचे हितगुज सरेना. टेलिफोन ऑपरेटर्सही त्यांना 'थांबा' म्हणेनात. त्यांना अनायासे ही जुगलबंदी ऐकायला सापडत होती. त्या का थांबवतील?

भारत दुभंगला. पिढ्यान पिढ्या एकत्र राहणारे हिंदु-मुसलमान सवतेसुभे पाडून मोकळे झाले. निर्वासित नावाचा नवाच एक लोकसमुदाय उत्पन्न झाला. धार्मिक कटुत्व सीमेला गेले. राजकीय कटुत्वाने, दोन शत्रू समोरासमोर उभे केले. फाळणीच्या कात्रीत जे हत्याकांड झाले, त्याला तर काय नाव द्यावे तेच जाणत्यांना उमगेनासे झाले. कलाप्रांतात विहार करणाऱ्या त्या दोन तरुणींना मात्र ते काही आठवले नाही. त्या दोघींचे स्वर मनमोकळेपणाने एकमेकींच्या कानी दरवळत राहिले. त्या दोघींनीही त्या स्वरभेटीचे ते मूल्यवान क्षण अत्तराच्या फायासारखे कितीतरी वेळ आपल्या कानांत ठेवून दिले असतील.

लताने फोन ठेवला आणि ती मला म्हणाली "राम अपनेको जाना है।"

'कहाँ?'

'दावतपर'

'किस के यहाँ?'

'नूरजहाँ के यहाँ?'

'लाहौर?'

'जी'

'पाकिस्तान में?'

'ना, पाकिस्तान जाना तो पासपोर्ट बासपोर्ट के चक्कर में जाना पड़ेगा'

'फिर?'

'वह कहती थीं हम नो मॅन्स लॅंड पर मिलें.'

आणि खरोखरच लता आणि नूरजहाँ एका स्वतंत्र भूखंडावर भेटल्या. त्या भुईच्या जागेवर कुठल्याही राजसत्तेचा अधिकार नव्हता. अमृतसरपासून तीसपस्तीस मैलांवर कुठेतरी ती जागा होती. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या सीमा एकमेकांना पाहत त्या ठिकाणी आमोरासमोर उभ्या ठाकल्या होत्या. मध्ये एक लहानसा जमिनीचा तुकडा होता. एक झाड होते. थोडी हिरवळ होती. नूरजहाँची गाडी पाकिस्तानच्या सीमेच्या आत उभी राहिली. आमची गाडी भारतीय सीमेच्या आत उभी राहिली.

त्या दोन गायिका त्या मुक्त भूखंडावर एकमेकींना उराउरी भेटल्या. त्यांनी एकमेकांना गाढ आलिंगने दिली. धर्म, देश, जाती, पंथ यांपैकी कोणालाच त्या आनंदक्षणात प्रवेश नव्हता. कलावंतांच्या जगात हे सारेच गौण होते. ती दोन कलावतींची भेट होती. दोन मैत्रिणींची भेट होती. एकमेकांच्या गुणावर लुब्ध असणाऱ्या दोन कलावेड्या जीवांची ती भेट होती. ती भेट पाहताना दोन्ही देशांचे सीमारक्षक गहिवरले. भारतीयांच्या डोळ्यांत अश्रू ओघळले. पाकरक्षकांच्या डोळ्यांत अश्रू तरारले. त्या दोन्ही अश्रूंची जात एक होती. धर्म एक होता. आभाळ एक होते. भूमीही एक होती.

तो सोहळा मी जन्मात कधी विसरणार नाही. तिथल्या हिरवळीवर मग

आम्ही वनभोजन केले. नूरजहाँबरोबर त्यांचे पती होते. आणखी काही आप्त होते. त्यांनी मुद्दाम मुसलमानी पदार्थ तयार करून आणले होते. ते पदार्थ नूरजहाँबाईंनी लताला भरविले. लतानेही त्यांच्या तोंडी घास घातले. तो सोहळा केवळ अवर्णनीय होता. कलेला प्रांत नाही. धर्म नाही. जात नाही. गोत नाही. कला म्हणजे प्रेम, अनुराग. कलावंताचे मनही कले-इतकेच विशाल झाले तर...

असो. माझ्या आयुष्यात मी जी काही फार रम्य दृश्ये पाहिली, त्यांत नूरजहाँ आणि लता यांच्या प्रीतिभेटीचे ते दृश्य सर्व दृश्यांत अधिक मनोहर होते. अव्याजसुंदर होते. धर्माने मुसलमान असलेल्या एक समव्यावसायिकेशी लताने एवढा स्नेह जोडला होता. आणि मी—

माझी जन्मदात्री माझ्यापासून दूर होती. माझ्यात आणि तिच्यात एका तपाचा अबोला होता. तो नाहीसा करण्याचा प्रयत्न एकवार लतानेच केला होता. मला वाटते, भगवानच्या 'अलबेला' चित्राच्या प्रकाशनासाठी मी, भगवान, लता आम्ही तिघेही पुण्याला आलो होतो. आई त्या वेळी पुण्यात होती. माझा मोठा भाऊ नानाही पुण्यात होता. मी त्यांना कधीच भेटत नव्हतो. पुण्याच्या त्या मुक्कामात लतालाच एकाएकी आठवण झाली. तिने मला विचारले, "राम, तुझ्या आई असतात ना इथे?"

"असते वाटतं—"

"वाटतं? तुला माहीत नाही?"

"माझं तिचं पटत नाही."

"का?"

मी अनेक गोष्टी सांगितल्या. माझ्या जन्माच्या वेळी आईने काढलेले ऐकीव उद्गारही तिच्या कानी घातले. ती हसली आणि म्हणाली, 'अरे, हे काही झालं तरी त्या तुझ्या आहेत. तुला हे जग दिसलं ते त्यांच्यामुळे.'

मी भावनावश झालो. जन्मदात्या आईला दूर ठेवण्यात आपल्याच

हातून अन्याय घडला असे मला मनोमन वाटले. माझी मुद्रा गोरीमोरी झाली. तरी ती बोलली, 'आपण जाऊ या त्यांच्याकडे.' मी नकार देऊ शकलो नाही. नानाचा पत्ता शोधून आम्ही त्याच्या बिऱ्हाडी गेलो. कैक वर्षांनंतर मी माझ्या जन्मदात्रीला नमस्कार केला. तीही गहिवरली. पुष्कळ बोलणे झाले. मायलेकरातला दुरावा संपला. मग मी आईसाठी काही पैसे पाठवू लागलो. वारंवार तिची भेट घेऊ लागलो. मनाचा एक कोपरा मोकळा झाल्यासारखा झाला.

लताने घडवून आणलेला तो सलोखा मला आठवला आणि कलावंत सामान्यांपेक्षा अधिक विशाल मनाचा असेल तर— या माझ्याच प्रश्नाला उत्तर गवसले.

१९५२ सालचा ऑगस्ट-सप्टेंबर महिना असेल. माझ्या साईप्रासादात राहणारे श्री. पटणी यांच्याकडे एक पाहुणे आले होते. पटणींनी त्यांचा माझा परिचय करून दिला. ते गृहस्थ व्यापारी होते. त्यांनी साऱ्या जगभर प्रवास केलेला होता. आताही ते कुठे तरी इंग्लंडला की, अमेरिकेला जाणार होते. त्यांचं नाव श्री. उदय गांधी.

'आपण नाही गेलात का कधी परदेश प्रवासाला?' त्या पाहुण्यांनी विचारले. मी खालचा ओठ किंचित पुढे काढला आणि हनुवटी उजव्या कानाकडून डाव्या कानाकडे व पुनः डाव्याकडून उजवीकडे वळविली.

'का बरं?' पाहुण्यांनी विचारले. मी काय उत्तर देणार? मी परदेशी प्रवासाला का गेलो नव्हतो ते मला तरी कुठं माहीत होते.

'तुमच्यासारख्यांनी जायला पाहिजे. एवढे पैसे मिळवता, तर प्रवासात खर्च करा थोडे. देशोदेशीचे संगीत ऐकले तर भर पडेल तुमच्या ज्ञानात.'

पाहुण्यांचे म्हणणे खोटे नव्हते. आपणही परदेश प्रवासाला गेले पाहिजे. असे मात्र वाटल्यावाचून राहिले नाही. मी बोटचेपा आहे हे पाहून त्या पाहुण्यांनी मग माझे भरपूर 'बौद्धिक' घेतले. कुणी भली गोष्ट सांगितली

तर ती चटकन पटावी अशी माझी मनोवृत्तीच आहे. मी त्यांच्याजवळ जवळ जवळ प्रतिज्ञाच केली की, ' मी परदेश प्रवासाला जाईन ! '

याच वेळी, कशासाठी तरी श्री. पु. रा. भिडे माझ्याकडे आले. ते जसे व्यवहारनिपुण होते, साहित्यकार होते, तत्त्वचिंतक होते, तसेच हस्तसामुद्रिक आणि ज्योतिषीही होते. मी माझा हात त्यांच्यापुढे केला आणि विचारले, ' परदेश-प्रवासाचा योग आहे का पहा ! '

भिड्यांनी नेहमीच्या गंभीरपणाने माझा हात पाहिला. रेषांचे अंदाज घेतले आणि मोठ्या कष्टाने सांगितले, ' या हातावर परदेश गमनाचा योग नाही. '

मी लहान पोरासारखा चिडीला पेटलो. दैवाने बेट्याने मला फार भय घातले होते. त्याच्याच अंगावर पान खाऊन पिचकारी मारायचे ठरविले. मी भगवानकडे गेलो आणि त्याला सांगितले,

' भगवान, हम फॉरेन जाएंगे ? '

' फॉरेन ? '

' हां, हां. '

' क्यों ? '

' यूँ ही– '

' यूँ ही ' हे काही कारण सांगितल्यासारखे झाले का ? पण भगवानला ते उत्तर पुरेसे झाले. तो म्हणाला, ' जाएंगे तो जाएंगे. '

प्रथम कुठे जावे हाही एक प्रश्नच होता. मग मी पुनः पटणीकाकांच्या त्या मित्राकडे धाव घेतली. त्यांनी सुचविले, ' जपान. '

झाले. मी आणि भगवानने जपानला जायचे ठरविले. पासपोर्ट मिळविण्याचा उद्योग सुरू झाला. वर्तमानपत्रांत बातम्या झळकल्या आणि कशासाठी कुणास ठाऊक आम्हांला मेजवान्यांवर मेजवान्या सुरू झाल्या. आम्ही काय कुणा सांस्कृतिक मंडळीचे प्रतिनिधी म्हणून चाललो होतो. का भारतीय संगीताचा झेंडा घेऊन निघालो होतो ! तसे काहीच नव्हते.

चित्रपट व्यवसायातल्या उत्सवप्रिय मित्रांनी आम्हांला निरोपाच्या मेजवान्या दिल्या. मद्ये पाजली. हारतुरे घातले. पासपोर्टही मिळाले.

२ ऑक्टोबर १९५२ या दिवशी आम्ही विमानाने मुंबई सोडली. महात्मा गांधींचा जन्मदिवस होता त्या दिवशी आमचे विमान कलकत्त्याला पोचले आणि आम्ही तिथेच अडकलो. पुढचे विमान चार दिवस मिळाले नाही. भगवान कलकत्त्याला कंटाळला. मी मनाशी म्हणालो, ' भिड्यांचे भविष्य खरे ठरले. '

' अन्नाजी– ' भगवान म्हणाला, ' बस हुई टूर. चलो बंबई जाएंगे. '

' नहीं भगवान. '

' क्यों ? क्या हर्ज है ? '

' अरे, ज्यांनी आपल्याला पार्ट्या दिल्या आपण परदेशी जाणार म्हणून, ते मारतील, इथूनच परत गेलो तर. '

भगवानला माझे म्हणणे पटले आणि सिंगापुरकडे जाणारे विमानही पाचव्या दिवशी सुटले.

या विमानप्रवासात एक गंमत वारंवार होत राहिली. भगवान खूप मद्य घ्यायचा आणि झोपी जायचा. तो घोरणारा जबर. त्याला झोपही झटकन यायची. बोलता बोलताच त्याचे घोरणे सुरू व्हायचे. विमानात देशोदेशीचे प्रवासी. भगवानची ती तऱ्हा पाहून त्यांना हसू येई. भगवान जागा झाला आणि त्याचे घोरणे थांबले म्हणजे ते त्याच्याकडे बघून हसत. भगवानही उत्तरादाखल हसे. मला ते चमत्कारिक वाटे.

' तू हसता क्यों है ? ' एकदा मी विचारलेही.

' तो क्या करूँ ? ' भगवान म्हणाला.

त्याच्या या प्रश्नाला काय उत्तर द्यावे ते मला सुचले नाही. भगवानचे इंग्रजीचे ज्ञान मोजके. आपसांत त्याचे इंग्रजी समजून घेण्याचा प्रयत्न केला जाई. देश सोडल्यावर, त्याचे इंग्रजी, जे त्याच्या गळ्यात जाऊन बसले ते, सहसा बाहेर पडले नाही. मद्यानंदात असताना मात्र फाडफाड

इंग्रजी बोलत राही. ते बरोबर असे की चूक, ते मला कधी कळले नाही, कारण मी त्या वेळी प्यायलेल्याच अवस्थेत असे.

होता होता आम्ही एका रात्री त्या उगवत्या सूर्याच्या देशात पोचलो. एका टोकियो शहरात पावणेदोन महिने राहिलो. जपान देश फिरून मुळीच पाहिला नाही. एकदा कुठे फुजीयामा पर्वताच्या आसपासचा एक उष्ण झरा पाहण्यासाठी गेलो तेवढेच. बाकी सारा वेळ आम्ही टोकियो शहरात काढला. मनमुराद मद्य प्यायलो. निशागारे निरखली. गैशांचा पाहुणचार घेतला. नाच पाहिले. गाणी ऐकली. आनंद केला.

टोकियोहून जवळ एक 'नीको' नावाचे गाव आहे. ते तिथल्या देवळाकरता (पॅगोडा) प्रसिद्ध आहे. आजूबाजूला सुंदर वनश्री आहे. २–३ तासांच्या प्रवासात आम्ही तिथे पोहोचलो. देवळाची जागा फार मोठी. मोठे पटांगण–आणि सर्व काही स्वच्छ ठेवलेलं. त्या पटांगणात तीन वून्डेड सोल्जर्स भीक मागत होते. एक अंधळा, एक लंगडा व एक लुळा. गळयात पाटी होती, "हेल्प अस, वुई आर वून्डेड इन द वॉर." मी आणि भगवान, आम्ही १० येन्स काढले व त्या भिकाऱ्यांच्या पेटीत टाकत होतो. एवढ्यात ४–५ जपानी तरुण पळत आमच्याकडे आले व म्हणाले, "डोन्ट पे देम एनिथिंग सर. दीज फेलोज, दे डोन्ट वॉन्ट टु वर्क. वुई हॅव वर्क फॉर ऑल." आम्हांला खरंच लाज वाटली त्यांना पैसे दिल्याबद्दल. असो.

परत येताना फिलिपाइन्समधील मनिला विमानतळावर आम्हांला थोडे थांबावे लागले. विमान बदलावयाचे होते व ते सुटायला चारपाच तासांचा अवधी होता. आमच्यापाशी अमेरिकन डॉलर्स पुष्कळ होते. मी भगवानला म्हणालो,

'चलो भगवान, शहर में हो आएंगे.'

भगवानने होकार दिला. वेळ रात्रीची होती. आम्ही मनिलामध्ये गेलो. एक हॉटेल गाठले. भरपूर प्यायलो. मस्त जेवलो.

आमचे सारे सामान विमानतळावरच होते. नाही म्हणायला काही जोखमीच्या वस्तू बरोबर होत्या. मी एक वाद्य जपानमध्ये खरेदी केले होते, ते मी बरोबर घेतले होते. आणखीही काही वस्तू होत्या. मद्याच्या कैफात आम्ही त्या हॉटेलमध्ये विसरलो नाही. साऱ्या अंगाखांद्यावर वागवीत मध्यरात्री विमानतळावर आलो. आमचे अवतार मोठे अजब दिसत असले पाहिजेत. फेरीवाल्यासारखे सर्वांगावर सामान होते. शरीराचे तोल जात होते.

त्या विमानतळावर स्नानगृहासारख्या खोल्यांची एक रांगच्या रांग होती. विमानतळाकडे जाणारा रस्ता त्या रांगेवरूनच जात होता. सारे विश्व आपल्याच मालकीचे असल्यासारखे, आम्ही मोकळेपणाने कोलमडत चालत होतो. चालता चालता बोलत होतो. मी पुढे चालत होतो. भगवान माझ्या मागे मागे येत होता. भगवान म्हणत होता, 'अन्ना.'

'बोलो.'

'यार, फोरेन में ट्रेव्हल करने में एक चीज बहुत जरुरी है'

'कौनसी?'

'ज़बान. अंग्रेजी अच्छी होनी चाहिये अपनी. मैं बिल्कुल अनपढ महसूस करने लगा हूँ.'

'ऐसा कुछ नहीं. मैंने भी कहाँ एम्मे पास की है? आदत की बात है. बोलते रहने से आ जाती है बोली, सुनो भगवान!'

पाठीमागून आवाज आला नाही. भगवान चालता चालता थांबला. कशासाठी म्हणून मी वळून बघितले. भगवान नव्हताच. आता होता आणि एवढ्यात नाहीसा झाला. हा गेला कुठे? वेड्यासारखे मी चारी दिशांना पाहिले. दूरवर माणसे दिसत होती. पण भगवान एवढ्या दूर जाईलच कसा? तो तर माझ्या पाठीमागे होता. एवढ्यात होता. मद्याने जडावलेल्या माझ्या मेंदूला एकाएकी जांभई आल्यासारखी झाली. मी मोहरा फिरवला. आल्यावाटेने उलट चालू लागलो. त्या रांगेने उभ्या राहिलेल्या खोल्यांतून दिवे आहेत हे मला जाणवले. मेंदूतही प्रकाश पडला. मद्यपानानंतर असे

होते. माणसाला पुनः पुनः स्नानगृहाकडे जावे लागते. स्वतःच्या अवस्थेला हसत मी चारआठ पावलेच पुढे गेलो. एका खोलीतून ओळखीचा सूर आला.

'नो, नो, नो, नो, नो, सर!'

आवाज भगवानचाच होता. इथे या जागी हा कुणाशी बोलतो आहे? माझा मेंदू परत गरगरला. अंगावरचे बोजे आवरीत मी त्वरेने पुढे झालो आणि त्या स्नानगृहाचे दार लोटले. ते फटकन् उघडले. आतले दृश्य बघताच माझी दारू खाडकन उतरली.

एका फिलिपाइन अधिकाऱ्यापुढे भगवान हात उंचावून उभा. त्या अधिकाऱ्याचा हात पिस्तुलावर!

'व्हॉट्स द मॅटर?' मी एकदम ओरडलो. त्या अधिकाऱ्याला मी सांगितले.

'आम्ही दोघे भारतीय आहोत. थेटचे प्रवासी आहोत. टोकियोहून निघालो आहोत. मुंबईला जाणार आहोत.'

त्या अधिकाऱ्याने पिस्तुलावरचा हात मागे घेतला. मला उद्देशून तो म्हणाला, "मी या गृहस्थांना पुनः पुन्हा विचारतो आहे, तुम्ही थेटचे प्रवासी आहात का? इथे विमान बदलणार आहात का? तर हा गृहस्थ नुसतंच नाही, नाही, हो हो, असं उत्तर देतो."

मग माझ्या लक्षात आले की, इंग्रजी भाषेच्या भयाने पछाडल्यामुळे भगवान बावरला होता. Yes च्या ऐवजी No – व No च्या ऐवजी Yes म्हणायचा मी त्या अधिकाऱ्याला सारे समजावून सांगितले, मग त्याने खुलासा केला तुम्ही अमेरिकन डॉलर्स खूप खर्च केलेत शहरात. इथल्या उतारूंना इतके डॉलर्स बाळगता येत नाहीत. तुम्ही विमान बदली करून पुढे जाणार असाल तर प्रश्नच नाही.

मी आणि भगवान यथाकाळी भारताच्या भूमीवर आलो. पुनः आपल्या कामाला लागलो.

एवढा लांबचा प्रवास करून धड अंगाने परत आलो म्हणून मी पुण्यास गेलो. आईला भेटलो. भावाची भेट घेतली. भेटीचा आनंद ओसरल्यावर माझ्या मायेच्या माणसांनी मोठ्या चिंतेच्या स्वरात मला एक धोक्याचा इशारा दिला, 'राम, सांभाळ. मुंबईला तुझ्याविरुद्ध कारस्थानं चालली आहेत. तुझ्यावर क्वचित विषप्रयोगदेखील होईल!'

'विषप्रयोग?' मी अगदी थक्क झालो. दिङ्मूढ झालो. मी कुणाचे वाईट केले आहे म्हणून कुणी माझ्या जिवावरच उठावे?

♠ · ♠

१३

माझ्यावर विषप्रयोग कोण आणि का करील हे माझ्या मुळीच लक्षात येईना. मी फार यशस्वी झालो होतो, आणि यशस्वी माणसाला शत्रू आपोआप उत्पन्न होतात, तसे ते मलाही झाले असतील हे मी जाणीत होतो. यशस्वितेच्या अपराधासाठी कुणी मला जिवे मारून टाकील, हे मात्र मला पटत नव्हते. पुण्यास राहणाऱ्या माझ्या आप्तस्वकीयांनी दिलेली धोक्याची सूचना, माझ्या डोक्यात खिळा रुतून बसावा तशी रुतून बसली. स्वरांची गुंफण वा वाद्यमेळाची मधुरता माझ्या मेंदूला सुचेनाशी झाली. हा एकच स्वर मस्तकात ठणकू लागला— 'माझ्यावर विषप्रयोग होणार आहे.' मी आतिशय त्रासलो. चिडका झालो. साध्या साध्या गोष्टीवरूनही मी माझ्या पत्नीवर रागवू लागलो. आदळआपट करू लागलो.

एकदा तिने विचारले, 'झालंय काय तुम्हांला ?'

'मी मरणार आहे लवकरच. माझ्यावर विषप्रयोग होणार आहे.' मी उत्तरलो.

ती क्षणकाल अवाक झाली. नंतर स्वरात शक्य तेवढी मृदुता आणून तिने विचारले,

'कुणी सांगितलं तुम्हांला ?'

मी या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. पुण्याच्या आप्तांनी मला ही गोष्ट सांगितली होती. पण त्यांना ती कुणी सांगितली होती, ते मलाही माहीत नव्हते. शेवटी आईला भेटण्यासाठी पुण्याला गेलो असताना मी चक्कच विचारले, 'कुणी सांगितलं तुम्हांला माझ्यावर विषप्रयोग होणार आहे म्हणून ?'

'एका माणसाच्या अंगात आले होते. त्याने आवर्जून सांगितले. आमची त्याची ओळखही नव्हती. तू काय करतोस हेही त्याला माहीत नव्हतं.' आईने माहिती दिली.

अंगात आलेला माणूस ! मला परत तो महार गोसावी आठवला. त्याचे तळतळाट आठवले. त्याच्या म्हणण्यातला अर्धा भाग सत्य झालाच होता. मला दोन अपत्ये झाली होती. ती मरून गेली होती. पुनः होण्याची आशा दिसत नव्हती. पत्नीशी माझे खटके उडत होते. घरात सुख नव्हते. व्यवसायात अकारण शत्रुत्वाची फळी जोरदारपणे उभारली जात होती. पैसा मिळाला होता. नाव मिळालं होते. पण सुख ? ते खरोखरच माझ्या जीवनापासून कैक योजने दूर होते. त्या महार गोसाव्याच्या अभद्र वाणीने इतके यश मिळविले होते. आता हा 'अंगात आलेला बुवा' तसाच सत्यवक्ता ठरला तर जीवनाची सुरावट इथंच थांबणार होती. मी अगदी बेचैन झालो. हैराण झालो.

मुंबईला गेल्यावर पत्नीला हे सारे सांगितले. तिने काहीच भाष्य केले नाही. घरातला कलह मात्र सारखा धुमसत राहिला. त्या धुमसण्याचे सर्वाधिक कारण होते माझा स्वभाव. मी विलक्षण चिडका झालो होतो. संतापी बनलो होतो.

असाच मी एकदा परत पुण्याला जायला निघालो होतो. तेव्हा माझ्या

मुंबईतील घराला वाचा फुटली. तिथे मला इशारा देण्यात आला. ' सांभाळून. पुण्याला तुमच्यावर विषप्रयोग होणार आहे.'

'कोण म्हणतं?' मी केवढ्या तरी मोठ्यांदा ओरडलो. त्या आरड्याला उत्तर मिळाले—' एक ज्योतिषी आला होता. त्याने कुंडली पाहिली आणि हे भाकीत केले' मी कपाळ बडवून घेतले. आरोलकरांसारख्या साधुतुल्य पुरुषाने केलेले भविष्य खरे ठरले होते. त्या महार जोगड्याची शापवाणी फळाला आली होती.

सुधारलेल्या जगाने अविश्वसनीय म्हणून फेकून दिलेल्या गोष्टी, माझ्या प्रत्यक्ष प्रत्ययाला आल्या होत्या. पण हे विषप्रयोगाचे थोतांड मात्र कपोल-कल्पित असावे असे मला वाटले. पुण्याचे घर विषप्रयोगाची जागा म्हणून मुंबईचा निर्देश करीत होते. मुंबईचे घर त्याच घटनेचे निश्चित स्थळ म्हणून पुण्यावर बोट ठेवीत होते. एक घर, आई आणि भावंडे यांचे, दुसरे पत्नीचे. या दोन्ही घरांना एकमेकांविषयी केवढा जिव्हाळा होता, हेच या भाकिताने उघड केले होते. माझ्यावर विषप्रयोग वगैरे कोणी केला नाही. सारे वातावरणच विषारी झाले होते. असो...

घरचे वातावरण असे दूषित होते तरीही बाहेर मी सपाटून काम करीत होतो. नवे नवे प्रयोग करीत होतो. यशच घेत चाललो होतो. हा वेळपा-वेतो मी सत्तर तरी बोलपटांना संगीत दिले होते.

एक गोष्ट मात्र खरी की, अलीकडे सार्वजनिक समारंभाला जाणे मी टाळू लागलो होतो. चित्रव्यावसायिक मंडळींशी एकत्र खानपान करण्याचे प्रसंग अनेक येत असत. ते चुकविण्याकडेच माझा कल वाढू लागला. अशा समारंभाला गेलो की कुणी सद्भावाने तर कुणी कुत्सितपणे माझ्या गृहजीवनाची चौकशी करीत. मला ते नकोसे झाले. घराविषयीचा विचारच मस्तकात उठू नये यासाठी अधिक मद्यपान करू लागलो. चित्रव्यवसायातील लोकांनी माझ्या या वागण्याचा भलताच अर्थ केला. ते म्हणू लागले, सी. रामचंद्र चढला आहे. गर्विष्ठ झाला आहे.

सी. रामचंद्राचे काय झाले होते ते, त्याचे त्यालाच माहीत.

अशा अवस्थेतच एका किडक्या सकाळी, श्री. पु. रा. भिडे बेलिफला घेऊन माझ्या दारी दत्त झाले. त्यांनी माझ्यावर आणि लता मंगेशकर यांच्यावर दोन लक्ष रुपयांचा दावा गुदरला होता. एवढी मोठी रक्कम म्हणे आम्ही भिड्यांचे देणे लागत होतो. त्या दाव्याचे आवतण वाचले आणि माझ्या सर्वांगाला घाम सुटला. मी भिड्यांचे दोन लाख रुपये देणे? कसले आणि कुठले? त्या बिचाऱ्या लताचे हात मी माझ्याबरोबर त्या प्रकरणात गुंतवून बसलेलो.

न्यायालयाची आणि माझी नुसती दृष्टिभेटही यापूर्वी कधी झालेली नव्हती. भिडयांनी ती भेट अपरिहार्य करून ठेवली. या पु. रा. भिड्यांनी एक संस्था काढली होती. शास्त्रीय गायक-गायिकांच्या संगीत वैशिष्टयांचे सचित्र संरक्षण, हे त्या संस्थेचे ध्येय होते. भिड्यांची ती योजना मला चांगली वाटलेली होती. लताला मीच त्या संस्थेची अध्यक्ष होण्याविषयी गळ घातली होती. संस्थेचे सभासद होते केवळ चार: श्री. पु. रा. भिडे, त्यांच्या पत्नी, मी आणि लता. प्रारंभी प्रारंभी श्री. आबासाहेब मुजुमदारांचे नावही या यादीत होते, पण ते पुढे कधीच पुढे आले नाही. भिड्यांचे म्हणणे पडले, ' सभेसाठी पुण्याहून नेहमी नेहमी येणे त्यांना जमणार नाही.'

आबासाहेबांचे नाव मी पुष्कळदा ऐकले होते. त्यांचा संगीतविषयक व्यासंग गाढा होता. त्यांच्यासारखी वजनदार व्यक्ती त्या संस्थेत असणे आवश्यक होते. आबासाहेब आले नाहीत ते नाहीतच.

लता अध्यक्ष, मी आणि पु. रा. भिडे संयुक्त चिटणीस, सौ. भिडे सभासद, इतकीच ती संस्था होती.

मी नेहमीच घाईत असलेला. पु. रा. भिडे मला कधी घरी गाठत, कधी एखाद्या स्टुडिओतच येऊन भेटत. संस्थेच्या सभांच्या अहवालावर वा पत्रव्यवहारावर माझ्या स्वाक्षऱ्या घेऊन जात. ते अहवाल वा पत्रव्यवहार

वाचावा कुणी ? इतकी सवडच कोणापाशी होती ? मी भराभर स्वाक्षऱ्या देई. माझी सही पाहून लता पण आपली सही करी.

असेच आम्हा दोघांच्या सह्या असलेले एक करारपत्र भिड्यांनी पोतडीतून काढले. त्या करारपत्रान्वये श्री. पु. रा. भिडे यांच्याकडून मी आणि लताने, या नव्या संस्थेसाठीं काही फिल्मस् खरेदी केलेल्या होत्या. त्या लघुपटाचे मूल्य म्हणून आम्ही त्यांचे दोन लक्ष रुपये देणे लागत होतो. करारपत्रावरच्या सह्या ठीक आमच्या सह्यांसारख्या होत्या, पण असे करारपत्र वा असा व्यवहार आम्ही कधीच केला नव्हता. एक दोन लक्ष रुपये तरी द्यायला हवे होते, नाहीतर न्यायालयात ते करारपत्रच असत्य असल्याचे ठरवायला हवे होते. घरबसल्या खेळ अंगाशी आला होता. ' गंडस्योपरि पीटिका '–म्हणतात तसा प्रकार झाला होता.

घरातल्या कलहाने मी उबगलो होतो. व्यवसायातही अकारण अपसमज पसरले होते–त्यात हा न्यायालयीन वनवास. सॉलिसिटर बघणे, वकिलांच्या भेटी घेणे– भागच पडले. सदैव विनयाने बोलणारे, खादीचा वेष पाघरणारे, चतुर आणि जाणकार वाटणारे भिडे, आम्हांला असे कुठेतरी कैचीत धरतील असे मात्र पूर्वी कधीच वाटले नव्हते.

हां, एकदा माझ्या पत्नीने मला जागे केले होते. एकदा भिड्यांनी कुठून तरी टेलिफोन केला. तो माझ्या पत्नीने घेतला.

भिडे म्हणाले, ' मी व पत्नी येत आहोत. अण्णा घरी आहेत का ?

ती म्हणाली, ' या, ते घरी आहेत. कुठून बोलताहात ? '

भिड्यांनी मोरारजी देसाई किंवा अशाच कोणा मोठ्या माणसाकडून आपण बोलत असल्याचे सांगितले. माझ्या पत्नीने रिसीव्हर ठेवून दिला.

थोड्या वेळाने भिडे आले. त्यांची एक अद्भुत दिसणारी मोटारगाडी होती. वाडियांच्या ' रोल्सरॉइसकी बेटी ' सारखी. तिच्या काचाबिचा बंद करीत भिडे थोडा वेळ बाहेर थांबले. सौ. भिडे आधी आल्या. माझ्या पत्नीने सौ. भिड्यांचे स्वागत केले, आणि सहजच विचारले—

' फोन कुठून केला होता भिड्यांनी ? '

त्यांनी कुठल्यातरी हॉटेलचे नाव सांगितलं. माझी पत्नी चमकली.

भिडे भेटून गेल्यावर तिने मला सांगितले, ' या माणसाच्या नादी फार लागू नका. हा तुम्हांला गोत्यात आणील ! '

तिने उपरि-उल्लेखित कथा सांगितली, तेव्हा मीही चरकलो. पत्नीच्या चाणाक्षपणाविषयी मला पूर्वीपासून खात्री होती. या प्रकरणात मी तिचे म्हणणे तंतोतंत ऐकले, आणि लवकरच भिड्यांच्या संस्थेचा राजीनामा दिला.

त्या राजीनाम्यामुळेही मी आता सुटत नव्हतो. लताने राजीनामा दिलेला नव्हता. त्या करारपत्रावर तिची सही होती आणि मी जामीनदार होतो. आम्ही चांगले अल्हादपणे अडकलो होतो.

सुटण्यासाठी धडपड चालू झाली. डोके अगदी ठणकू लागले. चारी बाजूंनी त्रास वाटू लागला, तेव्हा मी परदेशी प्रवासास जायचे ठरविले.

१९५४ सालच्या ऑक्टोबर महिन्यात मी, माझी पत्नी, माझा एक वादक सहकारी जॉनी, आणि पत्नीच्या बहिणीची छोटी मुलगी शीला असे चौघेजण, आकाशमार्गाने पश्चिम खंडाच्या प्रवासाला निघालो. मेंदूला शीतलता लाभावी या हेतूने या प्रवासात मी पुरे दोन महिने घालविले. खूप पाहिले. खूप ऐकले. देशोदेशींच्या संगीताने कानांची स्मरणशक्ती उत्फुल्ल करून घेतली.

कायरोला थांबलो. तिथले संगीत मनमुराद ऐकले. कानून नावाचे तिकडचे तंतुवाद्य मला फार आवडले. इजिप्शिअन संगीताचा एक विशेष तर माझ्या कायमचा स्मरणात राहिला. कोमल आणि शुद्ध यांच्या मधल्या स्वराचा उपयोग ते मोठ्या खुबीने करतात. या स्वरांना इंग्रजीत क्वार्टर नोट्स् म्हणतात.

या स्वरांची ओळख भारतीय संगीतशास्त्राला आहे. हे स्वर आम्हांलाही ज्ञात आहेत. पण ते प्रत्यक्षपणे इथे उपयोगात आणले जात नाहीत. इजिप्शिअन त्यांचा उपयोग सर्रास करतात. त्यांची समूह-गीते तसल्या

स्वरांमुळे फार गोड लागतात. मी आणि जॉनीने अशी गीते खूप ऐकली. काहींची सुरावटही लिपिबद्ध करून ठेवली.

इटली देश पाहिला. तिथल्या वातिकान सिटीला मुद्दाम भेट दिली. पोपचे ऐश्वर्य पाहिले. त्याचा दरबार पाहिला. त्यांच्या रंगीत वेषांनी डोळे अक्षरशः दिपून गेले. या देशातल्या पुतळ्यांनी डोळ्यांना फार आनंद दिला. अतिशय कलापूर्ण पुतळे. उंच, भाव वाचून घ्यावेत इतके बोलके.

इटलीच्या हुकूमशहाला — मुसोलिनीला — ज्या ठिकाणी मारला ते ठिकाण पाहिले. तो कसा पळाला? लोकांनी कसा पाठलाग केला? असंख्य पायऱ्या असलेले ते चर्च त्या पायऱ्यांवरून तो पळाला. अंती त्याचे प्रेत एखाद्या हिंस्र श्वापदासारखे एका झाडाला टांगून ठेवण्यात आले. ते झाडही पाहिले. मुसोलिनीच्या अवतार-समाप्तीचे ते स्थळ पाहताना माझा गळा अकारण दाटून आला. शिणलेल्या मेंदूतून उगाचच विचारांची वलये उमटू लागली.

लोकप्रियता, लोकप्रियता तरी शेवटी काय आहे? ज्या लोकांसाठी त्या मुसोलिनीने आयुष्य पणाला लावले, त्या मुसोलिनीचा असा अमानुष वध त्यांनीच केला. त्याचेही कोणी आप्त असतील. ते त्याच्या अंतःकाली काही उपयोगाला आले का?— कसल्यातरीच विचारांनी मी अस्वस्थ झालो. खरे सांगायचे तर मी रडलो. माझ्याविषयीच्या विषप्रयोगाच्या गोष्टी मला त्या जागी उगीचच आठवल्या— अगदी उगीच.

ज्वालामुखीने बेचिराख केलेले पाँपे नगर पाहिले. तेव्हाही तसेच काळीज हलले. नांदत्या घराचे फुटके अवशेष बघताना माझ्या काळजाला घरे पडली. व्हेनिस नगरही पाहिले. पण घाणेरडे वाटले. त्या नगरातील रस्ते म्हणजे पाण्याचे प्रवाह. बोटींनीच हिंडायचे पण या जलप्रवासात नासिका नावाचे इंद्रिय काढून फेकून द्यावे, इतका दुर्गंध दरवळतो. ते नगर न बघताच मरावे असे निदान घ्राणेंद्रियाला तरी वाटते.

या बिगर—इंग्रजी देशात हिंडताना भाषेने आमची फार मुस्कटदाबी

केली. एक गोष्ट सांगतो : आम्ही एका हॉटेलात थांबलो होतो. तिथून जेवण्यासाठी रोज एका ठराविक जागी जात होतो. या प्रत्येक वेळी आम्हांला टॅक्सीची बिले वेगवेगळी द्यावी लागली. कालच्यापेक्षा अधिक लिरा आज द्याव्या लागल्या. भाषेच्या अडचणीमुळे या प्रकाराचा अन्वयार्थ शेवटपर्यंत समजला नाही.

काही काळ फ्रान्समध्ये होतो. तिथली टॉवर वगैरे प्रकरणे पाहिली. विशेषतः तिथले नाइट क्लब पाहिले. तिथले संगीत ऐकत ऐकत रात्री जागविल्या. तिथल्या काही संगीतकारांच्या ओळखी करून घेतल्या. त्यांच्या वाद्यांवर भारतीय संगीत गाऊन त्यांना ऐकविले. एक मनमोकळी देवाण-घेवाण केली.

पॅरिसमधील 'फॉली बॅर्जो' या नाट्यगृहात काही अद्भुत प्रकार पाहिले. मन थक्क करून सोडणारे. एका 'व्हरायटी शो' च्या वेळी पडदा उघडला आणि पडद्यामागे दिसले काय? उभी भिंत आणि तीवर माणसे आडवी बसलेली. छतावरच्या पालीला माणसे उलटी बसल्यासारखी दिसतील ना, तशी. रेल्वेचा बाहुटा कसा उभ्या खांबावर आडवी हालचाल करतो, तशी हालचाल ती माणसे करीत होती. तो दृष्टिभ्रमच असला पाहिजे खाचित. गुरुत्वाकर्षणाच्या नियमातून फ्रान्स देश सुटला असेल थोडाच! नवल वाटले. प्रकाशयोजना, फिरते रंगमंच, अर्धनग्न नृत्ये यांची तर रेलचेल. इथेही संगीत श्रवण आणि मद्यपान यांचा आनंद मनमुराद घेतला.

स्पेनमध्येही काही काळ वास्तव्य केले. आपल्याकडील करतालासारखे त्यांचे कॅस्टनूटस नावाचे वाद्य वाजवीत नाचणाऱ्या सुंदरीच्या नृत्यांनी मने बेहोष झाली. स्पॅनिश गाण्याच्या सुरावटीचे, भारतीय लोकसंगीताशी साम्य पाहून तर मी हुरळून गेलो. त्याचे काही आलाप आमच्या महाराष्ट्रीय लावणीला जोडले तर ते परकीय आहेत हे ओळखणार देखील नाही. खेड्यातल्या स्त्रिया ओव्यांच्या अंती एक मुरडता स्वर घेतात आपल्याकडे— तो जसाच्या तसा माझ्या कानी पडला.

या देशातले वृषभ-युद्ध मुद्दाम पाहिले. ते पाहून मात्र मन कष्टी झाले. जे विसरण्याच्या इच्छेने एवढा प्रवास आरंभला होता त्या दुःखाची खपली निसटली. त्या बैल खेळवणाऱ्या माणसासारखाच मीही खेळवला जात होतो. निरनिराळ्या लालभडक प्रलोभनाशी भिडवला जात होतो. मी टकरा घेत होतो. शेवट जवळ आणीत होतो. तो क्रूर खेळ पाहून माझे मन रक्तबंबाळ झाले. स्वतःच्या करमणुकीसाठी शहाण्या माणूस जमातीने त्या उमद्या जनावरांचे मांडलेले हाल पाहून मला तर खरोखरच उबग आला.

काही मुक्काम स्वित्झर्लंडमध्ये केला. या सुंदर देशाचे नावीन्य भूगोलाच्या पुस्तकांनी देखील आधीच ओळखीचे करून ठेवले होते. नयनाल्हाद म्हणजे काय, ते या देशात अनुभवले.

एकदा स्वित्झर्लंडमध्ये झुरिक येथे एक हिंदी माणूस भेटला. त्याने इथल्या एका विशेष विद्यालय पद्धतीचे दर्शन घडविले. कौलारू घर. थिएटर नव्हे की वलय नव्हे. हॉटेल नव्हे की रेस्तराँ नव्हे. घर. बाहेर खिडकीशी तिकिट घ्यायचे. आत जाऊन बसायचे. आत एक मोठी खोली. दोन आडवे बाक. त्यावर शे-पन्नास स्त्री-पुरुष बसलेले. बहुधा प्रौढ. तरुण कमी. घरचा मालक त्या सर्वांना सौम्य मद्ये पिववीत, संगीत शिकवीत असलेला. त्या मालकाच्या गळ्यात गिटार. त्याचे स्वर छेडीत छेडीत तो गाई. सारे ग्राहक त्याचे गाणे एकसुरात म्हणत. रोज नवे गाणे, रोज नवा आनंद.

मला ही पद्धती फार आवडली. आपल्या देशात समूहगीते नावाची वस्तूच अस्तित्वात नाही, याची मला फार खंत वाटते. या प्रकारच्या घरगुती, अनौपचारिक संगीतशाळा आपल्याकडे का निघू नयेत ?

इंग्लंडमध्ये लंडनच्या विमानतळावर आलो, तेव्हा कानांतले दडे मोकळे झाल्याच्या आनंदात माझा गोवेकर वादक मित्र जॉनी मला म्हणाला—

' अण्णा, आता आपण आपल्या लोकांत आलो. आता इंग्रजी कानी पडेल. इंग्रजी बोलता येईल ! '

आपल्या स्वतःच्या गावी आल्यासारखा तो खुषीत आला. पहिल्यांदाच

दृष्टी पडलेल्या एका वृद्धाला त्याने इंग्रजीत विचारले,

' इथे जवळपास बार कुठे असेल ? '

तो माणूस बहिऱ्यासारखा आविर्भाव करीत जॉनीला म्हणाला, ' नो इंग्लिश. ओनली फ्रेंच ! '

तो कुणी परदेशी पाहुणा होता. त्याला केवळ फ्रेंच भाषा येत होती. इंग्लंड देशात सुखाने इंग्रजी बोलता येईल म्हणून खुषीत आलेला जॉनी सुरवातीलाच असा तोंडघशी पडला. आम्ही हसून हसून बेजार झालो.

इंग्लंडमध्ये आम्ही चांगले पंधरा दिवस राहिलो. निशा, नृत्यालये, मद्य यांचा आस्वाद घेतला. शहरात मुंबईपेक्षा वेगळे असे काही वाटले नाही. वेगळेपणा होता, त्याचा आस्वाद घेतला.

दोन महिन्यांनंतर सांताक्रूझ विमानतळावर पाय ठेवला. आणि— आणि वाटले की, स्वप्न संपले. कैफ उतरला. घरी दारी सोडलेल्या दुःखाचा विसर पडेल असे वाटले होते. तो विसर पडलेला नव्हता. मुंबईत आलो आणि जुन्या मनःस्थितीने पाहून ठेवलेल्या जाळ्यात जसाच्या तसा अडकलो.

१४

लंडन–स्पेन–कैरो–स्विझर्लंड, रोम वगैरे हे सर्व फिरून हिंदुस्थानात आलो खरा–पण तो सर्व आनंद लवकरच संपला. इथली सर्व परिस्थिती तशीच होती म्हणण्यापेक्षा थोडीशी आणखी बिघडलेलीच होती. रेडिओ सीलोनचं महत्त्व वाढत होतं. पी. आर. भिडेची केस चालूच होती. काय होणार हे माहीत नव्हतं, आई व नानाच्या अपेक्षेप्रमाणे मी वागत नाही म्हणून भांडण चालूच होतं. मित्र एक एक करून दूर जाऊ लागले व बेन-बरोबर सुरवातीला नाही पण नंतर भांडणं सुरू झाली. परत ये रे माझ्या मागल्या.

ह्या सर्व मुख्य अडचणी एक एक करून निरतरायला पाहिजेत. ह्यांच्या-पासून दूर पळता येत नाही. त्या तुमच्या बरोबरच येतात. रेडिओ सीलोन, कमर्शियल रेडिओ. ह्यावर पैसे देऊन पिक्चरची गाणी सारखी वाजवता येत होती. गाणं लोकप्रिय केलं जात होतं. सारखं पैसे देऊन वाजवून हॅमर करून ही पद्धत सर्रास सुरू झाली होती. जणू सीलोन रेडिओवर जाहि-

रात दिली नाही तर गाणी व पिक्चर चालणारच नाही अशी भावना निर्माण झाली होती. म्यूझिक डायरेक्टर्स सीलोन रेडिओवर जाहिरात नसली तर शेवटचे बॅकग्राउंड म्यूझिक देत नसत. कमाल आहे ! आजपर्यंत जे कधीही केलं नाही ते करायचं? मला हे पटत नव्हतं. स्वतःचीच गाणी ऐकण्याकरता रेडिओला पैसे द्यायचे ह्याचा राग येत होता. पॉप्युलर राहण्याचा तोसुद्धा एक प्रकार आहे, मग काम कमी झाले तरी चालेल. अरे वा रे वा. चीड येत होती यावर काहीच उपाय नाही म्हणून, चिक्कार पिणे-फ्रस्ट्रेशनपायी मी जितक्या पैशाची दारू प्यालो त्याच्या निम्म्या पैशांनीसुद्धा मी रेडिओच्या द्वारे पॉप्युलर राहू शकलो असतो पण–हे कधीही शक्य नव्हतं, मोठं इन्सल्टिंग वाटत होतं.

आता पी. आर. भिडे याने तर कोर्टातच केस केली होती. ती मी सोडवणारा कोण? लतावर दोन लाख रुपयांची केस व मी गॅरन्टर. वा ! माझ्या हातात हे प्रकरण नव्हतंच. कॉम्प्रमाइज झालं. केस उभी राहिली मी व लता कोर्टात हजर असू. चिक्कार गर्दी होत असे. आम्हां दोघांनाही काही समजत नसे. केसचा निकाल लागल्यावर समजलं की उगाच कोर्टाची भीती बाळगू नये. कोर्टाला सगळं खरं समजतं. आम्हांला दोन लाख रुपये द्यावे लागले नाहीत. पैसे भरावे लागले नाहीत.

आता आई व नाना, माझा मोठा भाऊ, त्यांची इच्छा माझ्याकडे पैसे आहेत म्हणून मी आणखी पैसे द्यावेत. मी पैसे देत होतोच. त्यांना राहायला घर दिले होते. शिवाय एक गाडी पण त्यांच्याकरता ठेवली होती. पण त्यांना आणखी पैसे पाहिजे होते. एक दिवस आई मला म्हणते, "राम, तू जितके पैसे एका चित्राला घेतोस ना, तेवढे मला दे." मी म्हणालो, "तुला जे पाहिजे ते मी आणून देईन. तुला पैसे कशाला पाहिजेत?" लगेच आईचं सुरू झालं, "मेल्या, मला विचारतोस? माझं ऐकत नाहीस ना, म्हणूनच नाव आणि काम कमी होत चाललंय !" आईचं ऐकायचं म्हणजे काय? आई काय मला चाल कशी करायची हे सांगत होती? एकदा तर

आईनं कमालच केली. भगवान, मंगलमाई व मी पुण्याला सकाळी ८ ला घरी गेलो व चहा मागितला. चहा आला पण त्यात दूध नव्हतं. मी म्हटलं, "आई, दूध जरा आण," तर ती म्हणते, "तू जास्त पैसे देत नाहीस ना, म्हणून दूध पुरत नाही." मला आठवतं मी रु. ११०|– फक्त दुधाकरता देत होतो व बाकी वेगळे.

मी आणि लताने एक चित्र काढायचं ठरवलं. त्या कंपनीचं नाव 'सुरेल चित्र'. पिक्चरचं नाव 'सुरीली'. चित्र संगीतमय होतं हे सांगायलाच नको. चित्राचा मुहूर्त माझे मित्र 'अनिल विश्वास' ह्यांच्या हातून केला.

स्वातंत्र्यवीर सावरकर आम्हांला आशीर्वाद द्यायला आले होते. चित्र भगवानच्या जागृती स्टुडिओत होणार होते. त्या आधी 'अलबेला' व 'झमेला' ही दोन चित्रे मी भगवान करता केली होती. आता सेटिंग लावायचे व शूटिंग स्टार्ट करायचे. भगवान म्हणाला, "सेटिंग लगानेको पैसे दो." मी म्हणालो, "भगवान, तुमने मेरे अलबेला और झमेलाके कुछभी पैसे नहीं दिये है उनमेसे लो. त्याच्यातून वळते करून घे." भगवान म्हणाला, "ते शक्य नाही. तो हिशोब वेगळा आहे." फार वाईट वाटलं.

रात्री नेहमीप्रमाणे भगवान, मी व मंगलभाई दारू पीत असताना मी म्हणालो "अब मै तुम्हारे पिक्चर में म्यूझिक नहीं दूँगा. हम सिर्फ दोस्त रहेंगे" तो म्हणतो, "म्यूझिक नही तो दोस्ती नही. काम नही करोगे तो दोस्ती क्यों?" फार वाईट वाटलं. तो असा नव्हता आधी. आता काय झालं? त्या दिवसापासून आमचं बोलणं बंद झालं.

गेल्या वेळेला लंडनला जायच्या आधी काही दिवस सकाळी दोन मुली घरी भेटायला आल्या. तरुण, सुशिक्षित, देखण्या पोरी. विचारलं काय काम आहे? एक म्हणाली, "आमची कॉलेजमध्ये पैज लागली आहे. तुम्ही कुणाला भेटत नाही असं ते म्हणतात." मी म्हणालो, "मी भेटणारच." मला हसू आलं. त्यांना बसायला सांगितलं व बेनला त्यांच्याकरता चहा सांगितला. त्या गेल्यावर मी बेनला म्हटलं, "सावध रहा. इतक्या तरुण पोरी

मला भेटायला येतात. "यू आर इन डेंजर." त्या वेळेस बेन फक्त हसली. मी तिला बरोबर लंडनला घेऊन जाणार म्हणून खूश होती. रात्री बसलो असताना बेन म्हणते, "माझ्या दोन ऑपरेशनमुळे मला मूल होणार नाही. तुम्हांला मुलाची हौस आहे. तुम्ही दुसरं लग्न करा." मी फक्त हसलो. बेनच्या मुखातून जणू नियतीच बोलत होती. हे जरी असलं तरी नंतर भांडणंच.

फिल्म लाइनच्या कुठल्याही पार्टीला मी जात नव्हतो व घरी पण पार्टी करत नव्हतो. घरी नेहमी भांडणाचा मूड. कशी करणार पार्टी? बाहेर पार्टीच्या वेळेला एकमेकाच्या उखाळ्या पाखाळ्या काढणं, चेष्टा करणं, टिंगल करणं हे मला आवडत नव्हतं. चीड येत होती. अशा रीतीनं माझा फिल्म लाइनच्या लोकांशी संबंध तुटत चालला होता. मी त्यांच्यांत मिक्स होत नव्हतो. वेगळा पडत चाललो होतो. एकटा पडत चाललो. माझ्या-सारख्यांनी एकटं राहणं म्हणजे वेड लागायची पाळी. म्हणून मग तेच–पिणं. एखाद्या पिक्चरचं प्रपोजल आलं की माझे मित्र माझं नाव त्यातून वगळायचे, कारण मी त्यांना संध्याकाळची कंपनी देऊ शकत नव्हतो. पाण्यात राहून माशांशी जुळवून घेत नव्हतो. मी मनाचं समाधान करून घेत होतो. आपलं काम चांगलं असलं म्हणजे झालं– म्हणून मी त्यांची पर्वा करत नव्हतो. अन् काही दिवसांनी त्यांनी पण माझी पर्वा करणं सोडून दिलं. वैताग, नुसता वैताग. ह्या घरच्या व बाहेरच्या वातावरणाने कुठेच मूड लागत नव्हता. फक्त सकाळी १०॥ ते ३ व संध्याकाळी ६॥ ते ११ परमिट रूममध्ये जाऊन पिणे. कधी एअरलाइन हॉटेल तर कधी वेस्ट-एन्ड हॉटेल तर कधी रिट्झ. माझा एक कॅमेरामन मित्र पण तिथे यायचा त्याला काम नसलं तर. तोही माझ्याच सारखा. आम्ही दोघेच असायचो. तो तर आणखीनच ग्रेट. त्याचा फोरास रोडवर अकाउंट होता. ३ ते ६ च्या दरम्यान तो एखादी फेरी तिकडे मारायचा. मला ते कसेसेच वाटे. आयुष्यामध्ये कधी नाही इतका नर्व्हस झालो होतो. कधी कधी आत्महत्या

करावी असे वाटे, पण दारू न पिता धीर होत नसे. व दारू प्यायल्यावर तो विचार मनात येत नसे. असे दिवस चालले होते.

असंच एकदा दिल्लीला गेलो होतो. २५ जानेवारीला तिथे २६–२७ तारखेला दिल्लीत जो नॅशनल प्रोग्रॅम होतो– रिपब्लिक डेचा– तो बघायला गेलो. मैदानाच्या मध्यभागी स्टेज, समोर अथांग जनसमुदाय. प्रोग्रॅम म्हणजे हिंदुस्थानातल्या प्रत्येक प्रांताचे फोक डान्सेस. हिंदुस्तानचे सगळे नेते– परदेशीय बडे बडे पाहुणे होते. इतका अप्रतिम कार्यक्रम होता की विचारू नका. साहजिकच आर्टिस्ट म्हणून विचार आला की इथे कधीतरी माझा कार्यक्रम होईल का ? कधीच होणार नाही. फिल्म लाइनचा कार्यक्रम इथे कसा होणार ? देवाने कधी तरी मला चान्स द्यावा इथे कार्यक्रम करण्याचा आमच्या लाडक्या नेत्यांच्या पुढे, असं वाटलं.

एकंदर मनाची स्थिती अगदी विचित्र होती. आपलं सुखदुःख कोणाला सांगणार ? 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार'. असाच एकदा विरंगुळा म्हणून किंवा काही म्हणा, परत प्रेमात पडलो. आधी गंमत म्हणून व नंतर सिरियसली. ही एकच व्यक्ती अशी होती की तिला भेटण्यात मला भीती वाटत नव्हती. नाही तर सारखी भीती. कोण काय बोलेल, कोण चेष्टा करील, कोणी अपमान करील अशी सारखी भीती. भीती ही जगातील अत्यंत भयंकर वस्तू आहे. त्या मुलीला माझी सगळी परिस्थिती सांगितली. सगळं माहीत असून ही मला सारखी धीर द्यायची. कुणालाही दोष देत नसे. हिच्यामुळे माझी दारू कमी झाली. भीती कमी झाली, काम करावसं वाटू लागलं. महाभयंकर असा तो नर्व्हसनेस गेला आणि एक दिवस आम्ही लग्न करायचं ठरवलं. लग्नात दोन अडचणी होत्या, त्या ईझिली सॉल्व्ह झाल्या. एक बेन– पण तिची तर इनडायरेक्टली परवानगी होतीच व दुसरं म्हणजे एक प्रांत असा होता की तिथे अजून तो कायदा आला नव्हता. एके दिवशी मी व ती सकाळच्या प्लेनने तिकडे गेलो व संध्याकाळच्या प्लेनने परत आलो. माझ्या दोन्ही लग्नांत माणसं फक्त दोन किंवा तीन. एकेकाचं नशीब असतं. मी लग्न

केल्याचं फक्त तिथल्या दोन मित्रांनाच माहीत. बाकी कुणालाही नाही. मी तिला पुण्याला आईबरोबर ठेवली. बिचारी नंतर २–३ वर्षं अज्ञातवासातच राहत होती. आज त्या गोष्टीला २३ वर्षं होऊन गेली.

लग्न झालं तरी बाकीचा त्रास तोच. बेनने कितीही सांगितलं की तुम्ही दुसरं लग्न करा म्हणून–पण तरीही ती संतापणारच. कितीही शहाणी असली तरी बाईच आहे ना !

असल्या विचित्र मनःस्थितीत मद्रासच्या वासन साहेबांचं पिक्चर साइन केले होते, त्यांचं बोलावणं आलं. ते करायला मद्रासला गेलो. त्यांना भेटल्या-वर वासन साहेब म्हणाले–रामचंद्र–युवर स्वीट हार्ट हॅड फोन्ड मी ॲन्ड सेड दॅट 'यू डोन्ट टेक राम–आय विल गिव्ह यू एनी अदर म्यूझिक डाय-रेक्टर ऑन युवर टर्म्स ॲन्ड कंडिशन्स.' दुसऱ्या सगळ्या अडचणी दूर झाल्या होत्या कशातरी. पण ही एक मुख्य अडचण लक्षातच नव्हती. वासन साहेबांनी स्वीट हार्ट म्हणाल्यावर तिला भेटल्यापासूनचे सर्व दिवस व घटना आठवल्या. भूतकाळात गेलो. त्याचं असं झालं–एकदा–अरे हो जिच्याशी लग्न केलं तिचं नाव सांगायचं राहून गेलं. तिचं नाव–शांता– आधी ज्या दोन मुली भेटायला आल्या होत्या त्यांपैकी एक–धाकटी.

/

१५

हे प्रकरण नाही वाचलं तरी लिंक लागेल.

वासन म्हणतात, ' रामचंद्रा, तुम्हारे स्वीट हार्ट का फोन आया था, और उसने कहा कि ' राम को मत लो, मैं तुम्हारे लिये कोई भी म्यूझिक डायरेक्टर को काम करनेको कहूँ गी. विथ युवर टर्म्स मगर तुम रामको मत लो.'

अरे मी प्रत्येक चित्र करायच्या वेळी— तिच्याकडूनच गाणी घेतली पाहिजेत तरच चित्र करीन असं निर्मात्याला सांगत होतो– तीच त्या वेळेला सुद्धा– अमीरबाई, जोहरबाई, शमशादबाई– ह्या सर्व हिच्यापेक्षा जास्त नाव असणाऱ्या गायिका होत्याच की ! त्यांना डावलून हिच्याचकडून गाणं घ्यावं ही माझी अट असे.

असो. मी एकदम ४६–४७ सालापर्यंत मागे गेलो. मला ' राम ' म्हणणाऱ्या ज्या ज्या काही ' सीता ' होत्या त्यांपैकी ही एक. ही सीता माझ्या जीवनात ४६–४७ किंवा ४७–४८ साली आली. तारीख आठवत

नाही, प्रसंग आठवतो.

माझ्या एका गाण्याचं रेकॉर्डिंग होतं. तीच गात होती. अप्रतिम गायली. अप्रतिम शिवाय दुसरा शब्दच नाही. आपली कलाकृती कशी असावी ह्याचं एक व्हिजन कलावंताच्या डोळ्यांसमोर असतं. ते अगदी हुबेहूब उतरलं तर त्याला समजतं की हेच, अगदी हेच त्याला हवं होतं, त्याला पाहिजे होतं. आधीच ते सॅड साँग (माझं आवडतं एक्स्प्रेशन), त्यातून हिनं ते अगदी आपल्या गोड गळ्यातून अतिशय छान म्हटलं. माझ्यातला कलावंत बेहोश झाला. बायकांच्या बाबतीत मी नाही तरी ' फिसलूच.' मी तिच्यावर लगेच प्रेम करू लागलो. तिची खूप तारीफ केली, खूप मस्का मारला व म्हणालो, " तू इतकं चांगलं गाणं म्हणलंयस की तुझा एक मुका घ्यावासा वाटतो." ती खूष झाली की नाही हे मला माहीत नाही पण म्हणाली. " तुम्हांला तर माहीतच आहे की माझं आणि हुस्नलालचं प्रेम आहे. मी फक्त त्याच्यावरच प्रेम करू शकते." आली का पंचाईत ? मी झटकन स्वतःला सावरीत म्हणालो, " डू नॉट मिस्अंडरस्टॅन्ड मी. मला फक्त तुझ्या त्या गोड गळ्याचा पापा घ्यायचाय. क्या गला दिया है उपरवालेने." माझ्या गाडीतून परत येत असताना तिनं माझी विनंती मान्य केली व मला ओब्लाइज केलं हे सांगायला नकोच. ही आमची सुरुवात– गंमत म्हणून सुरुवात केली व एक दिवस सपशेल तिच्या प्रेमात पडलो. अगदी वन सायडेड वन वे. नंतर झालं काय ? एक दिवस मी व भगवान बॉम्बे लॅब मध्ये एका चित्राची ट्रायल पाहत होतो. ही ' सीता ' भेटायला आली. सारखी रडत होती. मी म्हणालो, " क्या हुआ ? "

ती रडत म्हणते, " हुसनलाल हा खोटा माणूस आहे. वाईट माणूस आहे. मी तुझ्याशीच लग्न करणार. "

वा—हे सगळं अगदी मला पाहिजे तसंच होत होतं. मी म्हणालो, " अग, पण तुझं व त्याचं आधी जमलंच कसं ? "

ती म्हणते एक दिवस तो म्हणाला होता की आय आणि यू मधे

एक शब्द असतो तो तुला माहीत आहे का ? ''

मी म्हणाले–

'' हो, लव्ह.'' आणि त्याने ते वाक्य पुरं केलं– आय लव्ह यू अशी आमची सुरुवात. मी म्हणालो—

'' अग आय आणि यू च्या मधे आणखी बरेच शब्द असू शकतात. किल, लव्ह, किस आणि बरेचसे न छापण्यासारखे पण असतात.'' ती म्हणते '' आज मी त्याची बायको पाहिली. ती प्रेग्नंट होती आणि असं म्हणून ती परत रडू लागली. आता बोला, हुसनलालची सख्खी बायको गरोदर म्हणून हिला राग. इतकी जेलस. मला हे सांगून तिची अपेक्षा काय, तर मी तिच्यावर प्रेम करावं. मीही शादीशुदाच की ! पण हे सगळं माहीत असूनसुद्धा आम्ही प्रेम करायला लागलोच. आता वन वे नाही. बोथ वेज ' दोनो तरफ आग लगी थी बराबर ' खूप प्रेम केलं. गाडी, स्टुडिओ, चौपाटी अगदी सगळीकडे.

एक दिवस मी व ती खूप रंगात असताना ती अगदी बेभान होऊन '' हाय हुस्सू '' म्हणाली. बोंबला. हुस्सू हा हुसनलालचा शॉर्टफॉर्म. वारे मी ! तरीही प्रेम करतच होतो. मला लेकाला केव्हा अक्कल येईल ?

'' इश्क नाजूक मिज़ाज है बेहद
अक्लका भी बोझ उठा नही सकता ''

नंतर कळलेली एक गोष्ट आठवते. फिल्म लाइनमध्ये कोणी म्युजिशियन जरी मेला तरी त्या दिवशीचे सगळे रेकॉर्डिंग रद्द करतात. वादक व गायक कोणीच कामाला जात नाही. असे असूनसुद्धा ज्या वेळेस हुसनलाल मेले त्या दिवशी ही ' सीता ' रेकॉर्डिंगकरता सर्वप्रथम हजर होती. हाच तो हुसनलाल ही बातमी मला पं. रामनारायण, प्रख्यात सारंगीवाले ह्यांनी सांगितली.

बहुतेक बायका पझेसिव्ह असतात. पण ही म्हणजे अफाटच. मी तिचा ' बंदा ' झालो, हे तिच्या लक्षात येताच तिनं हक्क गाजवायला सुरुवात

केली. तिचा पहिला हट्ट – शराब छोडो (दारू सोड). झालं. इथे ती चुकली. वयाच्या बाराव्या वर्षांपासून माझा एकच प्रामाणिक मित्र आहे. माझ्यावर रागवत नाही की सोडून जात नाही. मी जे त्याच्यापासून एक्स्पेक्ट करतो ते तो मला देतो, कधीही नाही म्हणत नाही, काहीही एक्स्पेक्ट करत नाही. व तो किंवा ती – काय वाटेल ते म्हणा– तो म्हणजे '' शराब ''

'' हम अपने दर्दकी तौहीन कर गये होते.
अगर शराब न होती तो मर गये होते ''

समजायला लागल्यापासून माणसाला दोनच गोष्टी सोडत नाहीत. एक दुःख व दुसरी शराब. या दोघांची सांगड घालावी व अगदी निर्धास्त जगावं. या बायका लग्न झाल्यावर किंवा प्रेम जमल्यावर मुकादम किंवा मास्तरसारख्या रुबाब का करतात कोण जाणे. तिनं दारू सोडा म्हटलं की मी तुझ्याशी लग्न झाल्यावर सोडेन असं म्हणायचो. लग्न न करायचं हे तर मी ठरवलेलंच होतं. माझी भावुकता इतकी फालतू आहे की विचारूच नका. फार त्रास झालाय. ह्या अशा फालतू स्वभावानं. मी तिच्या प्रेमात पूर्ण बेभान झालो होतो. तिलाही माझ्या सच्चाईचा विश्वास होता.

दिल्लीची घटना आठवते. एका चित्राच्या रिलीजसाठी मी व ती दिल्लीला गेलो होतो. रात्री तिथल्या डिस्ट्रिब्यूटरने पार्टी ठेवली होती. तिला म्हटलं ' चल ' ती म्हणाली, ' तुम्ही सगळे तिथे दारू पिणार, माझी तर इच्छा आहे की तू पण जाऊ नकोस.' मी म्हणालो, ' असं कसं ? चित्र माझं आहे. पार्टी माझ्याकरता आहे. वाटल्यास लवकर येईन.' ती म्हणाली, ' जास्त पिऊ नकोस ' मी म्हणालो, ' फक्त दोन पेग ', असं म्हणून गेलो. पार्टीमधे दोन पेगचं आश्वासन विसरलो. विचार केला दोन पेग काय अन वीस पेग काय वास तेवढाच येणार ! चिकार पिऊन सकाळी पाच वाजता हॉटेलवर आलो. टॉप मूडमध्ये होतो. ती रडत वाट पाहत होती. मला पाहिल्यावर रागावली. मलाही राग आला. म्हटलं– ' शट् अप्, पाय दाब ' अन् झोपलो. सकाळी

१० वाजता उठून बघतो तर ती अजून पाय दाबत होती. मलाही वाईट वाटलं. पुन्हा तिला त्रास द्यायचा नाही असं ठरवलं.

तिनं एकदा बडे गुलाम अलींचं गाणं ठरवलं होतं. मी गेल्याशिवाय गाणं सुरू करणार नाही हे तिनं सांगितलं होतं. काय करू ? मला थोडा उशीर झाला. सगळे रसिक माझी वाट पाहत होते. मी पोहोचताच ती पळत आली व जवळ येताच पळतच मागे गेली. माझ्या तोंडाला दारूचा वास येत होता. ओरडून म्हणाली, 'आजचा हा असा दिवस अन् तू पिऊन आलास.' मी ही ओरडलो,–'स्वतःच्या पैशाने पितो, कुणाच्याही बापाच्या पैशाने पीत नाही. स्वतःच्यासुद्धा बापाच्या पैशाने पीत नाही.' हे ऐकताच ती बेशुद्ध पडली. सगळा गोंधळ. तिला चक्कर यायची सवय होती. तिनं लवकर शुद्धीवर यावं म्हणून मी दोन चमचे व्हिस्की तिच्या तोंडात टाकली. ती व्हिस्कीनं लवकर शुद्धीवर आली. मला म्हणते–'वास येतोय तोंडाला–तू मला दारू पाजलीस ?' मी हो म्हटलं तिनं तोंडात बोट घालून खूप ओकाऱ्या काढल्या. नुसत्या वासानंसुद्धा तिचे फार हाल होत असत. आता मला लोक सांगतात की ती चिक्कार दारू पिते. मी म्हणतो–ते कधीही शक्य नाही, ती वाटेल ते करेल पण दारू कधीही पिणार नाही. तिला वाटतं दारू पिण्याइतकी वाईट गोष्ट कुठलीही नाही. म्हणून ती हे सोडून वाटेल ती वाईट गोष्ट करते. त्या सर्व गोष्टी दारूपेक्षा चांगल्या आहेत असं ती समजते.

आम्हांला एकमेकांशिवाय बिलकुल चैन पडत नसे. सारखा वेळ मिळाला की बरोबर असायचो. एकदा बेन अगदी तिरसटून म्हणाली, "अहो, असलं काही करायचं होतं, तर काही रंग, रूप, नाक, डोळे पाहून तरी करायचं. काय ध्यान आहे." ते शब्द झोंबायचे नाहीत मला. उलट प्रेमाचा कैफ आणखी वाढायचा. मी अगदी मजनू असल्यासारखं सांगायचो. अरे, हमारी नजरोंसे तो देखो, आणि खरंच आहे की ती गात असताना फार सुंदर दिसते.

"दिलसे उतर गयी दुनियाकी सूरतें सब"

"कुछ ऐसा चढ गया है कोई मेरी नजरमे"

एकदा बेनने आक्रमक पवित्रा घेतला. सीता व मी मेट्रोला पिक्चर बघायला चाललो होतो. बेनने आमचा पाठलाग केला. मेट्रोसमोर माझी गाडी थांबते न थांबते तोच बेन आली तिने व सीतेचे केस धरून तिच्या फाड फाड ४–५ थोबाडीत मारल्या. हे फार अनपेक्षित होते. लगेच गर्दी जमली. २००–३०० माणसं जमा झाली, मला व माझी गाडी ओळखणारी. जी काही अब्रू जाणार होती ती फक्त माझीच. असल्या मामल्यात मी फारच डरपोक. मी लगेच बेनला गाडीत ढकललं व पळून गेलो, सीतेला तिथंच एकटं सोडून. पण इतकं होऊनही मी प्रेमाच्या धुंद वलयातून बाहेर पडू शकलो नाही. त्या दिवसापासून ती सीता, बेनचा कसा सूड उगवता येईल हे पाहू लागली. माझी आसक्ती तिला स्वतःची महान जीत वाटायची. मेट्रो चकमकीनंतर मी तिच्या घरी गेलो की ती बेनला फोन करून म्हणे, "तुझा नवरा बघ माझ्या घरी कसा कुत्र्यासारखा येऊन बसला आहे."

तिच्या स्वभावात हा अजब असुरीपणा. काही काही गोष्टी ह्या जगात विचित्र होत असतात. बेनवर ती असा सूड घेत होती. पण ! ही ती वेळ आहे ज्या वेळेस रेफ्रिजरेटर हे प्रत्येकाच्या घरी नसत. त्या वेळेस तिनं माझ्याकडे रेफ्रिजरेटरचा हट्ट घेतला. माझ्याकडे पैसे नव्हते. मी सगळे पैसे बेनकडे देत असे. मी साई प्रॉडक्शनचा भागीदार असल्यामुळे मी ओम्‌प्रकाशला सांगितले की 'त्याने' कंपनीतून पैसे घ्यावे व तिला रेफ्रिजरेटर घेऊन द्यावा. गंमत अशी की कंपनीतही पैसे नव्हते. ओम् बेटा फारच हुषार. तो बेनकडे गेला व म्हणाला, 'अण्णाको मत बोलो. कंपनीको सेट लगानेके लिए, पाच हजार रुपये चाहिये.' बेनने कंपनीकरता म्हणून दिले, आणि ह्या ओमने बेनने दिलेले पैसे तिच्या रेफ्रिजरेटरकरता खर्च केले, व तिच्याकडे रेफ्रिजरेटर नेऊन दिला. ही गोष्ट ओमप्रकाशनेच पाच-सहा वर्षांपूर्वी सांगितली. अजून तरी हे बेनला व त्या सीतेला माहीत नाही.

एकदा असाच माझा व तिचा खटका उडाला. मी रडू लागलो. त्यात ते

एवढं रडण्यासारखं काय आहे, असं म्हणत, ती हसत हसत आत गेली. आत तिची मंगला नावाची मैत्रीण बसली होती. तिथं रडत असताना त्या सीतेची आई आली व म्हणाली, "अण्णासाहेब, का उगाच त्रास करून घेताय, ह्या कारटीजवळ फक्त नरडं आहे, बाकी अगदी दुष्ट मुलगी आहे ती." घरी जायला निघालो त्यावेळी ती सीता म्हणाली, "जाताना ह्या मंगल्ला रस्त्यात सोड." मंगल गाडीत बसताच मला म्हणाली, "अहो अण्णा, तुम्ही कुणासाठी रडता ? मी तिला फार चांगली ओळखते. बाहेर तुम्ही रडत होता व ती आत येऊन हसत मला म्हणायची, बाहेर बघ राम कसा रडत बसला आहे, आणि परत हसायची. तिला असा भाव दिला की भलताच उन्माद येतो. तुमच्या प्रेमाला तिच्याकडून कधीही साद मिळणार नाही."

तिची मैत्रीण उपदेश करते, माझे मित्र, भगवान, ओमप्रकाश, राजेंद्र-कृष्ण पण मला चेतावणी द्यायचे, म्हणायचे, "यह उनमेंसे है जो कभी किसकी नही होती. खुदको बरबाद मत करो." माझा एक मित्र 'शम्स लखनवी' तर म्हणायचा 'सांप और औरत जहाँ मिले उनको सिर्फ मारो, प्यार बार झूट है' मी माझ्या सर्व मित्रांना सांगायचो, मैत्री टिकवायची असेल तर तिच्याबद्दल वाईट बोलू नका व मला उपदेश करू नका. पण एकटा असलो की सर्व आठवायचं, वडिलांचे सुद्धा हेच शब्द "बाईवर विश्वास ठेवू नको, बाईपासून जपून रहा," हे आठवायचं. ह्या सर्व वैतागावर एकच औषध.

"यह न पूछो कि मुझे उनकी तमन्ना क्यों है
यह सीतम होशमे रहके देखे नहीं जाते"

ह्या त्रास शुद्धीवर राहून सहन होत नाही, म्हणून पिणे. मी आता तिच्यापासून दूर दूर जात होतो व तीही माझ्यापासून.

मी एक दिवस एका मुलीला घेऊन बॉम्बे लॅबमध्ये रेकॉर्डिंगला गेलो. रेकॉर्डिंग त्या सीतेच्याच गाण्याचं होतं ! मी त्या मुलीची व तिची ओळख करून देत म्हटलं, "या मुलीशी मी लग्न करणार आहे. त्यावेळी ती सीता चूप

राहिली. पण नंतर एका रेकॉर्डिंगच्या वेळी ती एका मुलाला घेऊन आली व माझी ओळख करून देत म्हणाली, "हे एक प्रिन्स आहेत. अन् पूर्वी तू जसा मला होतास ना, तसा आता हा आहे." बदला किंवा सूड घेण्याची काय ही किळसवाणी पद्धत. शेवटी मला जे पाहिजे होतं ते तिनंच केलं. माझ्याशी भेटणं, बोलणं बंद केलं. उशिरा का होईना मला वडिलांचं म्हणणं पटलं.

"न आया हमे इश्क करना न आया
मरे उम्रभर और मरना न आया"

वरचा संवाद झाला त्या वेळेस मला तिनं पाठवलेलं एक पत्र आठवलं. तिनं लिहिलंय—

मेरे राजा— तेरी ठोकरमें जमाना है, तेरे हाथोंमें आस्मान है. तू डरता क्यों है ? तू मामुली आदमी थोडाही है ? तू बहुत बडा है, मेरा राजाभी कभी छोटा हो सकता है भला ! याद रखना, बहादूर बनके जीओ. बुजदिल होके रहनेसे मौत बेहतर होती है.

यह मत भूलो तुम महाराष्ट्रकी शान हो. तुम्हारी वजहसे हम लोग सर ऊँचा करके घूम सकते हैं. तुम्हारा पार्श्वसंगीत दस दिनमें होनाही चाहिये. मुझे निराश मत करो, मेरे राजा. साईबाबाका नाम लेकर काम करो, तू कभी नाकामयाब नहीं हो सकता. तुझपर साईबाबाका पूरा आशीर्वाद है.

राजा, खत पूरा करती हूँ. आगे बढो, मेरे शेर. अगर वक्त मिला तो जबाब देना, और यह लिखते रहेना कि रोज कितना काम होता है. मेरे ओजीको नमस्कार कहना.

सिर्फ तुम्हारी
× ×

हे ते प्रेमपत्र. आहे की नाही गंमत.

माझे काही मित्र तिला क्लिओपात्रा म्हणतात. ती फार महत्त्वाकांक्षी, धोरणी व श्रूड आहे. ती कलावंत आहे. बरी कलावंत पण माणूस म्हणून अगदी क्षुद्र— तिच्यावर प्रेम करायला लागल्यापासून अजूनपर्यंत

कुठलंही नवीन गाणं करत असताना तीच माझ्यापुढे असते. तिच्याच करता मी गाणं करतो हे सांगायला मला संकोच वाटत नाही. असे एक ना दोन हजारो किस्से.

“ ज़माना बडे शौकसे सुन रहा था
हमी सो गये दास्ताँ कहते कहते ”

♠ ♠

१६

सन १९६२. अष्टग्रही – माझ्या कुंडलीत आठव्या घरामध्ये हे आठ ग्रह एकत्र. मजा आला अगदी. सबंध वर्षभर म्हणजे बारा महिने एकही गाणं रेकॉर्ड केले नाही. वर्षानुवर्ष मी गाणी करतोय. कधी कधी एकेका दिवशी ५–५ गाणी केलीत. पण हे सबंध वर्ष नो रेकॉर्डिंग. पिक्चर नाही. वेड लागायची पाळी आली आहे.

जुहू लायन्स क्लबचा मी मेंबर होतो. त्यांच्या चॅरिटी ड्राइव्हसाठी बिर्ला मातोश्री सभागृहात कार्यक्रम देत होतो. कार्यक्रम चालू असताना महेंद्र कपूर माझ्याकडे आला व म्हणाला, “इमर्जन्सी डिक्लेअर हो गयी है.” युद्ध–वॉर भारताच्या स्वातंत्र्यानंतर पहिलंच युद्ध. एक गाणं तयार होतं. कवी प्रदीपनं लिहिलेलं—

बिगुल बज रहा आज़ादीका गगन गूँजता नारोंसे
मिला रही आज हिंदकी मिट्टी नजर सितारोंसे
एक बात कहनी है लेकिन आज हिंदके प्यारोंसे

जनतासे, नेताओंसे फ़ौजोंकी कडी कतारोंसे
कहनी है एक बात हमें इस देशके पहेरेदारोंसे
सम्हलके रहना अपने घरमें छुपे हुवे गद्दारोंसे ॥

त्या कार्यक्रमात ते गाणं इमर्जन्सीमुळे फिट बसलं. सर्वांना अतिशय आवडलं.

डिसेंबर ७ ला पण एक कार्यक्रम होता. त्याचं नाव 'समरसंगीत'. नौशाद, शंकर जयकिसन, बर्मन व मी. आम्ही गाणी देणार होतो. एकही नवीन चित्र नाही. लता तर माझ्याबरोबर गात नव्हतीच. कार्यक्रम तर द्यायलाच पाहिजे. आता युद्धाची गाणी फिल्म साप्ताहिकात यायला लागली होती. असंच साप्ताहिक चाळत असताना हे गाणं सापडलं, अर्धवट फाटलेलं. सुरुवातीची ओळ होती, वारे-चाऊ एन लाई तुझको शरम न आयी – भूल गया क्या वादा आपना – हिंदी चीनी भाई भाई. त्या समर-संगीताच्या कार्यक्रमात हे एकच गाणं असं होतं. श्रोत्यांना ते अतिशय आवडलं. ३-३ वेळा वन्स मोअर मिळाला. दुसऱ्या सर्वांनी जी गाणी म्हटली ती सर्व लव्ह साँग्ज् होती. त्यांचा व समरगीताचा काहीच संबंध नव्हता. म्हणून हे अधिक जास्त आवडलं असावं. मीच हे गाणं म्हटलं होतं.

त्यानंतर ता. २७ जानेवारी ६३ ला दिल्लीला कार्यक्रम. ह्या वेळेला मदनमोहन होता. माझे आदरणीय अनिल विश्वास होते. एकही चित्र माझ्याकडे नाही. दिल्लीत कार्यक्रम. माझी ॲम्बिशन, २७ जानेवारीला आवडत्या नेत्यांच्यापुढे दिल्लीला कार्यक्रम देण्याची. देवाने ऐकली पण काय देणार, काय म्हणणार? मनात तडफडत होतो. काही सुचत नव्हतं. एकाएकी आठवलं–प्रदीप–प्रदीपकडे गेलो. म्हटलं–२७ जानेवारीकरता मला गाणं दे; मला म्हणतो. 'फुकटका काम होता है तो आते हो'. बोंबला. मी त्याच्याकरता जे केलं होतं ते तो विसरला. मला जसं गाणं पाहिजे तसं देणारा हिंदीत एकच कवी–प्रदीप. मी गाणं त्याच्याचकडून घेणार. दिलीपकुमार हा आमच्या कमिटीचा चीफ होता. त्याने सांगितलं की पंडितजींना फक्त सिनेमातीलच गाणी ऐकायची आहेत. दुसरी नाही. मेलो. माझ्याकडे पिक्चर्स नाही तर गाणं कुठे? म्हणून प्रदीप. प्रदीपकडे परत परत जायचो, सांगायचो, माडगुळकरांनी बघ कशी गाणी लिहिलीत,

"फार झाले दिवस आता पाहू पाहू वाटते", "जिंकू किंवा", आणि, "या देशाचा मी संरक्षक । भारत माझे गाव, सैनिक माझे नाव" असली गाणी प्रदीपला सारखं ऐकवायचो, त्याला चिडवायचो. शेवटी एकदाचा कबूल झाला. प्रदीप म्हणजे कामात भूत आहे. त्याने जवळ जवळ १०० कडवी लिहिली.

लताने ह्या कार्यक्रमालाच येणार नाही म्हणून सांगितलं होतं. दिलीप मला सारखं म्हणायचा 'तू कहे–लता मस्ट कम.' मी म्हणालो, 'ती नाही म्हणते म्हणजे नाहीच येणार. मी आशा भोसलेकडून माझं गाणं घेणार आहे. नाही तरी माझ्याबरोबर लता गातच नाही. ती नेहमी दुसऱ्यांच्या-कडे गाते. शी शुड सिंग देअर साँग्ज नॉट माइन. ती यायलाच तयार नव्हती.' दिलीप अस्वस्थ होता.

एके दिवशी सकाळी प्रदीपचा फोन आला की लता तुझं गाणं म्हणायला तयार आहे. मी म्हणालो, 'नाही. आशा म्हणणार आहे. आशा तयार आहे. आता मी तिला नाही म्हणणार नाही.' तरी प्रदीप म्हणाला, 'लतालासुद्धा घ्या' मी म्हणालो, 'मग दोघी म्हणतील आशा व लता.' प्रदीप म्हणाला, मी थोड्या वेळाने सांगतो. नंतर म्हणाला त्याने लताला फोन केला होता–चालेल– लता व आशा दोघीही म्हणतील. ही बहुधा ता. २१ जानेवारी असावी.

मी कोणती गाणी म्हणणार म्हणून आमच्या कमिटीकडून चौकशी व्हायची. मी म्हणायचो, प्रदीप अजून गाणं लिहितोय. इकडे राज कपूर म्हणायचा, "अण्णाजी, आप वही गाना गाइये" वारे चाऊ एन लाई तुझको शरम न आयी!" आता तुम्हीच सांगा, पंडितजींच्यासमोर गाणं म्हणायचं ते हे म्हणू? शक्यच नाही.

प्रदीपनं गाणं लिहिलं– ऐ मेरे वतनके लोगो. तुम खूब लगा लो नारा गाणं लिहायला त्याला साधारण १५ दिवस लागले. रोज रात्री ७ ते १ वाजेपर्यंत आम्ही घरी बसत असू. १०० कडवी लिहिली. त्यांतून ५–६ निवडायची, हेही एक दिव्यच होतं. सगळीच कडवी चांगली होती. असं करत करत शेवटी एकदाचं गाणं फायनल झालं. साधारण गाणं व चाल ता. १८–१९ पर्यंत कंप्लीट झालं.

मी काय गाणं देणार म्हणून सगळ्यांच्या चौकशा सुरू झाल्या. कोणालाच काही माहीत नव्हतं. सगळ्या म्यूझिक डायरेक्टर्सनी रिहर्सल्स पण सुरू केल्या होत्या. फक्त माझीच रिहर्सल होत नव्हती. कोरस मुलं, मुली, म्युझिशियन्स ह्यांना माझ्या गाण्याची काहीच कल्पना नव्हती. त्यातून ता. २४ ला मी व शर्मा रेकॉर्डिस्ट दिल्लीला जाणार होतो, तिथली साउंड सिस्टिम बघायला. तारीख २१ ला माझा असिस्टंट जॉनी याला बोलावून मी गाण्याच्या शेवटच्या फक्त ३ ओळी लिहून दिल्या. हेच फक्त म्युझिशियन्सनी वाजवायचं. ता. २२ ला कोरसला बोलावून फक्त पहिल्या ओळीची चाल सांगितली. शब्द नाहीत. ता. २३ ला आशा व लताला रिहर्सलला बोलावलं. लता आधी आली, मग आशा. गाणं लिहून दिलं व रिहर्सल सुरू करणार तो लता आशाला म्हणते, ‘ तू सांगत का नाहीस रामला की तुझी तब्येत चांगली नाही, तू येऊ शकत नाहीस, म्हणून ! ’ आशा मला हॉलच्या बाहेर घेऊन गेली व म्हणाली, ‘ अण्णा, लताची इच्छा नाहीं, मी हे गाणं म्हणावं म्हणून. मी दिल्लीला येत नाही. ’ मी म्हणालो, ‘ अग, तुझं तिकिट पण काढलंय. तूच आधी म्हणणार होतीस, प्लीज ये. ’ ती म्हणाली, ‘ मी नाही येत. ’ व ती निघून गेली. फार वाईट वाटलं. आशा फार छान मुलगी आहे व चांगली गाणारी पण. असो. आता राहिली लता एकटी. आशानं का ऐकलं कुणास ठाऊक ! मोठ्या बहिणीचा मान ठेवला असावा स्वतःचा बळी देऊन.

१७

गाण्याच्या सुरवातीच्या ओळी आहेत “ ऐ मेरे वतनके लोगो तुम खूब लगा लो नारा– यह शुभ दिन है हम सबका लहरा लो तिरंगा प्यारा– ” हे गाणं नंतर सॅड होतं, पण सुरुवात हॅपी आहे. शब्दावरून सुरवातीला हॅपी म्यूझिक पाहिजे. म्हणून जायच्या आदल्या दिवशी जॉनीला ते हॅपी म्यूझिक लिहून दिले, रिहर्सल घ्यायला सांगितली. लताचीसुद्धा खास रिहर्सल झाली नव्हती. तिला मी गाणं म्हणून टेप करून दिलं व एक दिवस आधी दिल्लीला ये म्हणून सांगितलं. व ता. २४ ला मी व शर्मा दिल्लीला गेलो. प्लेनमध्ये शर्मा मला विचारतो– ये ×× क्यों आ रही है ? मी म्हणालो– उसकोही पूछ.

हे सर्व इतकं सीक्रेट ठेवायचं कारण म्हणजे, गाण्यामध्ये गाण्याची कल्पना हा फार मोठा भाग आहे त्या शब्दांचा व चालीचा. माझ्या मताप्रमाणे आतापर्यंत देशभक्तीचे गाणे म्हणजे नुसतं लढा, मारा, मरून जाऊ अशा टाइपचं आहे. हेच गाणं असं आहे की जवानांनी किती त्रास सोसला,

बर्फात काय हाल झाले, कशा परिस्थितीत लढले, व त्यांची तारीफ आहे. आता ही कल्पनाच जर चोरीला गेली असती तर गंमतच संपली. त्यानंतर चाल. देशभक्तीची चालसुद्धा सॅड स्वरांनी होऊ शकते, हे कुणालाच पटणार नाही म्हणून हे सीक्रेट.

ता. २६ ला लता आली. मी अशोक हॉटेलमध्ये होतो, तिथंच उतरली. तिथं तिनं त्या दिवशी भरपूर रिहर्सल केली. उद्या ता. २७ ला दुपारी २॥ वाजता कार्यक्रम.

ता. २७ ला सकाळी बाकी सगळे आले. म्युझिशियन्स, आर्टिस्ट, कोरसचे सगळे— दोन प्लेन्स भरून आले.

हॅपी म्युझिकची सुरुवात फ्ल्यूटपासून होती. मनोहारी फिल्म सिनेचा सर्वांत चांगला फ्ल्यूटिस्ट सुरुवात करणार होता.

सगळे आम्ही दुपारी १ पासूनच स्टेडियमवर होतो. बरोबर २॥ वाजता पंडितजी आले. प्रोग्रॅम सुरू झाला. आम्ही ४ म्यूझिक डायरेक्टर्सनी एक एक गाणं पंडितजींच्यासमोर पेश करायचं ठरलं होतं. नंबरवारी कशी हे मुंबईतच चिठ्या टाकून ठरलं होतं. त्यात माझा चौथा म्हणजे लास्ट नंबर होता.

लताने आधी " आपकी नजरोंने समझा " व " अल्ला तेरा नाम " ही दोन गाणी म्हटली होती.

माझा नंबर आला. अनाउन्स झालं. म्युझिशियन्स, लता व मी स्टेजवर आलो. मी उभा राहून वन, टू म्हणालो पण म्यूझिक स्टार्ट होईना. मनोहारी विसरला त्याचा पहिला पीस आहे म्हणून. असा घाम फुटला, विचारू नका. मग परत मनोहारीला सांगितलं, यू हॅव टु स्टार्ट. परत वन, टू— सगळं बरोबर सुरू झालं. भरपूर रिहर्सल नसल्यामुळं असं झालं.

म्यूझिक संपलं. नंतर—

ऐ मेरे वतनके लोगो तुम खूब लगा लो नारा ।

यह शुभ दिन है हम सबका लहरा लो तिरंगा प्यारा ।
पर मत भूलो सीमापर वीरोंने हैं प्राण गँवाए ।

इथपर्यंत समजलं की गाणं जमत चाललंय. ऑडियन्स मन लावून ऐकतात— एवढ्यात एक प्लेन वरून जायला लागलं. मला आठवतं, तिथं बसलेल्या ४० हजार माणसांच्या माना रागानं त्या प्लेनकडे फिरल्या. विमान निघून पण गेलं. मी अगदी खूष झालो. गाणं जमलं हे समजलं; नाही तर ४० हजार माणसांच्या ८० हजार डोळ्यांनी रागाने वर का पाहावं ?

दहा मिनिटांचं गाणं, इतक्या सगळ्या लोकांनी अगदी पिन-ड्रॉप सायलेन्समध्ये ऐकलं. माझं सारं लक्ष पंडितजींच्याकडे. ते आधी थोडेसे टेकून बसले व ३–४ ओळींनंतर पुढे होऊन बसले; व वर्ड बाय वर्ड ऐकत होते. शेवटी तर—

" जय हिंद— जय हिंद की सेना, " कोरस म्हणत असताना त्यांनी इकडे तिकडे पाहिले. कुठून आवाज येत होता ? मी काय केलं होतं, कोरसला पडद्यामागं ठेवलं होतं व शर्मांला कोरसच्या वेळेला एको द्यायला सांगितलं होतं. जनरली कोरसला स्टेजवर ठेवतात, मी पडद्यामागं ठेवलं होतं. म्हणून जणू काही सर्व भारतीय सर्व हिंदुस्तानी म्हणत आहेत. जय हिंद— जय हिंदकी सेना— जय हिंद— जय हिंदकी सेना. न दिसता आवाज येत होता व इफेक्ट अप्रतिम आला— जय हिंद— जय हिंदकी सेना— गाणं संपलं— प्रचंड टाळ्या.

विचारूच नका. सगळ्यांना गाणं आवडलं. त्यांतल्या त्यांत माझ्या सर्वांत आवडत्या पंडितजींना. नौशाद, राज कपूर, दिलीपकुमार सर्वांनी अभिनंदन केलं. मेहबूबसाहेब तर म्हणाले, आपने फिल्म लाइनकी नाक ऊँची रखी. आयुष्यातला सगळ्यांत सुखाचा दिवस. ह्यापेक्षा माझ्यातल्या कलावंताची तारीफ कधीच होणार नाही. ' सारेगम पधनीसा ' कसे छान लागले होते. देवा तुझे अनंत उपकार.

नंतर इंटर्व्हल. पंडितजी गेले. परत कार्यक्रम होता. त्या वेळेस ऑडियन्स बराच कमी होता. मला गाणं म्हणायचं होतं पंडितजी गेल्यावर " वा रे चाऊ एन लाई. " म्हणायला हरकत नव्हती.

प्रोग्रॅमनंतर पंडितजींच्या घरी टी पार्टी होती. मी तिथे उशिरा पोहोचलो तर जिन्यावर पंडितजी व इंदिराजी उभे होते. दोघांनी माझे हात धरले व म्हणाले, 'आज आपने हमको रुलाया.' मी काहीही बोलू शकलो नाही. रडत दूर जाऊन बसलो. फोटो काढणं चालू होतं. त्या थोर माणसाबरोबर आपला फोटो असावा असं प्रत्येकाला वाटत होतं. म्हणून प्रत्येक फोटोत गर्दी. मलाही बोलावलं. मी पंडितजींना विनंती केली की, मला फक्त तुमच्याबरोबर एक फोटो पाहिजे. त्यांनी लगेच 'हो' म्हटलं व एक फोटो काढला गेला.

थोड्या वेळाने आमचे माननीय यशवंतराव चव्हाण आले. त्यांनी कडकडून मिठी मारली. ह्यात सगळं आलं. परत त्यांच्याबरोबर फोटो. जिथं पार्टी होती त्याच्याशेजारी पंडितजींची स्टडी रूम, सिटिंग-रूम होती. डेव्हिड इब्राहीम, राम कमलानी व पंडितजी तिकडे गेले व मग मला त्यांनी तिकडे बोलावून घेतले आणि तिकडे कोणीही येऊ नये असं तिथल्या शिपायाला सांगितलं. त्यांच्या स्टडी रूममध्ये गेलो. खालपासून वरच्या आढ्यापर्यन्त सगळी पुस्तकंच पुस्तकं. एक भलंमोठं टेबल व एक खुर्ची. मी पुस्तकांच्याकडे पाहू लागलो तर पंडितजी एकदम म्हणाले, डोन्ट थिंक आय हॅव रेड देम ऑल आणि हसले. नंतर सिटिंग-रूममध्ये गेलो. आणि तेथे भलेमोठे दोन हस्तिदंत होते. नंतर एक चायनीज क्लेचा घोडा होता. तो दाखवला व म्हणाले, असा घोडा फक्त माझ्याकडेच आहे. जो फुटलेला किंवा जोडलेला नाही व छान हसले, लहान मुलासारखे.

पार्टी आटोपून अशोक हॉटेलमध्ये सर्व परत आलो. मला आता एकट्यालाच खोलीत बसावयाचे होते. सगळ्या मित्रांना सांगितलं की मला एकटं बसायचंय.

सगळे प्रसंग डोळ्यांपुढे आले. आधी प्रदीप. काय सुंदर गाणं लिहिलंय

त्याने. तोच दिल्लीला नाही आला. दुसरी आशा – बिचारी हा एकच शब्द. नंतर ता. १२-१-१८ ते २७-७-६३ पर्यन्त वाटचाल. काय झालं? काय झालं नाही? आयुष्यात सगळे ॲक्सिडेंटस् – बरे – वाईट – लढाई – घरात, घराबाहेर – धंद्यात – इतकंच नाही– माझ्या मनातसुद्धा. पण काय बरोबर – काय नाही – काय वाईट, काही माहीत नाही. काहीच समजलं नाही. सुचत नव्हतं काही, म्हणून व्हिस्की पीत होतो. सिग्रेट पीत होतो. आणि कुठे तरी बघत होतो.

लहानपणापासूनचे सगळं चित्र डोळ्यांपुढे येत होतं.

लहान असताना सिनेमा बघण्याकरता पानवाल्याची चोरी केली. मास्तर शंकरराव सप्रे ह्यांचा मार खाल्ला. शंकरराव सप्रे ह्यांनी मला संगीताचा 'श्रीगणेशा' शिकवला, त्यांचे उपकार मी कधीच विसरणार नाही. पण सिनेसंगीताचे माझे आणखीही गुरू आहेत. अनिल विश्वास, रामचंद्र बोरल, पंकज मलिक, गोविंदराव टेंबे, मास्तर कृष्णराव, गुलाम हैदर, खेमचंद्र प्रकाश, डी. पी. कोरगावकर, पं. अमरनाथ, ह्या सगळ्यांचे सूर ऐकून मला खूप सुचलं. माझं सिनेसंगीत क्षेत्रातील यश हे ह्या सर्वांच्यामुळे आहे. शाळेच्या प्रोग्रेस बुकावर वडिलांच्या खोट्या सह्या केल्या. आई नसून आईपेक्षा जास्त प्रेम करणाऱ्या गोदूताई आठवल्या. मी ब्राह्मण म्हणून त्या हरिजन मुलीचा लग्नाला नकार. दुसऱ्या मुलीच्या डेथच्या दिवशी गाणं रेकॉर्ड केलं. पहिल्यांदा जपानला जात असताना उडालेली गडबड. किती तरी मुलींशी प्रेम केलं. बऱ्याच वेळी फसलो व बाईवरचा विश्वास उडाला. तेव्हा एका मुलीनेच सावध केलं. वा–वा–! किती टेक्निकलर जीवन! देवाने सगळं दिलं. पण

स्वर्गांचे सगळेच गूढ वसले काळाचिया लेखनी,
बोले विश्वसुनी कधी तरि मला सांगेल का ते कुणी ॥
काळाची जर ही निगूढ लिखिते आम्हा कळाली तरी,
देवा रे – वसुधा क्षणात बनवू प्रत्यक्ष स्वर्गापरी ॥

♠ ♠